

१९६५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १२५६८

REFBK-0014427

# उद्योगपति बाबासाहेब डहाणूकर

लेखक - पु.बा. कुळकर्णी

# उद्योगपति
# बाबासाहेब डहाणूकर

जीवन कार्याचा अल्प परिचय

दा. क.

लेखक

**पुरुषोत्तम बाळकृष्ण कुळकर्णी**

ना. नानाशंकरशेट, मामा परमानंद आणि त्यांचा कालखंड,
योगी अरविंद घोष, देशबंधू चित्तरंजन दास
वगैरे चरित्रांचे लेखक.

REFBK-0014427

REFBK-0014427

*सर्वाधिकार प्रकाशकांच्या स्वाधीन*

प्रथमावृत्ति १९६५

प्रकाशक : **मनोहर पांडुरंग लिमये**
c/o एम्. एल्. डहाणूकर आणि कंपनी,
इंडस्ट्रियल अशुअरन्स बिल्डिंग,
चर्चगेट, मुंबई १

मुद्रक : **विष्णु पुरुषोत्तम भागवत,**
मौज प्रिन्टिंग ब्यूरो,
खटाववाडी, गिरगांव, मुंबई ४

अनुक्रम ३८९९२ वि: चरित्र
क्रमांक १२५६५ नों: दि: ७।१।।६५

# प्रस्तावना

**या** जगांत मी केवळ माझ्याच कर्तृत्वावर नांवालौकिकास चढलों असें कदाचित कोणालाही म्हणतां येणार नाहीं. कारण यश मिळविणें हें अनेक घटकांवर अवलंबून असतें. त्यांत स्वतःच्या गुणांचा पाया असून योग्य प्रसंगीं दुसऱ्यांनीं दिग्दर्शन किंवा इतर रूपानें केलेलें साहाय्य, अनपेक्षित पण अनुकूल परिस्थिती व भाग्याचा लहानमोठा अंश या सर्वांचा समावेश असतो. अंगीचें कर्तृत्व नेहमींच सात्त्विक व नीतिनिष्ठ असतें असेंही अनुभवावरून म्हणतां येत नाहीं. शोषक किंवा फसवेपणाच्या कर्तबगारीनें मातबर झालेले लोक काय कमी नाहींत. लढाईच्या हंगामांत तर जुवेबाजी, फटकाबाजार, काळाबाजार यांच्या जोरावर शिरजोर झालेले उद्योगपती मोठ्या प्रमाणांत जगांत मिरवणारे आढळतात. अशा वातावरणांत धोपटमार्गानें, धडाडीनें व धाडसानें साधारण अवस्थेंतून डोकें वर काढून निर्देशनीय उद्योगपतिपद गांठलेल्या माणसांचीं उदाहरणें दृष्टीस आलीं तर मनाला एका तऱ्हेचें सात्त्विक समाधान मिळतें, व होतकरू नवीन पिढीकरितां एक भव्य मार्गप्रदीप आढळतो. अशा माणसांमध्यें श्री. बाबासाहेब डहाणूकर यांची प्रामुख्यानें गणना करतां येण्यासारखी आहे.

श्री. महादेव लक्ष्मण ऊर्फ बाबासाहेब डहाणूकर हे या ग्रंथाचे चरित्र-नायक आहेत. लेखक अशा प्रकारच्या वाङ्मयक्षेत्रांत नांवारूपास चढलेले श्री. पु. बा. कुळकर्णी हे होत. हें छोटेखानी चरित्र श्री. कुळकर्णी यांनीं उत्साहानें पण मार्मिकतेनें व वास्तवाची कास न सोडतां लिहिलें आहे. या ग्रंथांत अशा प्रकारच्या वाङ्मयांत अनेक वेळां दृष्टीस येणारे दोष – सत्य-

विपर्यास, अतिरंजन, पक्षपात, बेहद स्तुती वगैरे–आढळून येत नाहींत. यामुळें हें चरित्रलेखन आकर्षक व उद्बोधक झालें आहे.

श्री. बाबासाहेब डहाणूकर यांचा व त्यांच्या परिवाराचा व माझा परिचय आज जवळ जवळ २५ वर्षांचा. मुंबईच्या खंबाला हिलच्या उत्तर टोकाच्या परिसरांत दोन श्रीसदनें एकमेकांसमोर आहेत. त्यांतील पहिलें श्री. बाबासाहेब डहाणूकर यांचें निवासस्थान व दुसरें रिझर्व बँक हाऊस. दुसऱ्यांत त्या संस्थेचा गव्हर्नर या नात्यानें मी इ. सन १९४३ पासून इ. सन १९४९ पर्यंत राहत असें. याच अवधींत आमचें शेजारीपण मैत्रींत परिणत झालें. श्री. बाबासाहेबांच्या उद्योगक्षेत्रांतील असामान्य कर्तबगारीची चांगली जाणीव झाली व त्यांच्या शांत, मनमिळाऊ वृत्तीची, सौजन्याची, सार्वजनिक प्रश्नाविषयीं चोखंदळ आस्थेची व साधेपणाची सादर पारख झाली. बागेची व फुलझाडांची आवड दोघांना असल्यामुळें मैत्रीला एक बळकट दुवा मिळाला. माझ्या बागेंत त्या अन्नवाढमोहिमेच्या काळांत उपजविलेल्या नाचणीचें श्री. बाबासाहेब यांनीं केवढें कौतुक केलें! मी मुंबई सोडल्यानंतर दिल्लीस आलों तरी माझी भेट घेण्यास श्री. बाबासाहेब कधींहि चुकत नसत. त्यांच्या चिरंजिवांनींही हा घरोबा चालविलेला आहे, व त्यांच्याच आमंत्रणावरून टिळकनगरासही भेट देऊन श्री. सौ. दुर्गाबाई व मी श्री. बाबासाहेबांच्या औद्योगिक पराक्रमाचीं प्रतीकें–आतां राष्ट्रीयीकरण झालेलीं पाहिलीं आहेत.

हें चरित्र वाचून श्री. बाबासाहेबांच्या मित्रमंडळीस समाधान होईल व त्यांच्याशीं आतांपर्यंत परिचय नसणारांस स्फूर्ति मिळेल, असा दृढविश्वास वाटतो.

नवी दिल्ली
१९ एप्रिल १९६५

**चिं. द्वा. देशमुख**

# दोन शब्द

"दैवायत्तं कुले जन्म, मदायत्तं च पौरुषं" असें स्वाभिमानी उत्तर देणाऱ्या महारथी कर्णाची आठवण व्हावी, अशीं अनेक उदाहरणें महाराष्ट्राच्या मागील पिढींत सहजपणें दाखवितां येत असत. स्वतःच्या कर्तृत्वानें, या ना त्या क्षेत्रांत, पुढें आलेल्या ह्या महाराष्ट्रीयांना स्फूर्ति मिळाली तीही महाराष्ट्र-केसरी लोकमान्य टिळकांची. लोकमान्यांपासून स्फूर्ति घेऊन स्वदेशी, स्वधर्म व स्वराज्य ह्या स्वत्वासाठीं राबलेल्या त्या काळच्या महाराष्ट्रीयांत उद्योगपति बाबासाहेब डहाणूकर यांचें नांव कोणासही घ्यावेंच लागेल. त्यांच्या पाठीशीं तेव्हां अर्थबळ नव्हतें, मनुष्यबळहि नव्हतें. त्यांच्याजवळ होती ती केवळ जिद्द! त्याच्या बळावरच ते उद्योगपति झाले.

आज महाराष्ट्र एका संक्रमणकाळांतून पुढें चालला आहे. भारताचें भवितव्य घडविण्याच्या कार्यांत महाराष्ट्र आज पुढाकार घेत आहे. ह्या कार्यास चालना द्यायची म्हणजेच महाराष्ट्राचें औद्योगीकरण करायचें. ह्या दृष्टीनें नव्या पिढीस बाबासाहेब डहाणूकरांचें चरित्र मार्गदर्शक ठरल्याशिवाय राहणार नाहीं.

श्री. पु. बा. कुलकर्णी यांनीं वाचकांना सहज समजेल अशा सोप्या भाषेंत हें चरित्र लिहून मराठी चरित्र-ग्रंथांत जी नवी भर घातली ती कौतुकास्पद अशीच आहे. त्यांचें हें कौतुक करीत असतांनाच, वाचकांनींही हें पुस्तक वाचून त्यांचें अंशतः कां होईना, अनुकरण करण्याचा प्रयत्न केला तर तो हवाच आहे.

## उद्योगपति बाबासाहेब डहाणूकर

महाराष्ट्र आजवर त्यागावरच जगला आहे. कुबेराची संपत्ति हातीं आली तरी कर्णाच्या दातृत्वाची त्याला जोड असली तरच त्या वैभवाचें महत्त्व चिरंतन टिकतें. बाबासाहेब डहाणूकर यांच्या दातृत्वाच्या बळावर आज ज्या अनेक संस्था नांवारूपाला आलेल्या आहेत, त्या ह्या वास्तव सत्याची जाणीव देण्यास समर्थ आहेत.

अशा कर्तबगार, निष्काम व कर्मयोगी नागरिकाचा समाजास अभिमान वाटणें स्वाभाविक आहे. माझ्या स्वतःच्या जीवनांत बाबासाहेब डहाणूकरांचा नितांत स्नेह व सहयोग मला सतत लाभला. अनेक सार्वजनिक व लोकहिताच्या कामांत त्यांनीं सतत मदत केली. त्यांचें उर्वरित आयुष्य शांतीचें व सुखाचें व्हावें, हीच माझी परमेश्वराकडे प्रार्थना !

स. का. पाटील

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .............. वि: ..................
क्रमांक .......................... नों: दि: ..................

# विषयानुक्रमणिका

**प्रस्तावना** — *तीन–चार*

**दोन शब्द** — *पांच–सहा*

**निवेदन** — *तेरा ते पंधरा*

**१ बालपण व शिक्षण—** १–७

मी मुंबईला जाणार; हा लोटा तरी ने; मी द्रोणांतून पाणी पिईन; वडिलार्जित धंदा; एक क्रांतिकारक घटना; मुंबईत शिक्षण; रुळलेला मार्ग नको; आहे तें ठीक !

**२ आरंभकाळांतील उद्योगधंदे—** ८–२०

मुंबईतील पहिल्या संसाराचा थाट; ध्येयसिद्धीची पूर्वतयारी; रेल्वेंत तात्पुरती नोकरी; लाकडें पुरविण्याची ठेकेदारी; धाडस अंगाशीं आलें नाहीं; बांधकामाची ठेकेदारी; युरोपियन कंपन्यांची मक्तेदारी; दगडमातींतील काव्य; दोघां मित्रांची पहिली भेट; ठेकेदारांची संघटना; कांहीं बांधकामांचा परिचय; एक मगरुरी इंजिनीयर; उज्वल भावि काळ.

**३ लो. टिळकांची प्रेरणा व स्वदेशी भावना—** २१–३१

लोकमान्यांनीं नाडी ओळखली; तत्कालीन राष्ट्रीय पुढाऱ्यांचें निदान; जमशेटजी टाटा; लो. टिळकांचें एक भाषण; सर्वांत अनिष्ट गोष्ट; कर्तव्याची जाणीव; स्वदेशी वस्तु प्रचारिणी सभा; बाबासाहेबांचें श्रद्धास्थान; जीवनांतील स्फूर्तिदेवता; लोकमान्यां-बद्दल भक्तिभाव; बाबासाहेबांनीं वाहिलेली आदरांजली.

४ साखर कारखान्यांचा जन्म— ३२–४९

औद्योगिक क्षेत्रांतील अजरामर नांवें; औद्योगिक क्षेत्राची टेहळणी; साखरधंद्याचें उज्वल भवितव्य; लोकमान्यांच्या विचारांची शिदोरी; लोकमान्यांचा सल्ला; परदेशाचा पहिला दौरा; जीवनांतील अनिश्चितता कायम; दुष्काळी नगर जिल्हा; कामत कमिटी उपकारक ठरली; साखरेचें खाणार त्याला देव देणार; बाबासाहेब व वालचंद शेटजी. 'मला आपला आशीर्वाद द्या;' बेलवंडी येथील साखर कारखाना; मति गुंग करणारी घटना; विचित्र दैवगति; महाराष्ट्रीय बुद्धिमत्ता व चिकाटी.

५ आरंभकाळांतील अडचणी— ५०–६२

कारखाना पहावा उभारून!—कायापालट घडवून आणिला; योग्य माणसांची निवड; आरंभकाळांतील सहाय्यक; कांहीं सवलती व कांहीं बंधनें; सर जोसेफ के; श्रीमती सौ. पार्वतीबाई; साखर कारखान्याची तत्कालीन स्थिति; भरभराटीच्या काळास आरंभ; संरक्षण सहजासहजीं मिळालें नाहीं; संरक्षण मिळविण्या-पूर्वी व नंतर; जीवनांत साखरेची गोडी आणिली.

६ महाराष्ट्र साखर कारखान्याचा विकास ६३–७३

देशी व परदेशी तंत्रज्ञ; एक महत्त्वाची घटना; संशोधनाचें महत्त्व; रसायन शाळेचा उद्घाटन समारंभ; ना. यशवंतरावजीं-कडून धन्यवाद; एक अमोलिक गुण; उत्पादन क्षेत्रांत उच्चांक; अवांतर उद्योगधंदे; डिस्टिलरीची उभारणी; तांत्रिक विषयांचें ग्रंथालय.

७ **बहुजनहिताय बहुजनसुखाय** ७४–८६

जीवनसाथी श्री. गणेश स. जोशी; बाबासाहेबांचें जीवनविषयक तत्त्वज्ञान; गीताहृदयानें मनाची पकड घेतली; लक्षांत घेण्याजोगा पैलू; सर्वांचीं तोंडें गोड व्हावीं; सेवेच्या तीन पायऱ्या; वडिलांचे बहुमोल शब्द; खेडीं सुधारण्याचें महत्त्व; कामगारवर्गासंबंधींचा दृष्टिकोन; कल्याणकार्याची अल्पशी कल्पना; बौद्धिक व सांस्कृतिक विकास; विद्यादानाचें कार्य; साखरकुटुंबियांचें सुखसमाधान; थोरामोठ्यांच्या भेटी व आशीर्वाद.

८ **महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांची संघटना—** ८७–९०

संघटनेचा पूर्वेतिहास; संघटनेचा पुनर्जन्म; स्वतंत्र संस्थेची जरुरी; महाराष्ट्रीयांनीं व्यापार-उदिमांत पुढें यावें; मुंगीच्या वेगानें परंतु खात्रीनें; संस्थेला मानाचें स्थान; एक संस्मरणीय घटना; संस्थेला मालकीचें घर पाहिजे; बाबासाहेबांचें गोड स्वप्न साकार झालें; राजकीय स्थित्यंतराचा काळ; पहिल्या वीस वर्षांतील प्रगती.

९ **साखर कारखानदारांची संघटना** १००–१०२

बाबासाहेबांचा व्यवसायबंधूंना सल्ला; साखरधंद्यावरील संकट; संघटनेचा जन्म; संस्थेचें रौप्यमहोत्सवी वर्ष.

१० **बाबासाहेबांचें राजकारण—** १०३–११६

त्या काळचें राजकारण; बाबासाहेबांचें राजकारणाकडे लक्ष; कॉंग्रेस पुढाऱ्यांस मेजवानी; कॉंग्रेस लढ्यासंबंधीं आठवणी; पुढाऱ्यांबद्दल नितांत प्रेमादर; हरेकृष्ण मेहताब यांचें शुभचिंतनपर पत्र; कारखानदार, व्यापारी व राजकारण; व्यापाऱ्यांस राजकारणाचें

महत्त्व; व्यापारीवर्ग व काँग्रेस चळवळ; महाराष्ट्राच्या विकासाबद्दल तळमळ; मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र; ना. मुरारजी देसाई यांचा विरोध !

११ बाबासाहेबांचे परदेशांतील दौरे— ११७–१२३

युरोप–अमेरिकेची ओढ; जिनिवा येथील मजूर परिषद; मालक-वर्गांचे प्रतिनिधी बाबासाहेब; जिनिवा येथील कार्यक्रम; भारताचा अनुल्लेख जाणवला; स्वीडन देश पुढें कसा आला ? मालक काय करणार ! आम्हीं काय शिकावें !

१२ बाबासाहेबांचें धार्मिक जीवन— १२४–१३१

बालपणांतील धार्मिक संस्कार; देवकृपेची जरुरी; कीर्तनांची आवड; मनाचे श्लोक; जें सहज उमजलें तेंच पकडलें; भक्तिमार्गप्रदीप; सदा सर्वदा देव सन्निध आहे.

१३ कौटुंबिक जीवन— १३२–१४१

वडील मंडळीच्या शब्दांवर श्रद्धा; वडिलांचा सदुपदेश वेदवाक्य मानिला; आज जो तो आपल्यापुरता; उद्योगधंद्यांमुळें भाग्योदय; मुलांबाळांकडे लक्ष; काय करणार ? लक्ष पुरवायला वेळ नाहीं ! मानसिक समाधान; भाग्यलक्ष्मीचा सहकार; बाबासाहेबांचा दूरदर्शीपणा; बाबासाहेबांचे जामात.

१४ कारखानदारीचा वाढता व्याप— १४२–१५५

न्यू युनायटेड कन्स्ट्रक्शन कंपनी; धोरणी स्वभाव; अमृत आईल मिल; नवें क्षेत्र धुंडाळण्याकडे लक्ष; देशी कारागिरीस उत्तेजन; धंद्यांत चढउतार चालायचेच; वरळी केमिकल वर्क्स लि.;

हिंद रेझर अँड ब्लेड कंपनी; आमचें परावलंबन; तंत्रज्ञांचा तुटवडा; देशाची गरज भागविणारा कारखाना.

**१५ शिक्षणप्रसार व समाज कल्याण कार्य—** १५६–१६१

कै. लक्ष्मण बापूजी डहाणूकर ट्रस्ट; एम्. एल्. डहाणूकर कॉलेज ऑफ कॉमर्स; एम्. एल्. डहाणूकर एज्युकेशनल ट्रस्ट; श्रीमंत बाबासाहेब डहाणूकर विद्यानगर, लोणावळा; डहाणू येथील व्यायामशाळेस मदत; समाजोपयोगी इतर कार्यांस मदत.

**१६ मानसन्मानाचे विविध प्रसंग—** १६२–१७३

मुंबईचे शेरीफ बाबासाहेब; दोन ठिकाणी नगरपिते होण्याचा मान; कामगार व अधिकारी यांच्यातर्फें मानपत्र; महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फें सत्कार.

**१७ समारोप—** १७४–१८४

प्रतिकूल परिस्थितीशीं टक्कर; बाबासाहेबांचा जीवनाधार; नेहमीं नव्याच्या शोधांत; प्रथम भांडवलदार बनायचें! परिस्थितीबरोबर झगडण्यासाठीं जन्म; परिस्थितीच्या आहारीं जायचें नाहीं. नियोजनाचें सामर्थ्य; निराशा नाहीं, भय नाहीं! जीवनांत मनोरंजनालाही स्थान होतें; चित्रकलेची आवड; उद्योगमंदिराची उभारणी कोणासाठीं? माणुसकीनें भारलेला महाराष्ट्रीय माणूस.

**बाबासाहेबांच्या जीवनांतील कांहीं महत्त्वाचे टप्पे—** १८५–१८६

**बाबासाहेबांची जन्मकुंडली—** १८७

**घराण्याचा वंशवृक्ष—** १८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम .................. वि: ..................
क्रमांक .................. नों: दि: ..................

# निवेदन

गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्राचे कट्टे अभिमानी, प्रतिकूल परिस्थितीशीं झगडून अनेक उद्योगधंद्यांची व विशेषतः साखर कारखान्यांची उभारणी करणारे उद्योगपति महादेव लक्ष्मण ऊर्फ बाबासाहेब डहाणूकर यांच्या जीवनकार्याकडे माझें लक्ष लागून राहिलें होतें. आपल्या कर्तृत्वानें आदरणीय ठरलेल्या कर्तबगार स्त्रीपुरुषांच्या जीवनाचें आकर्षण कोणाला वाटत नाहीं ? थोरांमोठ्यांच्या सुसंपन्न जीवनकार्याशीं आपण समरस व्हावें, त्यापासून स्वतःसाठीं जो कांहीं बोध घेतां येईल तो घ्यावा व इतरांनाही चरित्रलेखनाच्या रूपानें, जर कांहीं लाभ करून देतां आला तर यथाशक्ति करून द्यावा, हा माझा एक आवडता छंद आहे. त्यामुळें गेल्या ३०।३५ वर्षांच्या कालावधींत माझ्याकडून निरनिराळ्या क्षेत्रांत वावरणाऱ्या अनेक गुणवंतांचीं लहानमोठीं चरित्रें लिहिलीं गेलीं.

चरित्रवाचन ही एक प्रेरक, पोषक व स्फूर्तिदायक शक्ति आहे. अनेकांच्या जीवनांत त्या वाचनानें क्रांति घडवून आणलेली आहे. त्यामुळें सतत वृत्तपत्र व्यवसायांत गुंतलेला असतांही चरित्रलेखनांत मी विशेष रमलों.

मुद्रणकलाप्रवीण शेट जावजी दादाजी यांचें विस्तृत चरित्र लिहिण्यासाठीं जरूर तीं साधनें जमविण्यांत गुंतलों असतां उद्योगपति बाबासाहेब डहाणूकर यांच्या माननीय चिरंजीवांनीं व 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' या संस्थेचे उत्साही सेक्रेटरी व माझे स्नेही श्री. राम मोहाडीकर बी. ए. यांनीं पूज्य बाबासाहेबांच्या चरित्रलेखनाकडे माझें लक्ष वळविलें, याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

बाबासाहेबांच्या वयास आतां ७५ वर्षें पूर्ण होऊन ते शहात्तरींत प्रवेश करीत आहेत. त्यांनीं अत्यंत विपरीत परिस्थितीशीं धैर्यानें टक्कर देऊन भारताच्या व विशेषतः महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रांत मानाचें स्थान मिळविलें आहे. अशा उद्योगशील थोर पुरुषाच्या जीवनकार्याची व सतत पन्नास वर्षें त्यांनीं धीर खचूं न देतां ज्या विविध हालचाली केल्या, त्यांची त्रोटक चरित्राच्या रूपानें नोंद झालेली

असल्यास उद्योगधंद्यांत प्रवेश करूं पहाणाऱ्यांना व विशेषतः महाराष्ट्रीयांस ती मार्गदर्शक व स्फूर्तिदायक होऊन राहील, या भावनेनें मी या चरित्रलेखनाकडे वळलों; परंतु या कार्यासंबंधीं मी विचार करूं लागलों तेव्हां माझ्यापुढें मुख्यतः दोन अडचणी उभ्या राहिल्या. बाबासाहेब दीड दोन वर्षांपासून पक्षघातानें आजारी असल्यामुळें, मनांत उद्भवणाऱ्या विविध प्रश्नांसंबंधीं त्यांच्याशीं प्रत्यक्ष बोलून जरूर ती माहिती मिळविण्याचा दरवाजा बंद झालेला! ही झाली पहिली व महत्त्वाची अडचण. दुसरी अडचण म्हणजे वेळेची. बाबासाहेबांच्या ७६ व्या वाढदिवस समारंभाच्या वेळीं हें चरित्र प्रसिद्ध करण्याचें औचित्य साधावयाचें असल्यामुळें निरनिराळ्या संबंधित व्यक्तींकडून शक्य ती माहिती मिळवून चरित्र-लेखनकार्य अवघ्या चार महिन्यांत पूर्ण करावें लागलें! त्याला कोणाचाच इलाज नव्हता.

माहिती मिळविण्याच्या उद्योगांत असतां अनेकांच्या प्रेमळ सहकाराचा मला लाभ घडला, हें मी माझें भाग्य समजतों. त्या सर्वांचा मी अंतःकरणपूर्वक आभारी आहें. नामोल्लेख करण्याचें मी बुद्धिपुरस्सर टाळीत आहें; तरी कृपा करून कोणीही रागावूं नये अशी विनंती आहे.

विपरीत परिस्थितीला व नाना प्रकारच्या अडचणींना धीरोदात्तपणें तोंड देत बाबासाहेब सतत पन्नास वर्षें औद्योगिक क्षेत्रांत वावरले व अशा रीतीनें पुरुषार्थाचा व कर्तबगारीचा उच्च आदर्श त्यांनीं सर्वांपुढें ठेविला आहे. महाराष्ट्राला ललामभूत होऊन राहाणाऱ्या अशा या महाभागाचें हें केवळ त्रोटक चरित्र आहे. अनेक कारणांमुळें त्याला सर्वांगसुंदरता व पूर्णता आणणें शक्य झालें नाहीं, याची जाणीव लेखकाला आहे. या त्रोटक व छोट्या चरित्रापासून जर कांहीं स्फूर्ति मिळ-वितां आली तर ती मिळवून, एखादा भावी चरित्रकार त्याला भव्यता व पूर्णत्व आणण्याचा यशस्वी प्रयत्न करील अशी लेखक बळकट आशा बाळगून आहे.

अनेकांनीं सहकार्य दिल्यामुळें या चरित्रग्रंथाची निर्मिति होत आहे. नावांचा उल्लेख टाळावा असें योजिलें असलें तरी या कार्यांत असतां आरंभापासून अखेरपर्यंत ज्यांचा सौजन्यपूर्ण, प्रेमळ व अगत्याचा सहकार व मार्गदर्शन मला लाभलें, त्या नांवाचा उल्लेख करण्याचें मी टाळलें तर माझ्या मनाला कायमची रुखरुख लागून राहिल्याशिवाय रहाणार नाहीं. बाबासाहेबांचे द्वितीय चिरंजीव शांतारामजी ऊर्फ अण्णासाहेब यांचा व माझा गेल्या सुमारें वीस वर्षांचा स्नेहसंबंध. त्या काळांत त्यांच्या सौजन्याची प्रचीति मला अनेकवार आलेली आहे. माननीय

## निवेदन

बाबासाहेबांचें लहानसें का होईना, मीं चरित्र लिहावें, असें ठरवून व वडील बंधु दादासाहेब व धाकटे बंधु दिनूशेट यांची संमति घेऊन त्यांनीं ही जबाबदारी माझ्यावर सोपविलीं आणि त्यानंतर वेळांत वेळ काढून या कार्याकडे ते तळमळपूर्वक मधूनमधून लक्ष पुरवीत व मार्गदर्शन करीत राहिले. याबद्दल त्यांचे आभार कोणत्या शब्दांनीं मानावे हें मला समजेनासें झालें आहे. यासाठीं त्यांचे आभार मानून मोकळा न होतां त्यांचें सौजन्य व सहकारऋण मी सदैव उराशीं बाळगून ठेवीन.

भारत सरकारचे माजी अर्थमंत्री माननीय डॉ. चिंतामणराव देशमुख यांचा व बाबासाहेबांचा गेल्या पंचवीस वर्षांचा स्नेहसंबंध आहे. तो ध्यानीं आणून त्यांनीं या चरित्र ग्रंथास छोटीशी प्रस्तावना लिहावी, अशी इच्छा प्रगट करतांच त्यांनीं तिला आनंदानें प्रतिसाद दिला.

त्याचप्रमाणें भारत सरकारचे रेल्वे मंत्री माननीय ना. स. का. पाटील यांचा व बाबासाहेबांचा दीर्घकालीन व जिव्हाळ्याचा संबंध जाणून त्यानींही 'दोन शब्द' लिहावे अशी विनंती करण्यांत आल्यावरून त्यानींही अगत्यपूर्वक 'दोन शब्द' लिहून पाठविले; याबद्दल या दोघांही माननियांचे कितीही आभार मानिले तरी ते थोडेच होतील.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स या संस्थेचे कर्तबगार सेक्रेटरी व बाबासाहेबांचे चहाते श्री. राम मोहाडीकर यांनींही अगदीं आरंभापासून तों या चरित्राचें हस्तलिखित छापखान्यांत जाऊन तें सुव्यवस्थितपणें ग्रंथरूपानें छापून बाहेर पडेपर्यंत, केवळ आपुलकीच्या भावनेनें तळमळपूर्वक जी मेहनत घेतली, तिचाही साभार उल्लेख येथें केल्याशिवाय माझ्यानें रहावत नाहीं.

मुद्रण-प्रकाशनाच्या बाबतींत मौज प्रिंटिंग प्रेस आज आघाडीवर आहे. त्या लौकिकास साजेसें सुंदर मुद्रण करून दिल्याबद्दल चालकांचे आम्ही आभारी आहोंत.

१३, बरोज क्रॉसलेन
मुंबई २

सर्वांचा नम्र—
**पु. बा. कुळकर्णी**



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८९८२ वि: चरित्र
क्रमांक १२५६ नों: दि: १९।११।६९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. ११४२७

# १.

# बालपण व शिक्षण

"**माधव!** तूं मुंबईस जाण्याचें धाडस पत्करूं नकोस. आपली शेतीभाती व लाकडांचा वडिलोपार्जित धंदा ठीक चालला आहे. या धंद्यांत आम्हांला जरुरी आहे तुझी. जमाखर्च लिहिणें, कामावर देखरेख ठेवणें वगैरे कामें तूं आतां नीटपणें संभाळूं लागला आहेस. आपण कांहीं तरी करावें असें तुला वाटतें ना? मग नको कोणी म्हटलें? येथें राहून काय तो पराक्रम करून दाखव ना? घरची सुखाची मीठभाकर सोडून मुंबईला जाण्याची तुला काय बरें जरुरी?"

"जरुरी नाहीं कशी? जरुरी आहे! मुंबईंत दलालांमार्फत आपला व्यवहार चालला आहे. तो नीट चालला आहे असं मला नाहीं वाटत! मी मुंबईंत राहून हाच तुमचा व्यवसाय नीट रीतीनें संभाळीन. माझ्याबद्दल तुम्ही मुळींच चिंता करूं नका. मी आतां लहान का आहें? मला तुमच्याच सहाय्यानें परंतु स्वतःच्या जबाबदारीवर कांहीं तरी करूं द्या. माझ्या जाण्याआड कृपा करून येऊं नका!"

माधवचे वडील काय किंवा चुलते काय; त्यानें घर सोडून मुंबईसारख्या धोक्याच्या ठिकाणीं जाऊं नये असें त्यांच्या त्या काळच्या समजुतीप्रमाणें त्यांना वाटत होतें. त्यामुळें त्यांनीं पुन्हां पुन्हां माधवचें मन वळविण्याचे प्रयत्न केले. परंतु माधव घर सोडून आपलें नशीब काढण्यासाठीं मुंबईला जाण्याचा निर्धार करून चुकला होता. तो आपल्या निश्चयापासून ढळला नाहीं.

### हा लोटा तरी ने

सर्वांचा नमस्कारपूर्वक निरोप घेऊन माधव घराच्या पायऱ्या उतरूं लागला तेव्हां वडील व घरांतील सारीच मंडळी गहिंवरली ! वडिलांच्यानें रहावेना. ओटीवर जवळच एक पाणी पिण्याचा लोटा होता तो हातीं घेऊन ते म्हणाले, "माधव ! तूं जातोस तर ! हा लोटा तरी बरोबर घेऊन जा ! वेळप्रसंगीं पाणी प्यायला होईल !"

माधववर सारे जण चिडलेले होते. माधवनें घर सोडून जाऊं नये असें त्यांना वाटत होतें. आमच्यापैकीं कोणाचेंही न ऐकतां हा घर सोडून जातो म्हणजे काय ? एक चुलता तर माधवच्या हातांतील लोटा हिसकावून घेत म्हणाला, "कांहीं नको लोटा बिटा द्यायला! आमचें न ऐकतां तो जात आहे ना ? जाऊं द्या मोकळ्या हातांनीं! भारी शहाणा झालाय !"

### मी द्रोणांतून पाणी पिईन

"खरं आहे! मी हा लोटा तरी कां घ्यावा ? ठेवून द्या तो! मला विकत घेतां आला तर घेईन; नाहीं तर द्रोणांतून पाणी पिईन !" एवढेंच बोलून व पुन्हां एकवार सर्वांना नमस्कार करून मुंबई गांठण्यासाठीं माधव घराबाहेर पडला !

तरुण माधवला घरांतील वडीलधाऱ्या मंडळींनीं दिलेलें तें एक प्रकारचें आव्हान होतें. तें धैर्यानें व धडाडीनें स्वीकारून त्यानें आपली जीवननौका मुंबईच्या महासागरांत कशी लोटली व टक्केटोणपे खात खात ती यशस्वी रीतीनें पैलतीरास कशी पोहोंचविली, हें आतां आपण पाहावयाचें आहे.

हा माधव म्हणजेच आमचे चरित्रनायक महादेव लक्ष्मण उर्फ बाबासाहेब डहाणूकर. यांचा जन्म शहापूर (ठाणें जिल्हा) येथें आजोळीं ता. १३ डिसेंबर १८८९ रोजीं झाला. त्यांच्या वडिलाचें नांव लक्ष्मण व आईचें नांव कृष्णाबाई. दोघांचीही देवावर आत्यंतिक श्रद्धा. भोळ्या भाविक

माणसांचा व श्रद्धावंतांचा तो काळ होता. रोज नित्यनेमानें स्नानसंध्या, देवपूजा करावी, त्याची करुणा भाकावी, या गोष्टी अत्यावश्यक समजल्या जात असत. माधव त्याच वातावरणांत लहानाचा मोठा होऊं लागला. त्याचे आजोबा बापूजी हेही त्याच वळणाचे. शिवाय मोठे उद्योगी. त्यांना चार चिरंजीव. भगवान, लक्ष्मण, जयराम व यशवंत. त्यांपैकीं लक्ष्मणरावांस महादेव, पुरुषोत्तम, वामन, वासुदेव हे चार चिरंजीव आणि माणकूबाई, विठाबाई, शांताबाई व गुलाब ह्या चार कन्या; मिळून हीं एकंदर आठ भावंडें.

## वडिलार्जित धंदा

माधवचा जन्म शहापूरला आईच्या माहेरघरीं झाला असला तरी त्याचें बालपण डहाणू येथील वडिलार्जित घरीं गेलें. हें घराणें खाऊन पिऊन सुखी होतें. शेतीभाती करणें व जोडधंदा म्हणून जंगलाचे कूप घेऊन त्यापासून मिळणारा लाकूडफाटा विकणें हा या घराण्याचा परंपरेनें चालत आलेला धंदा. ठाणें जिल्ह्यांत जंगलांनीं व्यापलेला भाग बराच मोठा आहे. डहाणू किंवा जवळच्या घोलवड या गांवीं राहून तो व्यवसाय उत्तम प्रकारें संभाळतां येत असे. हा धंदा थोडा दगदगीचा असला तरी निदान पूर्वीच्या काळांत चढाओढ फारशी नसल्यामुळें त्यांत किफायत चांगली होत असे. त्याकाळीं जळणासाठीं गॅस प्रचारांत आलेला नव्हता. त्यामुळें जळाऊ लाकडांस मागणी मोठ्या प्रमाणांत होती. हीं लाकडें डहाणू स्टेशनवर आगगाडीच्या डब्यांत भरून मुंबईस दलालांकडे पाठवायचीं व त्या दलालांमार्फत त्यांची विक्री व्हायची.

माधवचें प्राथमिक शिक्षण संपल्यानंतर तो इंग्रजी शाळेंत जाऊं लागला. त्याकाळीं डहाणूच्या शाळेंत तीन इयत्तापर्यंत शिक्षण घेण्याची सोय होती. आणि घरांतील त्या काळच्या वडील मंडळीच्या दृष्टीनें त्याला मिळालें तेवढें शिक्षण पुरेसें होतें. काय करायचें आहे अधीक शिकून? साधारण लिहितां वाचतां व जुजबी हिशोब ठेवतां आला म्हणजे बस्स झालें! आपल्या घरचा चालू धंदा त्याला संभाळतां आला पाहिजे. त्यांत मात्र त्याला चांगला

वाकबगार करावयाचा. या दृष्टीनें वडिलांचें त्याचप्रमाणें साऱ्या चुलत्यांचें त्याच्याकडे सतत लक्ष असे. घरांतील बालबोध व प्रेमळ वातावरणांत माधव लहानाचा मोठा होत होता. समजूं उमजूं लागल्यापासून त्याचें एकच धोरण होतें. आई, वडील व चुलते यांनीं सांगितलेलें ऐकायचें. कोणत्याही बाबतींत चालढकल करायची नाहीं. त्यामुळें आज्ञाधारक माधव सर्वांना आवडायचा.

**एक क्रांतिकारक घटना**

माधवला पंधरावें संपून आतां सोळावें वर्ष सुरू झालें होतें. इंग्रजी तिसरीपर्यंतचें शिक्षण संपत आलें होतें. आणखी शिक्षण घ्यावें असें त्याला मनापासून वाटे; परंतु डहाणूला तशी सोय त्याकाळीं नव्हती. मग पुढें काय करायचें ? घरांत वडिलधाऱ्या मंडळीला शिक्षणापेक्षां उद्योगधंद्याची महति अधिक वाटत असे; आणि तें अगदीं स्वाभाविक होतें.

इतक्यांत माधवच्या आयुष्यांत एक क्रांतिकारक घटना घडून आली. विवाह ही मानवी जीवनांतील एक क्रांतिकारक घटनाच आहे नाहीं का ? त्याकाळीं म्हणजे साठ वर्षांपूर्वींच्या काळांत मुलामुलींचीं लग्नें लहान वयांत होत असत.

वांद्रे येथें वासुदेव पांडुरंग वांद्रेकर हे आपले बंधु नथोबा यांचेसह रहात असत. त्या काळाच्या मानानें हें घराणें सुखवस्तु, त्याचप्रमाणें शिक्षणाच्या दृष्टीनें पुढारलेलें व सुधारलेलें होतें. वासुदेवराव हे मेकॅनिकल इंजिनीयर होते तर त्यांचे बंधु नथोबा हे रेल्वेंत हुद्याच्या जागेवर होते. दोघांही बंधूंना, विशेषतः नथोबांना शिक्षणाची भारी आवड. शिक्षणाचें महत्त्व त्यांना पटलें होतें. आजच्या काळांतील लोकांना तें महत्त्व पटलें तर त्यांत कांहीं विशेष वाटत नाहीं.

वासुदेवरावांची एकुलती एक कन्या छबू ही अकरा वर्षांची झाली तेव्हां तिच्या विवाहासंबंधीं हालचाली सुरू झाल्या. शिक्षणांत मागासलेला असला तरी उद्योगधंद्यांत पुढें असलेल्या डहाणूकर घराण्यांतील माधव त्यांच्या मनांत

भरला. घराणें चांगलें घरंदाज, बाळबोध तसेंच शेतीवाडी व उद्योगधंदा संभाळून असलेलें. शिक्षणाचें काय? मुलाचें शिक्षण घेण्याचें वय आहे. मुंबईसारख्या ठिकाणीं त्याच्या शिक्षणाची सोय केली म्हणजे झालें! मुलाची मात्र तयारी असली पाहिजे. त्यानंतर मुलाची अधिक शिक्षण घेण्याची इच्छा असल्याचें समजून सर्वांना फार समाधान वाटलें.

## मुंबईंत शिक्षण

१९०५ सालीं माधवचा विवाह झाला. आणि त्यानंतर मुंबईंतील एखाद्या हायस्कूलमध्यें नांव दाखल करावयचें होतें त्यामुळें सर्व बाजूंनीं सुखसोईचें स्थान म्हणून माधव वांद्रे येथें श्वशुरगृहीं रहाण्यासाठीं आला. शिक्षणप्रेमी नथोबा यांचे चिरंजीव बाबूराव (जे नंतर खेर मंत्रीमंडळांत उपमंत्री पदावर होते व आज सत्तर वर्षें झालीं असलीं तरीही आदिवासी जनतेची एकनिष्ठपणें व निःस्वार्थपणें सेवा करीत आहेत) यांनाही शाळेंत दाखल करावयाचें होतें. मुंबईंतील आर्यन एज्युकेशन सोसायटी हायस्कूलचे प्रिन्सिपाल ठाकूर हे नथोबांच्या परिचयाचे; त्यामुळें माधव व बाबूराव या दोघांनाही त्याच शिक्षण संस्थेंत दाखल करण्यांत आलें. हे दोघेही विद्यार्थि तेथें सहाव्या यत्तेपर्यंत होते व नंतर ते विल्सन हायस्कूलमध्यें जाऊं लागले. बाबूराव पुढें गेले; परंतु माधवच्या शिक्षणाची मजल मॅट्रिकपर्यंतच गेली; कारण घरीं वडील व चुलत्यांना त्याची जरुरी भासूं लागली. त्यांचा लाकडाच्या धंद्याचा व्याप वाढत चालला होता. माधवनें त्या धंद्याची माहिती घेऊन त्यांत तरबेज व्हावें आणि आस्ते आस्ते धंद्याची जबाबदारी संभाळावी असें त्यांना वाटत असे. तेव्हां अशा स्थितींत सुमारें चार वर्षें मुंबईंत शिक्षणाप्रीत्यर्थ घालवून माधव परत आपल्या घरीं डहाणूला आला. तेथें वडिलांच्या व चुलत्यांच्या देखरेखीखालीं त्याचें धंदेशिक्षण सुरू झालें. वडिलांचा स्वभाव अत्यंत शांत व धिमा. कोणतेंही काम असो. तें घाईनें व कसेंबसें उरकणें त्यांना आवडत नसे. विचारपूर्वक वागायचें; डोकें नेहमीं शांत ठेवायचें; वेळीं अवेळीं कोणावरही भडकायचें नाहीं किंवा रागाच्या

आहारीं सहसा जायचें नाहीं, असा होता त्यांचा स्वभाव. तेच गुण माधवनें उचलले.

## रुळलेला मार्ग नको

नोकरी म्हणजे बंधन व दुसऱ्याची गुलामगिरी. ती आपण करायची नाहीं. आपला धंदा उत्तम प्रकारें संभाळायचा. आपला स्वतंत्र बाणा संभाळून धंदा–रोजगार करतां येतो, त्याचप्रमाणें त्यांत किफायतही चांगली होऊं शकते, अशी होती माधवच्या वडिलांची विचारसरणी. ती माधवला मान्य होती; परंतु मुंबईंत वास्तव्य करून व मुंबईचें पाणी चाखून आल्यापासून त्याच्या मनाला स्वस्थता किंवा स्थैर्य नव्हतें. रुळलेल्या मार्गानें जाण्यापेक्षां आपण नवीन मार्ग कां शोधून काढूं नये? उद्योगधंदाच करावा, नोकरीच्या फंदांत पडूं नये, परंतु आपली झेप मोठी कां असूं नये? आहे त्यांत समाधान मानून कां रहायचें? अशा प्रकारचे विचार त्याच्या मनांत घोळूं लागले होते; याचें मुख्य कारण म्हणजे मुंबईंत ऐकलेलीं लोकमान्य टिळक यांचीं स्फूर्तिदायक व्याख्यानें होत. आतां त्याला लोकमान्यांचा 'केसरी' वाचावा, त्यांच्या लेखांबद्दल विचार करावा असें वाटूं लागलें होतें. वडील लक्ष्मणराव यांना मुलानें निरंतर आपल्या पंखाखालीं रहावें असें वाटत असे, परंतु उंच उंच उडण्यासाठीं आतां मुलाचे पंख फडफडूं लागले होते!

हें डहाणूकर कुटुंब डहाणू येथें रहात असलें तरी त्यांचा लाकडांचा धंदा मुंबईंत दलालांमार्फत चालत असे. त्यांत कधीं फायदा तर कधीं कधीं नुकसानही सोसावें लागत असे. दलाल सांगतील तें प्रमाण! माधव घरीं आल्यापासून या रोजगाराकडे पाहूं लागला. हळूहळू त्याच्या लक्षांत ही गोष्ट येऊन चुकली होती. दलालांमार्फत धंदा करायचा; त्यांना भरपूर दलाली द्यावयाची आणि कधीं कधीं नुकसानही सोसायचें! मग मुंबईंत राहून आपणच तो धंदा चालविला तर आपल्या पदरांत अधिक फायदा पडणार नाहीं का? शिवाय मुंबईंत राहिल्यानें इतर नाना प्रकारचे उद्योगधंदे करायला वाव आहे, मग डहाणूंत राहून आपण कां कुजायचें?

**आहे तें ठीक!**

माधवला मुंबईला जाण्याची संधी पकडायची होती. त्यानें चालू असलेल्या धंद्यासंबंधीं व त्याची वाढ कशी करतां येईल यासंबंधीं आपले विचार वडील मंडळीपुढें ठेविले; परंतु ते ऐकून घेऊन ते आचरणांत आणण्यांत त्यांना धोका वाटूं लागला. आहे तें ठीक आहे, ही त्यांची वृत्ति होती, तर आहे त्यांत बदल घडवून आणिला पाहिजे व तो मी घडवून आणणार, ही माधवची वृत्ति होती.

असा हा दोन वृत्तींतील झगडा सतत कांहीं दिवस चालू होता; आणि शेवटीं एके दिवशीं, या प्रकरणाच्या आरंभीं सांगितल्याप्रमाणें 'स्फोट' होऊन माधवनें घर सोडलें आणि तो मुंबईच्या मार्गास लागला.

२.

# आरंभकाळातील काहीं उद्योगधंदे

**घरच्या** वडिलधाऱ्या मंडळींचें न ऐकतां माधव मुंबईला आला तो कशासाठीं? त्याच्या अंतःकरणांत मोठा होण्याची व कांहींना कांहीं कर्तबगारी करून दाखविण्याची महत्त्वाकांक्षा निर्माण झालेली होती. कर्तबगारीचा पाया रचायचा तर त्यासाठीं मुंबईंत विपुल क्षेत्र आहे हें त्याच्या लक्षांत येऊन चुकलें होतें. आपणाला उभें रहाण्यासाठीं जागा पाहिजे. मुंबईसारखी जागा इतरत्र कुठें सांपडण्याची शक्यता त्यावेळीं तरी त्याच्या मनांत वावरत नव्हती. शिवाय आरंभ करायला आपला घरचा लाकडाचा चालू धंदा होताच.

आपण मोठा होण्याच्या मार्गाला लागावें म्हणून माधवनें मुंबई गांठली. माधवचें स्थलांतर झालें. तेव्हां ज्या ईर्षेनें तो घराबाहेर पडला तिची तीव्रता व महत्त्व लक्षांत घेऊन आतां आपण त्याचें नामांतर करून यापुढें त्याचा उल्लेख बाबासाहेब या माननीय नांवानें करू या. कारण घरांत काय किंवा बाहेरच्या जगांत काय, आजकाल त्याच नांवानें ते सर्वपरिचित होऊन राहिले आहेत.

### मुंबईतील पहिला संसार

या डहाणूकर कुटुंबाचा लाकडांचा धंदा मागें सांगितल्याप्रमाणें मुंबईंत दलालांमार्फत चालत असे. ग्रँटरोड हें त्या व्यवसायाचें मुख्य ठिकाण होतें. तेव्हां तेथें जवळपास कुठें तरी रहाण्यासाठीं एखादी जागा पहायची

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ३८८८२ वि: चरित्र
क्रमांक १२५८ नों: दि: १२।११।८५



बाबासाहेबांच्या 'भाग्यलक्ष्मी' सौ. पार्वतीबाई डहाणूकर

होती. लॅमिंग्टन रोडवर टोपीवाल्यांच्या चाळींत त्यांना एक खोली अल्प भाड्यानें मिळाली. जागा मिळाली आतां लहानसा का होईना, संसार थाटला पाहिजे. बसायला किंवा हातपाय पसरायला कांहीं तरी पाहिजे ना? त्यासाठीं एक चटई विकत घेतली. स्वयंपाकासाठीं २।३ भांडीं व एक चूल खरेदी केली. अशा रीतीनें बिऱ्हाडाचा थाट सजविला. दलालांशीं बोलणें, त्यांच्याकडून जरूर ती माहिती मिळविणें व हिशेब पहाणें या गोष्टी मुंबईंत आल्यापासून सतत सुरू होत्या.

एके दिवशीं बिऱ्हाडासाठीं जागा घेतल्याचें व बायकोला घेऊन येण्याचें पत्र त्यांनीं आपल्या वडिलांस पाठविलें. त्याप्रमाणें वडील सौ. पार्वतीला घेऊन मुंबईंत आले. बाबासाहेबांच्या पत्नीचें घरचें नांव पार्वती होतें. कृष्णाची रुक्मिणी, अर्जुनाची सुभद्रा तशी महादेवाची पार्वती!

पूर्वींच्या काळीं पतीच्या नांवाशीं जुळणारें व अनुरूप असें नांव ठेवण्यांत मोठी धन्यता वाटत असे. आज मात्र तो जमाना साफ पालटला आहे! बाबासाहेबांच्या आयुष्यांत नंतरच्या काळांत भाग्यश्रीशीं त्यांची हात-मिळवणी होत गेली, तसतसें त्यांना आपल्या पत्नीबद्दल कौतुक वाटूं लागलें व ते तिला 'भाग्यलक्ष्मी' या नावानें संबोधूं लागले!

या भाग्यवंताचें व भाग्यलक्ष्मीचें आरंभकाळांतील जीवन मोठें खडतर होतें. कसें तें पहा! त्या काळच्या दैन्यावस्थेचें फक्त एकच उदाहरण! वडील लक्ष्मणराव सूनबाईला घेऊन चिरंजीवानें थाटलेल्या नव्या बिऱ्हाडीं आले. जीं कांहीं २।४ भांडीं हाताशीं होतीं, त्यांत भात शिजविण्याचा टोप होता तो दोन माणसांपुरता! सौ. पार्वतीनें भात शिजवून व वरण–भाजी करून दोघांना वाढलें आणि त्यानंतर त्याच टोपांत स्वतःसाठीं दुसरा भात करून घेतला!

असा हा उपक्रम पहिले कित्येक महिने सतत चालू होता. आणि त्याही काळांत बाबासाहेबांचें लक्ष जेवणाखाण्याकडे व ऐषआरामाकडे होतें कुठें? जो धंदा पत्करला त्याचा पाया भरभक्कम झाला पाहिजे व त्यांत मुबलक पैसा मिळवितां आला पाहिजे, याकडे होतें त्यांचें सर्व लक्ष.

## ध्येयसिद्धीची पूर्वतयारी

त्या वयांतही बाबासाहेबांनीं एका गोष्टीची आपल्या मनाशीं पक्की खुणगांठ बांधून ठेविली होती. आपणाला मोठ्या प्रमाणांत रोजगारधंदा करायचा आहे. उद्योगाचें क्षेत्र वाढवायचें आहे. आणि त्यासाठीं उद्योग करून व काटकसरीनें वागून जितका पैसा जवळ करतां येईल तेवढा करण्यासाठीं आपण झटलें पाहिजे.

साधारणपणें कोणीही मुंबईंत आला, नोकरीधंद्याला लागला, म्हणजे चार पैसे स्वतःच्या व घरच्या मंडळींच्या सुखसोयीसाठीं खर्च करून टाकण्याची त्याची साहजिक प्रवृत्ति असते. बाबासाहेबांनीं आरंभापासून तिला आटोक्यांत ठेविली होती !

मोठें ध्येय उराशीं बाळगून त्याचा काय बरें उपयोग ? तें सिध्दीला कसें जाईल याची रात्रंदिवस मनाला विवंचना लागून राहिली पाहिजे. त्याची योजना, रचना सतत दृष्टीसमोर असली पाहिजे. अंतःकरणाला त्याच गोष्टीची तळमळ लागून राहिली पाहिजे.

लॅमिंग्टनरोडवर कमींत कमी भाड्यांत बिऱ्हाडासाठीं बाबासाहेबांनीं जागा मिळविली खरी; परंतु आरोग्यदृष्ट्या ती सुखसोयीची नव्हती. त्याकाळीं त्या जागेच्या आसपास गुरांचे तबेले होते! मोकळी व शुद्ध हवा तेथें नव्हती. त्याचा परिणाम आजारी पडण्यांत झाला. आतां काय करायचें ?

मुगभाटांत कोणी एक नातलग रहात असत. त्यांच्या ओळखीनें त्या भागांत दरमहा तीन रुपये भाड्याची एक खोली मिळविण्यांत आली. पहिल्या जागेंत सुमारें एक वर्ष व या दुसऱ्या जागेंत वर्षभर मिळून आरंभींचीं मुंबईंतील दोन वर्षें मोठ्या हलाखीच्या स्थितींत गेलीं. सौ. पार्वतीबाईंचें बाळंतपण अगदीं नजीक आलें होतें. तेव्हां तिला माहेरीं वांद्र्यास पाठविण्याचें सबळ कारण मिळालें. नंतर बाबासाहेबही वांद्र्यास राहून मुंबईच्या येरझारा करूं लागले.

ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८९८८ वि: चरित्र
क्रमांक १२५६ नों: दि: १५।११।६५



### रेल्वेंत तात्पुरती नोकरी

आयुष्यांतील या आरंभकाळांत खर्चाची भारी ओढाताण व्हायची. चुलत सासरे नथुरामजी हे रेल्वेंत हुद्याच्या जागीं होते. त्यांच्या कानीं बाबासाहेबांच्या ओढाताणीची कुणकूण गेली तेव्हां त्यांनीं त्यांचें मन वळवून दरमहा पंचवीस रुपये पगारावर त्यांस नोकरीस लाविलें. पंचवीस रुपये आज फार कमी वाटत असले तरी त्याकाळीं तेवढ्या पगारावर दोघांचें पोट सुखानें भरत असे व सुखानें रहातां येत असे.

परंतु बाबासाहेबांचें लक्ष नोकरीवर होतें कुठें? त्यांचें लक्ष लागून राहिलें होतें धंद्याकडे! मुंबईंत गिरगांव भागांत त्यांनीं जळाऊ लाकडांची एक वखार सुरू केली होती. एका नोकरामार्फत या वखारीचें काम चालावयाचें. तसेंच ग्रँटरोडवर दलालांमार्फत स्वतःच्या देखरेखीखालीं घाऊक लाकूड विक्री करण्यासाठीं त्यानीं एक पेढी उघडली होती. त्या पेढीमार्फत लाकडें भरून आलेल्या वॅगन्स व्यापाऱ्यांना घाऊक विकून टाकवयाच्या.

उधारीचें प्रमाण बेताबाहेर वाढल्यामुळें गिरगावांतील लाकूड वखार बंद करावी लागली. पुढें पुढें घाऊक लाकूड विक्रींत फायदा होऊं लागला व पेढीचा कारभार केवळ नोकरांवर सोपवून चालणार नाहीं असें आढळून येतांच बाबासाहेबांनीं रेल्वेंतील नोकरीचा राजीनामा दिला व आपलें सर्व लक्ष ते याच व्यवसायाकडे पुरवूं लागले.

### लाकडें पुरविण्याची ठेकेदारी

आस्ते आस्ते या धंद्यांत त्यांचे पाय बळकट होऊं लागले व धंद्याचा व्यापही वाढत चालला. इतक्यांत १९१८ सालीं मुंबईंत व इतरत्र साथीच्या तापानें कहर उडवून दिला! मुंबईंत मृत माणसांची गणती करणेंही कठीण होऊन गेलें! सोनापूर स्मशानभूमींत प्रेतांचे ढीग पडून राहूं लागले. प्रेतदहनाला पुरेशीं लाकडें मिळणें कठीण झालें! सोनापूर स्मशानभूमि समीतीपुढें मोठा पेचप्रसंग निर्माण झाला! होतीं तीं लाकडें संपून गेलीं व

नवीन पुरेशीं लाकडें आणायचीं कुठून? या चिंतेंत सर्वजण होते. अशावेळीं त्या चिंतेचा भार बाबासाहेबांनीं स्वतःच्या शिरावर घेतला. डहाणू, सुरत वगैरे भागांतील व्यापाऱ्यांस तारा व पत्रें पाठवून जास्तींत जास्त लाकडें मिळविण्याची त्यांनीं व्यवस्था करविली. या काळांत सोनापूर स्मशानभूमीस लाकडें पुरविण्याची ठेकेदारी त्यांनीं मिळविली. परंतु सुरत, डहाणू व इतर भागांतून मुंबईत लाकडें आणण्याचें साधन म्हणजे आगगाडीचे डबे! रेल्वे-कडून ते जरूर त्या जादा प्रमाणांत मिळेनात. आतां काय करायचें?

त्याकाळीं राज्यपालांच्या मंत्रिमंडळांत सर सी. व्ही. मेहता हे होते. ते धर्माभिमानी होते. त्यांच्यापर्यंत जाऊन बाबासाहेबांनीं जरूर तेवढ्या वॅगन्स मिळण्याची व्यवस्था करविली. शिवाय स्मशान कमिटीकडून वॅगन्स-संबंधी गाऱ्हाणें सरकारकडे गेलेलें होतेंच. याप्रसंगीं बाबासाहेब धोरण संभाळून वागले. दिरंगाई करण्यासारखी ही गोष्ट नव्हती.

### धाडस अंगाशीं आलें नाहीं

कोणतीही चालून आलेली संधी वायां जाऊं द्यावयाची नाहीं. विचार-पूर्वक वागायचें व देवाचें नांव घेऊन पुढें पाऊल टाकायचें, या बाबासाहे-बांच्या ठायीं असलेल्या स्वभावगुणांची याप्रसंगीं सर्वांना चांगली प्रचीति आली. ठिकठिकाणाहून लाकडांचा पुरवठा भरपूर प्रमाणांत व्हावा याची व्यवस्था त्यांनीं अगोदरच केलेली होती. यावेळीं डहाणू येथें राहून मुंबईस लाकडें पाठविण्याच्या त्याच व्यवसायांत गुंतलेले बाबासाहेबांचे समवयस्क चुलतबंधु मोरेश्वर यांनीं तत्परतापूर्वक त्यांना उत्तम प्रकारचा सहकार दिला. या व्यवसायांत दोघेही नेहमीं एकमेकांस पूरक होऊन राहिले होते. बाबासाहेबांच्या लिहिण्यावरून आसपासच्या भागांत हिंडून जितकी म्हणून लाकडें मिळविणें शक्य होतीं तेवढीं त्यांनीं मिळविलीं व वॅगन्स भरभरून तीं मुंबईस बाबासाहेबांकडे रवाना केलीं. त्यांनीं आरंभकाळांत पत्करलेलें हें एक मोठें धाडस होतें. परंतु तें विचारपूर्वक केलेलें असल्यामुळें अंगाशीं आलें नाहीं. हजारो लोकांची त्यामुळें सोय झाली. पत्करलेल्या

धाडसाचा व घेतलेल्या मेहनतीचा योग्य तो मोबदला बाबासाहेबांच्या पदरांत पडला असला तरी त्याहीपेक्षां त्यांचा सर्वांत मोठा जो फायदा झाला तो म्हणजे मनुष्यस्वभावाचा व अनुभवजन्य ज्ञानाचा. याच पायावर पुढील काळांत त्यांना आपल्या उद्योगमंदिराची उभारणी करावयाची होती.

लाकूड व्यवसायांत बाबासाहेबांनीं आतां आपले पाय पक्के रोवले होते. २।३ ठिकाणीं लांकूडविक्रीच्या वखारीही चालू झालेल्या होत्या; परंतु त्यांचें मनस्वी महत्त्वाकांक्षी मन तेवढ्यावर राजी होऊन स्वस्थ राहायला तयार नव्हतें. आणखी एखाद्या अधिक किफायतशीर धंद्याकडे आपणास वळतां येईल का? असें कोणतें क्षेत्र आहे कीं ज्यांत पाऊल टाकलें असतां आपल्या कर्तबगारीला वाव मिळून, भावि काळांत जो औद्योगिक भव्य डोलारा उभारावयाचा आहे, त्यासाठीं जरूर असलेलें भांडवलही जवळ करतां येईल?

**बांधकामाची ठेकेदारी**

त्या काळीं रणछोडजी रामजी या नावाचे एक गृहस्थ रस्ते, पूल, इमारती वगैरे बांधकामांची ठेकेदारी करून मुबलक पैसा मिळवीत असत. मेहनत घ्यावी लागत असे. जरूर असलेलीं माणसें जवळ करावीं लागत असत व त्यांच्यावर विश्वास टाकून कामें आपल्या देखरेखीखालीं करवून घ्यावीं लागत असत.

बाबासाहेबांचें रणछोडजीकडे नेहमीं जाणें येणें असे. उद्योगधंद्याचा पाठलाग सदासर्वकाळ चालू असला तरी आपण नवीन कांहींतरी शिकावें, नवीन वाटा चोखाळाव्या, नवीन ओळखी करून घ्याव्या, हा त्यांचा फावल्या वेळेंतील हव्यास. त्याला अनुसरून रणछोडजीजवळ त्यांच्या बांधकामव्यवसायासंबंधीं नेहमीं गोष्टी व्हावयाच्या. रणछोडजीही खुल्या दिलानें त्या व्यवसायाची त्यांना माहिती करून द्यावयाचे.

बांधकामाच्या ठेकेदारीला थोडेंफार भांडवल तर लागतेंच, परंतु त्याशिवाय ज्या कामाची ठेकेदारी (कॉंट्रॅक्टर) पत्करावयाची तें काम कमींत कमी खर्चांत उत्तम प्रकारें व ठराविक मुदतींत पार पाडण्याची जबाबदारीही

स्वीकारावी लागते. स्वतः मेहनत घ्यावी लागते आणि कामावर ज्या माणसांची योजना केली असेल त्यांच्याकडूनही काम करवून घ्यावें लागतें. आपण बांधकामाच्या ठेकेदारीच्या व्यवसयांत पडावें असे विचार त्यांच्या मनांत घोळूं लागले तो काळही सुदैवानें अनुकूल होता. पहिलें महायुद्ध संपत आलें होतें आणि त्या काळांत नवीन रस्ते, पूल, इमारती यांसारख्या बांधकामाकडे सरकारचें, तसेंच जनतेचें लक्ष वळूं लागले होतें.

## युरोपियन कंपन्यांची मक्तेदारी

त्या काळीं या क्षेत्रांत आमच्या लोकांचा प्रवेश फारसा झालेला नव्हता. कारण जरूर ती अनुकूलता नव्हती. होतें तें सारें प्रतिकूल. राज्यकर्त्यांच्या जातीच्या युरोपियन कंपन्या मात्र या क्षेत्रांत मानाचें स्थान पटकावून राहिल्या होत्या. कारण त्यांना भरपूर राजाश्रय होता. बांधकामाच्या ठेकेदाराला पत असावी लागते, त्याचें सरकारदरबारीं वजन असावें लागतें, त्याच्याजवळ जरूर तें भांडवल व तंत्रज्ञही असावे लागतात. या व इतर साधनांच्या बळावर अनेक युरोपियन कंपन्यांनीं सरकारच्या व जनतेच्या मनांत विश्वासाची भावना निर्माण करून ठेविली होती. त्यामुळें ब्रिटिश अमदानींतील असोत किंवा संस्थानी अमदानींतील असोत, बांधकामें त्यांच्याकडे जावयाचीं.

पाठक वालचंद कंपनी व त्या कंपनीसारख्या त्या काळांत ज्या कांहीं नवीन कंपन्या जन्मास आलेल्या होत्या, त्यांना पत व विश्वास निर्माण करावयाचा होता. ही सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन बाबासाहेबांनीं त्या काळीं 'एम्. एल्. डहाणूकर आणि कंपनी लि.' या नावानें एक कंपनी स्थापन केली व तिच्या मार्फत बांधकामाच्या ठेकेदारीचा व्यवसाय त्यांनीं आरंभीं लहान प्रमाणांत सुरू केला.

कोणताही धंदा असो, त्याची सुरुवात लहान प्रमाणांत करावयाची व जसजसे अनुभव येत जातील तसतशी त्या धंद्याची वाढ करावयाची, हें बाबासाहेबांचें नेहमींचें धोरण होतें.

## दगडमातींतील काव्य

तसें पाहिलें तर बाबासाहेबांस बांधकामाच्या ठेकेदारीचा अनुभव कांहींच नव्हता. तो त्यांना प्राप्त करून घ्यावयाचा होता. या कामांत नेहमीं संबंध येतो तो माती, दगड, विटा लाकूड व लोखंड यांसारख्या वस्तूंशीं! किती शुष्क वस्तू आहेत या? त्यांपैकीं एकांत तरी काव्य वा सौंदर्य आहे का?

नाहीं कसें? इमारती, रस्ते, पूल व एकंदर नगररचनेच्या कामांत त्यांचें किती महत्त्वाचें स्थान आहे बरें? बांधकाम करणारा शिल्पी किंवा वास्तुशास्त्रज्ञ त्याच वस्तूंपासून डोळ्यांना दिपविणारी नवनिर्मिति करूं शकतो. या व्यवसायांत बाबासाहेबांनीं पदार्पण केलें आणि त्यावेळेपासून बांधकामाला सहाय्यभूत होणाऱ्या वरील वस्तूंकडे पाहाण्याची एक नवदृष्टि त्यांना प्राप्त झाली. कामाची जबाबदारी स्वीकारल्यामुळें नवनवे अनुभव येतच होते; शिवाय या व्यवसायासंबंधीं ज्यांच्याकडून अनुभवजन्य ज्ञान मिळवितां येईल त्यांच्याकडून ते मिळवीत होते.

या व्यवसायाच्या आरंभकाळांतच त्यांचा व वालचंदहिराचंद यांचा प्रथम परिचय घडून आला व पुढें तो शेवटपर्यंत टिकला. वालचंदजींनीं बांधकामाच्या ठेकेदारीनें आपल्या उद्योगधंद्याची कारकीर्द सुरू केली. फाटक हे प्रारंभीं त्याचे सहकारी होते. दोघांनीं मिळून 'फाटक अँड वालचंद लि.' या नांवाची कंपनी स्थापन करून आपल्या ठेकेदारीचा व्यवसाय चालविला होता.

## दोघा मित्रांची पहिली भेट

बाबासाहेब आपल्या एका ठेकेदारीच्या कामावर देखरेख करीत असतां तेथून जवळच फाटक वालचंद कंपनीचें कांहीं बांधकाम चालू होतें. हे दोघेही समव्यवसायी एके दिवशीं तेथें अचानक भेटले.

जो व्यवसाय पत्करला त्या बाबतींत दोघांच्याही मार्गांत अडचणी सारख्याच होत्या. तरीही धैर्यानें ते एकेक पाऊल पुढें पुढें टाकीत चालले

होते. या पहिल्या भेटीला अनुसरून बाबासाहेब एके ठिकाणीं म्हणतात, "या पहिल्याच भेटींत त्यांचा (वालचंद हिराचंद यांचा) विनोदी स्वभाव व दिलदार वृत्ति यांमुळें त्यांच्याविषयीं माझ्या मनांत स्नेहाची व आदराची भावना निर्माण झाली आणि तो आमचा संबंध जन्मभर टिकला."

वर सांगितल्याप्रमाणें ठेकेदारीचीं कामें करणाऱ्या गोऱ्या कंपन्या देशी कंपन्यांच्या मार्गांत नानाप्रकारचे अडथळे निर्माण करीत होत्या. राजाश्रयामुळें त्यांचा वरचष्मा होता. त्या काळांत त्यांच्याशीं सामना देणें देशी कंपन्यांना परवडत नसे; परंतु वालचंद हिराचंद यांनीं व बाबासाहेबांनीं युरोपीयन कंपन्यांशीं धैर्यानें टक्कर देऊन आपला मार्ग मोकळा करून घेतला.

एकमेकांशीं विचारविनिमय करून संघटनेच्या रूपानें प्राप्त संकटास तोंड देण्याचें त्यांनीं ठरविलें. त्यांनीं आणखी कांहीं ठेकेदारांचें सहकार्य संपादन करून 'Constrauction Contractors' Association' या नांवाची ठेकेदारांची एक सुसंघटना निर्माण केली. सर्व बांधकाम ठेकेदारांस एकत्र जमवून त्यांच्याही अडीअडचणी व गाऱ्हाणीं समजून घेतलीं. या संस्थेतर्फे देशी ठेकेदारांची योग्य बाजू व अडचणी सरकारपुढें ठेवण्यांत आल्या; तसेंच देशी ठेकेदार, कोणतेंही काम असो तें शिरावर घेऊन जबाबदारीनें पार पाडूं शकतात हें सरकारच्या नजरेस आणून देण्यांत आलें व त्यांची लायकी सिद्ध करून देण्यांत आली. याचा फार चांगला परिणाम झाला.

यानंतरच्या काळांत देशी ठेकेदारांकडे कोणतींही जबाबदारीचीं कामें असोत; तीं त्यांच्याकडे सोपविण्याचें धोरण सरकारला स्वीकारणें भाग पडलें.

त्याकाळीं बांधकामांच्या ठेकेदारीचेंच क्षेत्र नव्हे तर किफायतीचीं बहुतेक क्षेत्रें परकीयांनीं व्यापलेलीं होतीं. कारण ते राजकर्त्यांचे जातभाई होते, तसेच जागरूकही होते. व्यवसायांतील जाणतेपणही त्यांच्याकडे होतें. आम्ही सांगकामे, अल्पसंतुष्ट व स्वतःच्या हक्कांची जाणीव नसलेले!

बाबासाहेब व वालचंद हिराचंद यांनीं औद्योगिक क्षेत्रांत धडाडीनें प्रवेश केला त्यावेळीं आरंभकाळांत त्यांना वरील परिस्थितीमुळें थोडा थोडका विरोध झाला नाहीं. परंतु त्यामुळें ते डगमगले नाहींत किंवा निराशही झाले नाहींत. संघटना निर्माण करून किंवा जरूर त्या अन्य मार्गांचा अवलंब करून त्यांनीं आपला मार्ग मोकळा करून घेतला व त्यामुळें इतरांचाही मार्ग मोकळा झाला.

बांधकाम कार्यांत बाबासाहेबांस विशेष रस वाटत असे व त्या कामांत ते रंगून जात असत असें सांगितलें, याचें कारण काय ? रस्ते तयार करणें, पूल बांधणें, रहाण्यासाठीं, उद्योगधंद्यासाठीं किंवा शैक्षणिक कार्यासाठीं टोलेजंग इमारती बांधणें हें सारें कशासाठीं होत असतें ? जनतेच्या सोयीसाठीं, सुखासाठीं व कल्याणासाठीं. ही नवनिर्मिति असते. जें नाहीं तें नव्यानें निर्माण करावयाचें. कोणतीही नवनिर्मिति असो; तिचा जो कोणी निर्माता असतो त्याला त्या निर्मितीनंतर होणाऱ्या आनंदाची व सुखद संवेदनांची कल्पना दुसऱ्यांस करून देतां येणें कठीण आहे. एखादा शिल्पकार सुंदर शिल्पाकृति किंवा संगमरवरी दगडाचा पुतळा तयार करतो. चित्रकार एखादें मनोहर चित्र रंगवितो किंवा एखादा साहित्यिक मनाची पकड घेणारी एखादी वाङ्मयकृति निर्माण करतो, त्यावेळीं त्यांपैकीं प्रत्येकाच्या वाट्यास येणारा सात्त्विक आनंद हा त्यांचा त्यांनींच मनमुराद लुटावा !

बाबासाहेबांनीं आपल्या आयुष्यांत निरनिराळ्या ठिकाणीं विविध प्रकारचीं अनेक बांधकामें यशस्वी रीतीनें पार पाडिलीं व प्रत्येक वेळीं नवनिर्मितीचा आनंद लुटलेला आहे. याचें मुख्य कारण म्हणजे एकंदर बांधकामाचें चित्र ठोकळमानानें आपल्या कल्पनेच्या बळावर ते डोळ्यांसमोर आणीत असत. त्यासाठीं जरूर असलेल्या माणसांची निवड ते कसून करीत असत व हातीं घेतलेल्या बांधकामांत कोणत्याही प्रकारचा उणेपणा राहूं नये यासाठीं जास्तींत जास्त झटत असत. अशा कामाच्या वेळीं त्यांना तहानभुकेचेंही भान रहात नसे. त्या कामांत ते रमलेले असत. ज्या कामांत तुम्ही रंगून जातां तें काम चांगलें व यशस्वी झालेंच पाहिजे. बाबासाहेबांच्या

बांधकामांतील यशाचें हेंच मर्म आहे. या धंद्यांत त्यांनीं जसें नांव मिळविलें त्याचप्रमाणें पैसा व अनुभवही भरपूर मिळविला.

## कांहीं बांधकामांचा परिचय

त्यांच्या देखरेखीखालीं पार पडलेल्या कांहीं महत्त्वाच्या बांधकामांचा येथें ओझरता उल्लेख करण्यांत येत आहे. मोकळ्या हवेसाठीं व रपेटीसाठीं आपण चौपाटीवर जातों; परंतु चौपाटी ते नरिमन पॉईंटपर्यंत सुमारें दोन मैल लांबीचा जो मजबूत धक्का (Parapet) बांधला आहे व ज्यावर आपण कधीं ना कधीं हवा खाण्यासाठीं बसले असूं, तो धक्का बांधून देऊन मुंबईकरांच्या सुखसोयींत भर घालण्याची उपयुक्त कामगिरी बाबासाहेबांच्या नेतृत्वाखालीं पार पडलेली आहे, याची जाणीव फार थोड्या लोकांना असेल. सायंकाळच्या शांत वेळीं त्या धक्क्यावर बसून अफाट पसरलेला तो धीर गंभीर सागर व त्या धक्क्यावर जोरजोरानें आदळणाऱ्या त्या फेसाळ लाटा, आपल्या विचारांना गति दिल्याशिवाय रहात नाहींत. मानवी जीवनांत कधीं कधीं अशाच लाटा उसळूं लागतात आणि मग आपण भयभीत होतों! परंतु नाहीं ! लाटा येतात तशाच अंतर्धान पावतात. त्या त्यावेळीं छातीचा कोट, त्या भिंताडाप्रमाणें करून, धीरगंभीरपणें व विचारपूर्वक त्यांना आपण तोंड द्यायचें असतें. बाबासाहेबांच्या यशस्वी औद्योगिक जीवनापासून आपण जर कोणता धडा घ्यायचा असेल तर तो हाच होय.

जे. जे. हॉस्पिटलसच्या परिसरांत ऑपथॅल्मिक (डोळ्यांच्या रोग्यांसाठीं) हॉस्पिटलची इमारत डौलानें खडी आहे व ती अनेक नेत्ररोग्यांचें आश्रयस्थान होऊन राहिली आहे. हमरस्त्यावरून जातांना ती सहजासहजीं डोळ्यांत भरते. नायगांव येथील पोलिस ट्रेनिंग स्कूल, व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूटचें वर्कशॉप, पी. डब्ल्यु. डी. व मुंबई इंप्रुव्हमेंटच्या चाळी, दाहोद येथील बी. बी. सी. आय. रेल्वेचें प्रशस्त वर्कशॉप, डिलाइल रोड पोलिस स्टेशन व पोलिसांसाठीं इमारती, अशीं एक ना दोन बाबासाहेबांच्या कारकिर्दींत पार पडलेलीं किती बांधकामें सांगावीं?

**एक मगरुरी इंजिनियर**

दाहोद येथील प्रचंड वर्कशॉपचा वर उल्लेख करण्यांत आला आहे. त्या बांधकामाच्या बाबतींत घडलेली एक घटना जातां जातां येथें नमूद करावीशी वाटते. ज्या कामाची जबाबदारी आपण स्वीकारली तें बांधकाम उत्तमप्रकारें पार पडलें पाहिजे याकडे बाबासाहेबांचें सतत लक्ष लागून राहिलेलें असे. त्यासाठीं मग कितीही पैसा खर्च होवो. कित्येक प्रसंगी जरूरीप्रमाणें युरोपीयन तंत्रज्ञांचेंही सहकार्य त्यांना योग्य तो मोबदला देऊन घ्यावें लागत असे. त्या जमान्याची आजच्या जमान्याशीं तुलना करतां येणार नाहीं. एखादा गोरा अधिकारी असो वा तंत्रज्ञ असो, तो नेहमीं आपल्या तोऱ्यांत असे. मगरूरीनें वागणें हा त्यांना आपला जन्मसिद्ध हक्क आहे असें वाटत असे. दाहोद येथील बांधकामाशीं युरोपीयन तंत्रज्ञांचा संबंध नेहमीं येत असे. त्यांपैकीं मॅकमिलन या नांवाचा एक इंजिनीयर हाताखालच्या सर्व लोकांशीं भारी मगरूरीनें वागत असे. कामगारवर्ग कंटाळून गेला होता. बाबासाहेबांच्या लक्षांत ही गोष्ट येतांच त्यांनीं भक्कम पुराव्यानिशीं सर्व तक्रारी तेथील मुख्य इंजिनियरच्या नजरेस आणविल्या व परस्पर त्याच्याकडून त्यांनीं मॅकमिलनची घमेंड जिरविली! तेव्हांपासून कामगारवर्ग सुरळीतपणें आपापलीं कामें उरकूं लागला.

**उज्ज्वल भावी काळ**

हा ठेकेदारीचा व्यवसाय मन लावून चालवीत असतां बाबासाहेबांना मानवी स्वभावाचे नाना अनुभव आले व तेच त्यांना त्यांच्या पुढील आयुष्यांत मार्गदर्शनाच्या दृष्टीनें फार उपयोगी पडले. आपल्या या अनुभवांचा फायदा त्यांनीं आपले द्वितीय चिरंजीव शांताराम ऊर्फ अण्णासाहेब यांच्यातर्फे न्यू युनायटेड कन्स्ट्रक्शन कंपनीला वेळोवेळीं दिलेला आहे.

औद्योगिक क्षेत्रांतील बाबासाहेबांच्या उत्साहाला पारावार नव्हता. बांधकामाची ठेकेदारी ठीक चालली होती, तरीही तेवढ्यावर समाधान मानून

स्वस्थ रहाणारा त्यांचा स्वभाव नव्हता. आपण अनेक औद्योगिक क्षेत्रें धुंडाळावीं, आपल्याबरोबर अनेकांची सोय लावावी व उद्योगधंद्यांचें क्षेत्र जितकें वाढवितां येईल तेवढें वाढवावें ही होती त्यांची महत्त्वाकांक्षा! ती त्यांना स्वस्थ बसूं देत नव्हती. अधिकाधिक व्यापक अशा औद्योगिक क्षेत्राकडे आपणाला वळायचें आहे, हाच त्यांच्या मनांत घोळणारा नेहमींचा विचार. स्वस्थपणा किंवा सुखासीनता त्यांच्या स्वभावाला मानवण्यासारखी नव्हती. धोरण, धारिष्ट, उद्योगशीलता व चिकाटी हे गुण कसोटीला लागले पाहिजेत. त्या दृष्टीनें बाबासाहेब नवीन औद्योगिक क्षेत्रांत पदार्पण करण्याची संधि केव्हां मिळते याची टेहळणी करीत असतां शेवटीं त्यांना हवें असलेलें क्षेत्र एकदांचें सांपडलें!

३.

# लो. टिळकांची प्रेरणा व स्वदेशी भावना

**विद्यार्थीदशेपासून** बाबासाहेबांच्या मनावर लो. टिळकांच्या व्यक्तित्वाचा, निस्सीम देशभक्तीचा व विशेषत: त्यांनीं व्याख्यानें व लेख यांच्याद्वारें प्रचारिलेल्या स्वदेशी भावनेचा पगडा बसलेला होता. त्यांच्या बाबतींत आरंभापासून ती भावना म्हणजे एक प्रेरक शक्तीच होऊन राहिली होती. चालू विसाव्या शतकांतील पहिल्या दशकाचा तो काळ. लोकमान्य टिळकांनीं 'केसरी' पत्रांतील आपल्या दणदणीत लेखांच्या द्वारें व ठिकठिकाणीं होणाऱ्या व्याख्यानांच्या द्वारें महाराष्ट्रांतील असंख्य तरुणांचीं मनें स्वदेशप्रेमानें भारून टाकिलीं होतीं.

इंग्रज राज्यकर्त्यांनीं आमचा देश जिंकला व केवळ राजकीय दृष्ट्याच नव्हे तर आमचे उद्योगधंदे पद्धतशीरपणें नाहींसे करून सर्व बाबतींत आम्हांला परावलंबी कसें बनवून ठेविलें आहे, याचें चित्र अनेक दाखले देऊन लो. टिळक महाराष्ट्रीय जनतेपुढें खडें करीत होते.

आज सुदैवानें आपण स्वातंत्र्याच्या काळांत वावरत आहोंत. राजकीय स्वातंत्र्याबरोबर आम्हांला औद्योगिक स्वातंत्र्यही लाभलेलें आहे. जागोजाग देशी उद्योगधंदे स्थापन होऊन ते भरभराटीला येत आहेत; परंतु ज्या काळासंबंधानें आम्ही लिहीत आहोंत, तो ५०।६० वर्षांपूर्वींचा काळ विपरीत होता. आम्हांला लागणारी प्रत्येक लहान मोठी वस्तू परदेशांतून येत असे. आमच्या पैशांवर परदेशी व्यापारी व कारखानदार गबर

होत होते आणि आम्ही दिवसेंदिवस अधिकाधिक कंगाल होत चाललों होतों.

## लोकमान्यांनीं नाडी ओळखली

लो. टिळकांनीं राज्यकर्त्या इंग्रजांची नाडी बरोबर ओळखली होती. राज्यकर्त्यांना आपला देश व्यापारधंद्यांच्या बळावर सुसंपन्न करावयाचा होता; त्यापायीं हा देश कितीही कंगाल दशेला येऊन पोहोंचला तरी त्याची त्यांना फारशी पर्वा नव्हती; परंतु त्यांच्या या धोरणामुळें जनतेचा परावलंबीपणा व दारिद्र्य उत्तरोत्तर बळावत चाललें होतें. दुष्काळासारखी आपत्ति ओढवली असतां त्यांत लक्षावधि लोक बळी पडावयाचे. हें असें कां होतें? याचें मूलभूत कारण कोणतें? याकडे तत्पूर्वींच्या व तत्कालीन विचारवंतांचें लक्ष लागून राहिलें होतें. महर्षि दादाभाई नवरोजी, सार्वजनिक काका, न्यायमूर्ति रानडे व लोकमान्य टिळक यांच्यासारख्या विद्वान् व स्वदेशप्रेमी पुढाऱ्यांनीं त्याचें मूळ, तत्कालीन राज्यपद्धतींत आहे असा निर्णय दिला.

## तत्कालीन राष्ट्रीय पुढाऱ्यांचें निदान

आपलें राजकीय वर्चस्व प्रस्थापित करून एका देशानें दुसऱ्या देशाला परतंत्र बनविलें तर तो प्रश्न प्रामुख्यानें सर्वांच्या चर्चेचा विषय होतो; परंतु त्याहीपेक्षां अधिक महत्त्वाचा व अधिक हानिकारक असा दुसरा एक प्रश्न आहे; त्याकडे मात्र फारसें कोणाचें लक्ष जात नाहीं. आपलें भांडवल, कौशल्य, व व्यापारी धाडस वगैरे गुणांच्या बळावर, ती परकीय सत्ता जिंकलेल्या देशांत कारखाने व उद्योगधंदे स्थापन करून त्यांच्या द्वारें जनतेचें जें रक्तशोषण करते, त्यालाच भारी महत्त्व आहे. कारण त्यामुळें राष्ट्रीय जीवनाच्या व विकासाच्या साऱ्या नाड्या आखडल्या जातात.

महर्षि दादाभाई नवरोजी, न्यायमूर्ति रानडे व लोकमान्य टिळक यांच्यासारख्या स्वदेशप्रेमी विचारवंतांनीं त्या काळांत देशस्थितीचें जें निदान केलें, त्याचें सर्वसाधारण स्वरूप अशाप्रकारचें होतें.

अनुक्रम ३८८८२ वि: ...धारि...
९४५६ नों: दि: .२५।''...



## जमशेटजी टाटा

जमशेटजी टाटा (१८३९–१९०४) यांचें नांव कोणी ऐकलेलें नाहीं? वालचंद हिराचंद यांच्यापूर्वी अनेक उद्योगधंद्यांचा त्यांनीं खंबीर पाया घातला. आरंभीं कापसाच्या व्यापारामुळें मँचेस्टर व लँकाशायरशीं त्यांचा निकट संबंध आला. कापसाच्या रूपानें कच्चा माल या देशांतून निर्यात व्हावयाचा व त्याचीं तलम वस्त्रें बनून या देशांत यावयाचीं व तीं आम्हीं विकत घ्यावयाचीं. अशारीतीनें कोटयावधि रुपये परदेशीं जात असत. कच्चा माल द्यायचा आणि पक्का माल घ्यायचा. असा हा देशाला दरिद्री बनविणारा देवाणघेवाणचा व्यवहार होता. परंतु तो व्यवहार या देशांतील लोकांना कंगाल बनवून विलायतेंतील लोकांना व व्यापाऱ्यांना संपन्न बनवीत होता!

तलम कापडाच्या रूपानें परदेशीं जाणारा पैसा थोपविला पाहिजे व तो कशा रीतीनें थोपवितां येईल या विचारास जमशेटजी लागले. कारण त्यांना केवळ स्वतःचेंच कल्याण साधावयाचें नव्हतें. देशस्थितीकडे व देशांतील गोरगरीब जनतेकडेही त्यांचें लक्ष होतें. आणि त्याच हेतूनें डबघाईला आलेली एक कापडगिरण त्यांनीं १८८६ सालीं विकत घेतली आणि ती आधुनिक यंत्रसामुग्रीनें सुसज्ज करून तिचें नांव त्यांनीं 'स्वदेशी मिल' ठेविलें.[1]

## लो. टिळकांचें एक भाषण

त्याकाळीं किंवा तदनंतरच्या काळांतही या देशांत परदेशांतून येणाऱ्या कोटयवधि रुपयांच्या कापडावर सर्व पुढाऱ्यांचें लक्ष लागून राहिलेलें होतें.

१. "Fully impressed by Swadeshi idea he in 1886 projected another mill in Bombay, which he called the "Swadeshi Mills." So he had the honourable and patriotic ambition to compete with Lancashire in the finer goods, so as to materially reduce the imports."

—The Life and life-work of J. N. Tata by D. E. Wacha

लो. टिळक यांचें ता. १५ डिसेंबर १९०७ रोजीं गिरणीकामगारांच्या भागांत चिंचपोकळीस कामगार वर्गापुढें एक व्याख्यान झालें. त्यांत त्यांनीं सांगितलें कीं, "स्वदेशी हा पोटापाण्याचा प्रश्न आहे. मी तुमच्या गिरणींतील कापड घेतों म्हणून त्याची मजुरी तुम्हांला मिळते. म्हणजे स्वदेशीपासून प्रत्यक्ष फायदा तुमचा आहे. मुंबईंतील पहिल्या प्लेगचेवेळीं जीव बचावण्यासाठीं तुम्ही लोक आपल्या गांवाला गेला; परंतु तिकडे उपासमारीनें मरण्याची पाळी आली! त्यावेळीं मुंबईंत खाऊन पिऊन तरी मरूं, असा मनाचा धडा करून तुम्ही परत मुंबईंत आलां. याचा अर्थच असा कीं, तुमच्या देशांत तुम्हांला आपल्या निर्वाहाचें साधन नाहीं; म्हणून आपलीं घरेंदारें सोडून तुम्ही मुंबईंत येतां. स्वदेशीचा हेतु तरी हाच आहे कीं, तुम्हांला उद्योगधंदे मिळावे व आहेत ते भरभराटीस यावेत."

या भाषणाच्याद्वारें लोकमान्य टिळकांनीं अनेक गोष्टी सूचित केल्या आहेत. लोकांनीं या देशांत तयार होणारें कापड घ्यावें; कारण त्यामुळें आपल्या देशांतील कामगार वर्गाचें पोषण होतें. त्याचप्रमाणें आपला गांव व घरदार सोडून लोकांना पोटासाठीं मुंबईसारख्या शहरांत यावें लागतें. त्याऐवजीं खेड्यापाड्यांतून उद्योगधंद्यांची स्थापना झाल्यास किती चांगलें व सोयीचें होईल?

खेड्यापाड्यांतून उद्योगधंद्यांची स्थापना व विकास होणें हें आमच्या दृष्टीनें कितीही सुखसोयीचें असलें तरी राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें तें गैरसोयीचें होतें. लोकमान्य टिळक यांना या गोष्टीची बरोबर जाणीव झालेली होती व तिचे पडसाद त्यांच्या केसरींतील लेखांतून तसेंच व्याख्यानांतून वारंवार उमटत होते.

### सर्वांत अनिष्ट गोष्ट

सर्वांत अनिष्ट व अहितकर जर कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे औद्योगिक पारतंत्र्य हीच होय. या देशांतील उद्योगधंद्यांचा पद्धतशीर रीतीनें नायनाट करण्यांत आल्यामुळें देश किती दुबळा बनलेला आहे याची

जाणीव करून देतांना लोकमान्य टिळक म्हणतात, "औद्योगिक पारतंत्र्य अथवा उद्योगासाटीं दुसऱ्याच्या तोंडाकडे बघत बसणें या अनिष्ट अवदसेबद्दल आपल्या लोकांत जितकी चर्चा होऊं लागावी तितकी अजून झाली नाहीं हें आपणां सर्वांसच अहितकर होय.....ही स्थिति शोचनीय आहे हें जितकें लौकर आपल्या लोकांस स्पष्टपणें उमगेल तितकें चांगलें आहे. इंग्लिश लोकांचें राज्य येथें स्थापन होण्यापूर्वी आपल्या देशांत आपल्यास लागणारे सर्व जिन्नस आपण उत्पन्न करीत होतों....पण याच शतकांत काय गंमत झाली पहा! हल्लीं आमचे लोक नुसता कच्चा माल उत्पन्न करण्याचे मात्र अधिकारी होऊन बसले आहेत. पक्का माल सर्व पश्चिमेकडून येत आहे आणि त्यामुळें आम्हांस सर्वस्वीं परकीयत्व प्राप्त झालें आहे. इंग्रजांप्रमाणें आपणास हक्क नाहीं म्हणून आपण चरफडतों आणि त्याबद्दल आक्रोशही करतों; आपण सर्वदा लंगडे होऊन ज्याच्या योगानें आपल्या कर्तृत्वाचे सर्व अवयव लटके पडत चालले आहेत व जे अनावर झाले असतां आपल्या नाड्या आखडण्यास फारशी दिवसगत लागावयाची नाहीं, तें औद्योगिक पारतंत्र्य व ह्या पारतंत्र्याचें पूर्ण स्वरूप यांची ओळख आपण करून घेत नाहीं, या कारणानें ही पारतंत्र्याची बेडी आपल्यास विशेषच जखडीत चालली आहे, ही गोष्ट मात्र दुःसहतर होय."[१]

तत्कालीन 'केसरी' पत्रांतील लोकमान्य टिळकांच्या लेखांतील १।२ उतारें येथें देण्याचें कारण ते लेख तत्कालीन तरुणांचीं मनें तयार करीत होते. त्यांना आपल्या देशाच्या स्थितीची परिणामकारक रीतीनें जाणीव करून देत होते हेंच होय. त्याकाळीं लो. टिळकांचा केसरी खेड्यापाड्यांतून घरोघर जात असे व तो विचारपूर्वक व श्रद्धापूर्वक वाचला जात असे. इतरांप्रमाणें बाबासाहेबांच्याही वाचण्यांत केसरी येत असे व त्यांच्या संस्कारक्षम बालमनावर सहाजिकच कांहींना कांहीं इष्ट परिणाम घडून येत असे.

१ 'केसरी'—ता. २५ सप्टेंबर १८९४.

## कर्तव्याची जाणीव

मुंबईंत शिक्षणसंपादनार्थ आल्यानंतर लो. टिळकांच्या व्याख्यानांचा लाभ त्यांना घडणें स्वाभाविक होतें. विद्यार्थि दशेंत असतां भावी काळांतील आपल्या कर्तव्याची जाणीव होण्याचें भाग्य सर्वांच्याच वाट्यास येत असतें असें म्हणवत नाहीं; परंतु तें भाग्य बाबासाहेबांच्या वाट्यास आलेलें होतें.

लो. टिळकांनीं स्वदेशी वृत्तीचा जो जोरदार प्रचार चालविला होता त्याचा इष्ट परिणाम शहरांतून व खेड्यापाड्यांतूनही कुठें कुठें घडून आलेला दिसत असे. स्वदेशी व्रत स्वीकारणें ही त्याकाळीं साधीसुधी गोष्ट नव्हती. तें एक असिधाराव्रत होतें. स्वदेशीचा प्रचार आमच्या दृष्टीनें हितकर असला तरी परकीय सरकारला तो नको होता. स्वदेशीच्या पुरस्काराआड येणारीं आणखीही अनेक कारणें होतीं. कारणें वाटेल तेवढीं असलीं तरी झीज सोसून स्वदेशीचा स्वीकार व प्रचार करणारीं कांहीं तुरळक, त्यागी माणसें त्याकाळीं पुढें येऊं लागलीं होतीं.

## स्वदेशी वस्तु प्रचारिणी सभा

बाबासाहेब आरंभीं ज्या शिक्षण संस्थेंत दाखले झाले, त्या संस्थेशीं संबंध असलेले कै. वामनराव जोशी यांच्या पुरस्कारामुळें मुंबईंत त्याच सुमारास 'स्वदेशी वस्तु प्रचारिणी' नांवाची संस्था अस्तित्वांत आली. स्वदेशांत तयार होणारा माल घरोघर फिरून लोकांना पुरविणें हें त्या संस्थेचें एक ध्येय होतें. त्या संस्थेतर्फे वामनरावजींनीं विद्यार्थिवर्गांत स्वदेशीचा प्रचार चालविला होता. त्याचा परिणाम होऊन फावल्या वेळांत कांहीं विद्यार्थि स्वदेशी कापडाचे तागे खांद्यावर टाकून ते खपविण्यासाठीं घरोघर जात असत. विद्यार्थि बाबासाहेब त्या स्वदेशप्रेमी विद्यार्थ्यांत मोठ्या उत्साहानें सामील झाले होते.[1]

१. मुंबई विधान सभेचे माजी अध्यक्ष व बाबासाहेबांचे एक स्नेही कै. भाऊसाहेब सोमण यांच्या 'व्यापार-उद्योग' मासिकाच्या डहाणूकर विशेषांकांतील लेखावरून.

यावरून विद्यार्थिदशेपासून बाबासाहेबांचें लक्ष स्वदेशी व्रताकडे कसें लागून राहिलें होतें हें दिसून येतें; त्याचबरोबर विद्यार्थि असल्यापासून लोकमान्य टिळक यांच्या जीवनकार्याकडे, स्वदेशप्रेमाकडे व ते देशासाठीं करीत असलेल्या असीम त्यागाकडे त्यांचें लक्ष लागून राहिलें होतें.

**बाबासाहेबांचें श्रद्धास्थान**

प्रत्येक कर्तबगार व्यक्तीच्या जीवनांत श्रद्धास्थानाला फार मोठें महत्त्व असतें. माणसाची कुणावर तरी श्रद्धा असावी लागते. त्या श्रद्धेच्या छाये-खालीं वावरत असतां त्याला कर्तव्याची जाणीव होऊन कर्तव्यपालनाचा मार्गही सांपडत असतो. श्रद्धा ही एक दैवी शक्ति आहे. ती ज्याला प्रसन्न झाली तो माणूस कितीही संकटें आलीं तरी डगमगत नाहीं. त्याचें पाऊल नेहमीं पुढें पुढेंच पडत जावयाचें.

बाबासाहेबांच्या जीवनकार्याकडे बारकाईनें पहाणाऱ्यास आमच्या या म्हणण्याची प्रचीति आल्याशिवाय रहाणार नाहीं. लोकमान्य टिळक हे त्यांचें श्रद्धास्थान होतें. त्यांच्या जीवन कार्यावर त्यांची अढळ निष्ठा होती. विद्यार्थीदशेपासून तीच त्यांची प्रेरणा शक्ति होऊन राहिली होती. या आयुष्यांत आपल्याकडून जें कांहीं थोडें फार कार्य पार पडलें तें लो. टिळ-कांच्या प्रेरणेमुळेंच होय, हीच त्यांची नेहमींची भावना. हा ऋणनिर्देश त्यांनीं जाहीर रीतीनें अनेक वेळां अनेक ठिकाणीं अत्यंत कृतज्ञतेनें केलेला आहे.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ह्या त्यांनीं स्थापन करण्यांत भाग घेतलेल्या व्यापारी संस्थेतर्फे ना. नाईक निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखालीं त्यांचा सत्कार करण्यांत आला.[1] त्याप्रसंगीं बाबासाहेबाना लो. टिळकांची आठवण होऊन ते म्हणाले होते कीं, "माझ्या पाठीशीं लो. टिळकांचा आशीर्वाद आहे. त्यांच्या आशीर्वादामुळेंच या जीवनांत माझ्याकडून थोडें फार कार्य पार पडलें. ही त्यांच्याच आशीर्वादाची किमया आहे; आणि आतांही मी

१. ताजमहाल हॉटेलांत ता. १९ डिसेंबर १९४९ रोजीं.

आपणांस आश्वासन देतों कीं माझ्या जिवांत जीव असेपर्यंत मी राष्ट्राच्या उत्कर्षासाठीं झटेन."

वर सांगितल्याप्रमाणें बाबासाहेबांची लो. टिळकांवर असीम निष्ठा. त्या जाज्वल्य निष्ठेमुळें आपल्या देशासाठीं व देशबांधवांसाठीं आपण कांहीं ना कांहीं औद्योगिक हालचाल केली पाहिजे, आहे त्यांत समाधान मानून न रहातां आपल्या वाट्यास कष्टाचें जीवन आलें तरी त्याला आनंदानें कवटाळण्यास तयार राहिलें पाहिजे, ही जाणीव त्यांच्या ठायीं निर्माण झाली.

**जीवनांतील स्फूर्तिदेवता**

लोकमान्य टिळक म्हणजे बाबासाहेबांची स्फूर्तिदेवता. हिचें दर्शन उठतां बसतां घडावें म्हणून त्यांची एक भव्य तसबीर त्यांनीं आपल्या दिवाणखान्यांत दर्शनीय जागीं ठेविली आहे. ज्या व्यक्तीवर आपली श्रद्धा असते तिच्या मिळतील तेवढ्या प्रतिमा व तिचें वाङ्मय आपण जमा करतों व तें जवळ बाळगण्यांत आपल्या मनाला एक प्रकारचें सात्त्विक समाधान वाटत असतें. बाबासाहेबांच्या बाबतींतही हेंच आढळून येतें.

बाबासाहेबांनीं जीवनाच्या आरंभ काळापासून जीं जीं पावलें टाकलीं तीं तीं लोकमान्यांच्या स्फूर्तिप्रसादामुळेंच होत. आणि तो प्रसाद नेहमी पाठीशीं असल्यामुळें आपणांस यश मिळत गेलें हें कृतज्ञतापूर्वक सांगतांना त्यांना एक प्रकारचा सात्त्विक आनंद होत असे.

बेलापूर येथें किंवा बेलवंडी येथें साखरेच्या कारखान्याची उभारणी त्यांनीं केली ती मार्गांत आलेल्या अनेक संकटांशीं सामना देत देत केली. हें सामना देण्याचें व संकटांशीं झुंझार वृत्तीनें टक्कर देण्याचें मनोधैर्य त्यांना प्राप्त झालें तें लोकमान्यांच्या प्रेरणेमुळेंच होय. ही जाणीव त्यांच्या अंतःकरणांत सदैव वावरत असे आणि म्हणूनच तर त्या भागांत कारखानादारीमुळें निर्माण झालेल्या वसाहतीला त्यांनीं '**टिळकनगर**' हें आदरणीय नांव दिलें.

आपल्याप्रमाणें कर्तव्यपालनाची प्रेरणा व स्फूर्ति सर्वांना मिळावी या सद्धेतूनें त्या टिळकनगरांत लो. टिळकांचा अर्धपुतळा बसविण्यांत आला

आहे. त्याचें अनावरण ना. काकासाहेब गाडगीळ यांच्या हस्तें ता. १९ डिसेंबर १९५१ रोजीं मोठ्या थाटांत झालें.

**लोकमान्यांबद्दल भक्तिभाव**

या अर्धपुतळ्याचें अनावरण करण्याची ना. काकासाहेब गाडगीळ यांना विनंती करतांना बाबासाहेबांनीं केलेलें भाषण त्यांच्या टिळकभक्तीनें ओतप्रोत भरलेलें आहे. त्या प्रसंगीं बाबासाहेब म्हणाले होते कीं, "परकीयांच्या अंमलाखालीं महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती सर्वथैव खुंटली होती. परकीय सत्तेच्या गांजणुकीची झळ सबंध देशाबरोबर महाराष्ट्रालादेखील चांगलीच जाणवली. महाराष्ट्राची राजकीय, सामाजिक व आर्थिक दृष्ट्या सर्वथैव कुचंबणा झाली होती. गेल्या शतकाच्या शेवटीं शेवटीं परकीयांच्या जुलमी राज्यकारभाराची परिसीमा झाली. त्यावेळीं देशविमोचनाच्या चळवळीचें वीं जोरानें रुजण्यास सुरुवात झाली. देशाची पिळवणूक करणें हेंच परकीय सत्तेचें मुख्य धोरण होतें. त्यामुळें देशाच्या औद्योगिक विकासाकडे त्यांनीं बुध्या दुर्लक्ष केलें. याच धोरणाचे दुष्परिणाम देशांतील इतर भागांप्रमाणें महाराष्ट्रावर झाल्याखेरीज राहिले नाहींत. देशविमोचनाच्या क्रांतिकारक विचारजागृतीनें देशांत एक प्रकारचें नवचैतन्य निर्माण झालें. या स्वातंत्र्याच्या संग्रामांत महाराष्ट्रास आघाडीवर ठेवण्याचें व इतर लोकांना स्फूर्ति देण्याचें महान् कार्य जर कोणी केलें असेल तर तें लोकमान्य टिळकांनींच.

"स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच" हा दिव्य संदेश देऊन परकीय सत्तेविरुद्ध देशव्यापी प्रचंड चळवळ उभी करण्याचें श्रेय लो. टिळकांकडेच जातें. *१९०५-६ सालीं मुंबई येथें विद्यार्थि असतांना लोकमान्यांच्या भाषणांतील स्फूर्तीमुळेंच स्वदेशी चळवळींत भाग घेतल्याचें मला स्मरतें.*

"राजकारणांतील व्यापामुळें लोकमान्यांना औद्योगिक क्षेत्रांत जरी तितकेंसें प्रत्यक्ष लक्ष घालतां आलें नाहीं, तरी त्या क्षेत्राकडे त्यांचें दुर्लक्ष झालें असें म्हणतां येत नाहीं. लोकमान्य चतुरस्र असल्यानें औद्योगिक प्रगतीचें

महत्त्व त्यांना पूर्णपणें पटलें होतें. कार्याबद्दलचें त्यांचें अचूक निदान व वैचारिक प्रगल्भता हीं त्यांच्या अष्टपैलुत्वाची साक्ष देतात.

"विसाव्या शतकाच्या प्रारंभीं जेव्हां स्वराज्य हें केवळ स्वप्न होतें, अशावेळीं भविष्यकाळाचें अचूक निदान करून टिळकांनीं देशकार्यास हात घातला. त्यांनीं आम्हांला स्वदेशीचा महामंत्र दिला व तदनुषंगिक औद्योगिक कार्यास जोराचा उठाव दिला.

"तळेगांव दाभाडे येथील पैसाफंडाची कांचशाळा व कारखाना हीं याच गोष्टीची साक्ष देतात. आज भारतांतील कांच कारखान्यांचे चालक बहुतेक याच शाळेचे विद्यार्थि होते. राजकारण हीच देशसेवा व हेंच कर्तबगारीचें क्षेत्र ही कल्पना रूढ असलेल्या त्या काळांत औद्योगिक क्षेत्रांत पडण्याची कल्पना तितकीशी पटण्यासारखी नव्हती व म्हणूनच औद्योगिक प्रगतीचें महत्त्व पटविण्याची त्याकाळीं विशेष आवश्यकता होती. तेव्हां महाराष्ट्रानें औद्योगिक क्षेत्रांत जी प्रगती केली, त्याचें फार मोठें श्रेय लोकमान्यांनीं दिलेल्या या उत्तेजनाकडे जातें, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

"लोकमान्य दिवंगत होऊन आज ३१ वर्षें झालीं. (आतां ४४) त्यांचा पार्थिव देह जरी पंचत्वांत विलीन झाला असला, तरी त्यांचीं उदात्त तत्त्वें व त्यांचें महान् कार्य हीं अमर आहेत. ***अशा महान् नेत्याच्या वैचारिक श्रेष्ठतेचा पगडा माझ्या मनावर बसला असल्यास नवल नाहीं; व त्यामुळेंच लोकमान्यांना अत्यंत जिव्हाळ्याच्या असलेल्या औद्योगिक प्रगतीच्या कार्यास अल्पसा हातभार लावण्याचें मी ठरविलें.*** औद्योगिक क्षेत्रांत पडणाऱ्यांस किती अनपेक्षीत अडचणींना तोंड द्यावें लागतें याची कल्पना त्यांत पडलेल्यांनाच येऊं शकेल, इतकें सांगितलें म्हणजे पुरे.

"विवक्षीत कार्याची कल्पना करणें हें सोपें आहे; परंतु ती प्रत्यक्षांत उतरविण्यास केवळ चिकाटीच नव्हे, तर आत्मविश्वासाची आवश्यकता असते. लोकमान्यांच्या महाराष्ट्राच्या औद्योगिक उन्नतीबाबतच्या प्रेरणेमुळेंच हा साखर कारखाना उभारण्याचें मीं हातीं घेतलें व महाराष्ट्राच्या प्रगतीला कांहीं

प्रमाणांत हातभार लावूं शकलों. आणि अर्थात् कृतज्ञतेच्या भावनेनें त्यांच्या स्मृतीचें स्मारक म्हणून या वसाहतीचें नांव 'टिळकनगर' असें ठेविलें.

"स्मारक उभारण्यानें त्या लोकोत्तर पुरुषाचें नांव अजरामर होईल असें नाहीं. त्यांचें कार्यच इतकें थोर आणि श्रेष्ठ आहे कीं, तें नाहींसें होऊंच शकणार नाहीं. मानवी मूलभूत हक्काचा महामंत्र देऊन त्यांनीं राष्ट्राला जागृत केलें. त्यांच्या उज्ज्वल कार्याची आठवण सतत राहावी, याच भावनेनें हें स्मारक उभारलें आहे. लोकमान्य टिळकांच्या पुतळ्याच्या या उद्‌घाटनाचें वैशिष्ट्य हेंच आहे. हें स्मारक तरुण पिढीला सतत प्रेरणा दिल्याखेरीज राहाणार नाहीं."

लो. टिळक यांस कृतज्ञतापूर्वक आदरांजलि वहातांना बाबासाहेबांनीं केलेल्या भाषणांतील हा थोडासा लांबलेला उतारा येथें उद्‌धृत करण्याचा मोह आम्हांला आवरतां आला नाहीं याचें मुख्य कारण हेंच कीं, बाबासाहेबांनीं त्यांत आपली स्फूर्तिदेवता कोण होती व जीवनांत क्रांति घडवून आणून आपणास कार्यप्रवृत्त कोणीं केलें, याचा त्यांनीं असंदिग्ध भाषेंत खुलासा केलेला आहे.

विद्यार्थी दशेंत बाबासाहेबांच्या अंतःकरणांत स्वदेशी भावनेचें एकदां जें बीजारोपण झालें, त्याच भावनेला पुढील काळांत व्यापक स्वरूप येत गेलें. स्वदेशाच्या व आपल्या देशबांधवांच्या उन्नतीसाठीं, त्याचप्रमाणें त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठीं आपण उत्पादक उद्योगधंद्यांकडे वळलें पाहिजे असें त्यांना वाटूं लागलें व यापुढील काळांत तोच विषय त्यांच्या नित्य चिंतनाचा झाला.

## ४.

# साखर कारखान्याचा जन्म

" स्वदेशी मालाचा जितका जास्त व लवकर पुरवठा करतां येईल तितका करण्याविषयीं व्यापाऱ्यांनीं झटलें पाहिजे...देशी माल वापरण्याचा निश्चय करणें हें ज्याप्रमाणें लोकांचें कर्तव्य आहे, त्याचप्रमाणें लोकांच्या गरजा पुरवावयास लागतील ते उद्योग करणें हें देशांतील धनाढ्य लोकांचें कर्तव्य आहे."

**लो. टिळक**


**सध्यांच्या** काळांत भारतांत उद्योगधंद्यांची वाढ झपाट्यानें होऊं लागली आहे. उद्योगधंद्यांच्या वाढीस सर्वस्वीं पोषक व उत्तेजक अशा पंचवार्षिक योजनासारख्या अनेक योजना पुढें येत आहेत; आज औद्योगिक क्षेत्रांत क्रांति घडून येत आहे. परंतु इंग्रजांच्या राजवटींत आमच्या उद्योगधंद्यांना थारा नव्हता. उत्तेजन नव्हतें. अडथळे मात्र भरपूर होते. अशा त्या विपरीत काळाशीं चिकाटीनें व धैर्यानें टक्कर देऊन भारत स्वयंपूर्ण व स्वावलंबी व्हावा यासाठीं जे झटले व ज्यांनीं औद्योगिक क्षेत्रांत संस्मरणीय परंपरा निर्माण करून ठेवल्या त्या कर्मवीरांचें जितकें कौतुक करावें तितकें थोडेंच होईल.

### औद्योगिक क्षेत्रांतील अजरामर नांवें

पोलाद आणि वीज या दोन अत्यावश्यक साधनांकडे आपलें लक्ष गेलें असतां जमशेटजी टाटा यांची आठवण चटकन होते. मोटारी, बोटी




काश्मीरच्या मदतीसाठीं लिलांव पुकारण्यांत आलेला गालिचा, सर्वांत मोठी मागणी बाबासाहेबांकडून आल्यावरून तो गालिचा ना. मुरारजी देसाई त्यांना देत आहेत.



बसलेले डावीकडून (१) ना. गोविंदराव वर्तक, (२) ना. वैकुंठलाल मेहता व (३) बाबासाहेब.



स्वातंत्र्यकाळांतील मुंबईचे
पहिले हिंदी राज्यपाल
महाराजसिंग व
मुंबईचे शेरीफ बाबासाहेब
डहाणूकर (१९४८)



श्री. वालचंद हिराचंद व
श्री. बाबासाहेब डहाणूकर
(१९४१)



उसाच्या मळ्यांत बाबासाहेब (डावीकडून तिसरे)

## आरंभकाळांतील साहाय्यक व सल्लागार




शेठ मथुरदास वसनजी


आरंभकाळांतील
सहाय्यक व सल्लागार



सर सोरावजी
पोचखानवाला



शेट हरिदास
माधवदास



जिनीवा येथील आंतरराष्ट्रीय
मजूर परिषदेंत मालकवर्गाचे
प्रतिनिधि श्री. बाबासाहेब
डहाणूकर व सहाय्यक
श्री. दत्तोपंत केळकर
१९३९



जिनीवा परिषदेंत
कामगारवर्गाचे प्रतिनिधि
श्री. आर्. एस्. निंबकर
व मालकवर्गाचे प्रतिनिधि
श्री. बाबासाहेब डहाणूकर
१९३९

बाबासाहेबांच्या निकट परिचयांत आलेले आणखी कांहीं राष्ट्रीय पुढारी, उद्योगपति कारखानदार, सहकारी व स्नेहीसोबती.



श्री. विजयालक्ष्मी पंडित



श्री. हरिभाऊ पाटसकर



श्री. हरेकृष्ण मेहताब



श्री. ए. बी. नायर
संपादक, 'फ्री प्रेस जर्नल'



शेट जी. डी. बिर्ला



श्री. नवल टाटा



सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास



शेट लाला श्रीराम



शेट कस्तुरभाई लालभाई



श्री. ए. डी. श्रॉफ



शेट लालचंद हिराचंद



श्री. कमलनयन बजाज



शेट अंबालाल साराभाई



सर एच्. पी. मोदी



श्री. आर्. जी. सरैय्या



श्री. सी. एम्. कोठारी



श्री. डी. सी. कोठारी



श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर



श्री. शंतनुराव किर्लोस्कर



श्री. बाबूभाई चिनॉय

## बाबासाहेबांचे जीवनसाथी



श्री. शंकरराव ओगले



श्री. हाशम प्रेमजी



शास्त्रज्ञ सर टी. एस्. व्यंकटरमण



श्री. गणपतराव जोशी

व विमानें हीं दळणवळणाचीं साधनें दृष्टीपुढें आलीं असतां वालचंद हिराचंद यांची आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं. नांगर व शेतीचीं अवजारें यांच्याशीं लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचें नांव निगडित होऊन राहिलें आहे. साठे म्हणजे बिस्किटें; ओगले म्हणजे कांचेचें सामान; त्याचप्रमाणें स्फटिका-सारखी शुद्ध स्वदेशी साखर म्हटली म्हणजे बाबासाहेब डहाणूकर यांची आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं. निरनिराळ्या औद्योगिक क्षेत्रांत आपल्या महाराष्ट्रांत अशा अनेक कर्मवीरांनीं आपापलीं नांवें अजरामर करून ठेविलीं आहेत.

लाकडांचे व्यापारी, बांधकामाचे ठेकेदार वगैरे क्षेत्रांत यशस्वी रीतीनें वावरणारे बाबासाहेब साखर धंद्याकडे कसे वळले व त्या धंद्यांत त्यांनीं नांव कसें मिळविलें हें पहाण्यासारखें आहे.

आतांपर्यंत त्यांनीं जे व्यवसाय हाताळले त्यांत त्यांनीं थोडाबहुत पैसा जवळ केलेला होता. आणि जवळ केला असला तर त्यांत मोठेंसें नवल नाहीं. आपल्या देशांत स्वदेशी उद्योगधंदे निघाले पाहिजेत व धनिकांनीं आपल्याजवळील पैशांचा ओघ औद्योगिक क्षेत्राकडे वळविला पाहिजे, असें लोकमान्य टिळक परोपरीनें सांगत असत. बाबासाहेबांनीं श्रद्धापूर्वक ते शब्द झेलले होते. ते त्यांना स्वस्थ बसूं देत नव्हते. देशांतील पैसा देशांत राहील व ज्यामुळें असंख्य लोकांच्या पोटापाण्याची सोय होईल अशा उद्योगधंद्यांची आपण कांस धरावयाची तर त्यासाठीं सर्वप्रथम आपल्याजवळ भांडवल जमा झालें पाहिजे. दरिद्री माणसानें मनोरथाच्या माड्या रचल्या तरी त्यांचा काय उपयोग? बाबासाहेब हें पूर्णपणें जाणून होते. सर्वस्वीं दुसऱ्यांच्या आहारीं जाऊन त्यांना कोणतीही गोष्ट करावयाची नव्हती. त्यांना स्वतःची कुवत अजमावून पहावयाची होती. आर्थिक भांडवलाबरोबर त्यांना अनुभवांचें भांडवलही जवळ करावयाचें होतें. एकदां पुढें टाकलेलें पाऊल सहसा मागें घ्यायचें नाहीं; परंतु पहिलें पाऊल टाकतांना साधकबाधक रीतीनें पूर्णपणें विचार करावयाचा. आणि मग मागें वळून न पहातां आस्ते कदम प्रगतीच्या मार्गानें वाटचाल करावयाची, हा होता बाबासाहेबांचा नेहमींचा शिरस्ता.

### औद्योगिक क्षेत्रांची टेहळणी

या धोरणाला अनुसरून आपण कोणत्या औद्योगिक क्षेत्रांत पदार्पण करावें या विचारांत बाबासाहेब होते. त्यांनीं निरनिराळ्या क्षेत्रांची बारकाईनें टेहळणी चालविली होती.

बाबासाहेब नंतरच्या काळांत साखरधंद्यांत पडले तरी उद्योगधंद्यासंबंधीं त्यांचें विचारचक्र चालू असतां त्या धंद्याला स्थान मिळण्यासारखी तत्कालीन परिस्थिति नव्हती. ज्या धंद्याचा व्याप संभाळावयाचा तो किफायतशीर रीतीनें करतां आला पाहिजे, स्वतःच्या फायद्याबरोबर आपल्या देशबांधवांचाही त्यामुळें फायदा झाला पाहिजे. त्याकाळीं साखरधंद्याला अनुकूल व उत्तेजक असें कांहींच नव्हतें. जें होतें तें सारें प्रतिकूलच होतें. मग तो धंदा त्यांच्या दृष्टीपुढें यावा कसा? नीरा व्हॅलीसारखा देशी भांडवलदारांनीं सुरू केलेला साखर कारखाना युरोपियन मालकीच्या बेलापूर साखर कारखान्याशीं टक्कर देतां देतां गतप्राण झालेला होता. मग जाणूनबुजून त्या क्षेत्राकडे वळण्याची बाबासाहेबांना बुद्धि व्हावी कशी?

बुद्धि नाहीं झाली तरी अंतःकरणाची ओढ त्या धंद्याकडे होती. परिस्थिति मात्र प्रतिकूल होती. या आंतरिक प्रवृत्तीला एक फार मोठें कारण होतें. साखर, कांचसामान, आगपेट्या वगैरे घरोघर लागणाऱ्या नित्योपयोगी वस्तूंसाठीं या प्रचंड क्षेत्रफळांतील लोकांना परक्या देशांकडे पाहावें लागतें आणि त्यामुळें देशाचें दारिद्र्य दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे, या गोष्टीची लो. टिळकांना आत्यंतिक खंत वाटत असे. दरवर्षीं साखरेच्या रूपानें २०।२५ कोटी रुपये या देशांतून परदेशीं जातात ही औद्योगिक क्षेत्रांतील केवढी शोकांतिका आहे? काय देशांत उसाच्या पिकास सुयोग्य अशी जमीन नाहीं, का पाणी नाहीं, कीं शेती करणारीं माणसें नाहींत?

### साखरधंद्याचें उज्ज्वल भवितव्य

पैसाफंडाच्या बळावर लोकमान्यांच्या प्रेरणेनें व स्फूर्तीनें तळेगांवास

१२५५ नों: दि: २५ वि: पार



कांच व कांचसामान तयार करण्याचा कारखाना निघून एका धंद्याचा खंबीर पाया घातला गेला, त्याचप्रमाणें महाराष्ट्रांत साखरधंद्याचें भवितव्य उज्ज्वल आहे. आमच्या धनिकांनीं त्या धंद्याकडे वळलें पाहिजे, असें लो. टिळकांना तीव्रतेनें वाटत असे व त्याप्रमाणें त्यांनीं प्रचारही चालविला होता. असें समजतें कीं, लहानशा प्रमाणांत यंत्रसामुग्री आणवून त्यांनीं साखरनिर्मितीचा प्रयोगही करून पाहिला होता.

आपल्या एका लेखांत साखरधंद्यासंबंधीं लिहितांना लो. टिळक म्हणतात, "मॉरिशससारखें लहानसें बेट भारताला अमाप साखर पाठवितें; पण भारतासारखा प्रचंड देश स्वतःला लागणारीही साखर तयार करूं शकत नाहीं. याला कारण सरकार आपलें नाहीं हेंच होय. आपलें राष्ट्रीय सरकार असल्याशिवाय राष्ट्राला पोषक होणारे उद्योगधंदे निर्माण होणें कठीण आहे."

त्या काळची ही विदारक वस्तुस्थिति होती. प्रतिकूल परिस्थितीशीं टक्कर कुठवर द्यायची? त्यामुळें बाबासाहेबांच्या मनांत एका काळीं आपण कापडगिरणीकडे वळावें असें घोळत होतें कारण देशहिताच्या व लोकहिताच्या दृष्टीनें तोही एक धंदा हाताळण्यासारखा होता. अनेकांनीं त्यांत यश मिळविलें होतें. तसेंच त्याला व्यापक क्षेत्रही होतें.

## लोकमान्यांच्या विचारांची शिदोरी

बाबासाहेबांच्या मनांत विचारांचें आंदोलन सतत चालू होतें. त्यांचा बांधकामाच्या ठेकेदारीचा व्यवसाय भरभराटींत होता; परंतु त्यामुळें त्यांना जरूर तें समाधान लाभत नव्हतें. आहे त्यांत समाधान मानून रहाण्याची त्यांची वृत्ति नव्हती.

विद्यार्थिदशेंत असतां लोकमान्य टिळक यांचे लेख वाचणें व त्यांचीं व्याख्यानें ऐकणें, हा त्यांचा एक हव्यास होता. त्या अवस्थेंतून पार पडल्यानंतर बाबासाहेब स्वतंत्रपणें उद्योगधंदा करूं लागले तरीही टिळक-विचारांची शिदोरी त्यांनीं तशीच उराशीं बाळगून ठेविली होती. किंबहुना त्या विचारप्रणालीच्या प्रकाशांत ते वावरत होते.

लोकमान्य टिळक यांनीं सुरू केलेलें किंवा त्यांच्या नांवें सुरू झालेलें कोणतेंही कार्य असो; त्याच्याशीं संबंध जोडणें व त्याला हातभार लावणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे, असें त्यांच्यावरील निस्सीम निष्ठेमुळें त्यांना वाटत असे. लो. टिळकांनीं होमरूल लीग चळवळ सुरू केली तेव्हां एक स्वयंसेवक या नात्यानें बाबासाहेब त्या चळवळींत सामील झाले. लोकमान्य टिळक म्हणजे आपली स्फूर्तिदेवता! त्यांच्याशीं व त्यांनीं सुरू केलेल्या कार्याशीं आपला प्रत्यक्ष संबंध जडावा असें त्यांना वाटत असे.

बाबासाहेबांच्या ठायीं दुसरा एक मोठा गुण होता. आपण थोरा-मोठ्यांच्या व विचारवंतांच्या सहवासांत रहावें, त्यांचे विचार आत्मसात् करण्याचा प्रयत्न करावा व आपल्या मानसिक त्याचप्रमाणें औद्योगिक उत्कर्षांत त्यांचा सहकार मिळवितां आल्यास पहावा ही त्यांची दृष्टि होती.

## लोकमान्यांचा सल्ला

कार्यकारणपरत्वें क्वचित प्रसंगीं लाभणारा लो. टिळकांचा सहवास बाबासाहेबांस अत्यंत सुखदायक वाटत असे. ज्यांच्या लेखनाची, वाणीची व गुणांची छाप आपल्या मनावर पडलेली असते व कांहीं ना कांहीं कारणामुळें ज्यांच्याठायीं आपला भक्तिभाव जडलेला असतो, त्यांच्या भेटीगांठीचे प्रसंग आयुष्यांत संस्मरणीय होऊन रहात असतात. अशाच एका भेटीच्या प्रसंगीं बाबासाहेबांशीं बोलत असतां लो. टिळक म्हणाले होते कीं, "तुमच्यासारख्यांनीं आपलें लक्ष राष्ट्रीय धंद्याकडे वळविलें पाहिजे. जनतेच्या गरजा व त्यापायीं परदेशी जाणारा पैसा या गोष्टी लक्षांत घेऊन तुम्हीं उद्योगधंद्याची निवड केली पाहिजे. तुम्हीं महाराष्ट्रांत साखरधंद्याची उभारणी करा. त्या धंद्यांत तुम्हांला यश मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं."

एका द्रष्ट्या महापुरुषाची ती भविष्यवाणी होती. बाबासाहेबांच्या मनावर ती कायमची कोरली गेली. त्या वेळेपासून बाबासाहेबांचें लक्ष साखरधंद्याकडे लागून राहिलें होतें.

साखरधंद्याकडे वळा व परदेशीं साखरेपायीं जाणारे कोट्यावधि रुपये

वाचवा, हें म्हणणें ठीक आहे; परंतु आमच्यावर राज्य चालविणाऱ्या इंग्रज सत्ताधिकाऱ्यांनीं त्या धंद्याच्या सर्व वाटा बंद करून टाकलेल्या होत्या. परकीयांच्या वाटा मोकळ्या होत्या. त्यांना या देशांत मुक्तद्वार होतें. परंतु आमच्यावर बंधनें होतीं. आपल्या महाराष्ट्रापुरतेंच पहावयाचें झाल्यास ब्रॅडी कंपनीच्या बेलापूर येथील साखर कारखान्यास ज्या सवलती व उत्तेजन मिळत असे, तें एतद्देशीयांस मिळत नसे. मॉरिशस, जावा वगैरे परदेशांतून आयात होणाऱ्या साखरेच्या व्यापाऱ्यांची त्यामुळें त्याकाळीं चलती असल्यास त्यांत नवल कसलें ?

महाराष्ट्रांत कित्येक ठिकाणीं ऊस मुबलक होत असे; परंतु त्याचा उपयोग गूळ तयार करण्याकडे होत असे. साखरधंद्याचें तंत्र, तें आपलें परक्यांनींच सांभाळावें व रोजच्या रोज आमच्या चहाकॉफीसाठीं किंवा मेवामिठाईसाठीं लागणारी शुभ्र साखर त्यांनीं आम्हांला पुरवावी, अशी सर्वसाधारण ठाम समजूत होऊन राहिली होती. शिवाय त्याकाळीं एक तज्ज्ञांचा अहवाल बाहेर पाडून जनतेची अशी खोटी समजूत करून देण्यांत आली होती कीं, भारतांतील ऊस साखरधंद्याला पोषक नाहीं. तो गुळाच्याच कामाचा. अशा रीतीनें साखरधंद्याची कल्पना मुळांतच खुडून टाकण्यांत आली होती.

अशा विपरीत परिस्थितींतही लोकमान्य टिळकांनीं साखरधंद्याकडे वळण्याचा जो गुरुमंत्र दिला, तो आचरणांत आणण्याची संधि आपणांस कधीं मिळणार, याची बाबासाहेब वर्षांनुवर्षें वाट पहात होते.

## परदेशचा पहिला दौरा

त्यांना आतां व्यापक क्षेत्रांत वावरण्याची जरुरी भासूं लागली होती; परंतु कोणत्या औद्योगिक क्षेत्रांत पडावें, स्वतःच्या व आपल्या देशबांधवांच्या दृष्टीनें कोणता धंदा किफायतशीर होईल, हें निश्चित ठरवितां येत नव्हतें. अशा मनःस्थितींत असतां आपण परदेशीं जाऊन त्या देशांनीं आपली भरभराट कोणत्या गुणांच्या व साधनांच्या बळावर करून घेतली याचें निरीक्षण करून

यावें; त्यामुळें आपल्या ज्ञानांत भर पडेल व कांहीं ना कांहीं मार्गही सांपडेल, या भावनेनें बाबासाहेब यूरोपच्या दौऱ्यावर गेले. हा दौरा त्यांना अनेक दृष्टींनीं फायदेशीर झाला. यूरोपमधील निरनिराळ्या देशांतून फिरत असतां त्यांना किती तरी नवीन गोष्टींचा साक्षात्कार झाला असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. सुमारें चाळीस वर्षांपूर्वीची ही घटना आहे. पारतंत्र्यांत वावरणाऱ्यांच्या यातना व दुःखें कोणत्या प्रकारचीं असतात, याचा अनुभव त्यांनीं घेतलेला होता आणि आतां स्वतंत्र देशांतील स्वतंत्र लोक आपल्या सरकारच्या सहकारानें उद्योगाची कास धरून स्वतःची व आपल्या देशाची भरभराट कशा रीतीनें घडवून आणूं शकतात हें त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें. ते लोक सुखी व सुसंपन्न कशाच्या बळावर झाले आणि आमचे देशबांधव वर्षानुवर्ष दारिद्र्याच्या खाईंत पिचत कां पडले आहेत, याचीही खूणगांठ त्यांना बांधतां आली.

आमचा भारत शेतीप्रधान देश आहे. सुमारें पाऊणशें ते ऐंशीं टक्के लोकांचा शेती हाच उदरनिर्वाहाचा व्यवसाय आहे. त्याला दुसऱ्या कोणत्याही उद्योगधंद्याची जोड नाहीं. शास्त्रीय संशोधनाचें नांव नाहीं व व यांत्रिक सहकार्य तर मुळींच नाहीं. असल्या शेतीपासून उत्पादन तें कसलें व्हायचें? युरोपांत स्वीडनसारखे शेतीवर जगणारे देश आहेत; परंतु आपल्या शेतीला त्यांनीं नाना प्रकारच्या उत्पादक उद्योगधंद्यांची जोड करून दिलेली आहे. आपल्याकडे वडिलोपार्जित जुन्यापुराण्या पद्धतीनें कशीबशी शेती हाताळावयाची व हंगाम संपला म्हणजे बाकीचा राहिलेला काळ आळसांत घालवावयाचा. अशा लोकांच्या वांट्यास दैन्यवाण्या जीवनाशिवाय आणखी दुसरें काय येणार?

नवविचारांची व नवीन आशाआकांक्षांची पुंजी बरोबर घेऊन बाबासाहेब युरोपचा दौरा संपवून स्वदेशीं परत आले.

## जीवनांतील अनिश्चितता कायम

युरोपचा दौरा करून बाबासाहेब आले तरी जीवनांतील अनिश्चितता पूर्ववत कायम होती. काशी केली, गया केली. पुण्य पदरांत पडलें; तरीही

नेहमींची कर्मकटकट कांहीं चुकत नाहीं. मात्र आपला बांधकामाच्या ठेकेदारीचा व्यवसाय ते पूर्ववत् हाताळूं लागले तो नव्या दमानें व उत्साहानें. त्यांच्या पदरीं नवविचारांचा पुण्यसंचय झालेला होता. तो त्यांना स्वस्थ बसूं देत नव्हता. समव्यवसायी व समान ध्येयाच्या व्यक्तींशीं विचारांची देवाण-घेवाण सुरू झाली. वालचंद हिराचंद व त्यांच्या वर्तुळांतील व्यापारी वर्गाशीं त्यांचे संबंध उत्तरोत्तर वाढत चाललेले होते.

मनुष्य कितीही सुविचार संपन्न व ध्येयवादी असला तरी परिस्थिती-पुढें त्याला हात टेकावे लागतात. कोणता मार्ग पत्करावा याचा शोध, तपास चालू होता; परंतु मार्गच सांपडत नव्हता. तुमचें ध्येय कोणतेंही असो; त्यावर तुमची संपूर्ण निष्ठा असली पाहिजे. मग त्या निष्ठेचें फळ थोडें उशिरा का होईना, तें मिळाल्याशिवाय राहात नाहीं. बाबासाहेबांच्या ध्येयसिद्धीचा काळ आतां जवळ येऊं लागला होता.

१९३० साल मागें पडून १९३१ साल उजाडलें आणि तें किफा-यतशीर व कल्याणकारी धंद्याच्या शोधांत असलेल्या बाबांसाहेबासारख्या ध्येयवादी व्यापाऱ्यांना आशेचा नवसंदेश घेऊन आलें. अनेक वर्षांपासून साखरकारखान्याच्या स्वप्नसृष्टींत बाबासाहेब वावरत होते. तें स्वप्न साकार होण्याचा काळ समीप आला. 'साखरेचें खाणार त्याला देव देणार!' अनेकांच्या घरांत आनंदाचें गोड वातावरण नांदावें व आपल्या उद्योगापायीं अनेक कुटुंबांना सुखासमाधानाचा घांस मिळावा, ही बाबासाहेबांची आकांक्षा होती. मग कोणत्या ना कोणत्या रूपानें देव त्यांना कां प्रसन्न होणार नाहीं ?

## दुष्काळी नगर जिल्हा

त्याचें असें झालें. महाराष्ट्रांतील अहमदनगर जिल्हा हा पूर्वीं दुष्काळ-पीडित जिल्हा समजला जात असे. या जिल्ह्यांतील बहुसंख्य शेतकरीवर्ग कर्तृत्वसंपन्न व उद्योगी समजला जातो. सर्वांत मोठा उद्योग म्हणजे शेतीचा. परंतु पावसानें दगा दिल्यानंतर शेती करायची कशी ? कधीं काळीं पाऊस कोसळला तर तो फार मोठ्या प्रमाणांत कोसळायचा; नाहीं तर पावसाचें नांव

नाहीं! अशा रीतीनें पावसानें पाठ फिरविली म्हणजे लोकांच्या हालअपेष्टांस पारावार नसे! अवर्षणापायीं या जिल्ह्यांतील लोक दुष्काळाच्या तावडींत वारंवार सांपडायचे. अशा परिस्थितींत जनतेच्या पोटाची कांहीं तरी सोय लावावी या हेतूनें मग सरकारतर्फे दुष्काळीं कामें सुरू करण्यांत येत असत. या जिल्ह्याच्या कांहीं भागांतून गोदावरी, प्रवरा, भीमा वगैरे अनेक लहानमोठ्या नद्या वहातात. पाटबंधारे व कालवे यांच्या साहाय्यानें पाण्याचा प्रवाह दूरवर व जेथें त्याचा अभाव आहे तेथें नेतां येईल व त्या पाण्याच्या साहाय्यानें शेतीचें व बागायतीचें पोषण व संवर्धन होऊन दुष्काळपीडीत लोकांस रोजी वांटतां यावी, या सद्धेतूनें सरकारनें कालवे खणण्याचा कार्यक्रम सुरू केला. १८७५ ते १९२९ म्हणजे जवळजवळ ५०।५५ वर्षें हा उपक्रम चालू होता. सरकारला त्यापायीं सुमारें दहा कोटी रुपये खर्च करावे लागले. त्या गुंतवलेल्या रकमेवरील व्याज तरी सुटलें पाहिजे! परंतु तें कांहीं पदरांत पडत नव्हतें. सरकारनें कांहीं वर्षें वाट पाहिली व शेवटीं निराश होऊन ना. बाबासाहेब कामत यांच्या अध्यक्षतेखालीं १९३१ सालीं एक चौकशी कमिटी नेमिली. पाण्याचा उपयोग जास्तींत जास्त कोणत्या मार्गांचा अवलंब केला असतां होईल व सरकारला जास्तींत जास्त किंवा जरूर त्या प्रमाणांत मोबदला कसा मिळेल, याबाबतींत चौकशी करून जरूर त्या शिफारशी या कमिटीनें करावयाच्या होत्या.

## कामत कमिटी उपकारक ठरली

त्याप्रमाणें चौकशीचें कामकाज सुरू झालें. संबंधित लोकांकडून माहिती मिळविण्यांत आली व तिच्या आधारें ज्या शिफारशी करण्यांत आल्या त्या साखरधंद्याला पोषक व उपकारक होऊन रहाणाऱ्या होत्या. कालव्याच्या पाण्याचा उपयोग ऊसमळ्यांसाठीं करण्यांत यावा. या उसापासून साखर-निर्मिति व्हावी. या धंद्यांत जे भांडवलदार आपला पैसा गुंतवितील त्यांना जमिनीच्या, पाणी वापराच्या व अन्य बाबतींत शक्य तेवढ्या सवलती देण्यांत याव्या व मुख्य म्हणजे साखर धंद्यास संरक्षण देण्यांत यावें. पैसे

गुंतविण्याऱ्या कारखानदारांस आकर्षक अशा स्वरूपाच्या त्या शिफारशी होत्या.

तत्पूर्वींच्या काळांत कालव्याच्या भागांतील कांहीं जमीन उसाच्या मळ्यांनीं व्यापलेली असे. परंतु त्या उसापासून फक्त गूळनिर्मिति होत असे. गुळाचे भाव कधींकधीं एकदम घसरावयाचे; त्यामुळें ऊसाच्या लागवडीखालीं येणाऱ्या जमिनीचें प्रमाण फार कमी असे. त्याकाळीं अहमदनगर जिल्ह्यांत बेलापूर येथें एकच साखर कारखाना चालू होता व तो युरोपियनांच्या मालकीचा होता. ती साखर कंपनी कारखान्यासाठीं लागणारा ऊस आपल्या देखरेखीखालीं निर्माण करीत असे.

कामत कमिटीच्या शिफारशींस अनुसरून मुंबईतील व इतर ठिकाणच्या धनिकांकडे व भांडवलदारांकडेही सरकारतर्फे एक प्रश्नमालिका पाठविण्यांत आली. कारण त्यांचें सहकार्य मिळविणें जरूर होतें.

## साखरेचें खाणार त्याला देव देणार

त्याकाळीं बाबासाहेबांचें सारें लक्ष या घडामोडींकडे लागून राहिलें होतें. गेल्या कांहीं वर्षांपासून ज्या सुवर्णसंधीची मार्गप्रतिक्षा ते करीत होते ती संधि आतां त्यांच्यासारख्या धोरणी व धाडशी व्यापाऱ्याच्या पुढें चालून आलेली होती. त्याच सुमारास साखर धंद्यासंबधीं चौकशी करण्यासाठीं सरकारनें नेमलेल्या टॅरीफ बोर्डानें आपलें कामकाज संपवून साखर धंद्यास जरूर असलेलें संरक्षण देण्याची शिफारस सरकारला केली. (१९३२)

बाबासाहेबांनीं दूर दृष्टीनें पाहिलें कीं, ही संधि वाटेल ते प्रयत्न करून आपण साधली पाहिजे. कामत कमिटीच्या शिफारशी समजल्यापासून ते बेचैन झाले. सर्व बाजूंनीं अनुकूल वारे वाहूं लागले होते; परंतु सरकारचें नेहमींचें दिरंगाईचें धोरण आड येत होतें. ती दिरंगाई दूर करून घेण्यासाठीं बाबासाहेबांनीं या काळांत प्रयत्नांची पराकाष्ठा केली. ना. बाबासाहेब कामत त्याचप्रमाणें संबंधित अधिकारी यांच्या भेटीगांठी घेऊन कामत कमिटीच्या शिफारशी शक्य तेवढ्या लौकर अंमलांत आणण्याची आवश्यकता त्यांनीं

त्यांस पटवून दिली. मुंबईंतील कांहीं भांडवलदार त्या काळीं उत्तर भारतांतील साखर कारखान्यांत आपलें भांडवल गुंतविण्याच्या विचारांत होते; हीही महत्त्वाची घटना त्यांनीं सरकारच्या नजरेस आणून दिली. कारण बाबासाहेबांना महाराष्ट्रांत साखर धंद्याची उभारणी करावयाची होती.

आज महाराष्ट्रांत साखर कारखाने जेथें जेथें पाणी व जमीन या साधनांची सोय असेल त्या त्या भागांत झपाटेबंद रीतीनें स्थापन होत आहेत. सरकार आपलें असल्यामुळें कारखानदारांस जरूर त्या सवलती मिळत आहेत; परंतु ३०।३२ वर्षांपूर्वीच्या परकीय राजवटीच्या काळांत साखर धंद्यासाठीं आवश्यक त्या सवलती मिळवून त्या धंद्याचा खंबीर पाया घालणें ही साधी गोष्ट नव्हती. कालगतीला कालव्याच्या पाण्यानें कलाटणी दिली हें तर खरेंच; परंतु त्याही काळांत उपकारक होऊन राहाणाऱ्या जास्तींत जास्त सवलती मिळवून साखर धंद्याचा खंबीर पाया घालणें अत्यंत जरूर होतें. महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें झाल्यास ती कामगिरी त्याकाळीं बाबासाहेब डहाणूकर व या कार्यांतील त्यांचे सहकारी वालचंद हिराचंद यांनीं प्रामुख्यानें पार पाडलेली आहे

### बाबासाहेब व वालचंद शेटजी

प्राप्त संधीचा फायदा घेऊन साखर कारखान्याची स्थापना करावयाची असा निश्चय या दोघांनीं बरोबरच केला. त्याचप्रमाणें सरकारी सवलतींचा फायदा घेण्यासाठीं सर्वप्रथम तेच पुढें सरसावले. या बाबतींत दोघेही हातांत हात घालून एकमेकांच्या विचारानें पुढें पाऊल टाकीत होते. कारखानदारांना सरकारनें सवलतीनें व दीर्घ मुदतीच्या करारानें जमिनी देऊं केल्या होत्या. जमिनीचे निरनिराळे गट पाडले होते. धंद्याच्या दृष्टीनें कोणती जमीन फायदेशीर होईल, दळणवळणाच्या, कालव्याचें पाणी मिळविण्याच्या व इतर दृष्टीनीं जमिनीचा ताबा घ्यावयाचा होता. हें कार्य जसें महत्त्वाचें तसेंच तें तापदायकही होतें; परंतु या कार्याच्या बाबतींत बाबासाहेबांचा उत्साह बलवत्तर होता. कोणतेंही कार्य पार पाडावयाचें असा एकदां निर्णय घेतला

म्हणजे मग त्याचा पाया घालतांना कितीही मेहनत घ्यावी लागली तरी ती घेण्यांत ते यत्किंचीतही कुचराई करीत नसत. मग त्यांना जेवणाखाण्याचें किंवा तहानभुकेचें भान रहात नसे. तो त्यांचा स्वभावगुणच होता; व तेंच त्यांच्या यशाचें रहस्य होतें.

येथें जातां जातां बाबासाहेब व वालचंद हिराचंद हे दोघेही या कार्यांच्या बाबतींत एकमेकांस कसे पूरक होऊन राहिले होते, याची एक आठवण बाबासाहेबांच्याच शब्दांत येथें देण्याचा मोह अनावर होत आहे.

१९५६ सालीं वालचंदनगरांत बाबासाहेबांच्या हस्तें वालचंद शेटजींच्या पुतळ्याचें अनावरण झालें. त्याप्रसंगीं[1] वालचंद हिराचंद यांचा व आपला स्नेहसंबंध किती जिव्हाळ्याचा होता हें सांगतांना बाबासाहेब म्हणाले होते कीं, "साखरेच्या धंद्यास सरकार लौकरच संरक्षण देणार हें निश्चित झाल्यावर कारखाने काढावयाचे ठरवून आम्ही दोघे मोठ्या प्रमाणावर ऊंस पिकवून साखरेचा कारखाना काढण्यासाठीं सर्व दृष्टींनीं अनुकूल अशा जमिनी कालव्यांच्या भागांत कोठें मिळवितां येतील, याच्या शोधांत होतों. आम्हीं दोघांनीं १९३२ सालीं कांहीं ठिकाणें पाहिलीं. ही जमीन (सध्यां वालचंदनगर वसलें आहे ती) मीं माझ्या साखर कारखान्यासाठीं पाहिली होती. व कांहीं जमिनीचे भाडेपट्टेही केले होते. परंतु वालचंद शेटजींना ही जमीन पसंत पडली व त्यांनीं मजजवळ तिची मागणीही केली. त्यांचे माझे संबंध फार घनिष्ठ असल्यामुळें मला नकार देववेना, व ही जमीन मी त्यांच्या स्वाधीन करून माझ्यासाठीं दुसरे ठिकाणीं म्हणजे हल्लीचें टिळक नगर येथें महाराष्ट्र शुगर मीलसाठीं जमीन घेतली."

## 'मला आपला आशीर्वाद द्या'

या जागेच्या बाबतींत थोडें अधिक लिहिणें जरूर आहे. बाबासाहेबांनीं वरील जागा पाहून ती सर्व परीनें सोईस्कर आहे अशी

१. रविवार ता. १९-२-५६

त्यांच्या मनाची खात्री झाली तरीही या व्यवसायांतील आपले परम स्नेही वालचंद हिराचंद यांस आपली निवड योग्य वाटते कीं नाहीं हें त्यांना पडताळून पाहायचें होतें. त्यासाठीं त्यांना घेऊन ते त्या जागीं गेले. ती जागा पहातांच त्यांच्या मनांत ती एकदम भरली! त्या जागेची मागणी केल्याशिवाय त्यांच्यानें रहावेना. ते म्हणाले, "हें पहा! या जागेवर माझें मन बसलें आहे. काय वाटेल ती नुकसानभरपाई मागा; परंतु ही जागा मला द्या!"

यावर बाबासाहेब म्हणाले, "शेटजी! मी पसंत केलेली जागा आपल्याही पसंतीस उतरली, याचेंच मला समाधान वाटतें. मला आपल्याकडून नुकसानभरपाई नको; मला आपला आशीर्वाद द्या म्हणजे झालें! ही जागा आपलीच आहे असें समजा!"

पसंत केलेली जागा आपल्या मित्रास देऊन टाकल्यानंतर तशीच सुखसोयीची दुसरी जागा बाबासाहेब नगर जिल्ह्यांतील बेलापूर भागांत पाहूं लागले. त्या भागांत आपल्या कांहीं सहकाऱ्यांसह रानावनांतून, उन्हातानांतून व दगडकाट्यांतून त्यांनीं पायपीट केली. बेलापूर भागांत ब्रॅडी कंपनीचा साखर कारखाना चालू होताच. अनेक दृष्टींनीं तो पट्टा सुखसोयीचा असल्यामुळें त्या कंपनीच्या चालकांनींही दूर दृष्टींनीं ती जागेची निवड केलेली होती. त्याच भागांत आपल्या कारखान्याची मुहूर्तमेढ रोवण्यांत बाबासाहेबांचेही अनेक हेतू साध्य व्हावयाचे होते. जमिनीचा तो पट्टा पसंत पडला तरी प्रत्यक्ष कारखान्याची उभारणी कोणत्या जागीं करावयाची हें बाबासाहेबांस निश्चित ठरवायचें होतें. त्यासाठीं हिंडत फिरत असतां बेलापूरजवळ पाटाचे शेजारीं त्यांच्या पायांत एक कांटा मोडून रक्ताची धार लागली! ज्या भूमीवर आपलें रक्त सांडलें तीच जमीन पवित्र मानून व तो एक शुभ शकून समजून, त्याच ठिकाणीं आपल्या साखर कारखान्याची उभारणी करण्याचा निर्णय बाबासाहेबांनीं घेतला व १९३३ सालीं त्यांनीं विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर 'महाराष्ट्र शुगर मिल्स' या कारखान्याची विजयपताका फडकविली.

## बेलवंडी येथील साखर कारखाना

अहमदनगर जिल्हा म्हणजे दुष्काळपीडित जिल्हा अशी ३०।४० वर्षांपूर्वीची परिस्थिति होती. आजकाल त्या परिस्थितींत किती तरी थोरपालट घडून आलेला आहे. दुष्काळाला तोंड देण्यासाठीं नगर जिल्ह्यांतील कांहीं भागांत सरकारनें जसे कालवे काढले, त्याचप्रमाणे नगर जिल्ह्यांतील बेलवंडी भागांत दुष्काळपीडित लोकांच्या पोटापाण्याची सोय व्हावी या हेतूनें विसापूर तलावाच्या रूपानें पाणी साठवून ठेवण्याचें काम सुरू करून तें पूर्णत्वास आणिलें; परंतु हा पाण्याचा सांठा पर्जन्यराजाच्या मर्जीवर अवलंबून होता. त्याची ज्या वर्षीं अवकृपा होई त्यावर्षीं तलावांत पाण्याच्या नावें शुकशुकाट होऊन जाई; परंतु प्रत्यक्ष अनुभव येईपर्यंत हें लक्षांत येऊं शकलें नाहीं.

त्या भागांतील लोकांस रोजगारी मिळून त्यांच्या पोटापाण्याची सोय व्हावी व तलावांतील पाण्याचाही सदुपयोग व्हावा या हेतूनें मुंबई सरकारतर्फे बाबासाहेबांचें लक्ष या ओसाड भागाकडे वळविण्यांत आलें. तसेंच जमीन व पाणी यांच्या बाबतींत जरूर त्या सवलती देण्यासही सरकार तयार झालें. बाबासाहेबांस साखर कारखाना स्थापन करावयाचा होताच. त्यामुळें त्या भागांतील असंख्य शेतकरी वर्गाचेंही कल्याण होईल या जाणिवेनें बाबासाहेबानीं बेलवंडी भागांतील शेतजमिनी घेऊन विसापूर तलावांतील पाण्याच्या भरंवशावर त्या भागांत उसाची लागवड सुरू केली. परंतु लागवडीखालीं जमीन आणण्यापूर्वी बाबासाहेबांस व त्यांच्या सहकाऱ्यांस त्या भागांत अतोनात त्रास सोसावा लागला. जिकडे तिकडे बाभळीचीं झाडें, ओसाड व उंचसखल जमीन! मोडतोड करून मशागत करण्यासाठीं त्यांना फार मोठ्या प्रमाणांत पैसा खर्च करावा लागला.

ही अगदीं आरंभ काळांतील घटना आहे. उसाची लागवड व्यवस्थितपणें होऊन ऊस जसजसा वाढूं लागला तसतशी पाणी पुरवठ्यासंबंधीं चिंताही वाढूं लागली. विसापूर तलावाच्या पाण्यावर विसंबून रहातां येणार नाहीं ही

गोष्ट स्पष्ट झाली. त्याचबरोबर आपल्या कारखान्याचा विस्तार या भागांत केल्यास वेळप्रसंगीं नुकसान सोसावें लागेल, याचीही दु:खद जाणीव त्यांना झाली.

## मति गुंग करणारी घटना

मति गुंग करणारी ती एक अकल्पित घटना होती. त्या परिस्थितींत कोणीही गांगरून व गोंधळून गेला असता. परंतु धैर्यशाली बाबासाहेब डगमगले असले तर क्षणभरच! त्यांनीं विचार केला कीं पुढें आलेल्या परिस्थितीला धैर्यानें तोंड दिलें पाहिजे. कारखाना या भागांत काढून चालणार नाहीं; दुसरी सर्व बाजूंनीं सोईची जागा कारखान्यासाठीं पाहिली पाहिजे. सध्यां जेथें वालचंदनगरची वसाहत स्थापन झाली आहे ती जागा नंतर बाबासाहेबांनीं पसंत केली; परंतु ती जागा वालचंद हिराचंद यांनाही पसंत पडून त्यांनीं तिची मागणी केल्यामुळें ती त्यांना देऊन नंतर सध्यां जेथें टिळकनगरची वसाहत थाटली गेली आहे तेथें कारखाना स्थापन करण्यांत आला.

बेलवंडी येथील ऊस तयार होत आला. परंतु साखर कारखान्याची उभारणी झाली होती टिळकनगरांत! जेथें ऊस तयार झाला तेथें कारखाना नाहीं व जेथें कारखाना उभा झाला तेथें ऊस नाहीं, अशी विचित्र परिस्थिति निर्माण झाली! दोन्ही ठिकाणांतील अंतर फार मोठें! दूर अंतरावर असलेल्या साखर कारखान्याकडे ऊस पाठवायचा तर जादा खर्चाचा भार शिरावर घ्यायचा, अशा विचित्र परिस्थितींत सांपडले असतांही बाबासाहेब गलीत धैर्य झाले नाहींत. संकट प्रसंगीं शांतपणें विचार करावयाचा व दूरवर दृष्टि फेकून मार्ग शोधून काढावयाचा, हें बाबासाहेबांचें नेहमींचें धोरण. त्यांनीं पाहिलें कीं गुळाच्या भावाला तेजी येण्याचा दाट संभव आहे तेव्हां उसाची उचलबांगडी न करतां बेलवंडी येथें त्याच्यापासून गुळाची निर्मिति करावयाची. त्याप्रमाणें गूळ बनविण्यांत आला व त्यावर्षीं खरोखरच गुळाचे भाव कडाडले! अर्थात् या व्यवहारांत नुकसान न होतां उलट फायदाच

झाला. बाबासाहेबांच्या धोरणी स्वभावाचें व व्यापारचातुर्याचें हें एक उदाहरण आहे.

एकदां पुढें टाकलेलें पाऊल कोणत्याही परिस्थितींत मागें घ्यावयाचें नाहीं; मग त्यासाठीं कितीही आर्थिक वा इतर झीज सोसावी लागो-नुकसान कां येतें, याचा संपूर्णपणें विचार करावयाचा व जीं कारणें आड येतील तीं दूर करण्यासाठीं तत्परतेने झटावयाचें, हा होता त्यांचा नेहमीचा बाणा.

**विचित्र दैवगति**

या स्वभावधर्मास अनुसरून बेलवंडी येथेंही साखर कारखाना रीतसर स्थापन झाला व त्याची सुरुवात १९३६ जानेवारीपासून करण्यांत आली. तेथें केवळ नैसर्गिकच नव्हे तर मानवनिर्मित अडचणींस आरंभापासून तोंड द्यावें लागत आहे. त्या अडचणींचा पाढा कुठवर वाचावा? यापूर्वींच सांगितल्याप्रमाणें जेथें जंगल होतें तेथें भारी खर्च करून बाबासाहेबानीं नंदनवन निर्माण केलें. त्या भूभागांत सुखसोयीच्या व इतर दृष्टींनीं बाबासाहेबांनीं कांहीं करायचें बाकी ठेवलें नाहीं. परंतु दैवगति कशी विचित्र असते पहा! तुम्ही कितीही कर्तबगार असलां तरी तिच्या तावडींतून तुम्ही सुटूं शकत नाहीं हें गेल्या ३ वर्षांतील घडामोडीं-वरून स्पष्ट झालें आहे. सरकारनें एक जमीनविधेयक पास करून साखर कारखान्यांच्या जमिनी सक्तीनें ताब्यांत घेण्याचें धोरण स्वीकारलें व त्या सरकारी धोरणास अनुसरून ता. १ ऑक्टोबर १९६३ रोजीं त्या भागांतील जमिनी सरकारच्या ताब्यांत देण्यांत आल्या.

येथील कारखान्यासाठीं लागणारा जरूर तो ऊस मेहनत घेऊन शास्त्रशुद्ध पद्धतीनें निर्माण करण्यांत येत असे; त्यामुळें कारखाना लहान असला तरी तो वर्षाकाठीं थोडीफार कमाई करून देत असे. परंतु आतां यापुढें सरकारनें वाढवलेला ऊस विकत घेऊन कारखाना फायदेशीरपणें चालविणें अशक्यप्राय होणार आहे.

**महाराष्ट्रीय बुद्धिमत्ता व चिकाटी**

१९३२ पासून गेल्या ३०।३२ वर्षांच्या काळांत महाराष्ट्रामध्यें खाजगी प्रयत्नांच्या द्वारें साखर कारखान्यांनीं केलेली प्रगति खरोखर अभिनंदनीय आहे असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं. या प्रगतीची प्रशंसा केवळ भारतांतच नव्हे तर जगभर झालेली आहे. उसाचें एकरीं उत्पादन जें २०।२१ टन होतें तें ऐशीं ते शंभर टनांपर्यंत वाढविण्यांत आलें. साखरेचा उतारा ९ ते १० टक्के होता तो १३ ते १४ टक्केपर्यंत वाढविण्यांत आला! अधिकांत अधिक साखर देणाऱ्या उसाच्या जाती संशोधनपूर्वक शोधून काढण्यांत आल्या, तसेंच उसावर चढणाऱ्या रोगांच्या बाबतींत संशोधन करून उसाचें मोठ्या प्रमाणांत व फायदेशीर पीक कसें काढावें, याचा उच्च आदर्श सर्वांपुढें ठेवण्यांत आला. उसाच्या व साखर निर्मितीच्या बाबतींत आपल्या महाराष्ट्रांत हें जें प्रशंसनीय व देशाला उपकारक होऊन रहाणारें कार्य गेल्या २५।३० वर्षांच्या काळांत पार पडलें, त्यामुळें महाराष्ट्राच्या बुद्धिमत्तेबद्दल व चिकाटीच्या प्रयत्नांबद्दल कोणीही कौतुक करावें असें त्याचें स्वरूप आहे.

महाराष्ट्रांतील साखर कारखाने म्हणजे खरोखर महाराष्ट्राचें तें एक घवघवीत भूषण होऊन राहील. या यशाचा आजकाल कोणीही हेवा करावा! परंतु दुर्दैवाची घटना कशी:आहे पहा! वर उल्लेखिल्याप्रमाणें या महनीय यशाला जणूं काय कोणाची तरी दृष्ट लागावी, असा अनुचित प्रकार सरकारच्या जमीनविधेयकानें सध्यां घडवून आणलेला आहे! त्यामुळें साखर निर्मितीच्या बाबतींत महाराष्ट्रांत आजवर जें प्रशंसनीय कार्य पार पडलें त्यांत खंड पडल्यावाचून रहाणार नाहीं अशी भीति वाटूं लागली आहे! जरी यापुढें साखर उत्पादन चालू राहिलें तरी त्या कार्याची दैदिप्यमान प्रगति चालू राहील कीं नाहीं, हें भावी काळच सांगूं शकेल.

साखर कारखान्यांच्या आरंभकाळांत ज्यांच्या सहकाराचा व सल्लामसलतीचा बाबासाहेबांस विशेष उपयोग झाला त्यांत त्यांचे मेहुणे व स्नेही

दत्तोपंत ऊर्फ बाबूराव वांद्रेकर व सदानंद नथोबा वांद्रेकर या बंधुद्वयाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतां येईल. टिळकनगरांत कामगारवर्गाच्या कल्याणासंबंधीं योजना आखीत असतां जसा बाबूराव वांद्रेकर यांचा प्रेरक सहकार बाबासाहेबांस उपयोगी पडला, त्याचप्रमाणें बेलवंडी येथील खडकाळ जमिनींत उसाची लागवड फायदेशीर होण्याच्या दृष्टीनें सदानंद वांद्रेकर यांचें शेतीविषयक ज्ञान मार्गदर्शक ठरलें आहे.

५.

# आरंभकाळातील अडचणी

**ज्या** प्रांतांत किंवा ज्या ज्ञातींत आपला जन्म झाला, त्या ज्ञातीसंबंधीं व प्रांतासंबंधीं एक प्रकारचा अभिमान वाटणें ही अगदीं स्वाभाविक गोष्ट आहे. तो अभिमान बाळगूनही आपण सर्व समाजांतील लोकांशीं व अन्य प्रांतीयांशीं प्रेमभावानें व सलोख्यानें वागूं शकतों व एकमेकांच्या कल्याणासाठीं झटूं शकतों. महाराष्ट्राचा अभिमान बाळगूनही बाबासाहेब सर्वांशीं समरसतेनें वागूं शकले व आपल्या कार्यांत सर्वांचा सहकार संपादन करूं शकले. याचें कारण त्यांच्या स्वभावांतील अनन्यसाधारण गोडवा व लोकसंग्राहक वृत्तीच होय.

महाराष्ट्र हा कारखानदारींत, व्यापार–धंद्यांत व त्यासाठीं जरूर असलेल्या धाडसी वृत्तींत फार मागासलेला आहे, असा सर्वसाधारण समज आहे; परंतु खरा प्रकार तसा नाहीं. महाराष्ट्र कारखानदारींत व औद्योगिक क्षेत्रांत मागें नाहीं तो आघाडीवर आहे हें बाबासाहेबांनीं आपल्या पहिल्या-वहिल्या कारखान्यास 'महाराष्ट्र शुगर मिल्स' हें नांव देऊन व त्याच्या यशस्वितेसाठीं आपलें कर्तृत्व पणास लावून सिद्ध करून दाखविलें आहे.

### कारखाना पहावा उभारून!

साखर कारखान्यासारख्या एखाद्या कारखान्याचा पसारा मांडणें ही साधी का गोष्ट आहे? 'घर पाहावें बांधून आणि लग्न पाहावें करून' अशी

दा. क्र. १४४२०

आपल्यांत म्हण आहे. त्याच्याहीपेक्षां 'कारखाना पाहावा उभारून' आणि तोही इंग्रज सरकारच्या राजवटींत, असें म्हणण्याचा प्रघात पडला असता तर तो अधिक वस्तुस्थितिदर्शक ठरला असता! कोणत्याही कार्याचा आरंभ-काळ हा महाकठीण असतो. आणि येथें काय होतें? सर्व गोष्टींचा पाया रचावयाचा होता. या कारखान्याच्या आरंभकाळांत बाबासाहेबांना नाना प्रकारचे व कमालीचे कष्ट सोसावे लागले आहेत. परंतु ते त्यांनीं कर्तव्य-बुद्धीनें व आनंदानें सोसले. कारण कारखानदारीच्या क्षेत्रांत कर्तृत्व गाजवून दाखविण्याची जिद्द त्यांच्याठायीं होती. त्याचप्रमाणें लोकमान्य टिळकांनीं दिलेल्या आशीर्वादामुळें त्यांच्या ठायीं आत्मविश्वासही जागृत झालेला होता.

आज हिरव्यागार ऊसमळ्यांच्या रूपानें जेथें नंदनवन फुललेलें दिसत आहे, तेथें पूर्वीं काय होतें? ओसाड, उंच-सखल, निर्मनुष्य व निकामी असा तो भूमिभाग होता. आज माणसांनीं गजबजलेल्या त्या भागांत पूर्वीं चिटपाखरूंही फिरकत नसे! मधून मधून कांहीं बाभळीचीं झाडें व रानझुडपें डोकावत असत!

### कायापालट घडवून आणिला

आणि आज? आज बाबासाहेबांनीं त्या भूमीचाच नव्हे तर तिच्या आसमंतांत वावरणाऱ्या लोकांचाही सर्वतोपरी कायापालट घडवून आणिला आहे! त्या आरंभकाळांत किती तरी बिकट प्रश्न यशस्वी रीतीनें सोडविण्या-साठीं बाबासाहेबांपुढें आ वासून उभे राहिले होते. जमिनीची मशागत करायची होती, तशीच माणसांचीही निवड करायची होती. उसाची लागवड करायची होती, तशीच जरूर त्या यंत्रसामुग्रीचीही जमवाजमव करायची होती. शेतकरी, कामकरी, व अधिकारी यांच्या राहण्यासवरण्याची सोय करायची होती, त्याचप्रमाणें हे सर्व व्याप संभाळण्यासाठीं पुरेशा भांडवलाचीही तरतूद करायची होती!

एक ना दोन अशा किती गोष्टी सांगाव्या? एका घरचा मालक असतो, त्याचा प्रपंच आटोपशीर असतो, तरीही रोजच्या रोज किंवा

महिनाअखेर येईपर्यंत तो चिंतेच्या भाराखालीं वाकून जात असतो. बाबासाहेबांनीं तर एका घराची नव्हे, एका गांवाची नव्हे, तर अनेक लहानलहान गांवांतील हजारो कुटुंबांच्या भरणपोषणाची व त्यांच्या सुखदुःखाची सारी जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेतलेली होती.

बाबासाहेबांच्या जीवनांतील तो चिंतेचा, विपरीत व अननुभूत परिस्थितीशीं झगडण्याचा व कसोटीचा काळ होता. मनुष्याच्या वाट्यास कितीही खडतर काळ येवो, त्या काळावर मात करून दाखविणें व मेरुपर्वताप्रमाणें अचल रहाणें याचेंच नांव पुरुषार्थ. स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं झगडत असतां लोकमान्य टिळकांच्या मार्गांत थोड्या थोडक्या का अडचणी आल्या? ते केवढ्या प्रचंड व व्यापक क्षेत्रांत धीरोदात्तपणें वावरत होते व वाट्यास आलेलीं संकटें व दुःखें हंसतमुखानें शीरोधार्य करीत होते! त्या मानानें आपलें कार्यक्षेत्र किती छोटें व आकुंचित! त्यांनींच हा भार वाहाण्याची आपणास प्रेरणा दिली व त्यांच्याच स्फूर्तीनें व कृपाप्रसादानें आपणास संकटपार व्हावयाचें आहे, ही प्रेरक भावना या काळांत बाबासाहेबांच्या पाठीशीं सतत होती व तीच त्यांना न थकतां न भागतां प्रगतीच्या मार्गानें घेऊन जात होती.

## योग्य माणसांची निवड

योग्य माणसांची निवड करणें, तीं राखणें व त्यांच्याकडून मनाजोगतें व भरपूर काम करून घेणें ही एक कला आहे. ज्याला एखाद्या कारखान्याचा कारभार चालवायचा आहे व त्यामुळें ज्याचा अनेक व विविध क्षेत्रांतील लोकांशीं संबंध येतो, तो कारखानदार अशा कलेंत पारंगत असावा लागतो. बाबासाहेबांच्या ठायीं हा गुण प्रकर्षानें वास करीत आहे. निरनिराळ्या कामांसाठीं त्यांनीं आयुष्यभर अनेक माणसें पारखून निरखून जवळ केलीं आणि आपल्या सौजन्याच्या, प्रेमळतेच्या व आपुलकीच्या भावनेच्या बळावर तीं दीर्घकाळ संभाळलीं. त्यांच्या स्वभावांत तुसडेपणा नाहीं तर प्रेमळपणा आहे; त्यांच्या चेहऱ्यांत उग्रता नाहीं तर हंसरेपणा आहे. त्यामुळें

एकदां त्यांच्याजवळ आलेला माणूस सहसा त्यांच्यापासून दूर जात नाहीं. बाबासाहेबांनीं कामाचा व श्रमाचा कधीं कंटाळा केला नाहीं. माणसानें काम भरपूर व मन लावून करावें आणि त्याचा मोबदलाही भरपूर मिळवावा. नव्हे तो मिळावयाचाच. मालक स्वतः जीवतोड मेहनत घेतात, आपली विचारपूस करतात, मग त्यांच्याप्रमाणें आपणही नको का मेहनत घ्यायला? असें त्यांच्या सान्निध्यांत काम करणाऱ्याला वाटावें. कधीं कोणाला तोडायचें नाहीं. जोडणें हा त्यांचा जन्मस्वभाव.

त्यामुळें काय झालें? महाराष्ट्र साखर कारखान्याच्या निरनिराळ्या खात्यांत कामें करणारीं जीं माणसें त्यांनीं आरंभापासून जवळ केलीं तीं त्यांच्याचप्रमाणें कारखान्याच्या उत्कर्षासाठीं झटणारीं होतीं, व आजही झटत आहेत.

कोणताही कारखाना असो, तो यशस्वी रीतीनें चालविण्यासाठीं जशीं विश्वासू, कामसू आणि मालकाशीं व आपल्यावर सोपविलेल्या कामाशीं निष्ठेनें वागणारीं माणसें लागत असतात, त्याचप्रमाणें कारखान्याच्या मालकापाशीं पुरेसें भांडवल असावें लागतें; बाजारांत त्याचें वजन व पत असावी लागते.

काळबादेवीसारख्या व्यापाऱ्यांनीं गजबजलेल्या भागांत यापूर्वींच त्यांनीं दोन टोलेजंग इमारती उभारल्या होत्या. इतरत्रही त्यांनीं मिळकती केल्या होत्या. त्यांचा बांधकामाच्या ठेकेदारीचा व्यवसायही चालू होताच. त्यामुळें मुंबईतील व्यापारीवर्ग त्यांना ओळखत असे व त्यांच्या शब्दाला मान देत असे.

## आरंभ काळांतील सहाय्यक

धाडस करून एखाद्या कार्याची किंवा उद्योगधंद्याची जबाबदारी आपण शिरावर घेतों; परंतु त्यापायीं किती खर्च येईल याचा प्रथमारंभींच निश्चित अंदाज करणें कठीण असतें. खर्चाच्या अनेक बाबी पुढें येतात व त्या भागविल्याशिवाय पुढें पाऊल टाकतां येत नाहीं. कारखाना सुरू केल्यानंतर अनेक प्रसंगीं बाबासाहेबांना आर्थिक अडचणींना तोंड द्यावें

लागलें; आणि अशा प्रत्येक प्रसंगीं न डगमगतां धीरोदात्तपणें वागून आपल्या सौजन्याच्या, गोड स्वभावाच्या व बाजारांतील पतीच्या बळावर त्यांनीं जरूर तें आर्थिक सहकार्य मिळविलें आहे. आरंभकाळांतील अशा सहकाऱ्यांत शेट अमृतलाल हरगोविंददास, सर हरिदास माधवदास, शेट मथुरादास वसनजी व सेंट्रल बँकेचे सर सोराबजी पोचखानवाला यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें जरूर आहे. त्यांनीं जरुरीच्या वेळीं आर्थिक सहकाराचा हात पुढें केलाच, परंतु वेळोवेळीं बहुमोल सल्लाही देऊन बाबासाहेबांना कायमचे ऋणी करून ठेविलें आहे.

उद्योगधंद्यांत पडलेल्या माणसाला सर्वच दिवस सारखे दिसत नसतात. चढउताराचें रहाटगाडगें सतत चालू असतें; परंतु संकटकाळ असो वा भरभराटीचा काळ असो; आपल्या मनाचा समतोलपणा राखणें, नेहमीं आशावादी रहाणें व ईश्वरावर भरिभार टाकून मार्गक्रमण करणें हें सर्वांनाच साधत नाहीं. ती किमया श्रद्धेच्या बळावर बाबासाहेबांनीं साध्य केलेली आहे व त्यामुळेंच प्राप्त संकटांचें हंसतमुखानें स्वागत करण्यास ते समर्थ ठरले आहेत.

बेलापूर विभागांत तत्पूर्वींच निघालेला ब्रॅडी कंपनीचा साखर कारखाना सुव्यवस्थीतपणें चालू होता. त्या कारखान्याचा जम ठीक बसलेला होता. युरोपीयन मालकीच्या त्या कारखान्यानें जरूर त्या सवलती मिळविल्या होत्या. कारण कारखान्याचे मालक राज्यकर्त्यांचे जातभाई होते. अशा समर्थ कारखान्याशीं महाराष्ट्र साखर कारखान्यास निदान आरंभकाळांत चढाओढीच्या दृष्टीनें भीषण स्वरूपाची टक्कर द्यावी लागली आहे.

## कांहीं सवलती कांहीं बंधनें

सरकारनें देशी कारखानदारांस उत्तेजन मिळावें म्हणून कांहीं सवलती दिल्या होत्या. तशींच त्यांच्यावर कांहीं बंधनेंही लादलीं होतीं. उसाच्या लागवडीखालीं किती जमीन आणावी व त्यासाठीं कालव्याच्या पाण्याचा वापर किती प्रमाणांत करावा यासंबंधीं बंधनें होतीं. धंद्याच्या वाढीच्या दृष्टीनें

क्रमांक ...१२५५६..... नों. दि. ...१५।


तीं जाचक होतीं. आरंभीं ४।५ वर्षे तो जाच सहन करावा लागला; प्रयत्न करूनही कांहीं वळलें नाहीं! त्यानंतर सुदैवानें खेर मंत्रिमंडळ अस्तित्वांत आलें. आपलें सरकार असलें म्हणजे आपल्या उद्योगधंद्याच्या वाढीसाठीं किती सहकार करूं शकतें, याचें प्रत्यंतर त्यावेळीं आलें. खेरमंत्रिमंडळ अस्तित्वांत येतांच पाणीपुरवठ्यासंबंधीं कारखान्याची अडचण त्यांच्या नजरेस आणण्यांत आली आणि त्यांनीं विलंब न लावतां ती दूर केली.

## सर जोसेफ के

ज्याचा वर उल्लेख करण्यांत आला आहे तो शेजारचा बेलापूर साखर कारखाना युरोपीयन मालकीचा असला तरी त्याचे एक प्रमुख संचालक सर जोसेफ के यांच्याशीं बाबासाहेबांनीं स्नेहसंबंध जोडला होता. ते बोलाचालायला ठीक होते; परंतु नवीन निघालेल्या साखरकारखान्या-संबंधीं त्यांच्या मनांत सहानुभूतीची भावना फारशी नव्हती. मात्र त्या कारखान्यांतील शेतकी तज्ज्ञ जी. आर. महाजन व केमिस्ट पाध्ये यांना, महाराष्ट्र साखर कारखान्याबद्दल, एक स्वदेशी कारखाना या नात्यानें अतीव आदर व अभिमान वाटत असे. आरंभकाळांत कारखान्याची उभारणी सुरू असतां बाबासाहेबांना त्यांच्या सल्लामसलतीचा फार उपयोग झालेला आहे, हें येथें कृतज्ञतापूर्वक नमूद करणें जरूर आहे.

येथें सर जोसेफ के यांचें नांव निघालें म्हणून जातां जातां त्यांच्या स्वभावासंबंधीं एक-दोन आठवणी सांगणें अप्रस्तुत होणार नाहीं.

१९३६-३७ सालीं साखर कारखान्यापायीं बाबासाहेब पैशांच्या फार अडचणींत होते. कांहीं ना कांहीं मार्ग शोधून काढणें जरूर होतें. बँक ऑफ इंडियाचे त्यावेळचे जनरल मॅनेजर ए. जी. ग्रे यांना जाऊन ते भेटले व खुल्या दिलानें आपली आर्थिक अडचण त्यांनीं त्यांच्यापुढें ठेविली व कर्जाऊ रकमेची मागणी केली. नंतर बँकेच्या बोर्डापुढें हा प्रश्न चर्चे-साठीं आला. बोर्डांत सर जोसेफ के होते. कर्जाऊ रक्कम मंजूर करावी कीं न करावी, यावर चर्चा चालली असतां सर जोसेफ के म्हणाले, "अहो!

डहाणूकरांना कर्ज मंजूर करण्याची जरुरी नाहीं! तो कारखाना ते चालवूं शकणार आहेत का? एक-दोन वर्षांतच ते ढबगईला येतील व कारखाना आम्हांला विकून मोकळे होतील!"

अशा परिस्थितींत कर्जाऊ रक्कम मंजूर होऊं शकली नाहीं! मागाहून बाबासाहेबांस वरील गोष्ट समजली; परंतु त्यांनीं ती मनावर घेतली नाहीं. मात्र तिच्यापासून जरूर तो धडा घेऊन ते दुप्पट उत्साहानें कामास लागले.

उद्योगधंद्यांत चढउतार चालावयाचाच. त्याबद्दल आनंद किंवा दुःख मानायचें नाहीं. आपलें कर्तव्य चोख रीतीनें बजावण्यासाठीं नेहमीं जपायचें, हा होता बाबासाहेबांचा नेहमींचा बाणा.

१९४१-४२ साल कारखान्याला भरभराटीचें गेलें. संशोधकांच्या सहकार्यानें साखरेचा दर्जा वाढविण्यांत कारखान्यानें सुयश मिळविलें. त्यावेळीं तेच सर जोसेफ के बाबासाहेबांचें हार्दिक अभिनंदन करण्यासाठीं आले! असें आहे हें कालमाहात्म्य!

मागें सांगितल्याप्रमाणें औद्योगिक क्षेत्रांत वावरणाऱ्यास नेहमीं चढ-उतारास तोंड द्यावें लागत असतें. फटके खावे लागत असतात. ते खावे लागले म्हणून कांहीं बिघडत नाहीं; परंतु ते खाण्याचें व सोसण्याचें त्राण अंगीं असलें पाहिजे ना? आरंभकाळ म्हणजे बेसुमार धडपडीचा व चिंतेचा काळ. १९३५-३६ सालीं साखरेचे भाव एकदम घसरले व त्यामुळें भारी नुकसान सोसावें लागलें. मोठी हताश स्थिति वांट्याला आली; परंतु हेही दिवस निघून जातील, असा पोक्त विचार करून बाबासाहेबांनीं त्या प्रसंगाला धैर्यानें तोंड दिलें. आणि एकदां तर उसाचीं उभीं पिकें टोळधाडीनें साफ उद्ध्वस्त करून टाकल्याचें पहाण्याचें दुर्भाग्य बाबासाहेबांच्या वांट्याला आलें! निराशेनें व चिंतेनें करपून जाण्याचा तो प्रसंग होता; परंतु तशाही प्रसंगीं बाबासाहेब आपल्या मनाचा समतोल संभाळूं शकले!

### श्रीमती सौ. पार्वतीबाई

आरंभकाळांत आर्थिक अडचणींशीं सामना देत असतांना ज्यांनीं

सहकाराचा हात पुढें केला अशा कांहीं व्यक्तींचा नामोल्लेख वर कृतज्ञतापूर्वक करण्यांत आला आहे; त्याचप्रमाणें बाबासाहेबांच्या सहधर्मचारिणी श्रीमती सौ. पार्वतीबाई यांचाही येथें आदरपूर्वक उल्लेख करणें जरूर आहे. कितीही चिंतेंत असले तरी बाबासाहेब आपल्या चिंतेचा उपसर्ग दुसऱ्यांस होऊं नये म्हणून जपत असत. आपल्या घरांतील माणसांपुढेंही व्यवहारांतील अडचणींचा पाढा ते कधीं वाचीत नसत. परंतु सौ. पार्वतीबाई धोरणी व परिस्थितीची जाणीव बाळगणाऱ्या होत्या. संकटाची चाहूल लागतांच एके दिवशीं त्यांनीं स्वतःजवळ माहेरचे व घरचे असे जे कांहीं दागदागिने होते ते सारे बाबासाहेबांच्या पुढ्यांत ठेवून त्यांचा जरुरीप्रमाणें उपयोग करण्याची त्यांनीं विनंती केली. ते दिवस कारखान्याच्या इतिहासांत आर्थिकदृष्ट्या आणीबाणीचे होते. त्यामुळें पत्नीचा तो संस्मरणीय सहकार त्यांना नाकारतां आला नाहीं! तदनंतर चांगले दिवस येतांच पत्नीचे तारण ठेवलेले दागिने बाबासाहेबांनीं सोडवून आणिले व प्रेमादरपूर्वक त्यांच्या स्वाधीन केले.

माणसाची खरी पारख संकटकाळांतच होत असते. सुखाचे भागीदार शोधावे लागत नाहींत. ते आपोआप जवळ आलेले असतात; परंतु संकट-काळाशीं सामना देत असतां स्वयंस्फूर्तीनें सहकार देण्यासाठीं जो पुढें येईल त्याचीच आपणास मातब्बरी वाटत असते. सौ. पार्वतीबाईंनीं व इतर ज्यांनीं ज्यांनीं त्या काळांत साहाय्य केलें त्या सर्वांबद्दल बाबासाहेबांस नेहमी कृतज्ञता वाटत असते.

या काळांत बाबासाहेबांना अनेक आघाड्या संभाळाव्या लागत होत्या. महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांचें उत्पादन वाढत चालल्यामुळें परदेशी साखरेची आयात आस्ते आस्ते कमी होऊं लागली होती. परदेशी साखरेची दलाली करणारांना तें असह्य होऊं लागलें होतें. त्याचप्रमाणें संयुक्तप्रांत, बिहार या भागांतील साखर कारखानदारही महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांचा हेवा करूं लागले होते. बाबासाहेब व वालचंद हिराचंद-सारखे या व्यवसायांतील त्यांचे सहकारी, हा विरोध हाणून पाडण्यासाठीं आपापल्यापरीनें झटत होते.

### साखर कारखान्यांची तत्कालीन स्थिति

तत्कालीन परिस्थितीची जाणीव बाबासाहेबांच्याच शब्दांत करून देणें उचित होईल. १९३७ सालीं महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स या संस्थेच्या व्यासपीठावरून ते म्हणाले होते कीं, "उत्कृष्ट गुळासाठीं दख्खन प्रख्यात असल्यानें येथें नुसता उत्कृष्ट गूळच करण्यांत यावा आणि साखर संयुक्त प्रांत, बिहार या प्रांतांनींच करावी अशी सूचना करण्यांत आली आहे. साखरेच्या धंद्यांतील अव्वल दर्जा गांठण्यासाठीं डेक्कनच्या साखर कारखानदारांना कांहीं अडचणींतून अद्याप बाहेर पडायचें असलें तरी ही गोष्ट तितकीच खरी आहे कीं, डेक्कनमधील साखर कारखान्यांनीं आजतागायत केलेली प्रगति निःसंशय अभिनंदनीय आहे. डेक्कन कालव्यांचा प्रदेश साखरेच्या कारखान्यांना योग्य असल्याबद्दल तज्ज्ञांचा अनुकूल निर्णय पडल्यानंतर आणि उतारपेठांच्या अनुकूलता असतांही गुळाचा धंदा या प्रदेशांत नीट चालत नसल्याचा अनुभव आल्यावरच तेथें साखर कारखाने स्थापन करण्याचा उपक्रम करण्यांत आला. डेक्कनमधील बहुतेक देशी साखर कारखाने ज्या डेक्कन कालव्यांच्या टापूंत स्थापन झाले आहेत त्या टापूंत उत्कृष्ट गुळाची पैदास होत नसून ती कोल्हापूर संस्थानांत व आसमंतांतल्या प्रदेशांत होते. हें बाजूला ठेवून या बाबतींत असाही समर्पक प्रश्न विचारतां येण्यासारखा आहे कीं, डेक्कनमध्यें उत्कृष्ट गुळाची पैदास होते, हें जर मान्य असेल तर तेथें उत्कृष्ट साखरेचीही पैदास कां करूं नये? खरें बोलायचें तर जावासारखी साखरेच्या पैदाशीला जवळजवळ अनुकूल अशी परिस्थिति हिंदुस्थान देशांत जर कोणत्या भागांत असेल तर तो डेक्कन कॅनाल्सचाच भाग होय. अर्थात् याच ठिकाणीं साखरेचे कारखाने स्थापन झाले हें स्वाभाविकरित्या व्हावें तसेंच झालें. वस्तुस्थिति अशी असतांना केवळ परदेशी साखर देशांत आणवून ती विकण्याचा दलालीचा व्यापार अगर धंदा करणारांनीं असला अनाहूत आणि विचित्र सल्ला देण्यास प्रवृत्त व्हावें व तोही या स्वदेशी धंद्याची टॅरीफ बोर्डामार्फत चौकशी होत

असतांना प्रवृत्त व्हावें, ही खरोखर सौम्यांत सौम्य शब्द वापरावयाचा तर आश्चर्याची गोष्ट आहे.''[1]

## भरभराटीच्या काळास आरंभ

१९३८–३९ सालापासून महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांच्या वांट्यास भरभराटीचा काळ येण्यास सुरुवात झाली. १९३८ सालीं उत्तरेकडील भागांत पाऊस फार मोठ्या प्रमाणांत कोसळून उसाच्या मळ्यांत बेसुमार वाळू शिरली व त्याचा अनिष्ट परिणाम उसाच्या पिकावर झाला. ही एक दुर्दैवी घटना होती! त्यामुळें तिकडील कारखानदारांस तें वर्ष फार नुकसानीचें गेलें तर महाराष्ट्रीय कारखानदारांस फायद्याचें गेलें!

१९३८ सालीं दुसरें महायुद्ध सुरू झाल्यामुळें भारतांतील साऱ्या साखर कारखानदारांस युद्धजन्य परिस्थितीचा फायदा घेतां आला. योगायोग कसा आहे पहा? तुम्ही जें कार्य हातीं घ्याल त्यावर तुमची संपूर्ण निष्ठा असली म्हणजे तुमचीं पावलें आपोआप योग्य मार्गानें पडूं लागतात. १९३८ सालीं साखरउत्पादन वाढविण्यासाठीं कारखान्याचा विस्तार करण्याची योजना बाबासाहेबांनीं हातीं घेतली. त्यासाठीं नव्या यंत्रसामुग्रीची जरुरी होती. यंत्रसामुग्री शक्य तों देशी कारागिरांकडून बनवून घ्यायची यावर त्यांचा सतत कटाक्ष असे. निरुपाय झाला तर परदेशी यंत्रसामुग्री घ्यावयाची. जरूर तेथें पहाणी करून अद्ययावत् यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठीं बाबासाहेबानीं आपले ज्येष्ठ चिरंजीव दत्तात्रय ऊर्फ दादासाहेब यांस, त्या वेळचे कारखान्यांतील चीफ इंजिनीयर बी. एस्. दवे यांच्यासह जर्मनीस पाठविलें.

कारखान्यांत बसविलेल्या यंत्रसामुग्रीच्या साहाय्यानें त्या काळीं दररोज सुमारें साडेचारशें टन ऊंस गाळतां येत असे. रोज निदान एक हजार टन ऊंस गाळतां आला पाहिजे हें बाबासाहेबांचें लक्ष्य होतें. त्याला अनुसरून

१. ता. ११ ऑगष्ट १९३७ रोजीं महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या तिसऱ्या त्रैमासिक साधारण सभेपुढें अध्यक्ष या नात्यानें केलेलें भाषण.

जरूर ती यंत्रसामुग्री खरेदी करण्यांत आली, ती भारताच्या किनाऱ्यास येऊन लागली आणि अवघ्या एकच महिन्याच्या अवधींत महायुद्धाच्या रणदुंदुभि वाजूं लागल्या! खरोखर, हा एक योगायोगच समजला पाहिजे.

## संरक्षण सहजासहजीं मिळालें नाहीं

टॅरीफ बोर्डाकडून भारतीय साखरधंद्याला जें अत्यावश्यक संरक्षण मिळालें तें सहजासहजीं मिळालेलें नाहीं. सरकार त्यावेळीं आर्थिक पेचांत सांपडलें होतें. हें खरें असलें तरी हें संरक्षण दिलें जाऊं नये यासाठीं उठाठेवी करणारी कांहीं आपमतलबी मंडळी त्याकाळीं होतीच. भारतांत परदेशांतून जी साखरेची आयात होई त्यांपैकीं पंच्याहात्तर टक्के साखर जावामधून येत असे! भारतीय साखरेस संरक्षण मिळत आहे हें समजल्या-बरोबर जावा येथील ऊस मळेवाल्यांचें धाबें दणाणलें! त्यांच्यापैकीं कांहीं जणांनीं भारतांत मिळणाऱ्या सवलतीचा फायदा आपल्याच पदरांत पाडून घ्यावा, या हेतूनें इकडे येऊन कारखाने सुरू करण्याचा मनसुबा रचला होता; परंतु तो त्यांचा डाव सरकार दरबारीं वजन असलेल्या देशहितैषी व्यापारी नेत्यांनीं हाणून पाडिला! अशा तत्कालीन नेत्यांत बाबासाहेब व वालचंद हिराचंद यांचा प्रामुख्यानें उल्लेख करता येईल.

## संरक्षण मिळविण्यापूर्वी व नंतर

साखर धंद्यास उत्तेजन व संरक्षण मिळण्यापूर्वीं व तदनंतर आठ-दहा वर्षांच्या काळांत केवढें स्थित्यंतर घडून आलें, हें पहाण्यासारखें आहे!

१९३०–३२ सालीं काय परिस्थिति होती आणि आठ-दहा वर्षांनंतर त्यांत कोणता व किती पालट घडून आला हें आपण पाहूं या.

१९३२ सालापर्यंत परदेशांतून भारतांत आयात होणाऱ्या पांढऱ्या शुभ्र साखरेचें प्रमाण दहा ते बारा लक्ष टनांपर्यंत पोहोंचलें होतें. या शुभ्र साखरेच्या रूपानें भारतांतून सरासरी वीस कोटी रुपये परदेशीं जात असत. भारतीय साखर कारखान्यांची उत्पादनशक्ति त्याकाळीं दीड लक्ष टनांपेक्षां

अधिक नव्हती. तीस-बत्तीस साखर कारखाने कसेबसे जीव संभाळून हालचाल करीत होते.

त्यानंतर १९४० सालीं जादूची कांठी फिरविल्याप्रमाणें काय चमत्कार घडून आला पहा! १९४० सालीं वीस कोटीऐवजीं परदेशीं फक्त एक कोट रुपये गेले. साखरेचें वार्षिक उत्पादन तेरा लाख टनांवर जाऊन पोहोंचलें आणि साखर कारखान्यांची संख्या एकशें पंचेचाळीसच्या पलीकडे गेली!

कोठें वीस कोटी रुपये व कोठें एक कोट रुपये! आणि त्यानंतर आज पाव शतकाचा काळ लोटल्यानंतर याच देहीं याच डोळां आपण कोणता चमत्कार पहात आहोंत? आज भारत साखरेच्या बाबतींत स्वयंपूर्ण झालेला आहे एवढेंच नव्हे, तर साखरेचें वार्षिक उत्पादन वाढत चालल्यामुळें (१९६२ सालीं ३० लक्ष टन) परदेशांतल्या साखरेच्या बाजारपेठा काबीज करण्याच्या मार्गावर आहे. देशाच्या भरभराटीच्या दृष्टीनें काळानें केवढें हें स्थित्यंतर घडवून आणिलें आहे!

## जीवनांत साखरेची गोडी आणिली

आज देशांत स्वातंत्र्य नांदत असतां व व्यापारधंद्याच्या वाढीकडे आपल्या सरकारचें लक्ष लागून राहिलें असतां साखर धंदाच काय, परंतु इतर नाना प्रकारचे उद्योगधंदे प्रगतीच्या मार्गावर असल्यास त्यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं; परंतु परकीयांच्या राजवटींत देशी उद्योगधंद्यांची पाळेंमुळें खणून काढून ते नेस्तनाबूत करण्याचा जेथें अट्टाहासपूर्वक प्रयत्न चालू होता, त्या विपरीत काळांत साखर धंद्याच्या क्षेत्रांत प्रवेश करून व नाना प्रकारच्या अडीअडचणींशीं धैर्यानें टक्कर देऊन अनेकांच्या सहकार्यानें बाबासाहेबांनीं तो उत्तमप्रकारें नांवारूपास आणून दाखविला. एवढेंच करून ते थांबले नाहींत. आपला साखर कारखाना सर्व दृष्टींनीं नांवाजण्याजोगा झाला पाहिजे; त्या धंद्याचीं जीं इतर अंगें, उपांगें आहेत, त्यांचेंही संगोपन झालें पाहिजे; व या कारखान्याशीं कोणत्याही नात्यानें निगडीत झालेल्या

हजारो लोकांचें जीवन सुखावह व्हावें व त्यांत साखरेची माधुरी निर्माण व्हावी यासाठीं बाबासाहेबांनीं व गेल्या सुमारें पंधरा वर्षांपासून या कारखान्याचें संचालकत्व यशस्वी रीतीनें संभाळणारे त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव दत्तात्रय ऊर्फ दादासाहेब यांनीं कारखाना वैभवसंपन्न व्हावा, यासाठीं काय काय केलें, त्याकडे आतां आपण लक्ष पुरवूं या.

६.

# महाराष्ट्र साखर कारखान्याचा विकास

**महाराष्ट्र** साखर कारखान्यास जसजशीं वर्षे लोटूं लागलीं तसतशा त्याच्या विस्ताराच्या व नानाविध सुधारणा घडवून आणण्याच्या योजना बाबासाहेबांच्या मनांत घोळूं लागल्या व त्या आस्ते आस्ते आचरणांतही येऊं लागल्या.

**देशी व परदेशी तंत्रज्ञ**

परदेशांत जाऊन व तिकडील उद्योगधंद्यांची भरभराट पाहून आल्यापासून शास्त्रीय संशोधनाचें महत्त्व बाबासाहेबांस पूर्णपणें पटलें होतें. त्यामुळें महाराष्ट्र साखर कारखान्याची स्थापना झाल्यापासून त्यांनीं शास्त्रीय संशोधनाकडे लक्ष पुरविण्यास सुरुवात केली. त्यासाठीं आरंभकाळांत त्यांना कांहीं युरोपीयन संशोधक मोठमोठे पगार देऊन जवळ करावे लागले. त्यांच्या सल्ल्यानुसार रसायन शाळेसाठीं लागणारी जरूर ती साधनसामुग्री मागवून एका रसायनशाळेची त्यांनीं स्थापना करविली. आपल्या कारखान्याची उभारणी खंबीर पायावर झाली पाहिजे. तो कारखाना नमुनेदार व अद्ययावत् साधनसामुग्रीनें सुसज्ज असावा व तो सर्वांच्या कौतुकाचा विषय होऊन रहावा ही होती बाबासाहेबांची महत्त्वाकांक्षा! त्यासाठीं योग्य व लायक माणसांच्या शोधांत ते सतत असत. कोणतीही गोष्ट असो, तिच्यासाठीं तळमळपूर्वक शोध चालविला असतां ती सहसा सांपडल्याशिवाय रहात

नाहीं. त्या काळीं आपल्या देशांत साखरतंत्रज्ञांचा अतोनात तुटवडा होता. त्यामुळें परदेशीय तंत्रज्ञांचें सहकार्य त्यांना आरंभकाळांत घ्यावें लागलें. आपल्या कारखान्यानें नांव मिळविलें पाहिजे, त्याची सर्वत्र ख्याति झाली पाहिजे, ही त्यांची आकांक्षा होती. ऊस व साखर निर्मिति याबाबतींत मिळविलेलीं परदेशीय तज्ज्ञ माणसें आरंभकाळांत त्यांनीं अधिकार पदावर नेमिलीं. त्यांत बाबासाहेबांचे दोन हेतू होते. एक तर आपला कारखाना जास्तींत जास्त कार्यक्षम होऊन संशोधनामुळें उत्पादन वाढ व्हावी आणि आपल्या लोकांस कामकाजाची शिस्त लागून त्यांच्या हाताखालीं तरबेज होण्याची त्यांना सुसंधि मिळावी. परदेशी तंत्रज्ञांवर सर्वस्वी अवलंबून रहाण्याचा बाबासाहेबांचा केव्हांही विचार नव्हता. या धोरणामुळें त्या युरोपीयन तंत्रज्ञांच्या हाताखालीं काम शिकून कारखान्यांतील अनेक हुशार माणसें तयार झालीं. तीं जसजशीं तयार होत गेलीं तसतशीं त्यांच्यावर वेगवेगळ्या क्षेत्रांतील कामाची जबाबदारी सोपवून युरोपीयन तंत्रज्ञांस रजा देण्यांत आली.

### एक महत्त्वाची घटना

१९४२ सालीं महाराष्ट्र साखर कारखान्याच्या इतिहासांत एक महत्त्वपूर्ण घटना घडून आली. तिचें मुख्य कारण म्हणजे वरील संशोधकांचें सहकार्य व कारखान्याच्या रसायनशाळेच्या द्वारें चालू असलेलें अखंड संशोधनच होय. येथें अभिमानपूर्वक नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे जरूर ती संधि मिळाली असतां आमचे तंत्रज्ञ परकीय तंत्रज्ञांपेक्षांही सरस कामगिरी बजावूं शकतात, असें अनुभवांतीं आढळून आलें आहे. जातां जातां शेतकी तज्ज्ञ जी. सी. पालेकर यांच्या शेतकी क्षेत्रांतील अभिनंदनीय कामगिरीचा येथें उल्लेख करणें जरूर आहे. उंसाच्या उत्पादनांत त्यांनीं या कारखान्याच्या द्वारें जगांत दुसरा क्रमांक मिळविला आहे !

भारतीय साखर कारखानदारांस परदेशांतून येणाऱ्या पांढऱ्या शुभ्र व दाणेदार साखरेच्या तोडीची साखर निर्माण केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें.

अनुक्र. ३८९८२ वि: चरित्र
क्रमांक. १२४५९ नों दि: १५।११।



आणि तशा प्रकारच्या साखरनिर्मितीसाठीं बोन चारकोलचा उपयोग परदेशी साखर कारखान्यांतून केला जात असे; परंतु धार्मिकदृष्ट्या आपल्याकडे अशा रीतीनें तयार झालेली साखर निषिद्ध मानली जात असे. १९४०–४१ पर्यंत हा प्रकार चालू होता. बोन चारकोलचा उपयोग केल्याशिवाय परदेशी साखरेच्या तोडीची पांढरी शुभ्र व दाणेदार साखर कां निर्माण करतां येऊं नये ? त्यासाठीं कांहीं ना कांहीं उपाय शोधून काढलाच पाहिजे. हा विचार बाबासाहेबांच्या मनांत अनेक वर्षांपासून सतत घोळत होता व तो विचार आपल्या कारखान्याच्या संशोधनशाखेंत काम करणाऱ्या संशोधकांपुढें ते वारंवार ठेवीत असत. त्यांच्यापैकीं आर. जी. प्रधान व जे. एच. होल्स्टर यांनीं तर नाना प्रयोगांच्याद्वारें त्या विषयाचा स्वतःला ध्यासच लावून घेतला होता. शेवटीं १९४२ सालीं विशिष्ट रासायनीक पद्धतीनें पांढरी शुभ्र व दाणेदार साखर निर्माण करण्यांत त्यानीं यश मिळविलें. नंतर त्याविशिष्ट पद्धतीचें पेटंटही घेण्यात आलें. बाबासाहेबांच्या जीवनांतील तो एक आनंदाचा व कृतार्थतेचा क्षण होता. तसेंच भारतीय साखर निर्मिति क्षेत्रांतील हा एक महत्त्वाचा व अभिनंदनीय टप्पा होता व तो गांठण्यांत महाराष्ट्र साखर कारखान्यानें यश मिळविलें. त्यामुळें या साखर कारखान्याचें व बाबासाहेबाचें नाव भारतभर दुमदुमलें. बेलापूर शुगर कंपनीचे प्रमुख सर जोसेफ के व भारताचे शुगर कंट्रोलर एन्. सी. मेहता, आय. सी. एस्. यांच्यासारख्यांनीं महाराष्ट्र साखर कारखान्याचें हार्दिक अभिनंदन केलें. असें आहे शास्त्रीय संशोधनाचें महत्त्व.

### संशोधनाचें महत्त्व

आमच्या देशांतील कारखानदारांस शास्त्रीय संशोधनाची महति अलीकडे कुठें समजूं लागली आहे. विशेषतः स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू व त्यांच्या मंत्रीमंडळानें भारतांत ठिकठिकाणीं रसायनशाळा स्थापन करून औद्योगिक क्षेत्रांत शास्त्रीय संशोधनाचें महत्त्व पटविण्याचे जारीचे प्रयत्न सुरू केले, ही खरोखर

अभिनंदनीय घटना आहे. परंतु त्याबाबतींत बाबासाहेब फार पूर्वींपासून जागरूक आहेत.

संशोधनाचें महत्त्व कुठवर सांगावें? उसाची लागवड करण्यापासून तों साखर गाळली जाईपर्यंत शास्त्रीय संशोधनाचा ठायीं ठायीं संबंध येतो. शेतजमिनीचें पृथक्करण, उसांच्या जाती, खतांचा वापर, उसावर पडणाऱ्या कृमिकीटकांचा नाश, साखरउत्पादनाची प्रक्रिया वगैरे एक ना दोन किती तरी बाबतींत संशोधनाच्याद्वारें सुधारणा घडवून आणण्याची जरुरी असते. आणि हीं सारीं कामें महाराष्ट्र साखर कारखान्यांतील तरबेज तंत्रज्ञांतर्फे आजकाल यशस्वी रीतीनें पार पाडिलीं जात आहेत.

वर सांगितल्याप्रमाणें आरंभापासून बाबासाहेबांचें लक्ष या कार्यक्षेत्राकडे लागून राहिलेलें असे. कार्याचा व्याप वाढत चालला तसतशी जुनी रसायनशाळा अपुरी वाटूं लागली. ती उणीव लक्षांत घेऊन त्यानीं आपली रसायनशाळा अद्ययावत् यंत्रसामुग्रीनें सुसज्ज व समृद्ध बनविण्याची योजना आखून ती अंमलांतही आणिली.

## रसायनशाळेचा उद्घाटन समारंभ

कारखान्याच्या इतिहासांतील ही प्रगतीशील घटना १९५९ सालीं घडून आली. त्यावेळचे महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांच्या शुभ हस्तें या सुसज्ज व सुधारलेल्या रसायनशाळेचा उद्घाटन समारंभ टिळकनगर येथें घडवून आणण्यांत आला. त्यावेळीं शास्त्रीय संशोधनाचें साखर धंद्यांत किती महत्त्व आहे हें सांगतांना आपल्या स्वागतपर भाषणांत बाबासाहेब म्हणाले होते कीं, "महाराष्ट्रांतील साखर धंदा विकास पावत आहे. हा विकास मुख्यतः संशोधनकार्यामुळें होत आहे. नॅशनल शुगर इन्स्टिटयूट, पाडेगांव साखर संशोधन केंद्र व लहानमोठ्या साखर कारखान्यांतून होत असलेलें संशोधन, हा साखर धंद्याच्या विकासाचा मोठाच आधार आहे. उसाची लागवड करण्यापासून तों साखर गाळण्यापर्यंतच्या प्रत्येक क्रियेशीं शास्त्रीय संशोधनाचा संबंध येतो. त्यामुळें शेती आणि कारखाना या दोन्ही

क्षेत्रांत संशोधनाची आवश्यकता आहे. ऊस लावण्याची शेतजमीन आणि साखर गाळणारीं यंत्रें या दोन्हीं टोकांकडे शास्त्रीय संशोधकांना सारखेंच लक्ष द्यावें लागतें. विज्ञानाची प्रगति जितक्या झपाट्यानें होत आहे, तितक्याच झपाट्यानें ती साखर धंद्यांतही वापरली जात आहे. त्यामुळें तर या संशोधनाचें महत्त्व विशेषच वाढलें आहे. आपला देश कच्च्या मालाच्या बाबतींत संपन्न आहे; पण परदेशांत होत असलेली तांत्रिक प्रगति जर आपण आत्मसात् केली नाहीं तर जुनाट उत्पादनपद्धतींत आपली शक्ति वाया जाईल. साखर धंद्यालाही ही गोष्ट लागू आहे."

**ना. यशवंतरावजींकडून धन्यवाद**

बाबासाहेबांच्या या प्रासंगिक उद्गारांवरूनही शास्त्रीय संशोधन हा त्यांचा किती जिव्हाळ्याचा विषय आहे हें दिसून येईल. त्याप्रसंगीं ना. यशवंतरावजी चव्हाण यांनीं आपल्या भाषणांत बाबासाहेबांनीं अत्यंत विपरीत परिस्थितींत पुढाकार घेऊन नगर जिल्ह्यांत साखर कारखान्याची स्थापना केली व त्याला उन्नत आणि अभिनव स्वरूप प्राप्त व्हावें, यासाठीं त्यांनीं अहर्निश चालविलेल्या उद्योगाबद्दल व त्यांच्या शास्त्रीय दृष्टिकोनाबद्दल त्यांचें हार्दिक अभिनंदन केलें.

ही रसायनशाळा सतत प्रगतिपथावर असून तेथें निष्ठापूर्वक संशोधन-कार्यांत गुंतलेले संशोधक साखरधंद्याला उपकारक असे लहानमोठे शोध लावून कारखान्याचें वैभव वाढवीत आहेत.

जरूर त्या कामासाठीं योग्य माणसाची निवड करावयाची व त्याला टक्केटोणपे खात अनुभव घेऊं द्यावयाचे आणि मग त्याच्यावर जबाबदारी सोपवावयाची व ती त्याच्याकडून यशस्वी रीतीनें पार पाडून घ्यावयाची, या नियमाची अंमलबजावणी त्यांनीं कारखान्यांतील अधिकारी व कामकरी यांच्या बाबतींत केली तशीच ती त्यानीं आपले ज्येष्ठ चिरंजीव दत्तात्रय ऊर्फ दादासाहेब यांच्या बाबतींतही कसोशीनें केली. दृष्टीचा पल्ला नेहमीं दूरवर फेकावयाचा; हाताजवळचें पाहावयाचें, त्याचप्रमाणें दूरवरचेंही

पहाण्याचा प्रयत्न करावयाचा, हें होतें बाबासाहेबांचें धोरण. कोणीही मनुष्य असो. त्याच्या उत्साहाला व सामर्थ्याला मर्यादा असतात. त्या मर्यादा ज्यानें त्यानें ओळखून भावी काळाची तरतूद करून ठेविली पाहिजे; या दृष्टीनें यानंतरच्या काळांत बाबासाहेबांचीं पावलें पडूं लागलीं.

दादासाहेबांवर साखर कारखान्याची जबाबदारी सोपवावयाची तर ती पेलण्याची त्यांची तयारी झाली पाहिजे. विपरीत काळांत पुढें पाऊल टाकून व नानाप्रकारें झीज आणि कष्ट सोसून जो साखर कारखाना आपण नांवारूपास आणिला, त्याचा नावलौकिक सतत वाढत राहिला पाहिजे, एवढेंच नव्हे तर त्यानें वैभवाचें शिखर गांठलें पाहिजे, ही होती बाबासाहेबांची महत्त्वाकांक्षा. त्यानीं दादासाहेबांवर सर्व जबाबदारी एकदम सोपविली नाहीं. इतकीं वर्षे आपण ज्या धोरणानें वागत आलों, त्याची त्यांना बरोबर जाणीव झाली पाहिजे, उसाच्या लागवडीखालीं येणाऱ्या जमिनीच्या मशागतीपासून तों साखर तयार होऊन ती बाहेर जाईपर्यंत ज्या घडामोडी व हालचाली होतात त्यांची व तीं तीं कामें ज्या खात्यांमार्फत होतात, त्या खात्यांची दादासाहेबांस यथायोग्य माहिती व्हावी, त्यांचें अनुभवजन्य ज्ञान वाढावें व अशारीतीनें कारखान्याची जबाबदारी संभाळण्याचें सामर्थ्य त्यांच्या ठायीं यावें, या हेतूनें बाबाहेबानीं त्यांना निरनिराळ्या खात्यांत प्रत्यक्ष काम करायला लाविलें. १९३३ ते १९३९ पर्यंत म्हणजे सुमारें सात वर्षें दादासाहेबांनीं कारखान्याच्या क्षेत्रांत उमेदवारी केली. या उमेदवारीच्या काळानंतर त्यांना संचालक मंडळावर नेमण्यात आलें. त्या काळांत बाबासाहेबांच्या नेतृत्वाखालीं वावरत असतां त्यांना साखरधंद्यांतील सारे खांचखळगे समजून आले, बाबासाहेबांच्या ध्येयधोरणाची अचूक खूणगांठ बांधतां आली व आत्मविश्वासपूर्वक वडिलांच्या छत्राखालीं प्रगतीच्या मार्गानें वाटचाल करतां आली.

## एक अमोलिक गुण

दादासाहेबांच्या ठायीं एक अमोलिक व धंद्याला उपकारक होऊन

रहाणारा गुण आहे. ज्या क्षेत्रांत आपण वावरत आहोंत, त्यांत संपूर्ण यश मिळावें यासाठीं जें जें करणें जरूर असेल तें तें करण्यासाठीं झटावयाचें; त्याच कार्याशीं सर्वस्वीं समरस होऊन जावयाचें. हें थोडें तें थोडें असला अर्धवटपणा त्यांना पसंत नाहीं. त्यामुळें महाराष्ट्र साखर कारखान्याची भरभराट त्यांच्या नेतृत्वाखालीं झपाट्यानें झाली.

१९४४ सालापासून महाराष्ट्र साखर कारखान्याच्या संचालनाची सारी जबाबदारी दादासाहेबांवर सोपविण्यांत आली असून ती त्यानीं समाधानकारक रीतीनें पार पाडलेली आहे. या कारखान्याचा आज निरनिराळ्या दृष्टीनें जो विकास झालेला आपण पहात आहोंत, तो त्यांच्या गेल्या १५।२० वर्षांच्या काळांतील आहे. फार थोडे बोलायचें, परंतु कारखान्याच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें जें करणें योग्य असेल तें नेमकें करावयाचें, हा त्यांचा नेहमींचा बाणा आहे.

पहिलीं १० वर्षें या साखरकारखान्याचा खंबीर पाया रचून त्यावर टोलेजंग इमारत रचण्यांत व त्या इमारतींतील निरनिराळीं दालनें बांधण्यांत गेलीं तर तदनंतरचा आतापर्यंतचा पंधरा वर्षांचा काळ, त्या भरभक्कम इमारतीची व तिच्यांतील निरनिराळ्या दालनांची शोभा व उपयुक्तता वाढविण्यांत, तसेंच तिला चिरस्थायी, टिकाऊ आणि सुंदर स्वरूप देऊन त्या इमारतीवर कळस चढविण्यांत गेलेला आहे.

एकानें पाया घालून इमारतीची उभारणी करावी व दुसऱ्यानें येऊन ती जमीनदोस्त करून मोकळें व्हावें! आपल्या सभोंवारच्या जगांत नित्यश: याच प्रकारच्या घडामोडी आपण पहात आहोंत. बाबासाहेबही तेंच पाहात आले. आपल्या बाबतींत तसें कांहीं घडूं नये, यासाठीं त्यांनीं आरंभापासून जास्तींत जास्त दक्षता बाळगली, त्याचेंच हें मधुर फळ आहे. आपल्या मुलांच्या मनांवर चांगले संस्कार घडावे, चुका करतां करतां त्यानीं शहाणे व्हावें आणि जगांत सर्वांकडून 'भला रे भला' म्हणवून घ्यावें, ही होती बाबासाहेबांची नेहमींची दृष्टि. दादासाहेबानीं व त्यांच्या दुसऱ्या दोन्ही चिरंजिवांनीं ती पूर्ण केली आहे.

गेल्या पंधरा वर्षांच्या काळांत दादासाहेबानीं कारखान्याच्या सर्व क्षेत्रांतून नाना प्रकारच्या उपयुक्त सुधारणा घडवून आणिल्या. त्यामागें बाबासाहेबांची शिकवण, प्रेरणा व सद्भावना अखंड आहे.

आणि या ठिकाणीं हेंही सांगणें जरूर आहे कीं, दादासाहेबांच्या पाठीशीं केवळ बाबासाहेबांची प्रेरणा व सद्भावना आहे एवढेंच नसून, बाबासाहेबानीं आपल्या तालमींत तयार केलेल्या व त्यांच्या प्रेरक सहवासांत दीर्घकाळ आलेल्या अनुभवी, विश्वासू व हितचिंतक अधिकाऱ्यांच्या अनुभवांचा व ज्ञानाचा त्यांना भरपूर लाभ घेतां येत आहे.

### उत्पादनक्षेत्रांत उच्चांक

दादासाहेबांच्या नेतृत्वाखालीं महाराष्ट्र साखर कारखान्यानें केलेली प्रगती खरोखर अभिनंदनीय आहे. साखर-उत्पादनाच्या बाबतींत या कारखान्यानें उच्चांक गांठलेला आहे. दर एकरीं जास्तींत जास्त साखर उत्पादन करून दाखविणें, हें या कारखान्याच्या संचालकांचें उच्च ध्येय होतें. त्याला अनुसरून सतत शिकस्तीचे प्रयत्न चालू असत. १९६३ सालीं महाराष्ट्र साखर कारखान्यानें दर एकरीं सुमारें नऊ टन साखर उत्पादन करून त्या क्षेत्रांत पहिला क्रमांक मिळविला आहे. महाराष्ट्रांतील कारखान्यांचें सरासरी एकरी उत्पादन पाहिलें तर तें सहा किंवा साडेसहा टनांपलीकडे गेलेलें नाहीं. अशा परिस्थितींत महाराष्ट्र साखर कारखान्यानें उत्पादनक्षेत्रांत मिळविलेलें हें यश किती प्रशंसनीय आहे याची आपणास कल्पना होईल. या उत्पादनाच्या बाबतींत दुसरी एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. जगांत एकरीं जास्तींत जास्त उत्पादन करणारे जे देश आहेत, त्यांच्या उत्पादनाचा उच्चांक दर एकरीं सरासरी दहा टनापेक्षां जास्त नाहीं. अशा स्थितींत महाराष्ट्र साखर कारखान्यानें उत्पादनाच्या बाबतींत मिळविलेला उच्चांक जसा डहाणूकर कुटुंबाला भूषणावह आहे तसाच तो महाराष्ट्रालाच नव्हे तर अखिल भारतालाही भूषणावह आहे.

**अवांतर उद्योगधंदे**

आपल्याकडे साखर कारखाना म्हटला म्हणजे तेथें फक्त साखर तयार व्हायची; परंतु परदेशांत जावासारख्या ठिकाणीं जे साखर निर्मितीचे कारखाने आहेत, त्यांचें तसें नाहीं. साखरनिर्मितीशिवाय तेथें त्या धंद्याशीं निगडित असलेले असे नाना प्रकारचे जोडधंदे चालू असतात व ते किफायतशीरपणें चाललेले असतात. त्यामुळें खर्चाचा सारा भार त्याच एकमेव धंद्यावर न पडतां तो भार विभागला जातो व साखर स्वस्त भावानें द्यायला परवडते. बाबासाहेबांस या गोष्टीची जाणीव आरंभापासून होती; परंतु परकीय सत्तेच्या अमदानींत नाना प्रकारच्या बंधनांत वापरावें लागत होतें. तुमची वाटेल ती आकांक्षा असली किंवा ती पूर्ण करून घेण्याची वाटेल तेवढी ताकद तुमच्या ठायीं असली तरी कांहीं हालचाल करतां येत नव्हती व केली तरी कोणत्या ना कोणत्या सबबीखालीं ती दाबून टाकण्यांत येत असे.

हेंच पहा ना ! उसाच्या रसापासून साखर तयार करतांना शेवटीं शुगर—ग्लुकोजयुक्त असा एक द्रव पदार्थ शिल्लक रहातो. तो द्रव टाकाऊ म्हणून बाजूला टाकण्यांत येत असे. त्या द्रवास अंतिम राब (Final Molasses) म्हणतात. पूर्वीच्या काळीं त्या टाकाऊ राबाचा किंवा गाळाचा जळणासाठीं किंवा रस्ते मजबूत करण्याच्या कामीं उपयोग होत असे; तो उत्तरोत्तर वाढत जावयाचा; तेव्हां तो सांठवून ठेवायचा कुठें हा प्रश्न कारखानदारापुढें सतत उभा रहात असे.

या निरर्थक फुकट जाणाऱ्या राबाच्या बाबतींत बाबासाहेब आरंभापासून किति जागरूक व दक्ष होते हें १९३७ सालीं त्यानीं महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या व्यासपीठावरून जें भाषण केलें त्यावरून दिसून येतें.[१]

ते म्हणाले होते कीं, "राबापासून पावर आल्कोहोल बनविण्याची परवानगी सरकार देईल तर तें साखरधंद्याला फार हितावह होईल.

१. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स. तिसरी त्रैमासिक साधारणसभा. ता. ११ ऑगष्ट १९३७

(एकट्या १९३६–३७ सालांत अंदाजें पाच लक्ष टन राब फुकट गेल्याची नोंद आहे.) त्यामुळें साखरेच्या धंद्याला अधिक प्राप्ति होऊन त्याला चांगली बरकत येईल; आणि त्याचबरोबर देशाच्या संपत्तींतही भर पडेल. आस्ट्रेलिया, क्यूबा, हवाई, अमेरिका वगैरे देशांतून मोटारस्पिरीटमध्यें २५ टक्क्यांपर्यंत राब किंवा काकवीपासून तयार केलेलें अल्कोहोल सक्तीनें मिसळण्यांत येतें. तर ही गोष्ट लक्षांत घेऊन सरकारनें परवानगी द्यावी."

**डिस्टिलरीची उभारणी**

बाबासाहेब केवळ भाषणाच्याद्वारें आपले विचार पुढें मांडून थांबत नसत तर त्यासाठीं जरूर व शक्य त्या हालचालीही करीत असत; परंतु त्या प्रतिकूल काळांत त्यांची डाळ शिजत नसे; कांहीं म्हणा. सर्व दिवस सारखे नसतात. बाबासाहेबांनीं जे विचार पुढें मांडले ते अंमलांत आणण्याच्या दृष्टीनें त्यानंतर दीड दोन वर्षांनीं अनुकूल वारा वाहूं लागला. १९३९ सालीं महायुद्धाचा वणवा भडकला! त्यानंतरच्या काळांत पेट्रोल व क्रूड ऑईलची टंचाई तीव्रतेनें भासूं लागली. गाड्यांचें दळणवळण बेसुमार वाढलें. पेट्रोलच्या ऐवजीं अल्कोहोलमिश्रित पेट्रोल वापरण्याची पाळी आली! हा काळाचा महिमा! आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे साखर कारखान्यांतून जो खंडोगणती राब निकामी म्हणून टाकून देण्यांत येत असे, त्यापासून अल्कोहोल तयार करण्यासाठीं भट्ट्या (डिस्टिलरी) घालण्याची परवानगी सरकारकडून देण्यांत आली. तेव्हांपासून महाराष्ट्र साखर कारखान्यांत 'डिस्टिलरी' उभारण्यांत आली असून तिची संपूर्ण कल्पना (Design) व बनावट भारतीय तज्ज्ञाच्या देखरेखीखालीं करण्यांत आली आहे. बाबासाहेबांचे द्वितीय चिरंजीव शांतारामजी ऊर्फ अण्णासाहेब यांच्या इंजिनियरिंगच्या सखोल ज्ञानाचा, या डिस्टिलरीची उभारणी करतांना फार मोठा उपयोग झालेला आहे, ही गोष्ट येथें नमूद करणें जरूर आहे. ही भट्टी वर्षांतून दिडशें दिवस चालू असते व तिच्या द्वारें सध्यां सुमारें पांच

लक्ष गॅलन स्पिरीट तयार होतें. टाकाऊ म्हणून फेकून देण्यांत येणाऱ्या इतर अनेक वस्तूंचाही आतां सदुपयोग होऊं लागला आहे.

## तांत्रिक विषयांचें ग्रंथालय

याप्ूर्वींच सांगण्यांत आल्याप्रमाणें संशोधनानें व्यापलेल्या सध्यांच्या या ज्ञानयुगांत प्रत्येक क्षेत्रांत रोज नवे नवे शोध लागत आहेत. त्यामुळें जगाचें पाऊल पुढें पुढें पडत चाललें आहे. आम्ही पूर्वी होतों तेथेंच थांबलों तर चालू चढाओढींत आम्ही मागें पडल्याशिवाय रहाणार नाहीं. आपण औद्योगिक क्षेत्रांत नवनवे शोध लावण्याचा कसून प्रयत्न केला पाहिजे. इतर देशांनीं लावलेले शोध कोणत्या स्वरूपाचे आहेत त्याची माहिती मिळवून आम्हीं ते आत्मसात केले पाहिजेत. तरच आमचें पाऊल पुढें पडेल.

शास्त्रीय व तांत्रिक ग्रंथांचें आणि नियतकालिकांचें वाचन हें ज्ञानांत भर घालणारें आहे. आपल्या कारखान्यांतील लोकांचें लक्ष या गोष्टीकडे वळावें व शास्त्रीय तसेंच तांत्रिक स्वरूपाचें वाङ्मय त्यांच्या आटोक्यांत यावें, या हेतूनें टिळकनगरांत खास तंत्रज्ञांसाठीं एक तांत्रिक ग्रंथालय (Technical Library) १९६२ सालीं ना. शेषराव वानखेडे (उद्योगधंदे व कायदेकानू खात्याचे मंत्री) यांच्या हस्तें उघडण्यांत आलें आहे. एवढ्यावरून एक गोष्ट सिद्ध होते व ती हीच कीं, आपला कारखाना व कारखान्यांत वावरणारे कर्मचारी नेहमीं प्रगतिपथावर असावे व त्यांच्या मनांत नेहमीं प्रगतीचे विचार घोळत रहावे; असें या कारखान्याच्या चालकांस वाटत असतें.

या कारखान्याच्या चालकांनींच नव्हे तर सर्व महाराष्ट्रीयांनीं अभिमान बाळगण्यासारखी गोष्ट म्हणजे महाराष्ट्र शुगर मिल्सनें साखरनिर्मिती क्षेत्रांत १९६१ सालीं अखिल भारतांत पहिला क्रमांक मिळविला असून, तें बहुमानाचें स्थान आजही कायम आहे.

७.

# बहुजनहिताय बहुजनसुखाय

**कारखाना** म्हटला म्हणजे कामगारवर्ग आलाच. आतां सक्तीनें व मनाला येईल त्याप्रमाणें कामगारांना राबविण्याचा जमाना राहिलेला नाहीं. तो कधींच मागें पडला आहे. आतां युक्तीनें, सहानुभूतीनें व त्यांच्यासाठीं जरूर त्या सुखसोयी निर्माण करून, एवढेंच नव्हे, तर त्यांचा संभाळ आपल्या कुटुंबांतील माणसांप्रमाणें करून त्यांचें सहकार्य संपादन करण्याचा आजचा जमाना आहे. बाबासाहेब आरंभापासून या जाणीवेनें वागत आले आहेत.

फार कशाला? असेंही म्हणतां येईल कीं, त्यानीं आत्यंतिक मेहनत घेऊन व सर्वस्व पणास लावून कारखानदारीचा जो एवढा पसारा मांडला तो कोणासाठीं? केवळ स्वतःच्या व डहाणूकर कुटुंबियांच्याच सुखसमृद्धीसाठीं? प्रत्येकाच्याठायीं कमीजास्त प्रमाणांत स्वार्थ हा असावयाचाच; व तसा तो बाबासाहेबांच्या ठायींही आहे. परंतु तो साधीत असतां परार्थाकडेही जाणीवपूर्वक लक्ष पुरविणें, आपल्या सान्निध्यांत कर्मधर्म संयोगानें जीं जीं माणसें येतील त्यांना सुख, समाधान लाभावें यासाठीं झटणें, ही एक उच्च प्रकारची मानवसेवा आहे. बाबासाहेबांनीं कारखानदारीच्या व्यापक क्षेत्रांत पदार्पण केलें, तत्पूर्वीच्या काळांत त्यांच्या उदार अंतःकरणांत दुसऱ्यांचें जीवन सुखी करण्यासाठीं झटण्याची किंवा तशा स्वरूपाची कांहीं ना कांहीं उदात्त विचारसरणी वावरत होती असें निश्चितपणें म्हणतां येतें.

## जीवनसाथी गणपतराव जोशी

कारखानदारीकडे वळण्यापूर्वी बाबासाहेब बांधकामाच्या ठेकेदारीचा व्यवसाय यशस्वीपणें हाताळीत होते; परंतु त्यांच्या महत्त्वाकांक्षी मनाला तेथें समाधान मिळत नव्हतें. ते अस्वस्थ झालेले होते. कांहीं तरी धुंडाळीत होते. विचारमग्न स्थितींत होते. व्यवसायी जीवनाच्या आरंभापासून त्यांच्या पाठीशीं पाठ व खांद्याशीं खांदा लावून त्यांच्याबरोबर वावरणारे त्यांचे निष्ठावंत जीवनसाथी गणपतराव जोशी यांना त्यांची ती अस्वस्थता एकदा असह्य झाली! त्यांच्यानें बोलल्याशिवाय रहावेना. त्यांचा तो हक्कच होता.

ते एकदां म्हणाले, "बाबा! कशाला एवढी धडपड करतां? ठेकेदारींत दोन पैसे कमी मिळाले म्हणून काय बिघडलें? ईश्वरानें आपणांस कांहीं कमी केलेलें नाहीं. कशाला इतकी दगदग करतां? देवानें दिलें त्यांत समाधान मानून नको का रहायला?"

यावर बाबासाहेबांनीं काय उत्तर द्यावें? ते शांत गंभीरपणें म्हणाले, "होय, गणपती! तूं म्हणतोस तें ठीक आहे; परंतु तें मला नाहीं लागू पडत! अरे हें तर कांहींच नाहीं! अजून पुष्कळ गोष्टी व्हायच्या आहेत. त्या करीत असतां स्वतःचा फायदा वाढेल हें तर खरेंच; परंतु त्यामुळें आपल्याला जी संधि मिळते, तिचा उपयोग शेकडो लोकांना आपली सुखाची मीठभाकर मिळविण्यासाठीं होत असेल तर काय हरकत आहे?"

## जीवन विषयक तत्त्वज्ञान

या उत्तरांत बाबासाहेबांनीं थोडक्या व मोजक्या शब्दांत आपलें जीवनविषयक तत्त्वज्ञानच सांगून टाकलें आहे, असें म्हणायला हरकत नाहीं. स्वतःच्या फायद्यासाठीं झटत असतां जी संधी मिळत असते तिचा सदुपयोग शेकडो लोकांना सुखाची मीठभाकर मिळवून देण्यासाठीं होत असेल तर तें स्वार्थमिश्रित सत्कार्य आपण कां करूं नये? हाच बाबासाहेबांच्या त्या मंतरलेल्या मौल्यवान् शब्दांचा भावार्थ आहे, हें कोणीही सांगूं शकेल.

ज्या काळीं वरील संवाद झाला त्या काळांत बाबासाहेब व्यापक क्षेत्रांत पाऊल टाकण्यासाठीं धडपडत होते. त्यांना कार्याचा व्याप वाढवावयाचा होता तो केवळ स्वतःसाठींच नव्हता. इतरांपेक्षां आपण कांहीं तरी भव्य व वेगळें करावें, ही त्यांची आकांक्षा होती. खेड्यापाड्यांतील लोक अर्धपोटीं जीवन जगत आहेत. त्यांना मला पोटभर घांस द्यावयाचा आहे. खेडीपाडीं ओस पडून त्यांना भयाण स्वरूप येऊं लागलें आहे. तेथें अठरा विश्वे दारिद्र्य नांदत आहे. त्या खेड्यापाड्यांचा मला अल्प प्रमाणांत का होईना, कायापालट घडवून आणावयाचा आहे. तो शेतकीप्रधान उद्योगधंद्याच्या सहाय्यानें करतां येईल, या विचारानीं त्यांच्या मनाची पकड घेतलेली होती.

## गीताहृदयानें मनाची पकड घेतली

माणसाच्या मनांत अशा प्रकारच्या सुविचारांची प्रेरणा उगाच होत नाहीं. लोकमान्य टिळक यांच्या प्रेरक विचारांचा पगडा त्यांच्या मनावर बसलेला होता हें तर खरेंच; परंतु त्याशिवाय त्याला दुसरेंही एक कारण होतें.

बाबासाहेब जाडजूड व समजण्यास अवघड असे ग्रंथ वाचण्याच्या व्यापांत कधीं अडकले गेले नाहींत. त्यांना तेवढा वेळच नव्हता. त्यांचें वाचन फार थोडें व समजण्यास सुलभ असेंच असावयाचें. नेहमीं उद्योगधंद्यांच्या व त्या क्षेत्रांतील यशापयशाच्या चिंतनांत गुंतलेलें त्यांचें मन. त्या मनःस्थितींत भगवंतांनीं गीतेच्या रूपानें सांगितलेल्या मौलिक तत्त्वज्ञानाची महती त्यांना जाणवली व पटली ती पूज्य विनोबा भावे यांच्या गीतेवरील प्रवचनांनीं. पूज्य सानेगुरुजी यांनीं लिहून काढलेला त्या प्रवचनांचा सारांश 'गीताहृदय' या नांवानें प्रसिद्ध झालेला आहे. बाबासाहेबांचीं जीं लहान, सुटसुटीत व समजण्यास सुलभ अशीं दोन-चार आवडतीं व नित्य वाचनांत येणारीं पुस्तकें आहेत, त्यांत या छोट्या पाऊणशें पानी पुस्तकाचा समावेश करायला हरकत नाहीं.

३८८८२ वि. ५/२/७१ १२५५६

## लक्षांत घेण्याजोगा पैलू

त्या पुस्तकांतील कर्मयोगाचा दुसरा अध्याय हा बाबासाहेबांच्या आत्यंतिक आवडीचा. त्यांनीं वाचलें थोडें व ऐकलेंही थोडें; परंतु जें कांहीं वाचलें व ऐकलें तें आत्मसात् करून त्यांचें भक्तिभाव व कर्तव्यपूर्वक आचारण करण्यासाठीं ते मनोभावें झटले. त्याच्या जीवनांतील हा एक महत्त्वाचा व लक्षांत घेण्याजोगा पैलू आहे.

विनोबाजी भावे त्या अध्यायावरील आपल्या प्रवचनांत म्हणतात, " जो माणूस परहितासाठी झटण्याच्या भावनेनें भारला जातो, तो स्वतःचें तर कल्याण करून घेत असतोच, परंतु त्यामुळें तो आपल्या असंख्य समाजबंधूंच्याही कल्याणास कारणीभूत होत असतो. कर्मयोगी सदैव उद्योगांत गुंतलेला असतो. कर्माचरण हेंच त्याचें ध्येय असतें. त्या ध्येयाचा, त्याच्या त्या उद्योगीपणाचा इष्ट परिणाम आजूबाजूच्या लोकांवरही होऊन त्यामुळें त्या समाजांत व ज्या लोकांत तो वावरतो, त्या सर्वांचें कल्याण साधण्यास तो समर्थ होत असतो."

देशासाठीं व आपल्या देशबंधूंसाठीं आपणास कांहीं ना कांहीं करायचें आहे, या विचारांनीं भारल्या गेलेल्या बाबासाहेबांच्या मनावर या विचारांचा ठसा उमटल्याशिवाय कसा राहील ?

## सर्वांचीं तोंडें गोड व्हावीं

बाबासाहेबांनीं साखर निर्मितीचा व्यापक स्वरूपाचा व्यवसाय पत्करला त्यांत निदान साखरेपुरता तरी आपला देश स्वावलंबी बनावा हा विचार होता; परंतु त्याशिवाय त्या विचाराच्या पाठीमागें दुसराही एक सुविचार होता. हा साखरनिर्मितीचा व्यवसाय मी करतों आहें, तो केवळ माझ्या व माझ्या कुटुंबियांच्या तोंडांत साखर पडून त्यांचीं तोंडें गोड व्हावीं एवढ्याचसाठीं नसून, त्या व्यवसायांत जे जे माझ्याजवळ येतील, जे जे या व्यवसायांत माझ्याशीं सहकार करतील, त्या सर्वांचीं तोंडें गोड व्हावीं व

त्यांना पोटभर घांस मिळावा, हेंही त्यांचें ध्येय होतें. त्याना स्वार्थ साधावयाचा होताच; परंतु त्याचबरोबर त्यांचें लक्ष परार्थाकडेही होतें.

'बहुजनहिताय, बहुजनसुखाय' या भावनेनें जो उद्योग किंवा कर्माचरण करतो त्याची फलनिष्पत्तीही विनोबांनीं आपल्या त्या प्रवचनांत सांगितलेली आहे. ते म्हणतात, "आपल्याबरोबर इतरांचेंही कल्याण व्हावें यासाठीं तो कर्मयोगी जें मंतरलेलें कर्म करतो, त्यानें चित्तशुद्धि मिळते. ....तो एक प्रकारचा जप आहे. रामनामाचा जप करीत राहिल्यानें पुण्य मिळतें असेंच केवळ नाहीं. सतत सत्कार्य करीत रहाणें, दुसऱ्यांना पोटभर मीठभाकर मिळावी म्हणून उद्योग करीत रहाणें, हाही जपच आहे. त्यामुळें चित्ताला एक प्रकारचा सात्त्वीक आनंद मिळतो. चित्त निर्मळ बनतें आणि त्यांत ज्ञानाचें बीजारोपण होतें."

## सेवेच्या तीन पायऱ्या

यावर आणखी वेगळें भाष्य करण्याची मुळींच जरुरी नाहीं. ही विचारसंपदा निरंतर आपल्या उराशीं बाळगून ती यथाशक्ति आचरणांत आणण्यासाठीं बाबासाहेब जीवनभर झटत आले आहेत. जें जीवन सेवाभावानें व परदु:खविमोचनानें उजळलें गेलें तेंच खऱ्या अर्थानें वैभवशाली जीवन होय. बाबासाहेबांच्या गेल्या पन्नास वर्षांच्या कर्तबगार जीवनाकडे आपण पाहूं लागलों असतां असें दिसून येतें कीं, त्यांना कोणत्याही गोष्टीची घाई करणें आवडत नाहीं. नेहमीं पुढें जाण्यासाठीं झटावयाचें, परंतु आपलीं पावलें विचारपूर्वक टाकावयाचीं. उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत एकेक पाऊल टाकीत ते पुढें पुढें चाल करीत गेले, त्याचप्रमाणें सेवेच्या क्षेत्रांतही त्यांनीं आस्तेकदम पावलें टाकीत पुढें जाण्याचा उपक्रम आचरणांत आणिला. सर्वांआधीं आपलें विशाल कुटुंब, मग आपला समाज आणि सेवेची तिसरी पायरी म्हणजे सर्वत्र विखुरलेले आपले देशबांधव. सेवेच्या या तीन पायऱ्या असून त्या तिन्ही आपापल्या परीनें महत्त्वाच्या आहेत. सेवेचें हें क्षेत्र किती व्यापक व अपरंपार आहे! सेवेचीं हीं तीन प्रमुख क्षेत्रें! त्यांपैकीं एखादें

स्वतःच्या कुवतीप्रमाणें पकडून त्यांत आम्हीं प्रामाणिकपणें वावरलों तरीही कर्तव्यपालनाचा आनंद आपल्या वांट्यास आल्याशिवाय रहाणार नाहीं.

**वडिलांचे बहुमोल शब्द**

बाबासाहेबांचे वयोवृद्ध वडील एकदां त्यांना म्हणाले होते कीं, "आपल्या कुटुंबांतील माणसांना तूं कधीं विसरूं नकोस. त्यांच्यासाठीं तुला करतां येईल तेवढें कर. त्यामुळें तुझें कांहीं कमी होणार नाहीं. देव तुला अधिक देईल!"

वडिलांचा हा आदेश बाबासाहेबांनीं शिरसावंद्य मानून तो कसोशीनें व अक्षरशः अंमलांत आणण्यासाठीं झटणें, हें आपलें एक पवित्र कर्तव्य त्यानीं मानिलें. डहाणूकर कुटुंबांतील प्रत्येक विद्यार्थ्यानें घेतां येईल तेवढें शिक्षण घेऊन विद्यासंपन्न व नोकरीधंद्याच्या दृष्टीनें स्वावलंबी व्हावें, यासाठीं ते सतत झटले. "महत्त्वाकांक्षा बाळगा. जितकें घेता येईल तेवढें शिक्षण घ्या. मी तुमच्या पाठीशीं आहे," असें डहाणूकर कुटुंबांतील जवळच्या व दूरच्याही तरुणांना त्यांचें नेहमीं सांगणें असे; परंतु सर्वांची बुद्धि सारखी का असते! कोणी कोणी मध्येंच शिक्षण सोडून देत. त्यांच्यावर न रागावतां किंवा त्यांना निराश न करतां ते त्यांचा प्रवेश एखाद्या उद्योगधंद्यांत किंवा नोकरींत करून देत व त्याला मार्गस्थ करीत. अशा रीतीनें त्यांनीं कुटुंबऋण फेडण्याच्या बाबतींत सर्वांपुढें एक उच्च आदर्श ठेविला आहे.

कुटुंबानंतर ज्या समाजांत आपला जन्म झाला तो समाज. आपला महाराष्ट्रीय पांचाळ समाज शिक्षणांत फार मागासलेला आहे, तो पुढें आला पाहिजे; समाजांत अनाथ, पंगू किंवा निराश्रित अशा ज्या बायाबापड्या असतील, त्यांचें जीवन सुखकर झालें पाहिजे, या भावनेनें बाबासाहेबांनीं दोन लक्ष रुपयांचा एक विश्वस्त निधि आपल्या वडिलांच्या नांवें निर्माण केला असून मुंबई व ठाणें जिल्हा या भागांतील समाज बंधुभगिनींना त्याचा फार चांगला उपयोग होत आहे. अशा रीतीनें बाबासाहेबांनीं समाजऋण फेडण्याचें आपलें कर्तव्य यथाशक्ति पार पाडिलें आहे.

## खेडीं सुधारण्याचें महत्त्व

महाराष्ट्र साखर कारखान्याच्या द्वारें बाबासाहेब व्यापक क्षेत्रांत उतरले. तेथें त्यांचा खेड्यापाड्यांतील लोकांशीं संबंध आला. आमचीं खेडीं-पाडीं म्हणजे अज्ञानाचीं व दैन्यावस्थेचीं माहेरघरें! दैन्य, दारिद्र्य व घोर अज्ञान यांच्या वरवंट्याखालीं खेड्यापाड्यांतील लोक वर्षानुवर्ष चिरडले जात आहेत. स्वतःचें व कुटुंबांतील माणसांचें भरणपोषण व्हावें म्हणून आपलें घरदार सोडून खेड्यांतील धडधाकट लोक मुंबईकडे धांव घेतात. त्यामुळें त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना नाना प्रकारच्या आपत्तींना तोंड द्यावें लागतें! काय करणार? तोंड बांधून बुक्क्यांचा मार!

परंतु सुदैवाची गोष्ट म्हणजे या कोंडमाऱ्यांतून त्यांची सुटका होण्याचें नवें युग आतां या देशांत सुरू झालें आहे. सरकार आपलें आहे. खेडीं सुधारल्याशिवाय देशाची सुधारणा होणार नाहीं, हें सरकारनें बरोबर ओळखलें आहे; एवढेंच नव्हे तर विकासकार्याच्या रूपानें त्या मार्गानें सरकारचीं पावलें पडूं लागलीं आहेत. त्यामुळें आमच्या खेड्यापाड्यांची सुधारणा कधीं घडून येणार असेल ती येवो; परंतु त्यापूर्वींच महाराष्ट्र साखर कारखान्याची घडी नीट बसतांच बाबासाहेबांनीं व त्यांचे चिरंजीव दादासाहेब यांनीं आपल्या कक्षेंत आलेल्या खेड्यांतील जनतेंत शक्य त्या मार्गांनीं सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न यथाशक्ति चालविला आहे.

## कामगार वर्गासंबंधींचा दृष्टिकोन

कामगारवर्गाच्या कल्याणासाठीं व त्यांच्या सर्वांगीण उत्कर्षासाठीं झटणें हें मालकांचें एक पवित्र कर्तव्यच आहे. त्यांत त्यांचाही स्वार्थ साध्य होत असतो. कामगार सुखी व समाधानी असला तरच तो तुम्हांला सुख लाभूं देणार. वालचंदनगर येथील औद्योगिक वसाहतींत एकदां भाषण करीत असतां बाबासाहेबांनीं कामगारवर्गासंबंधींचा आपला दृष्टिकोन स्पष्ट केलेला आहे. ते म्हणाले होते कीं, "कारखानदार व कामगार यांचे परस्पर

संबंधाविषयीं येथें दोन शब्द बोलण्याचा मोह मला अनावर होतो. त्यांचे परस्पर संबंध सलोख्याचे असले पाहिजेत. तसे ते येथें आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. परस्परांकडे त्यांनीं नेहमीं साशंक दृष्टीनें न पहातां, परस्परांच्या अडचणी समजावून घेऊन सहकार्यानें त्या सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असें करण्यांत दोघांचेंही व पर्यायानें समाजाचेंही हित होणार आहे. उद्योगधंद्यांत अधिक उत्पादन होऊन राष्ट्रांतील संपत्तींत पुष्कळ वाढ झाल्याशिवाय सर्वांची स्थिति सुधारणार नाहीं व देशांत सुबत्ता निर्माण होणार नाहीं."[१]

परंतु त्याही पूर्वीं १९३९ सालीं जिनिवा येथें भरलेल्या आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेस मालकवर्गाचे प्रतिनिधि या नात्यानें हजर राहून भाषण करण्याची संधि मिळाली त्यावेळीं तेथेंही बाबासाहेबांनीं कामगार-कल्याणासंबंधींचा आपला दृष्टिकोन स्पष्ट शब्दांत पुढें मांडिला होता.

**कल्याण कार्याची अल्पशी कल्पना**

कामगार कल्याणासंबंधींच्या बाबासाहेबांच्या उद्दिष्टाला अनुसरून विशेषतः गेल्या पंधरा वर्षांपासून टिळकनगरांतील कामगार वसाहतींत जें कल्याणकार्य अखंड चालू आहे, त्याची थोडीशी कल्पना या ठिकाणीं करून दिल्यास ती अस्थानीं होणार नाहीं.

कामगारवर्गांत कौटुंबिक भावना निर्माण करणें ही साधी गोष्ट नाहीं. त्यासाठीं त्याग करावा लागतो; परंतु त्या त्यागाचें गोड फळ मालकाला मिळाल्याशिवाय रहात नाहीं. तुम्ही आपल्या कुटुंबांतील माणसांची शारीरिक, बौद्धिक व सांस्कृतिक उन्नति व्हावी व कुटुंबांतील प्रत्येक व्यक्ति 'माणूस' म्हणवून घ्यायला सर्व परीनें लायक व्हावी म्हणून झटतांच की नाहीं? कारखानदारीमुळें अनेक माणसांशीं व अनेक कुटुंबांशीं तुमचा संबंध यदृच्छेनें

१. वालचंद हिराचंद यांच्या पुतळ्याचें अनावरण करतांना बाबासाहेबांनीं वालचंदनगर येथें ता. १९।२।५६ रोजीं केलेल्या भाषणावरून.

जडला. कुटुंबाचा वेलविस्तार वाढला. त्या विस्तारलेल्या व्यापक कुटुंबांत तुम्ही मानाचें व प्रेमादराचें स्थान ज्या प्रमाणांत मिळवाल, त्या प्रमाणांत तुम्हीं चालविलेली कारखानदारी व त्याचबरोबर तुमचें जीवनही यशाच्या मार्गावर आहे, असें म्हणतां येईल. साखरनिर्मितीशीं ज्यांचा संबंध येतो तीं सारीं माणसें आपल्या शर्कराकुटुंबांतील आहेत या भावनेनें बाबासाहेब त्या सर्वांच्या सुखासाठीं व विकासासाठीं अहर्निश झटले. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव व कारखान्याचे संचालक दादासाहेब हे आजकाल कामगार कल्याणाच्या दृष्टीनें जें जें करणें शक्य व जरूर आहे, तें तें दक्षतेनें करीत आहेत.

महाराष्ट्र साखर कारखान्याच्या निमित्तानें टिळकनगर व त्याला जोडून शेतकरी व कामगार यांनीं गजबजलेल्या १०।१२ वाड्या निर्माण झाल्या. त्या वाड्यांना म. गांधी, जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस, ना. गोखले, पं. मालवीय वगैरे राष्ट्रभक्तांचीं नांवें देण्यांत आलीं आहेत. त्यांत उद्देश हाच कीं, सर्वांना सहजरीतीनें ज्यांनीं ज्यांनीं राष्ट्रोद्धारासाठीं आपलें जीवन आटविलें त्या थोर राष्ट्रभक्तांचें पुण्यस्मरण व्हावें. या निरनिराळ्या वाड्यांत रहाणाऱ्या लोकांसाठीं गेल्या दहा वर्षांपासून पक्कीं घरें बांधण्याचा उपक्रम सुरू करण्यांत आला असून त्यासाठीं लक्षावधि रुपये खर्च करण्यांत येत आहेत. घरबांधणीचा हा कार्यक्रम खर्चाच्या दृष्टीनें वीस ते पंचवीस लक्ष रुपयांपर्यंत जाईल असा अंदाज आहे. घरबांधणीनंतर दळणवळणासाठीं रस्ते पाहिजेत. पाणीपुरवठा, आरोग्यरक्षण, औषधपाणी, दिवाबत्ती, जरूर लागणारा दाणागोटा व कपडालत्ता स्वस्त भावांत मिळण्याची सोय, तसेंच निर्भेळ व स्वच्छ दुधाचा पुरवठा, अशा एक ना दोन किती तरी गरजा एकामागून एक आपल्यापुढें उभ्या राहतात. या वसाहतींत त्या सर्व गरजा भागविण्यांत आल्या आहेत.

### बौद्धिक व सांस्कृतिक विकास

रहायला निवाऱ्याचें व सुखसोयीनें संपन्न असें घर आणि शरीर-पोषणासाठीं अन्नपाणी या झाल्या प्रत्येकाच्या अत्यावश्यक गरजा. त्या

भागवीत असतां माणसाच्या शारीरिक, बौद्धिक व सांस्कृतिक विकासाकडेही लक्ष पुरविणें तितकेंच आवश्यक असतें.

मुलेंबाळें म्हणजे देशाचे भावी नागरिक. खेड्यांतून रहाणाऱ्या शेतकऱ्यांच्या व कामगारांच्याही मुलांना शक्य तेवढें शिक्षण संपादन करून पुरुषार्थ गाजविण्याचा व जगांत मानाचें स्थान पटकविण्याचा हक्क आहे.

टिळकनगरांत व आसपासच्या वाड्यांतून रहाणाऱ्या मुलांमुलींसाठीं प्राथमिक त्याचप्रमाणें दुय्यम शिक्षणाची उत्तम प्रकारची सोय चालकांतर्फे करण्यांत आली आहे. मुलांमुलींनीं शक्य तेवढें शिक्षण घ्यावें यासाठीं शक्य तेवढें उत्तेजन देण्यांत येतें.

एस्. एस्. सी. पर्यंत शिक्षण देणारी 'डहाणूकर विद्यालय' ही शिक्षण-संस्था त्या भागांतील एक नामवंत संस्था होऊन राहिली आहे. त्यासाठीं एक प्रशस्त व सुसज्ज इमारत बांधून देण्यांत आली असून शिक्षणकार्यांत उपयोगी व आवश्यक अशी सर्व प्रकारची साधनसामुग्री तेथें चालकांतर्फे उपलब्ध करून देण्यांत आली आहे. आकाशांतील ग्रहदर्शन घडविणारे ग्रहगोलदर्शक यंत्र व इतर शास्त्रीय उपकरणें, जरूर तें फर्निचर वगैरे सर्व साहित्य कारखान्याच्या संचालकांतर्फे तत्परतेनें पुरविण्यांत येतें. प्राथमिक शाळा व डहाणूकर विद्यालय ह्या दोन्हीं शिक्षणसंस्था नगर येथील 'हिंद सेवा मंडळ' ह्या शिक्षणप्रसारक मंडळाकडे सोपविण्यात आल्या आहेत. ह्या विद्यालयाच्या भव्य इमारतींत 'सायन्स हॉल' व इतर शैक्षणिकदृष्ट्या जरूर त्या सोयी आहेत. दोन्हीं शिक्षण संस्थांत मिळून सुमारें एक हजार विद्यार्थि या विद्यादानाचा फायदा घेत आहेत.

विद्यादानाचें व ज्ञानप्रसाराचें महत्त्व बाबासाहेबांनीं पूर्णपणें ओळखलें आहे. शहरांत रहाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं शिक्षणसंपादनाच्या नानाप्रकारच्या सोई उपलब्ध असतात. खेड्यांतील विद्यार्थ्यांच्या वाट्यास तशा सोयी सहसा येत नाहींत. हें ओळखून बाबासाहेबानीं या विद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठीं "श्री. एम्. एल्. डहाणूकर

एज्युकेशन ट्रस्ट" निर्माण केला असून, त्याचा उपयोग अनेक अभ्यासू वृत्तीच्या विद्यार्थ्यांना आजकाल होत आहे. या ट्रस्टमधून १९६० सालापासून ४२२ शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या; तसेंच परदेशीं जाऊन उच्च व विशेष शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या तीन विद्यार्थ्यांस मदत करण्यांत आलेली आहे. एका कुटुंबांतील एक विद्यार्थि शिक्षणसंपन्न झाला तर तो आपल्या भावंडांना वर काढूं शकतो व आपल्या कुटुंबाच्या उद्धारास कारण होत असतो.

### साखरकुटुंबियांचें सुखसमाधान

या शिक्षणसंस्थांचा फायदा केवळ टिळकनगर व आसपासच्या वाड्यांतील विद्यार्थ्यांना होत असतो असें नाहीं. कारखान्याशीं संबंध नसलेल्या आजूबाजूच्या भागांतील विद्यार्थीही त्या संस्थांचा फायदा घेत आहेत.

विद्यार्थ्यांच्या मनावर सुसंस्कार घडावे या हेतूनें मधून मधून स्नेहसंमेलनें, पुढाऱ्यांच्या पुण्यतिथ्या व इतर विविध स्वरूपाचे कार्यक्रम नियोजनपूर्वक पार पाडण्यांत येतात. इतर जरूर त्या सुखसोयींप्रमाणें मुलांच्या मनावर बालवयापासून सुसंस्कार घडावे, हंसतां खेळतां मुलांनीं शहाणे व्हावें, यासाठीं सौ. मालतीबाई डहाणूकर (दादासाहेबांच्या सुविद्य पत्नी) यांच्या सक्रिय प्रोत्साहनानें 'शिशुक्रीडा गृह' स्थापन करण्यांत आलें असून त्याचा फायदा ४०–५० मुलें घेत आहेत. मुलांची सुडौल व सुयोग्य घडवणूक करण्याचें हें कार्य काळजीपूर्वक पार पाडिलें जात आहे.

साखर निर्मितीच्या कार्याशीं संलग्न झालेलीं साखरकुटुंबें सुखासमाधानांत रहावीं व सर्व बाबतींत त्यांचा विकास होत जावा, यासाठीं जें जें करणें जरूर आहे, तें तें करण्यासाठीं कारखान्याचे संचालक झटत असतात.

या वसाहतींत दूरदूरच्या भागांत रहाणाऱ्या स्त्रीपुरुषांस प्रवासाचा त्रास न पडतां ताबडतोब जरूर तो औषधोपचार व डॉक्टरी सल्ला सुलभतेनें मिळावा यासाठीं सुमारें चाळीस हजार रुपये खर्च करून एक फिरता दवाखाना (Mobile Dispensary) चालू ठेवण्यांत आला आहे.

व वसाहतीचे सर्व विभाग मध्यवर्ती केंद्राशीं टेलिफोनद्वारें जोडण्यांत आले आहेत. त्यामुळें कोठें कांहीं अडचण निर्माण झाली असतां तिचें निराकरण ताबडतोब करतां येतें. ज्याप्रमाणें शिक्षणाच्या बाबतींत, त्याचप्रमाणें औषधोपचाराच्या बाबतींत कारखान्याशीं संबंध नसलेल्या परंतु गरजू अशा स्त्रीपुरुषांसही त्या सुखसोयीचा फायदा घेतां येतो.

या वसाहतींतील स्त्रीपुरुषांच्या करमणुकीसाठीं व सांस्कृतिक उन्नतीसाठीं निरनिराळीं केंद्रें स्थापन करण्यांत आलीं असून त्यांच्यातर्फे नाट्यप्रयोग, सिनेमा व इतर करमणुकीचे प्रकार घडवून आणिले जातात. नाट्यप्रयोगांत कामें करणारांस शक्य तेवढें उत्तेजन देण्यांत येतें. धार्मिक व राष्ट्रीय दीन समारंभपूर्वक साजरे केले जातात. कारखान्याचे संचालक दादासाहेब हे जसे लहानमोठ्या कार्यक्रमांकडे आस्थापूर्वक लक्ष पुरवितात, त्याचप्रमाणें त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. मालतीबाई यांचेंही सहकार्य त्यांना लाभलें आहे. केवळ पुरुषवर्गाचा विकास होऊन कसें चालेल? स्त्रियांनाही त्यांच्या बरोबरीनें वाटचाल करतां आली पाहिजे. या सद्धेतूनें महिला मंडळासारखी स्त्रियांच्या विकासास वाहिलेली संस्था स्थापन करून सौ. मालतीबाईनीं तिचें योग्य प्रकारें मार्गदर्शन चालविलें आहे.

सहकारी पतपेढी व सहकारी स्टोअर्स यांसारख्या कामगार कल्याणकार्यास हातभार लावणाऱ्या संस्थाही तेथें कार्यक्षमतेनें वावरत आहेत.

अशा रीतीनें हा कारखाना गेल्या ३०।३२ वर्षांपासून प्रगतीच्या मार्गानें वाटचाल करीत आहे. मालक व कामगार यांचे परस्पर संबंध अत्यंत सलोख्याचे आहेत. कामगारांच्या कल्याणाच्या दृष्टीनें कोणतीही उपयुक्त सूचना कामगार पुढाऱ्यांकडून पुढें येवो. तिचा विचार संचालक दादासाहेब यांच्याकडून नेहमीं सहानुभूतीपूर्वक केला जातो. महाराष्ट्र साखर कारखाना हें बाबासाहेबांच्या अहर्निश चिंतनाचें व त्यांच्या ध्येयपूर्तीचें पवित्र स्थान आहे. त्या स्थानाचें पावित्र्य आपण प्रयत्नेंकरून संभाळलें पाहिजे, याची पूर्ण जाणीव दादासाहेबांना आहे. त्या जाणिवेची प्रचीति त्यांच्या दैनंदिन वागणुकींत दिसून येत असते.

## थोरामोठ्यांच्या भेटी व आशीर्वाद

या कारखान्याचा रौप्यमहोत्सव ता. ७ सप्टेंबर १९५९ रोजीं भारत सरकारचे त्यावेळचे शेतकी मंत्री ना. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटांत साजरा झाला. कारणपरत्वें व निरनिराळ्या समारंभप्रसंगीं ना. यशवंतराव चव्हाण, ना. स. का. पाटील, डॉ. चिंतामणराव देशमुख, सौ. दुर्गाबाई देशमुख, ना. रफी अहमद किडवाई, ना. बाळासाहेब खेर, ना. मुरारजी देसाई, ना. काकासाहेब गाडगीळ, सर एम्. विश्वेश्वरय्या, गगनविहारी मेहता, सर टी. एस्. व्यंकटरमण, ना. भाऊसाहेब हिरे, ना. बाळासाहेब भारदे, १९५६ सालीं दिल्लींत भरलेल्या आंतरराष्ट्रीय ऊस व साखर तंत्रज्ञांच्या परिषदेस हजर राहिलेले निरनिराळ्या राष्ट्रांचे प्रतिनिधी, वगैरे अनेक राजकीय पुढाऱ्यांचे, शास्त्रज्ञांचे व अधिकारीवर्गाचे पाय टिळकनगराला व त्याच्या आजूबाजूस स्थापन झालेल्या वसाहतींस लागले असून सर्वांनीं तेथील प्रगतीबद्दल व चालू असलेल्या विकास व संशोधन कार्याबद्दल प्रशंसोद्गार काढले आहेत.

अशी आहे बाबासाहेबांनीं पुढाकार घेऊन अत्यंत विपरीत काळांत स्थापन केलेल्या महाराष्ट्र साखर कारखान्याची कथा. या कथेचें सार एकाच वाक्यांत सांगतां येण्यासारखें आहे. 'मुंगी होऊन साखर खावी.' मुंगी हा अत्यंत क्षुद्र व लहानांत लहान प्राणी; परंतु त्याची करणी फार मोठी आहे. आपण मुंगीप्रमाणें वागावें असें अनेक भाषणांतून बाबासाहेबांनीं सांगितलें आहे. कारण मुंगी हें दीर्घोद्योगाचें, धीरोदात्ततेचें, चिकाटीचें, गतिमानतेचें व नम्रतेचें प्रतीक आहे. त्या गुणांच्या बळावर मुंगीचा प्रवेश कुठेंही होऊं शकतो व तिला साखरेशीं संधान जुळवितां येतें. महाराष्ट्रीयांपुढें बाबासाहेबांनीं महाराष्ट्र साखर कारखान्याच्या रूपानें पुरुषार्थाचा एक आदरणीय आदर्श ठेविला आहे.

८.

# महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांची संघटना

**मुंबईंत** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ही संघटनेच्याद्वारें महाराष्ट्रीय व्यापारीवर्गाच्या उत्कर्षासाठीं व त्यांचे हितसंबंध रक्षण करण्यासाठीं परोपरीनें झटणारी एक सुप्रतिष्ठित संस्था आहे. तिचा सदतिसावा वाढदिवस नुकताच (ता. १० आक्टोबर १९६४) साजरा झाला. या संस्थेच्या जन्माशीं, तिच्या संगोपनाशीं व तिला स्वतःच्या पायांवर उभी करण्याशीं बाबासाहेबांचा अत्यंत निकट व जिव्हाळ्याचा संबंध आहे. त्यांनीं या संस्थेचें लालनपालन पुत्रवत् केलें आहे.

या संस्थेच्या जीवनांतील बाबासाहेबांच्या चिरस्मरणीय कारकिर्दीकडे वळण्यापूर्वी तिच्या पूर्वेतिहासाकडे थोडेंसें लक्ष पुरविणें जरूर आहे.

### संघटनेचा पूर्वेतिहास

सुमारें पन्नास वर्षांपूर्वीची गोष्ट. व्यापारधंद्याच्या दृष्टीनें महाराष्ट्र फार मागासलेला होता. कोणाची कोणाला दाद नव्हती. संघटना नव्हती. त्या विपरीत काळांत व्यापारधंद्याचें महत्त्व ओळखून ज्यांनीं त्याची कांस धरण्याचें मनोधैर्य दाखविलें, त्यांच्या नाना प्रकारच्या अडचणी होत्या. कोणत्याही प्रकारचें उत्तेजन नव्हतें. प्रत्येकजण काळोखांत चाचपडत होता.

अशा त्या विपरीत काळांत संघटनेचें महत्त्व ओळखणारे मुंबईंतील कांहीं महाराष्ट्रीय व्यापारी पुढें सरसावले (१९१४) व त्यानीं 'डेक्कन मर्चंटस्

असोसिएशन ' या नांवाची महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांची एक संस्था स्थापन केली. त्यानंतरच्या २–३ वर्षांच्या कालावधींत टिळक टेक्निकल लायब्ररी व डेक्कन मर्चंटस् कोऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी या व्यापारी वर्गाच्या दृष्टीनें महत्त्वाच्या अशा दोन संस्था जन्मास आल्या. १९२३ सालीं महाराष्ट्राचे अभिमानी डॉ. बाबासाहेब जयकर यांच्या अध्यक्षतेखालीं महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांचें एक स्नेहसंमेलन भरवून तेथें विविध प्रकारच्या औद्योगिक प्रश्नांवर चर्चा झाली.

वरील संस्थेतर्फे पहिली व्यापारी परिषद औंधचे राजेसाहेब श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आली. त्यावेळीं राजेसाहेबांनीं आपल्या भाषणाच्याद्वारें सर्व प्रतिनिधींना उद्देशून, देशाची आर्थिक स्थिति सुधारण्याच्या दृष्टीनें एक बहुमोलाचा संदेश दिला. 'कच्चा माल देऊं नये. पक्का माल घेऊं नये; कच्चा माल घ्यावा व पक्का माल द्यावा.' देशाच्या व व्यापारधंद्याच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें अत्यंत सोप्या भाषेंत त्यानीं सांगितलेली ही चतुःसूत्री कितीही मौल्यवान असली तरी त्यासाठीं झटण्याकरितां आपली कुवत खर्च करण्याऐवजीं तिचा विनियोग आपसांत भांडणें व हेवेदावे निर्माण करण्यांत झाला व त्यापायीं मोठ्या उत्साहानें आरंभिलेलें हें संघटनाकार्य थंडावलें तें १९२७ साल उजाडे-पर्यंत. हितकर व कल्याणप्रद गोष्टीला कधीं मरण नसतें. देवकृपेनें तिचा कोणाच्या ना कोणाच्या हातून पुनरुद्धार होत असतो.

## संघटनेचा पुनर्जन्म

पहिल्या परिषदेचे उत्साही व कर्तबगार चिटणीस दत्तोपंत बर्वे हे व्यापारउदिमानिमित्त विलायतेस गेले होते, ते १९२७ सालीं परत आले. महाराष्ट्रीय व्यापारी वर्गांत निर्माण झालेली हताश व शोचनीय स्थिति त्यांना असह्य झाली. कांहींतरी हालचाल केली पाहिजे, असें त्यांना वाटूं लागलें. त्यांना पाठिंबा देणारी महाजनी, जोशी वगैरे कांहीं मंडळी होतीच. त्यांच्या प्रयत्नानें पुणें व मुंबईमधील कांहीं सद्गृहस्थांची एक बैठक पुणें येथें

५२-५६ ता ३।१४५



जगन्नाथमहाराज यांच्या घरीं होऊन व्यापारीवर्गांत पुन्हां उत्साह निर्माण करण्यासाठीं व दुर्दैवानें स्थगित झालेल्या कार्यास चालना देण्यासाठीं पुणें येथें महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांची दुसरी परिषद वालचंद हिराचंद यांच्या अध्यक्षतेखालीं भरविण्याचें ठरून त्याप्रमाणें परिषद उत्साहभरांत व यशस्वी रीतीनें पार पडली. (ता. १८ सप्टेंबर १९२७)

या परिषदेंत महाराष्ट्रीय व्यापारी वर्गाचे हितसंबंध रक्षण करून त्यांच्या मार्गांतील अडीअडणींचें योग्य त्या मार्गानीं निराकरण करण्याच्या उद्देशानें 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' या नावानें महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांची संघटना निर्माण करण्याचा ठराव पास करण्यांत आला व त्या संस्थेचे पहिले अध्यक्ष या नात्यानें वालचंद हिराचंद व उपाध्यक्ष या नात्यानें बाबासाहेब डहाणूकर व शेट हणमंतराम रामनाथ यांचीं नावें सर्वांनुमतें संमत करण्यांत आलीं.

या घटनेला आतां सुमारें सदतीस वर्षें होऊन गेलीं आहेत. मुंबईत त्यापूर्वींच 'इंडियन मर्चंटस् चेंबर' ही हिंदी व्यापाऱ्यांची मातबर संघटना अस्तित्वांत होतीच. सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास, सर फिरोज सेठना, लालजी नारायणजी त्यांच्यासारखे थोर उद्योगपति त्या संस्थेचीं सूत्रें हालवीत होते. वालचंद हिराचंद हे तर त्यावेळी त्या संस्थेचे अध्यक्ष होते. बाबासाहेबही त्या संस्थेच्या कार्यकारी मंडळांत होते; असें असतां महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांसाठीं ही स्वतंत्र संस्था स्थापन करण्याचें प्रयोजन काय होतें हें थोडेसें मागें वळून पहाण्यासारखें आहे. हें प्रयोजन बाबासाहेबांच्याच शब्दांत सांगणें योग्य होईल.

## स्वतंत्र संस्थेची जरूरी

वालचंदनगर येथें वालचंद हिराचंद यांच्या अर्धपुतळ्याचें अनावरण करीत असतां बाबासाहेब म्हणाले होते कीं, "वालचंदशेटजी व मी दोघेही उद्योगधंद्यांतील माणसें असल्यानें आम्हांला आढळून आलें कीं, महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यासंबंधीं विशेष प्रकारच्या प्रश्नांकडे त्यावेळीं अस्तित्वांत असलेल्या व्यापारी संस्थांतून अनेक कारणांमुळें म्हणण्यासारखें लक्ष दिलें जात नव्हतें.

हें अनुभवानें आमच्या लक्षांत आलें. महाराष्ट्रांत असलेल्या व होणाऱ्या भावी उद्योगधंद्यांच्या हितरक्षणार्थ व उद्योगधंद्यांत मागें असलेल्या महाराष्ट्राची औद्योगिक व आर्थिक प्रगती व्हावी, एतदर्थ शक्य ते प्रयत्न करण्यासाठीं म्हणून महाराष्ट्रांतील व्यापारीवर्गाची एखादी संघटना वा संस्था हवी असें वाटूं लागलें. त्यासाठीं अनुकूल संधीही प्राप्त झाली व वालचंद हिराचंद, मी व दुसरे कांहीं मुंबई पुण्याच्या व्यापारी मंडळींनीं दूरदृष्टीनें विचार करून "महाराराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स" नांवाची व्यापाऱ्यांची संघटना स्थापन करून तिचें कार्यालय मुंबईंत स्थापन करण्यांत आलें. शेट वालचंद व मी मिळून अनुक्रमें दोघांनीं आम्हीं प्रारंभीचीं कित्येक वर्षे अध्यक्ष म्हणून या संस्थेची जबाबदारी वाहिली. आज ही संस्था महाराष्ट्रांतील मध्यवर्ति, प्रमुख व वजनदार संस्था म्हणून गणली जात आहे."

वालचंद हिराचंद यांनीं या संस्थेचें अध्यक्षपद आरंभापासून अकरा वर्षेपर्यंत (१९३८ पर्यंत) शोभविलें व तितकींच वर्षे उपाध्यक्ष या नात्यानें बाबासाहेब त्यांना संपूर्ण सहकार देत होते. त्यांच्यानंतर अध्यक्षस्थानीं बाबासाहेबांची योजना झाली व त्यानीं तें स्थान आठ वर्षेपर्यंत भूषविलें. (१९३८ ते १९४६) अशा रीतीनें आरंभापासून सतत एकोणीस वर्षे बाबासाहेब या संस्थेच्या जीवनाशीं एकरूप झालेले होते.

महाराष्ट्रीय लोक उद्योगधंद्यांत, इतर समाजांच्या मानानें फार मागासलेले; त्यामुळें त्यांना दैन्यवाणें जीवन जगावें लागतें, या गोष्टीची बाबासाहेबांना पूर्वीपासून अतिशय खंत वाटत असे. कोणत्याही प्रकारचें धाडस पत्करावयाचें नाहीं, उद्योगाकडे लक्ष नाहीं, आपसांत हेवेदावे, मत्सर व भांडणतंटे यांत असेल नसेल तो उत्साह खर्च करावयाचा, अशा परिस्थितींतही ज्यांच्याशीं आपला संबंध येईल त्यांना बाबासाहेब व्यापारधंद्यांत प्रवेश करण्याची दीक्षा देत असत. स्वतःच्या कुटुंबांतील माणसांनीं व्यापारधंद्यांकडे वळावें म्हणून ते शक्य तें उत्तेजन व सहकार स्वतः झीज सोसून त्यांना देत असत. कोणताही उद्योगधंदा असो; तो करीत असतां आरंभकाळांत नुकसान झालें म्हणून काय बिघडलें? व्यापारधंद्यांत हें चालायचेंच. त्यामुळें निराश न होतां

नुकसान कां आलें, याचा विचार करून पुन्हां प्रयत्न करावयाचा, अशी होती त्यांची आरंभापासून विचारसरणी व शिकवण.

### महाराष्ट्रीयांनीं व्यापार-उदिमांत पुढें यावें

महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांच्या संघटनेकडे ते आरंभापासून मोठ्या उत्साहानें व तडफेनें वळले याचें मुख्य कारण म्हणजे तो त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. उद्योगधंद्यांत पडलेल्यांबद्दल त्याना अभिमान व सहानुभूती वाटत असे. त्यांच्यासाठीं आपण कांहीं ना कांहीं हालचाल करावी, असें त्यांना मनापासून वाटत असे. याचें कारण त्या विपरीत व नाउमेद करणाऱ्या काळांतही महाराष्ट्राचा व महाराष्ट्रीयांचा भाग्योदय व्हायचा तर तो नाना प्रकारच्या उद्योगधंद्यांची कास धरल्यानेंच होईल. केवळ बुद्धिमत्ता, विद्वत्ता व नीतिमत्ता असून भागत नाहीं. तिचा प्रभाव आर्थिक सुबत्ता पदरीं असल्याशिवाय पडणार नाहीं. त्यासाठीं धाडस पत्करून नाना उद्योग-धंद्यांच्या वाटा चोखाळण्याची प्रवृत्ति वृद्धिंगत होत गेली पाहिजे. ही होती बाबासाहेबांची पूर्वीपासून ठाम विचारसरणी. स्वतःच्या जीवनांत ती त्यांनीं अनुभवली होती. आपला महाराष्ट्र सर्वार्थानें समृद्ध व मोठा व्हावा, हा पवित्र हेतु उराशीं बाळगून ते वाटचाल करूं लागले होते.

आपल्या मुलांबाळांत, नातलगांतच नव्हे, तर सर्व महाराष्ट्रीयांत व्यापारी वृत्ति बळावत जावी, ही होती त्यांची जीवनाकांक्षा. ईश्वरकृपेनें ज्या प्रेरणेचा व प्रसादाचा लाभ आपणास झाला तिचा प्रसार महाराष्ट्रभर व्हावा व महाराष्ट्र सामर्थ्यसंपन्न व्हावा असे विचार त्यांच्या मनांत घोळूं लागले होते.

### मुंगीच्या वेगानें परंतु खात्रीनें

बाबासाहेब उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत वावरूं लागलेल्या आरंभकाळांत 'बालबोध' नावाचें मासिक प्रसिद्ध होत असे. त्या मासिकाचे विद्वान व उद्योगी संपादक विनायक कोंडदेव ओक हे महाराष्ट्रीयांत पुरुषार्थाची व

कर्तबगारी गाजविण्याची भावना जागृत व्हावी या हेतूनें आपली लेखणी परोपरीनें झिजवीत होते. तें त्यांचें जीवनकार्य होतें. त्याला उद्देशून आपल्या एका कवितेंत ते म्हणतातः—

"हा सत्प्रसाद मजला ईशकृपेनें अखंड लाभावा॥
मुंगीच्या चालीनें तरि हेतु अखेर सिद्धिला जावा"॥

त्याचप्रमाणें महाराष्ट्रीय व्यापारी वर्गाच्या उत्कर्षासाठीं आपणास काहीं ना कांहीं करायचें आहे; त्यासाठीं मिळेल ती संधी पकडून आपण कामास लागलें पाहिजे, या वृत्तीनें बाबासाहेब भारले गेले होते. आपला हेतू बळकट व पवित्र असावा लागतो; तसेंच तो आंतरिक प्रेरणेनें पोसला जावा लागतो. मग मागें वळून न पहातां, आस्ते कदम, मुंगीच्या चालीनें का होईना, आपली आगेकूच अखेरपर्यंत चालू रहाते.

संघटनेचें सामर्थ्य ते ओळखून होते. एकटादुकटा या जगांत फारसें कांहीं करूं शकत नाहीं आणि म्हणूनच जन्मकाळापासून या व्यापारी संघटनेशीं आपला संबंध जोडून तीं चांगली कर्तबगार होऊन नावारूपास आलेली पाहीपर्यंत तिच्यापासून ते दूर झाले नाहींत. वेळोवेळीं तिच्यासाठीं जो जो त्याग करावा लागला तो तो त्यांनीं कर्तव्य बुद्धीनें केलेला आहे.

या व्यापारी संस्थेचा कारभार सुरळीत रीतीनें चालू रहावा यासाठीं कांहीं प्रमुख व विशेष आस्थेवाईक व्यापारीबंधू मासिक देणग्यांच्या रूपानें हातभार लावीत असत. त्यांत बाबासाहेबांचा हिस्सा सर्वांत मोठा असे. संस्थेचा पसारा उत्तरोत्तर वाढत गेला पाहिजे. महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून वावरणाऱ्या लहानमोठ्या व्यापाऱ्यांनीं चेंबरच्या छत्राखालीं येऊन आपापल्या अडीअडचणींचें निराकरण करून घेण्यासाठीं झटलें पाहिजे, या हेतूनें त्या काळांत बाबासाहेब जरूर तें मार्गदर्शन व हालचाल करीत असत. आरंभ-काळांत जरूर असलेलें कांहीं फर्निचरही त्यानीं घेऊन दिलें आहे. जसा आपला संसार, तसाच चेंबरचा संसार, ही त्यांची आपलेपणाची भावना होती.

ज्या एकोणीस वर्षांच्या काळांत उपाध्यक्ष व अध्यक्ष या नात्यानें बाबासाहेब चेंबरशीं निगडीत झालेले होते तो काळ आणि त्यांतही त्यांची

आठ वर्षांची अध्यक्षीय अमदानी नाना प्रकारच्या घडामोडींनीं व राजकीय उलथापालथीनीं अपरंपार व्यापलेली आहे.

आमच्या कोणत्याही उद्योगधंद्यांना तत्कालीन परकीय सत्ता वर डोकें करूं देत नव्हती. या ना त्या सबबीखालीं मार्गांत अडथळे निर्माण करण्याचा सपाटा सुरू होता. मग तीं गाऱ्हाणीं व तक्रारी चेंबरकडे यायच्या व चेंबरनें जरूर त्या ठिकाणीं पत्रव्यवहार करून किंवा शक्य त्या अन्य मार्गांनीं दाद लावून घेण्याचा प्रयत्न करावयाचा. त्यामुळें सहाजिकच तीं गाऱ्हाणीं बाबासाहेबांपर्यंत येत असत. त्यासंबंधीं जरूर ती चौकशी करवून ते आपल्या भाषणांच्याद्वारा त्या तक्रारी व गाऱ्हाण्यांना वाचा फोडीत असत.

## संस्थेला मानाचें स्थान

आरंभकाळ हा जपणुकीचा काळ असतो. व्यक्ति काय किंवा संस्था काय, आरंभापासून पावलें योग्य मार्गानें पडत आहेत कीं नाहींत, जबाबदारीनें वागणें सवरणें होत आहे कीं नाहीं, वगैरे कितीतरी लहानमोठ्या गोष्टींकडे डोळ्यांत तेल घालून जपावें लागत असतें. त्याशिवाय अंगीं मोठेपण येत नाहीं व सभोंवारच्या जगांत मानमान्यता मिळत नाहीं. आपल्या मुलांबाळांच्या बाबतींत बाबासाहेब जसे जपत असत, तसेच या संस्थेसाठीं ते झटत असत.

माणसांप्रमाणें संस्थेनेंही समाजांत दर्जा मिळवावा लागतो. तो आपोआप कोणाच्याही वाट्याला येत नाहीं. त्यासाठीं कसून मेहनत घ्यावी लागत असते. आपल्या अंगीं तसेच गुण असावे लागतात. महाराष्ट्र चेंबरची मानमान्यता वाढली पाहिजे, व्यापारीवर्गांत तिचें स्थान मानाचें असलें पाहिजे, असें बाबासाहेबांस मनापासून वाटत असे व त्यासाठीं ते सतत प्रयत्नांत असत. त्यांच्या अध्यक्षीय कारकिर्दींत बहुशः त्यांच्या चिकाटीच्या प्रयत्नामुळें महाराष्ट्र चेंबरला बॉंबे पोर्टट्रस्ट, बोर्ड ऑफ काम्युनिकेशन, एक्सपोर्ट ॲडव्हायसरी कौन्सिल, फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज यासारख्या अनेक महत्त्वाच्या संस्थांवर प्रतिनिधित्व मिळालें. बॉंबे

पोर्ट ट्रस्ट, फेडरेशन ऑफ इंडियन मर्चंटस् चेंबर, यासारख्या संस्थांशीं बाबासाहेबांचा फार निकटचा, जिव्हाळ्याचा व दीर्घकालीन संबंध होता. आपल्या वेळप्रसंगींच्या सुयोग्य सल्ला मसलतीनें त्या संस्थांना त्यानीं ऋणी करून ठेविलें आहे.

दुसरी येथें नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे वरील सारख्या मातबर संस्थांत वावरत असल्यामुळें भारतांतील शेट घनश्यामदास बिर्ला यांच्या सारख्या थोर व नामवंत व्यापाऱ्यांशीं बाबासाहेबांचा परिचय झाला व त्यांच्याठायीं असलेल्या गुणांमुळें तो उत्तरोत्तर वाढत गेला.

बाबासाहेबानीं अनेक संस्थांशीं संबंध जोडला, त्याचप्रमाणें युनायटेड कमर्शियल बँकेसारख्या व्यापारीवर्गाच्या दृष्टीनें फार महत्त्वाच्या अशा अनेक संस्था स्थापन करण्यांत प्रामुख्यानें भाग घेतला व त्यांचे संस्थापक, संचालक होण्याचाही मान मिळविला.

महाराष्ट्रीय व्यापारी मागें राहातां कामा नये. तो नेहमीं आघाडीवर असला पाहिजे व त्याचा सर्वत्र बोलबाला झाला पाहिजे, ही होती त्यांची दृष्टि.

## एक संस्मरणीय घटना

परंतु या सर्वांपेक्षां विशेष महत्त्वाची घटना म्हणजे बाबासाहेब चेंबरचे अध्यक्ष असतां १९३९ सालीं जिनिवा येथें भरलेल्या आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेसाठीं मालकवर्गाचे प्रतिनिधी या नात्यानें भारत सरकारनें त्यांची निवड केली, ही होय. चेंबर व बाबासाहेब या उभयतांच्या दृष्टीनें ही एक संस्मरणीय, तशीच सन्माननीय घटना होती.

आपण नेहमीं कालमहात्म्य समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तो काळ कसा होता हें आपण पाहिलें. त्या काळांत बाबासाहेबांच्या ज्या हालचाली व उलाढाली चालू होत्या त्यांकडे व त्या काळांतील त्यांच्या मनस्थितीकडेही आपण थोडेंसें लक्ष पुरविलें पाहिजे. त्या काळांत बाबासाहेब साखर कारखान्याचें स्वप्न साकार झालेलें पहात होते; परंतु त्यासाठीं त्यांना

अतोनात मेहनत घ्यावी लागत होती. शक्य तेवढें जास्तींत जास्त लक्ष व जास्तींत जास्त उत्साह त्या कार्यासाठीं खर्च करावा लागत होता. असें असूनही चेंबरचें कार्य सदैव त्यांच्या दृष्टीसमोर असे. महाराष्ट्रीयांनीं अधिकाधिक प्रमाणांत उद्योगधंद्यांत पडावें व जे पडतील त्यांना शक्य तेवढें उत्तेजन मिळावें, ह्या आपल्या इच्छापूर्तीचें चेंबर हें एक साधन आहे, तें बळकट व खंभीर बनलें पाहिजे व त्यासाठीं परोपरीनें झटणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे, असें त्या काळात बाबासाहेबांस वाटत असे.

**संस्थेला मालकीचें घर पाहिजे**

जसजशीं वर्षे लोटूं लागलीं तसतसा चेंबरच्या कार्याचा पसाराही वाढत चालला. चेंबरला सोळावें संपून सतरावें वर्ष लागलें (१९४४), आपल्या कर्तृत्वाच्या बळावर तिनें नावलौकिकही मिळविला. व्यापारीवर्ग अधिकाधिक आशेनें तिच्याकडे पाहूं लागला व तिच्या सहकाराची अपेक्षा करूं लागला. संस्थेच्या कार्याचा पसारा उत्तरोत्तर असाच वाढत जाणार. परंतु हा पसारा आयुष्यभर भाड्याच्याच घरांत थाटावयाचा का? चेंबरला स्वतःच्या मालकीची वास्तु कां नसावी? स्वतःच्या मालकीच्या घरांत राहण्याइतकी पुण्याईची कमाई चेंबरनें आजवर केलेली आहे. तिच्या बळावर स्वतःच्या घरांत तिला राहतां येण्यासारखें आहे. त्यामुळें चेंबरला विपुल जागेची सोय होऊन आपली उपयुक्तता वाढवितां येईल; एवढेंच नव्हे तर मासिक भाड्याच्या रूपानें उत्पन्नांतही भर पडेल. चेंबरबद्दल मनांत वास करणाऱ्या वात्सल्यामुळें बाबासाहेबांच्या मनांत अशा प्रकारचे उन्नत विचार घोळूं लागले. त्या विचारांत उत्कंठा होती, तळमळ होती, तशीच तीव्रताही होती.

एकदां (१९४४) चेंबरचे अध्यक्ष या नात्यानें भाषण करीत असतां बाबासाहेबांनीं अत्यंत कळकळपूर्ण शब्दांत आपले हे विचार सर्वांपुढें मांडिले व त्यांना चालना मिळावी, या हेतूनें एक इमारत फंड कमिटी स्थापन करण्यांत आली. पंचवीस हजार रुपयांची देणगी देऊन बाबासाहेबांनीं या निधीचा शुभारंभ केला. एवढें करून ते थांबले नाहींत. ज्यांच्याकडून

देणग्या मिळविणें शक्य असेल त्यांच्याकडून त्या मिळविण्याच्या कामगिरीस ते लागले. त्यानंतर दोन वर्षांनीं त्यांची अध्यक्षीय कारकीर्द संपायला आली त्यावेळीं इमारतनिधीचा आंकडा एक लाखापलिकडे गेलेला होता. त्याकाळीं इमारत कार्यासाठीं तीन लक्ष रुपये लागतील असा ठोकळ मानानें अंदाज करण्यांत आला होता.

### बाबासाहेबांचें गोड स्वप्न साकार झालें

हें कार्य दिरंगाईवर न पडतां तें शक्य तेवढ्या लौकर पार पडावें अशी तळमळ बाबासाहेबांस लागून राहिली होती. अध्यक्षीय जबाबदारींतून ते मोकळे झाले तरी त्यांना स्वस्थता कुठें होती ? चेंबरनें मालकीच्या घरांत आपला संसार थाटला पाहिजे हा ध्यास त्यांना सतत लागून राहिला होता व आपल्यापरीनें शक्य ती हालचाल ते करीत होते. निधी वाढत चालला त्याचबरोबर बांधकामासाठीं लागणाऱ्या वस्तूंच्या किंमतीही वाढत चालल्या. त्यामुळें तीन लाखांचा अंदाज मागें पडून तो चार लाखांवर येऊन बसला. बाबांसाहेबांची इच्छा लक्षांत घेऊन त्यांच्या चिरंजिवांनीं पहिल्या देणगींत आणखी पंचवीस हजार रुपयांची भर घातली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स या संस्थेला स्वतःच्या मालकीच्या इमारतींत आपला संसार सुखानें थाटतां आला पाहिजे, हेंही बाबासाहेबांचें गोड स्वप्न आतां साकार झालें आहे. कोटांत रामपार्ट रो या भागांतील आपल्या मालकीच्या भव्य इमारतींत महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ही संस्था आतां स्वावलंबी, मानाचें व अधिकाधिक उपयुक्ततेचें जीवन जगूं लागली आहे. संस्थेला प्राप्त झालेलें हें वैभव कोणीही हेवा करावा अशा प्रकारचें आहे.

बाबासाहेबांनीं या संस्थेच्याद्वारें महाराष्ट्रीय व्यापारीवर्गाची अनन्यभावें सेवा केली. त्यांच्या मागून आले त्यांनींही तिला वेळोवेळीं जरूर तें खतपाणी पुरवलें. एकटा कांहीं करूं शकत नाहीं. अनेकांचा सहकार संपादन करून आपलें उद्दिष्ट साधावयाचें असतें. बाबासाहेबानीं तेंच केलें. तेव्हां

चेंबरला आज जी वैभवश्री प्राप्त झाली आहे, तिच्यांत वालचंद शेटजीपासून लालचंदशेटजीपर्यंत सर्वांचाच कमीजास्त प्रमाणांत वांटा आहे.

## राजकीय स्थित्यंतराचा काळ

आपण पाहिलें कीं, चेंबरच्या जन्मापासून तों ती संस्था विसाव्या वर्षांत पदार्पण करीपर्यंत बाबासाहेबांचा तिच्याशीं उपाध्यक्ष व अध्यक्ष या नात्यानें अत्यंत निकट व जिव्हाळ्याचा संबंध होता. या महत्त्वाच्या व विशेषतः बाबासाहेबांच्या अध्यक्षीय अमदानींत (१९३८ ते १९४६) महाराष्ट्राच्या व आपल्या देशाच्या औद्योगिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रांत अत्यंत महत्त्वाच्या व क्रांतिकारक घटना घडून आल्या. त्या काळात भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्याला उग्र स्वरूप आलेलें होतें. राजकीय स्थित्यंतराचा तो मध्यान्हकाळ होता. महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू यांच्यासारख्या लोकप्रिय व थोर पुढाऱ्यांना अटकेंत ठेऊन इंग्रज सरकार नाना प्रकारचे डावपेच लढवीत होतें. सर्वत्र भीतीचें व दहशतीचें वातावरण पसरलेलें होतें. अशावेळीं महाराष्ट्रीय व्यापारी संघटनेचे प्रमुख या नात्यानें सरकारी धोरणाबद्दल आपणास काय वाटतें, हें वेळोवेळीं चेंबरच्या व्यासपीठावरून स्पष्टपणें सांगण्यांत बाबासाहेबांनीं केंव्हांही कसूर केली नाहीं.

त्याकाळचें सरकार कोणाचाही सल्ला मानण्यास तयार नव्हतें. सर्वत्र दडपशाही चालू होती. आपला सल्ला सरकारला रुचो वा न रुचो; आपणाला जें वाटतें तें ठणकावून सांगावयाचें व अशा रीतीनें कर्तव्यपालन करीत रहावयाचें, हें होतें त्या काळांतील बाबासाहेबांचें सडेतोड धोरण.

## पहिल्या वीस वर्षांतील प्रगती

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ही संस्था वर्षानुवर्ष वाढत्या प्रगतीचा मार्ग आक्रमीत आहे. पहिल्या वर्षी या चेंबरची सभासद संख्या १५० होती ती एकूणिसाव्या वर्षअखेर ८०० च्या पलिकडे गेलेली आहे. पहिल्या वर्षीं

संस्था सभासद अवघे तीन होते. तर वरील कालावधींत तो आंकडा तेविसापलिकडे गेला.

चेंबरची विसावी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार ता. २९ नोवेंबर १९४६ रोजीं भरली. बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं भरलेली ती शेवटची सभा असल्यामुळें त्या सभेंत त्यांनीं सर्वांचा मोठ्या प्रेमानें व आस्थेवाईकपणें निरोप घेतला. त्यावेळीं त्यांनीं छोटेसेंच, परंतु हृदयस्पर्शी भाषण केलें. त्यावरून चेंबरसंबंधीं व विशेषतः महाराष्ट्रीयांसंबंधीं त्यांना किती जिव्हाळा वाटतो, याचें सर्वांना दर्शन घडलें.

आपल्या भाषणांत त्यांनीं संस्थेची उत्तरोत्तर प्रगती होत असल्याबद्दल व दिवसेंदिवस महाराष्ट्रीय लोक व्यापारउदीमांत व उद्योगधंद्यांत वाढत्या प्रमाणांत पुढें येत असल्याबद्दल समाधान व्यक्त केलें आणि शेवटीं सर्वांचा प्रेमळ निरोप घेऊन ते म्हणाले, "आपण सर्वांनीं मिळून चेंबरसाठीं जें कांहीं केलें त्याबद्दल मला अभिमान वाटतो. यापुढेंही तुम्हीं सर्वांनीं आपुलकीनें, खेळीमेळीनें, चेंबरचें कार्य करून चेंबरचें वैभव वाढवावें, एवढीच माझी प्रार्थना आहे. आमच्या महाराष्ट्रीयांमध्यें धाडस कमी आहे, खेळीमेळीचें वातावरण नसतें व त्यांना दुसऱ्यांचा उत्कर्ष सहन होत नाहीं, असे आपणांतील दोष नेहमीं दाखविले जातात. तेव्हां त्यांतून आपली सुटका होईल, त्याच वेळीं खऱ्या व्यापारी दृष्टीनें महाराष्ट्र उदयास येईल व मगच तो कीर्ति मिळवील."

बाबासाहेबांनीं निरोपादाखल केलेल्या भाषणाच्या द्वारें त्यांनीं ज्या अपेक्षा प्रगट केल्या त्याला आतां अठरा वर्षें होऊन गेलीं आहेत. काळ पालटलेला आहे, त्याचबरोबर एकंदर परिस्थितींतही स्थित्यंतर घडून आलें आहे. महाराष्ट्र चेंबरचे जे कार्यवाह (सेक्रेटरी) असतात, त्यांच्यावर संस्थेच्या कार्यक्षमतेची फार मोठी जबाबदारी असते. कार्यवाहाच्या हातांत महत्त्वाचीं सूत्रें असतात. तीं त्यांनीं जबाबदारीपूर्वक व संस्थेच्या हिताच्या दृष्टीनें हालवावयाचीं असतात. चेंबरचें महत् भाग्य असें कीं, पहिल्या सुमारें वीस वर्षांच्या अमदानींत त्या संस्थेला दत्तोपंत केळकर हे चतुर, समंजस व

कर्तव्यदक्ष कार्यवाह लाभले तर त्यांच्यानंतर त्या जागीं आलेले कार्यवाह राम मोहाडीकर हेही महाराष्ट्र चेंबरच्या हितचिंतनांत व आपल्या कर्तव्यपालनांत सवाई दक्ष व जागरूक आहेत. त्यामुळेंच ही महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांची संघटना उत्तरोत्तर प्रगतीचा मार्ग आक्रमीत आहे व आजकाल सर्वत्र बहुमानाचें स्थान पटकावून राहिली आहे.

३८९८२ चरित्र
१२५६ १५।११।६८

९.

# साखर कारखानदारांची संघटना

'एकत्र या आणि एकमेकांच्या विचारानें वागून उद्योगधंद्यांत आपलें पाऊल नेहमीं पुढें पडत राहील याची दक्षता बाळगा' हा बाबासाहेबांचा आपल्या व्यवसायबंधूंना नेहमींचा सल्ला असे. साखरधंद्यांत अडचणी निर्माण होऊं लागल्या तेव्हां त्याचें निवारण करण्यासाठीं बाबासाहेबांच्या सल्ल्यानुसार 'डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशन' ही संस्था १९३९ सालीं अस्तित्वांत आली.

या संस्थेचा जन्म कोणत्या परिस्थितींत झाला, हें मागें वळून पहाण्यासारखें आहे; कारण या संस्थेचा रौप्यमहोत्सव आतां लौकरच साजरा व्हावयाचा आहे.

ही संस्था स्थापन होण्यापूर्वीं १९३३ सालीं 'महाराष्ट्र शुगर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन' ही संस्था अस्तित्वांत होती. तिचे दक्षिण विभागांतील पांच साखर कारखाने सभासद होते. त्याकाळीं महाराष्ट्रांतील साखर धंद्याला अंतर्गत चढाओढीला तोंड द्यावें लागत नव्हतें किंवा धंद्यापुढें धंद्याआड येणारे असे म्हणण्यासारखे गंभीर प्रश्नही नव्हते. त्यामुळें मुंबई प्रांतांतील इतर कांहीं कारखानदारांस या संस्थेचे सभासद होण्याची जरुरी भासली नाहीं. परंतु १९३६ सालापासून संयुक्त प्रांत व बिहार येथील कारखानदारांनीं स्वीकारलेल्या धोरणामुळें अंतर्गत चढाओढ व अडचणी निर्माण होऊं लागल्या. त्यावेळीं दक्षिण भागांतील सर्व साखरकारखानदा-

रांस आपण आतां आपल्या हितसंबंधांचें संरक्षण करण्यासाठीं सुसंघटित झालें पाहिजे व साखरेचे भाव एकमतानें निश्चित केले पाहिजेत, तरच आपला तरणोपाय आहे असें वाटूं लागलें.

विशेषत: १९३६–३७ व १९३७–३८ सालीं सखरेची पैदास वाजवीपेक्षां फाजील होऊन साखरेचे भाव कारखानदारांस परवडणार नाहींत, इतक्या प्रमाणांत खालीं घसरूं लागले. आपल्याजवळचा साखरेचा सांठा (जरुरीपेक्षां जास्त वाढलेला) एकदां कमी केला पाहिजे या हेतूनें यू. पी. व बिहारमधील कारखानदार भाव खालीं आणूं लागले.

या परिस्थितींतून मार्ग काढणें अत्यंत आवश्यक होतें. स्वस्थ राहून चालण्यासारखें नव्हतें. बाबासाहेबांच्या लक्षांत ही सारी परिस्थिति आली तेव्हां त्याकाळीं या क्षेत्रांतील विशेष जाणकार म्हणजे सर जोसेफ के. त्यांच्याशीं या परिस्थितींतून मार्ग कशा रीतीनें काढावा यासंबंधीं त्यानीं चर्चा केली. व सुचविलें कीं, धंद्याच्या दृष्टीनें परिस्थिति गंभीर आहे. तरी त्याबाबतींत विचारविनिमय करण्यासाठीं महाराष्ट्रांतील सर्व कारखानदारांनीं निदान आठवड्यांतून एकदां एकत्र जमावें व प्राप्त परिस्थितींतून कांहीं मार्ग काढतां येतो का ? याचा विचार करावा. सर जोसेफ के यांना संघटित विचारविनिमयाचा हा मार्ग हितकर वाटून त्याप्रमाणें बाबासाहेबांची सूचना अंमलांत आली. सतत दोन वर्षें हा हितकर उपक्रम चालू होता. त्यानंतर (१९३९) ही सुसंघटना पुढेंही अव्याहत चालू राहावी या हेतूनें आरंभीं सांगितल्याप्रमाणें 'डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशन' या नावानें तिचें कार्य सुरू झालें. महाराष्ट्रांत त्यावेळीं नऊ साखर कारखाने होते; ते सर्व या नवीन संस्थेचे सभासद झाले. जुनी संस्था नामशेष होऊन तिचे सर्व कागदपत्र या नवीन संस्थेकडे आले.

साखरधंद्याच्या उत्कर्षासाठीं स्थापन झालेल्या या संस्थेचे पहिले अध्यक्ष व उपाध्यक्ष होण्याचा मान अनुक्रमें सर जोसेफ के व बाबासाहेब डहाणूकर यांच्या वांट्यास आला. (१९३९ ते १९४१)

त्यांनंतर दुसरे अध्यक्ष व उपाध्यक्ष होण्याचा मान बाबासाहेब



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

डहाणूकर व शेट गुलाबचंद हिराचंद यांच्या वांट्यास आला. (१९४१ ते १९४२)

या संस्थेचे पहिले सेक्रेटरी डी. व्ही. केळकर एम्. ए. हे होते तर सध्यां ती जबाबदारी मो. गो. खिरे बी. कॉम्. हे तितक्याच जबाबदारीनें व हुषारीनें संभाळीत आहेत. त्यांच्या कारकीर्दीत या संस्थेचा रौप्यमहोत्सव मोठ्या थाटांत सांजरा होवो, असें आम्हीं इच्छितों.

१०.

# बाबासाहेबांचें राजकारण

**महाराष्ट्राचा** औद्योगिक विकास घडून आल्याशिवाय जनतेची आर्थिक स्थिति सुधारणार नाहीं व जनता सुखी होणार नाहीं. त्यासाठीं शक्य त्यांचें सहकार्य संपादन करून चिकाटीच्या व दीर्घोद्योगाच्या बळावर आपणास जें जें करतां येईल तें करावयाचें, हा निर्धार बाबासाहेबांनीं ज्या काळांत केला त्या काळांत या देशावर परकीय सत्तेचा अंमल होता. ती सत्ता देशी उद्योगधंद्यांना बिलकूल पोषक नव्हती; उलट मारक मात्र होती. तरीही बाबासाहेबानीं औद्योगिक क्षेत्रांत धडाडीनें उडी मारली; कारण त्यांच्या पाठीशीं लो. टिळकांची शिकवण व त्यांचें चालतें बोलतें कर्तृत्व होतें. त्या काळचें राजकारण म्हणजे सत्ताधाऱ्यांस विरोध करून त्यांच्या रोषास पात्र होण्याचें राजकारण होतें; आणि लोकमान्य तेंच धडाडीनें खेळत होते. तत्कालीन परिस्थितीचें त्यानीं केसरींत रेखाटलेलें चित्र कसें होतें पहा. ते म्हणतात:—"आम्ही सर्व प्रकारें दुबळे झालेले आहोंत. आमच्याजवळ शस्त्र नाहीं, सत्ता नाहीं व सध्यां तरी एकीचेंही पूर्ण बळ नाहीं. राज्यकर्ते आपण होऊन उदार बुद्धीनें आमच्या लोकांत एक राष्ट्रीयत्वाची बुद्धि उत्पन्न करून आम्हांस स्वराज्याचे हक्क देतील म्हणावें तर तीही आशा आतां ठार बुडाली आहे. इतकेंच नव्हे तर आम्हीं स्वावलंबनाचा धडा आपल्यापुढें ठेऊन त्याप्रमाणें उद्योग करावयास लागल्यास आमचे पाय मोडण्यास येथील अरेरावी अधिकारीवर्ग तयार झालेला आहे. अशा स्थितींत स्वदेशी, बहिष्कार किंवा

राष्ट्रीय शिक्षण इत्यादि उपायांखेरीज आम्हांस दुसरें कोणतेंही साधन उपलब्ध नाहीं व या साधनाचा आम्हीं जर उपयोग करून घेतला नाहीं तर आमच्यासारखे महामूर्ख जगांत कोणी नाहींत असें म्हणावें लागेल."[1]

अशा परिस्थितींत आपल्या आवडत्या औद्योगिक क्षेत्रांत वावरणें व त्याद्वारें स्वतःची व राष्ट्राची जी कांहीं सेवा करतां येईल ती करणें याशिवाय दुसरा मार्ग नव्हता.

### राजकारणाकडे लक्ष


मुंबईंत आल्यानंतर बाबासाहेबानीं प्रथम हाताळलेला व्यवसाय म्हणजे लाकडांचाच होय. आरंभीं प्रत्येक व्यवसायांत टक्केटोणपे खावे लागतात तसे ते त्यांनींही खाल्ले; परंतु त्या व्यवसायांत थोडासा स्थिरपणा येत आहे असें दिसून येतांच (१९१५) बाबासाहेबांचें लक्ष राजकारणाकडे वळूं लागलें.

लोकमान्य टिळकांच्या राजकारणाचा सूर्य त्याकाळीं महाराष्ट्राच्या आकाशांत प्रखरतेनें तळपूं लागलेला होता. प्रत्येकाचीं अंतःकरणें त्यांनीं त्याकाळीं भारून टाकलेलीं होतीं; परंतु तत्कालीन परकीय राजसत्ता त्या राजकारणाकडे व तें चालविणारांकडे अत्यंत वक्र दृष्टीनें पहात होती. लो. टिळकाशीं संबंध ठेवणें किंवा त्यांचें राजकीय अनुयायित्व पत्करणें, ही त्याकाळीं भयंकर समजली जाणारी गोष्ट होती; परंतु बाबासाहेबांची लो. टिळकांवरील निष्ठा लेचीपेची नव्हती. ती निष्ठा त्यांच्याकडून धिटाईनें कार्य करवून घेत होती. ती निष्ठा म्हणजे त्यांचें जीवनसर्वस्व होतें. त्यामुळें लो. टिळकानीं त्याकाळीं चालविलेल्या चळवळींत ते यथाशक्ति भाग घेत होते; परंतु आपला व्यवसाय सांभाळून.

आपण कॉंग्रेसकडे व देशसेवेकडे कसे खेचले गेलों व पूर्वीपासून कॉंग्रेसबद्दल नितांत आदराची व विश्वासाची भावना आपल्यांत कशी वास करीत आहे हें त्यांनींच एका प्रसंगीं सांगितलें आहे.

---


१. केसरी—ता. ६ ऑगष्ट १९०७



भोजनसमारंभ प्रसंगीं पं. जवाहरलाल नेहरू यांचें बाबासाहेबांकडून स्वागत. यांत डावीकडून पहिले ना. यशवंतराव चव्हाण व शेवटीं बाबासाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव दादासाहेब.




राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांचा राजभवनांत स्वागतसमारंभ झाला त्यावेळचें छायाचित्र




पंतप्रधान ना. पं. जवाहरलाल नेहरू विलायतचा दौरा करून आले त्यावेळीं विमान-तळावरील त्यांच्या स्वागतास मुख्यमंत्री बाळासाहेब खेर, बाबासाहेब वगैरे (१९४८)



ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सभासदांस बाबासाहेबांनीं मेजवानी दिली,
त्याप्रसंगीचें छायाचित्र
पंतप्रधान पं. नेहरू, ना. यशवंतराव चव्हाण व श्री. बाबासाहेब डहाणूकर



ऑ. इं. काँ. कमिटीस बाबासाहेबांकडून मेजवानी देण्यांत आल्यावेळीं घेतलेला फोटो
डावीकडून—१. राज्यपाल ना. श्रीप्रकाश, २. पं. जवाहरलाल नेहरू व
३. श्री. बाबासाहेब (स्वागतपर भाषण करीत असतां)




सरदार वल्लभभाई पटेल, सर इब्राहिम रहिमतुल्ला यांच्यासमवेत बाबासाहेब




कौन्सिल हॉलमधील मेजवानीच्या प्रसंगीं श्री. पट्टाभिसितारामय्या, श्री. एम्. ए. मास्तर, श्री. जोकिम आल्वा व बाबासाहेब हे बातचीत करीत असतां.



कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. पट्टाभिसितारामय्या यांच्या स्वागतसमारंभांत बाबासाहेब सोबत सभापती सिलम, सौ. लिलावती मुनशी वगैरे




राजभवनांतील मेजवानींत
डावीकडून—(१) श्री. बाबासाहेब, (२) ना. भाऊसाहेब हिरे
व (३) राज्यपाल ना. बाजपाय




ना. स. का. पाटील, ना. बाळासाहेब खेर, डॉ. मस्कारनीस,
सर बेहेराम करंजिया यांच्यासमवेत बाबासाहेब




डहाणूकर कुटुंबियांसमवेत डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी



इंडियन मर्चंटस् चेंबरचे माननीय अध्यक्ष एम्. आर्. रुईया यांनीं त्यावेळचे भारत सरकारचे अर्थमंत्री ना. डॉ. चिंतामणराव देशमुख यांचा, आपल्या निवासस्थानीं सत्कार घडवून आणिला त्यावेळचा फोटो. (१९५२)




एका भोजनप्रसंगींचें छायाचित्र



लोणावळा गुरुकुल पायाभरणीसमारंभ ना. स. का. पाटील यांच्या अध्यक्षतेखालीं महर्षि अण्णासाहेब कर्वे यांच्या हस्तें पार पडला. त्यावेळीं भाषण करीत असतां बाबासाहेब. श्री. गणेश चंदावरकर (डावीकडून पहिले) व श्री. अनंत काणेकर (डावीकडून शेवटचे) या छायाचित्रांत आहेत.




एम्प्लॉयर्स फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेच्या वार्षिक सभेंत सर विठ्ठल चंदावरकर भाषण करीत असतां. उजवीकडून पहिले बाबासाहेब




महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स या संस्थेच्या अध्यक्षीय जबाबदारींतून मुक्त झाल्यानंतर निरोपादाखल भाषण करीत असतां बाबासाहेब




श्री. जी. डी. बिर्ला, नवल टाटा, जी. डी. सोमाणी, के. एम्. मुनशी, मुरारजी देसाई वगैरे उद्योगपति व राजकीय पुढारी यांच्यासमवेत बाबासाहेब



मावळते राज्यपाल ना. कोलव्हिल, त्यांच्या पत्नी तसेंच ना. बाळासाहेब खेर, श्रीमती मिथन लाम व श्री. बाबासाहेब



बसलेले डावीकडून—उगवते शेरीफ जोकिम अल्वा, मावळते शेरीफ बाबासाहेब व डेप्युटी शेरीफ—नीमाझी (१९४८)



उगवते शेरीफ श्री. जोकिम आल्वा, राज्यपाल महाराजसिंग व मावळते शेरीफ श्री. बाबासाहेब डहाणूकर (१९४८)

**काँग्रेस पुढाऱ्यांस मेजवानी**

पुणें येथें जून १९६० मध्यें ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची बैठक भरली असतां बाबासाहेबांनीं तेथील आपल्या बंगल्यावर सर्व काँग्रेस पुढाऱ्यांस एक थाटाची मेजवानी दिली.

असे प्रसंग आपल्या आयुष्यांत त्यांनीं अनेक वेळां जुळवून आणिले आहेत. त्यामुळें सर्वांच्या भेटीगांठी होऊन खुल्या अंतःकरणानें एकमेकांशीं बोलतां येतें, परिचय वाढतो व त्यांच्या विचारांची दिशा समजून येते.

महाराष्ट्र राज्याची स्थापना नुकतीच झालेली होती आणि पुणें शहरांत अशा रीतीनें एकत्र येण्याचा सुयोग सुमारें वीस वर्षांनंतर जुळून आलेला होता. बाबासाहेबांस तो योग साधावासा वाटल्यास नवल नाहीं.

वरील प्रसंगीं पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू, राज्यपाल श्रीप्रकाश आदि महनीय पुढाऱ्यांचें स्वागत करतांना काँग्रेस संघटनेशीं आपला संबंध किती जिव्हाळ्याचा व पूर्वीपासून आहे हें सांगतांना बाबासाहेब म्हणाले, "मी एक व्यापारी असलों तरी राष्ट्रीय सभेशीं माझा संबंध फार जुना व अनेक वर्षांपासून आहे. मी एक जुना काँग्रेसभक्त आहें आणि आपल्या राष्ट्रासाठीं या संस्थेनें फार मोठें कार्य केलें आहे असें पूर्वीपासून मानणारा आहें. काँग्रेस हीच संस्था देशाचें भलें करूं शकेल, ही माझी भावना सफल झालेली आहे.

"या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं काँग्रेसनें जो स्फूर्तिदायक पुढाकार घेतला त्याचा माझ्या मनावर परिणाम होऊन सुमारें पंचेचाळीस (आतां पन्नास) वर्षांपूर्वीं १९१५ सालीं काँग्रेसचा एक नम्र सेवक या नात्यानें त्या संस्थेंत मीं प्रवेश केला आणि वर्षांमागून वर्षें लोटलीं तरी तो संबंध आजही कायम आहे हें मी माझें भाग्य समजतों. (I have been fortunate in having this-long association for all these years with this great institution.)

"पुढें १९३६ पर्यंत म्हणजे सुमारें २०–२१ वर्षे एक साधा व निष्ठावंत कार्यकर्ता या नात्यानें त्या संस्थेशीं माझा संबंध होता. कॉंग्रेसनें स्वातंत्र्यप्राप्तीचा लढा अविरत चालविला होता. त्या काळांत कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या अनेक बैठकांस हजर राहून देशस्थितीसंबंधानें मी अनेक गोष्टी शिकूं शकलों व त्याचबरोबर अनेक कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या सान्निध्यांतही येऊं शकलों. त्या व तदनंतरच्या काळांत कॉंग्रेससाठीं माझ्यासारख्यास जें कांहीं करतां येण्यासारखें होतें तें मी करीत होतों. त्या सेवेच्या क्षेत्रांत वावरत असतां लो. टिळक, महात्मा गांधी, पं. मोतीलाल नेहरू, पं. मदन मोहन मालवीय, विठ्ठलभाई पटेल, वल्लभभाई पटेल, पं. जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्रप्रसाद वगैरे अनेक थोर व वंदनीय देशभक्तांच्या सान्निध्यांत मी येऊं शकलों या गोष्टीचा मला नेहमीं अभिमान वाटत असतो.

"मी एक साधासुधा व लहानसा माणूस असलों तरी या सर्व कारणांमुळें माझ्या मनावर अनपेक्षित व अनन्यसाधारण असे संस्कार घडून आले. माझ्या ठायीं राष्ट्रीय वृत्ति बाणली व प्रत्येक प्रश्नाकडे व्यापक व राष्ट्रीय दृष्टीनें कसें पहावें, याचें शिक्षण मला मिळालें." (I must confess that a small man I was, things which I never expected happened in my life and they helped me to develop a national outlook and character and imbibed in me ideas, which I still carry with me.)

### कॉंग्रेसलढ्यासंबंधीं आठवणी

हें भाषण करीत असतां बाबासाहेबांचें अंतःकरण कृतज्ञतेनें भरून आलें होतें. कॉंग्रेसवरील निष्ठेमुळें दरवर्षी भरणाऱ्या त्या राष्ट्रीय संस्थेच्या वार्षिक बैठकांस शक्य तों बाबासाहेब हजर रहात असत. कारण त्यामुळें अनेक पुढाऱ्यांच्या भेटीगांठी होऊन राजकारणाचे रागरंगही समजून येत असत. वरील भाषणांत १९२१ पासून तों १९४७ पर्यंत म्हणजे स्वातंत्र्य

प्राप्तीपर्यंतच्या कॉंग्रेससंबंधीं आपल्या कांहीं संस्मरणीय आठवणी त्या प्रसंगीं बाबासाहेबानीं सांगितल्या.

कॉंग्रेसनें चालविलेल्या लढ्यांतील अखेरच्या पर्वाकडे वळून शेवटीं बाबासाहेब आपल्या भाषणांत म्हणाले, "१९४५ सालीं याच पुणें शहरांत कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक भरली त्यावेळीं तिचें यजमानपण महत् भाग्यानें आजच्यासारखें माझ्या वाट्यास आलें होतें. ("The responsibility and honour to serve the Congress Working Committee in 1945 as the host in this very city fell upon me.")

"खरोखर ती एक संस्मरणीय बैठक होती. अहंमदनगर जेलमधून कॉंग्रेस पुढाऱ्यांची सुटका होतांच तांतडीनें भरविण्यांत आलेली ती महत्त्वपूर्ण बैठक होती. दीर्घ विचारांतीं वर्किंग कमिटीनें त्या बैठकींत एक व्यवहार्य मार्ग स्वीकारला. लॉर्ड वाव्हेल हे त्यावेळीं व्हाईसरॉय होते. स्वातंत्र्याच्या हक्कासंबंधीं ब्रिटिश राज्यकर्त्यांशीं बोलणें करण्याचा निर्णय घेण्यांत आला व त्यानंतर बोलणीं चालूच होतीं. त्यांचा परिणाम म्हणजे १९४७ सालीं पं. जवाहरलाल नेहरू यांच्याकडे या राष्ट्राचें पंतप्रधानपद येऊन, पहिलें राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यांत झाला.

"अशा प्रकारच्या या रम्य आठवणींनीं यावेळीं मी रोमांचित झालों असून आपलें सर्वांचें येथें स्वागत करण्याची सुसंधी मला लाभली व ज्या संस्थेचीं निष्ठापूर्वक सेवा करण्यांत माझ्या आयुष्याचीं गेलीं पंचेचाळीस वर्षे गेलीं, त्याच संस्थेनें आम्हांला संपूर्ण स्वातंत्र्याचे हक्क मिळवून दिले व आपलें ध्येय पूर्णत्वास आणिलें, तो सुखद सोहळा आपल्याबरोबर पहाण्याचें भाग्य मलाही लाभलें याबद्दल मला आनंद होत आहे."

## पुढाऱ्यांबद्दल नितांत प्रेमादर

देशाला स्वातंत्र्याचा लाभ करून देणारी कॉंग्रेस व कॉंग्रेस पुढारी यांच्याबद्दल बाबासाहेबांच्या मनांत किती नितांत प्रेमादराची भावना आहे, हें त्यांच्या भाषणांतील थोड्या लांबलेल्या या उताऱ्यांवरून स्पष्ट होईल.

बाबासाहेबांनीं लढाऊ राजकारणांत प्रत्यक्षपणें भाग घेतला नसला तरी तो घेणाऱ्यांबद्दल त्यांना आत्यंतिक आदर वाटत असे. त्यांच्याशीं संबंध जोडणें, त्यांचे विचार समजून घेणें व त्यांच्या कार्यांत आर्थिक व अन्य प्रकारें जें जें सहकार्य करतां येईल तें करायला ते नेहमीं तत्पर असत.

हेंच पहा ना. अहमदनगर येथील तुरुंगांतून पं. जवाहरलाल नेहरू, हरेकृष्ण मेहताब वगैरे थोर काँग्रेस पुढारी सुटका होऊन पुण्यास आले. त्यांच्याबद्दल सहाजिकच सर्वांना आत्यंतिक प्रेमादरभाव वाटत असे. परंतु आपण तत्कालीन सरकारच्या रोषास पात्र होऊं, हा वचक अनेकांच्या अंतः-करणांत वावरत असे. बाबासाहेबांनीं तशा प्रकारचा वचक कोणत्याही काळीं मानला नाहीं. पुणें येथें पं. जवाहरलाल वगैरे पुढाऱ्यांचें स्वागत करून त्यांनीं तेथील आपल्या बंगल्यांत वास्तव्य करावें, अशी इच्छा प्रगट केली. त्यावेळीं त्या इच्छेला मान देऊन पंडितजींसह मौ. आझाद व इतर बडे काँग्रेस पुढारी त्याकाळीं सुमारें आठवडाभर त्यांच्या बंगल्यांत राहिले होते.

देशकल्याणासाठीं व स्वातंत्र्य प्राप्तीसाठीं झटणाऱ्या काँग्रेस पुढाऱ्यांची यथाशक्ति सेवा आपल्या हातून घडावी, हीच बाबासाहेबांची आरंभापासून दृष्टि होती. सर्वांच्या परिचयाचे सुप्रसिद्ध काँग्रेस पुढारी हरेकृष्ण मेहेताब हे बाबासाहेबांच्या वाढदिवसानिमित्त नवी दिल्ली येथून ता. ८ डिसेंबर १९६४ रोजीं पाठविलेल्या शुभचिंतनपर पत्रांत लिहितात कीं, "I came to know Shri Dahanukar long ago, even before the war when I used to go to Poona to attend the meetings of the Congress Working Committee. At that time he used to be our host. He has been a pillar of Congress from the beginning. In the field of industry he is the pioneer in Maharashtra. I know a number of Social and Cultural work receive continuous assistance from Shri Dahanukar."

आपल्या घरीं आलेल्या या बड्या पाहुण्यांचें आगतस्वागत योग्य प्रकारें झालें पाहिजे व त्यांना कोणत्याही प्रकारची अडचण भासूं नये, यासाठीं

बाबासाहेब दक्षतापूर्वक डोळ्यांत तेल घालून जपत असत. पं. जवाहरलालजी सकाळींच सहा वाजतां उठायचे तर मौ. आझाद हे भल्या पहांटे चार वाजतां बिछाना सोडायचे. त्या त्या वेळीं त्यांच्या जरुरीप्रमाणें व आवडीप्रमाणें त्यांना चहा, कॉफी तयार ठेवविण्यापासून तों त्यांच्या इतर बारीकसारीक गरजांकडे ते स्वतः कर्तव्यबुद्धीनें लक्ष पुरवीत असत.

पं. मदन मोहन मालवीय यांच्याबद्दलही बाबासाहेबांस नितांत आदर वाटत असे. त्यांची धर्मनिष्ठा व त्यांचा हिंदुत्वाचा अभिमान यामुळें त्यांच्याकडे कोणीही आकर्षिला जात असे. त्यामुळें १।२ वर्षें बाबासाहेबांचा हिंदुमहासभेशींही निकट संबंध होता.

आपण उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत वावरत आहोंत. एकदां आपण विचारपूर्वक जी निवड केली ती अर्धवट न हाताळतां तें क्षेत्र आपल्या व आपल्या सहकाऱ्यांच्या बळावर जितकें म्हणून प्रभावशाली व उपकारक बनवितां येईल तेवढें बनविण्यासाठीं झटावयाचें, त्यांत जराही कसूर करावयाची नाहीं, हें होतें बाबासाहेबांचें धोरण. त्यांच्या जीवनांत राजकारणाला स्थान होतें. परंतु तें दुय्यम होतें. पहिलें मानाचें स्थान त्यानीं दिलें होतें उद्योगधंद्यांना. राजकारण त्याला पोषक व उपकारक म्हणून त्याच्याशीं संबंध ठेविला पाहिजे, त्याशिवाय औद्योगिक क्षेत्रांत आपलें पाऊल पुढें पडणार नाहीं याची पूर्ण जाणीव त्यांच्या धोरणी व विचारी मनाला आरंभापासून होती.

## कारखानदार, व्यापारी व राजकारण

तुमचें क्षेत्र कोणतेंही असो, राजकारणाकडे पाठ फिरवून तुमचें चालणार नाहीं. आपल्या कामापुरतें का होईना, त्यांत तुम्ही वावरलें पाहिजे तरच तुमचा टिकाव लागेल.

कारखानदार व व्यापारी यांनीं राजकारणापासून दूर रहावें कीं राजकारणांत वावरावें, यासंबंधीं बाबासाहेबांनीं १९४९ सालीं आपले विचार

एका मुलाखतीद्वारें प्रगट केले आहेत[1] तिची येथें आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं. त्या मुलाखतींत बाबासाहेब म्हणतातः—"कारखानदार व्यापारी यानीं देशाच्या राजकारणापासून दूर राहून चालणार नाहीं. त्यानीं राजकीय क्षेत्रांत भाग घेतला पाहिजे. आपल्याला राजकारणांत जितका भाग घेतां येईल तितका घ्यावा. पण त्यापासून अलिप्त राहिल्यानें प्रगतीचें पाऊल पुढें पडूं शकणार नाहीं. ***मी राजकीय क्षेत्रांत जी थोडीफार कामगिरी केली, त्यामुळेंच मला आतांपर्यंत केलें तें शक्य झालें, असें मी म्हणूं शकतों एरवीं तें शक्य नव्हतें.***

देशाच्या कारभारांत जबाबदारीनें काम करण्याची शक्यता व्यापारी व कारखानदार यांनाच आहे असें मला वाटतें. त्यांना विविध प्रकारचा अनुभव असतो. इंग्लड-अमेरिकेंतील कारखानदार व व्यापारी राजशकटाची जबाबदारी घेत असतात. आपल्या देशांतील व्यापारी व कारखानदारांनीं निवडणुकींत व इतर राजकीय संघटनांत भाग घेतला पाहिजे. इतकेंच नव्हे, तर वेळप्रसंगीं मंत्रिमंडळांतही जाऊन देशसेवेची आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. महाराष्ट्रीयानीं काँग्रेस सरकारला पाठिंबा द्यावा असें मला वाटतें."

## राजकारणाचें महत्त्व

या मुलाखतीच्या द्वारें बाबासाहेबांनी आपलें मनोगत अगदीं सुस्पष्ट केलें आहे. राजकारणापासून अलिप्त राहून चालणार नाहीं. व्यापारी व कारखानदार यानीं तर राजकारणाशीं आपला संबंध जोडलाच पाहिजे. त्याशिवाय प्रगतीचा मार्ग चोखळतां येणार नाहीं. ते म्हणतात कीं, औद्योगिक क्षेत्रांत माझ्याकडून जी कांहीं कामगिरी पार पडली तिचें कारण राजकीय क्षेत्रांत मी थोडी का होईना, हालचाल करीत होतों, म्हणूनच मला तें शक्य झालें.

१. व्यापार-उद्योग—डहाणूकर खास अंक १९४९

या ठिकाणीं जातां जाता बाबासाहेबांचें एक स्वभाववैशिष्ट्य सांगून टाकावें असें वाटतें. नवीन ओळखी करून घेण्याचा व प्रत्येकापासून कांहीं ना कांहीं शिकण्याचा, त्यांना एक प्रकारचा छंदच होता म्हणा ना. सहज सकाळच्या प्रहरीं कधींतरी फिरायला निघाले असतां किंवा आगगाडींतील प्रवासांत कोणी ना कोणी भेटतात. ती व्यक्ति कोणीही असो, आपण होऊन त्या व्यक्तीचा परिचय करून घ्यायचा, तिची विचारपूस करायची व त्या व्यक्तीचा आपल्या व्यवसायांत कांहीं उपयोग होण्यासारखा असल्यास किंवा त्या व्यक्तीला आपला कांहीं उपयोग होण्यासारखा असल्यास तो करून द्यावयाचा व करून घ्यावयाचाही. अशा रीतीनें आजवरच्या आपल्या आयुष्यांत त्यांनीं अनेक माणसें कायमचीं जोडलीं आहेत.

राजकीय, औद्योगिक, सामाजिक वा शैक्षणिक क्षेत्रांत ज्यांच्याकडून कांहीं ना कांहीं महनीय कामगिरी पार पडली आहे, त्यांना भेटायला बाबासाहेब नेहमीं आतुर असत. कोणत्या ना कोणत्या रूपानें त्यांच्या भेटीगांठीचा प्रसंग जुळवून आणून विचारांची देवाणघेवाण करणें हा त्यांचा एक आवडता छंद होता असेंही म्हणतां येईल. अशा रीतीनें गेल्या ४०।५० वर्षांच्या काळांत निरनिराळ्या क्षेत्रांतील सुमारे शेंपाऊणशें थोरामोठ्यांशीं त्यांचा संबंध घडून आला तो केवळ त्यांच्या प्रेमळ, ज्ञानपिपासू, आदरातिथ्यशील व लोकसंग्राहक स्वभावामुळेंच होय.

## व्यापारीवर्ग व कॉंग्रेस चळवळ

वर सांगितल्याप्रमाणें आपला व्यवसाय संभाळून कॉंग्रेस द्वारें चाललेल्या सार्वजनिक चळवळींत ते मोठ्या आस्थेनें भाग घेत असत. मुंबई प्रदेश कॉंग्रेस कमिटी व महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटी या दोन्ही कमिट्यांच्या कार्यकारी मंडळांत ते निवडून आले होते. त्यामुळें शंकरराव देव, स. का. पाटील, काकासाहेब गाडगीळ वगैरे अनेक कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या निकट सहवासांत ते आले. स्वातंत्र्य प्राप्तिपूर्वीचा तो काळ! त्या काळांत चळवळ जोमदारपणें चालविण्यासाठीं सहाजिकच आर्थिक सहाय्याची जरुरी पदोपदीं भासत असे.

अमाप पैसा जमा करावा लागत असे. त्या काळांत बाबासाहेबांसारखे अनेक राष्ट्रप्रेमी व्यापारी कॉंग्रेसच्या पाठीशीं होते व चळवळीस मदत करीत होते, हें केव्हांही दृष्टिआड करून चालणार नाहीं. बाबासाहेबानीं प्रत्येक वेळीं सहकाराचा आपला वांटा यथाशक्ति आनंदानें उचललेला आहे.

त्या काळीं शंकरराव देव हे एक आघाडीवरचे कॉंग्रेस पुढारी होते. त्यांचें व बाबासाहेबांचें विशेष सख्य. ते केव्हांही मुंबईंत आले असतां त्यांचें वास्तव्य बाबासाहेबांच्या कार्मकिल रोडवरील श्रीसदनांत असावयाचें. तसेंच इतर कोणीही कॉंग्रेस पुढारी येवो, त्यांच्या स्वागतार्थ बाबासाहेब व त्यांच्या घरची मंडळी नेहमीं तत्पर असत.

स्वातंत्र्यपूर्व काळांत स्वातंत्र्य प्राप्तीच्या अनेकविध साधनांपैकीं उद्योग-धंदे व कारखानदारी हें एक साधन, या भावनेनें बाबासाहेब औद्योगिक क्षेत्रांत उतरले. आरंभ काळांत कितीही मेहनत घ्यावी लागली तरी त्यांनीं माघार घेतली नाहीं. याचें प्रमुख कारण म्हणजे त्यांची प्रखर ध्येयनिष्ठाच होय. ज्या ज्या वेळीं संधी मिळे त्या त्या वेळीं उद्योगधंद्यांसंबंधीं आपले विचार ते राजकीय पुढाऱ्यांपुढें ठेवीत असत.

महाराष्ट्राची औद्योगिक व आर्थिक दृष्ट्या वाढ व उन्नति कोणत्या मार्गाचें अवलंबन केलें असतां होईल यासंबंधीं विचारविनिमय करण्यासाठीं जून १९६० मध्यें महाराष्ट्र कमर्शियल अँड इंडस्ट्रियल कॉन्फरन्सची बैठक, मुंबईंत डॉ. चिंतामणराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. त्यावेळीं राजकीय व औद्योगिक क्षेत्रांतील पुढारी व विचारवंत मोठ्या प्रमाणांत हजर होते. उद्योगपति बी. डी. गरवारे हे स्वागताध्यक्ष होते. त्यावेळचे राज्यपाल ना. श्रीप्रकाश, मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण, प्रो. धनंजयराव गाडगीळ यांच्यासारखी थोर मंडळी परिषदेला हजर होती. बाबासाहेबांनींही इतरांच्या बरोबरीनें या परिषदेंत यथाशक्ति भाग घेतला. परंतु तेवढ्यानें त्यांचें समाधान झालें नाहीं.

महाराष्ट्राच्या औद्योगिक उन्नतीच्या कार्याला सर्वांचा हातभार लागला पाहिजे, त्यांच्यांत गोडवा व परस्पर सहकाराची भावना निर्माण झाली

पाहिजे, या सद्धतूनें त्यांनीं ताजमहाल हॉटेलमध्यें परिषदेशीं संबंध आलेल्या सर्वांना एक थाटाची मेजवानी दिली. आपले विचार मोकळेपणीं पुढें मांडण्याची सुसंधी अशा प्रसंगीं लाभत असते. बाबासाहेबांनीं त्या संधीचा फायदा घेऊन महाराष्ट्राच्या औद्योगिक व आर्थिक उन्नतीसंबंधींचे आपले विचार सुस्पष्ट शब्दांत पुढें मांडिले. कोयना योजना पुरी होत आल्यामुळें महाराष्ट्राच्या कांहीं भागांना विजेचा पुरवठा होणार याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें. तसेंच ठिकठिकाणीं सरकार औद्योगिक वसाहती स्थापन करून छोटे उद्योगधंदेवाल्यांची सोय करणार, या घटनेचेंही त्यांनीं स्वागत केलें.

## महाराष्ट्राच्या विकासाबद्दल तळमळ

परंतु आज ज्या अन्नधान्याच्या प्रश्नाला गंभीर व महत्त्वाचें स्वरूप आलें आहे, त्या प्रश्नाकडे तातडीनें लक्ष पुरविण्याची जरुरी त्यांनीं ४।५ वर्षांपूर्वीं प्रतिपादिली हें विशेष होय. ते त्याप्रसंगीं म्हणाले होते कीं, "आपणास सर्वांगीण उन्नति साधावयाची आहे. आणि त्यासाठीं शेतीचें व शेतमालाचें उत्पादन जास्तींत जास्त कसें वाढवितां येईल, याकडे आपणांस विशेष लक्ष द्यावें लागेल. आमच्या लोकांचा आर्थिक दर्जा सुधारला पाहिजे हें खरें; परंतु त्यांत सुधारणा कशी घडून येईल? जनतेची अन्नाची भूक आपणाला भागवितां आली पाहिजे. ती गरज उत्तरोत्तर वाढत चालली आहे, त्याचप्रमाणें उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं आपणाला कच्च्या मालाचा पुरवठा करतां आला पाहिजे. कोणत्याही दृष्टीनें पहा; अन्नसमस्या हीच सर्वांत महत्त्वाची आहे. अन्नधान्याच्या वाढत्या किंमतीला आळा घालून त्यांचें आपणांस नियमन करतां आलें पाहिजे. उद्योगधंद्याच्या वाढीच्या दृष्टीनेंही हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे.

"माझ्या आयुष्याचीं उणींपुरीं पन्नास वर्षें मीं औद्योगिक क्षेत्रांत वावरण्यांत घालविलीं आहेत. या काळांतील माझ्या अनुभवांच्या आधारें मी सांगूं इच्छितों कीं, आपण उद्योगधंद्यांकडे वळलें पाहिजे व त्या क्षेत्रांतील आपला वांटा उत्साहपूर्वक उचलला पाहिजे, असें अलीकडे लोकांना तीव्रतेनें

वाटूं लागलें आहे. आनंदाची गोष्ट म्हणजे माझ्या दृष्टीनें सर्वांत महत्त्वाचें असें उद्योगधंद्याचें खातें मुख्य मंत्र्यांनीं स्वतःकडे घेतलें आहे. तरी महाराष्ट्रीय जनतेनें विशेषतः व्यापारी वृत्तीच्या महाराष्ट्रीयांनीं या सुसंधीचा फायदा जरूर घ्यावा, असें मला कळकळीनें सांगावेंसें वाटतें.

"अशा प्रसंगीं माझ्या महाराष्ट्रीय बंधूंना मला प्रेमभावानें एकच सल्ला द्यावासा वाटतो व तो म्हणजे "एकत्र या व सुसंघटित होऊन एकोप्यानें कार्य करण्याचें महत्त्व ओळखा. (Get together, realise the importance of team spirit.) आणि मग आपल्या बुद्धिमत्तेच्या व चिकाटीच्या बळावर तुम्हीं आपली व महाराष्ट्राची आर्थिक उन्नति झपाट्यानें घडवून आणल्याशिवाय रहाणार नाहीं."

## मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति झाली पाहिजे, त्याशिवाय महाराष्ट्राची औद्योगिक व इतर दृष्टींनीं भरभराट होणार नाहीं, अशी बाबासाहेबांची व त्यांच्या कुटुंबियांची पूर्वीपासूनची विचारसरणी होती. महाराष्ट्र चेंबरच्या व्यासपीठावरूनही आपली ती इच्छा बाबासाहेबांनीं स्पष्ट शब्दांत प्रकट केलेली आहे. राज्य पुनर्घटना मंडळापुढेंही बाबासाहेब व त्यांचे चिरंजीव अण्णासाहेब यांनीं ही विचारसरणी ठासून व स्पष्ट शब्दांत मांडलेली आहे. त्या काळांत मुख्य मंत्रीपद होतें ना. मुरारजी देसाई यांच्याकडे. त्यांचा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीस कसून विरोध होता, हें सर्वांना माहीत आहे. त्यावेळीं अण्णासाहेब हे ले. कौन्सिलचे सभासद होते. ते ना. मुरारजीभाईंच्या विचारसरणीस तेथेंही विरोध दर्शवीत असत. त्यामुळें अण्णासाहेब डहाणूकर यांच्यावर त्यांचा रोष झालेला होता. त्यानंतर बाबासाहेबांची व ना. मुरारजी देसाई यांची एकदां भेट झाली असतां ते म्हणाले होते कीं, "तुम्ही कॉंग्रेस पक्षांतील माणसें. असें असतां तुमचे चिरंजीव मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीस पाठिंबा देतात, याची सांगड कशी घालायची?"

त्यावर बाबासाहेबानीं त्यांना स्पष्ट शब्दांत जाणविलें कीं, "प्रत्यक्ष तुमच्या मंडळींत ना. भाऊसाहेब हिरे, नानासाहेब कुंटे यांच्यासारखी मंडळी त्याच मताची आहेत, तेथें इतरांचें काय? याची जाणीव आपणांस असेलच. शिवाय कॉंग्रेसच्या सभासदांस मतस्वातंत्र्याचा अधिकार देण्यांत आलेला आहेच. मात्र कॉंग्रेस दुबळी होईल अशा रीतीनें कोणीही प्रचार करूं नये, असा आदेश देण्यांत आलेला आहे. अण्णासाहेबांस या गोष्टींची जाणीव आहे व ते कॉंग्रेसच्या आदेशाविरुद्ध केव्हांहि वागणार नाहींत याबद्दल आपण खात्री बाळगावी व त्यांच्या बाबतींत वृथा गैरसमज करून घेऊं नये."

यावरून बाबासाहेबांच्या धोरणाची बरोबर कल्पना करतां येईल.

राज्यपुनर्घटना मंडळाचा अहवाल बाहेर पडल्यानंतरही ना. मुरारजीभाईंनीं मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति होऊं नये यासाठीं पराकाष्ठेचें प्रयत्न केले. परंतु महाराष्ट्रीय जनतेच्या निष्ठेपुढें व निर्धारापुढें शेवटीं त्यांना हार खावी लागली! त्या काळांत शंकरराव देव यांचें वास्तव्य बाबासाहेबांकडे होतें.

डहाणूकर मंडळी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या बाजूची आहेत व त्यासाठीं ते झटून प्रयत्न करीत आहेत, या गोष्टीचा फायदा घेऊन त्याकाळीं कांहीं गुजराथी वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या विपर्यस्त बातम्यांची आठवण याप्रसंगीं झाल्याशिवाय रहात नाहीं. त्यांपैकीं कांहीं पत्रांतून असें वृत्त प्रसिद्ध झालें होतें कीं, डहाणूकर हे गुंडांना हाताशीं धरून मुंबईंतील गुजराथी मंडळींत व अन्य समाजांतील लोकांत धाकदपटशा निर्माण करूं पहात आहेत व त्यासाठीं लागेल तेवढा पैसा खर्च करण्याची त्यांची तयारी आहे!

या बाबतच्या बातम्या धादांत खोट्या होत्या. त्यांचा उगम कुठून झाला हें सांगतां येणें कठीण आहे. परंतु त्या बातम्या बाबासाहेबांच्या कानापर्यंत पोहोंचल्या तेव्हां ते एवढेंच म्हणाले कीं, "असले विचार आमच्या मनांत केव्हांही येण्याची शक्यता नाहीं. सर्व समाजाशीं आमचे स्नेहभावाचे संबंध आहेत. सर्वांनीं येथें राहून एकमेकांस सहकार द्यावयाचा आहे. आमच्या

वागणुकींत आडपडदा किंवा लपवाछपवी बिलकूल नाहीं. आमचा कोणाशींही विरोध नाहीं. मग कोणी आमच्याविरुद्ध अपप्रचार केला तर त्याचीं फळें ते भोगतील! आम्हीं त्याकडे लक्ष देण्याचें कांहीं कारण नाहीं. जें रास्त आहे तें घडून येईल व कालांतरानें सर्व कांहीं ठीक होईल."

ता. १ मे १९६० रोजीं मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति जाहीर झाली तेव्हां फार दिवसांची आपली इच्छा परिपूर्ण झाल्याबद्दल बाबासाहेबांस आत्यंतिक आनंद झाला, आणि आपला आनंद प्रगट करण्यासाठीं महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळास मेजवानी देऊन महाराष्ट्रासंबंधींच्या आपल्या आशाआकांक्षा प्रकट करण्याचा पहिला मान बाबासाहेबांनीं पटकाविला.

## ११.

# बाबासाहेबांचे परदेशांतील दौरे

**औद्योगिक** दृष्ट्या व इतर सर्व दृष्टींनीं सुधारणांचें शिखर गांठलेल्या यूरोप-अमेरिकेचें आकर्षण स्वाभाविकपणें सर्वांना असतें. त्या खंडांतील देशांनीं आपली सुधारणा कशा रीतीनें करून घेतली, प्रत्येक क्षेत्रांत आजकाल त्या दोन्ही खंडांतील लोक आघाडीवर आहेत, नवनवीन शोध लावून जगांतील जनतेच्या सुखांत भर घालीत आहेत व स्वतः ऐश्वर्य भोगीत आहेत.

**यूरोप अमेरिकेची ओढ**

महत्त्वाकांक्षी बाबासाहेबांच्या मनास यूरोप अमेरिकेची ओढ विद्यार्थि दशेपासून होती. त्यांच्याठायीं चौकसपणा निर्माण झालेला होता. ते लोक पुढें कां व आपण इतके मागें कां? कोणत्या गुणांच्या व परिस्थितीच्या बळावर त्यांनीं वैभवश्री संपादन केली हें बाबासाहेबांना प्रत्यक्षपणें पहायचें होतें. तसें नसतें तर नांवारूपाला येत असलेला हातांतील धंदा बाजूला ठेवून १९२६ सालीं त्यांनीं यूरोपकडे आपला मोर्चा कशाला वळविला असता? देशांची, लोकांची व उद्योगधंद्यांची पहाणी करणें हाच त्यावेळीं त्यांचा एकमेव हेतु होता. आपल्या ठायीं असलेल्या निरीक्षण-शक्तीच्या व चौकस-बुद्धीच्या बळावर तो उद्देश त्यांनीं साध्य करून घेतला. त्यांच्या मनाला खुराक हवा होता तो मिळाला; त्याचप्रमाणें कर्तृत्व गाजविण्यासाठीं जरूर

असलेली स्फूर्तीही त्यांना मिळाली. कोणत्या गुणांच्या बळावर मनुष्य कर्तबगार व वैभवसंपन्न होऊं शकतो, याचें तुलनात्मक ज्ञान या पहिल्याच दौऱ्यांत त्यांना झालें. अनेक ग्रंथांचें आलोडन करून जें ज्ञान पदरीं पडलें नसतें तें यूरोप-अमेरिकेच्या प्रत्यक्ष दर्शनानें त्यांनीं मिळविलें; व यापुढील काळांत त्या संपादित ज्ञानाचा त्यांनीं भरपूर उपयोग करून घेतला.

## मालकवर्गाचे प्रतीनिधी

त्यानंतर यूरोपला जाण्याचा दुसरा सन्माननीय सुयोग त्यांच्या वांट्यास १९३९ सालीं आला. बाबासाहेब त्यावेळीं महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेच्या माननीय अध्यक्षपदावर होते. यूरोपमध्यें जिनीवा येथें पंचविसावी आंतरराष्ट्रीय कामगार परिषद भरावयाची होती. मालकवर्गाचे प्रतिनिधी या नात्यानें त्या परिषदेसाठीं सरकारतर्फे त्यांची निवड झाली. ही निवड करून सरकारनें त्यांचा, त्याचप्रमाणें महाराष्ट्र चेंबरचाही बहुमान केला. त्यामुळें त्यांचें नांव भारतभरच नव्हे तर यूरोप व इतर देशांतूनही गाजलें. त्या ठिकाणीं नाना देशींचे प्रतिनिधी आले होते. खेळीमेळीच्या वातावरणांत बाबासाहेबांचा त्यांच्याशीं परिचय घडून आला.

या परिषदेस हजर रहाण्यासाठीं बाबासाहेबांनीं ता. २५ मे १९३९ रोजीं मुंबई सोडली. त्यांच्याबरोबर त्यांचे मदतनीस या नात्यानें चेंबरचे सेक्रेटरी दत्तोपंत केळकर हे होते. ही मंडळी ता. ६ जून रोजीं जिनीवा येथें पोहोंचलीं. परिषदेचें कामकाज ता. ८ ते २८ जूनपर्यंत चालू होतें. परिषदेला सरकार, मालक व कामगार या तिन्ही वर्गांतर्फे १५६ प्रतिनिधी हजर होते. त्याशिवाय प्रतिनिधींचे सल्लागार, सेक्रेटरी वगैरे सर्व मिळून ३६४ लोक हजर होते.

## जिनीवा येथील कार्यक्रम

सर्व कामकाज व्यवस्थितपणें पार पडावें यासाठीं वेगवेगळ्या कमिट्या स्थापन करण्यांत आल्या होत्या. बाबासाहेबांची योजना पुढील तीन कमिट्यांवर

झालेली होती : (1) Selection Committee, (2) Committee on hours of work in road transport, (3) Committee on indigenous workers, (4) Committee on hours of work in coal mines.

याशिवाय तांत्रिक शिक्षण कमिटीवरही त्यांची योजना करण्यांत आली होती. मालकांचे प्रतिनिधी या नात्यानें इतर मालक प्रतिनिधींत त्यांचा दर्जा बहुमानाचा होता.

ता. १४ जून रोजीं बाबासाहेबांनीं हजर असलेल्या सर्व प्रतिनिधींना एक थाटाची मेजवानी दिली. नाना देशींच्या नामवंत प्रतिनिधींनीं त्या मेजवानीचा लाभ घेतला. आंतरराष्ट्रीय कामगार कचेरीचे संचालक जे. जी. विनँट, भारताचे इंग्लंड येथील हायकमिशनर सर फेरोजखान नून, तसेंच सर फ्रँक नॉईस, सर फॉर्बस वॅटसन, हॅरिमन वगैरे त्या काळांतील बड्या मंडळीशीं या भोजनसंमारंभाच्या निमित्तानें बाबासाहेबांचा विशेष परिचय घडून आला.

## भारताचा अनुल्लेख जाणवला

आंतरराष्ट्रीय कामगार कचेरीचे संचालक यानीं या परिषदेस जागतिक कामगारविषयक प्रश्नासंबंधानें एक अहवाल सादर केलेला होता. त्यावर बाबासाहेबानीं सडेतोड भाषण करून भारताकडे हीन दृष्टीनें पहाण्याच्या सार्वत्रिक भावनेचा निषेध केला. ते म्हणाले, "औद्योगिकदृष्ट्या भारताचा जगांत आठवा क्रमांक लागतो. तेथें उद्योगधंदे आहेत. कामगार व मालक यांचे प्रश्नही आहेत; परंतु आपल्यापुढें जो अहवाल सदर करण्यांत आला आहे, त्यांत भारतीय प्रश्नांचा उल्लेख नाहीं. जुलमाच्या रामरामाला एके ठिकाणीं सहज जातां जातां उल्लेख करण्यांत आला आहे!"

पुढें ते म्हणाले, "जगांतील सर्व राष्ट्रांना निरनिराळ्या कारणांमुळें एकमेकांवर अवलंबून रहावें लागत असतें. भारत हा शेतीप्रधान देश आहे.

कच्चा माल पुरविणारा आहे. परंतु तो नेहमीं तसाच रहावा, त्या देशांत उद्योगधंद्यांना वाव मिळूं नये, अशी आपली अपेक्षा आहे काय? अनेक देशांनीं भारताला आपली बाजारपेठ करून तेथें हातपाय पसरण्यास सुरुवात केली आहे. परंतु हा प्रकार सतत चालू राहूं शकणार नाहीं. त्यांत आज ना उद्यां थारेपालट घडून आलाच पाहिजे.

"भारत एकलकोंडा राहूं शकत नाहीं. इतर देशांच्या सहकाराची त्याला अपेक्षा आहे. औद्योगिकदृष्ट्या भारताचा विकास शक्य तेवढ्या लौकर घडून आला पाहिजे. त्यांतच भारताचें, तसेंच इतर देशांचेंही कल्याण आहे. भारतांत कच्च्या मालाची सुबत्ता आहे, भरपूर मनुष्यबळ आहे व बाजारपेठही किती तरी मोठी आहे. या सर्व साधनसामुग्रीच्या बळावर भारत औद्योगिक क्षेत्रांत क्रांति घडवून आणील. परंतु शेतीशिवाय भारताला दुसरा रोजगारधंदा नाहीं, अशी परिस्थिति आहे. अशा स्थितींत जनतेचें रहाणीमान वाढावें कसें? जिकडे तिकडे दारिद्र्य बोकाळलें आहे; कारण उद्योगधंद्यांना उत्तेजन नाहीं. अनेक धंद्यांच्या बाबतींत सरकारकडून संरक्षण मिळणें अत्यंत जरूर असतां तें मिळूं शकत नाहीं.

## स्वीडन कसा पुढें आला?

"भारत हा सर्वस्वी शेतीप्रधान देश असला तरी शेतीच्या विकासाकडेही कोणाचें लक्ष नाहीं. शास्त्रीय धोरणानें शेती केली असतां उत्पन्नांत वाढ होईल; परंतु शास्त्रीय पद्धतीकडे कोणी लक्ष पुरवीत नाहीं. किती तरी शेतीप्रधान उद्योगधंदे करून उत्पन्न वाढवितां येण्यासारखें असतां त्या महत्त्वाच्या प्रश्नांकडे भारतांत दुर्लक्ष केलें जात आहे. स्वीडनसारखा देश आधुनिक यंत्रसामुग्रीच्या व तंत्रविद्येच्या बळावर हांहां म्हणतां प्रगति करून घेऊं शकतो, लोकांचें रहाणीमान एकदम तिप्पटीनें वाढवूं शकतो आणि भारतासारखा प्रचंड देश मोठ्या प्रमाणांत साधन सामुग्रीनें सुसज्ज असतां औद्योगिक क्षेत्रांत सर्वांच्या मागें रहातो, याचें कारण आपण शोधून काढलें पाहिजे.

क्रमांक ९२५५५ नों दि. १५।।।६५



"भारतासारखे औद्योगिक दृष्ट्या जे देश मागासलेले आहेत त्यांची उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें शक्य तेवढी वाढ होत गेली पाहिजे. त्याशिवाय लोकांची भरभराट होत नाहीं व लोकांच्या हातांत पैसा खेळत नाहीं. जनतेची क्रयशक्ति वाढण्याचें मुख्य साधन म्हणजे उद्योगधंद्यांची वाढ हेंच होय. भारताच्याच नव्हे तर इतर देशांच्या दृष्टीनेंही भारताची क्रयशक्ति वाढणें जरुरीचें आहे.

**मालक काय करणार ?**

"भारतांतील मालकवर्गालाही फार जपून पावलें टाकावीं लागतात. परकीय भांडवलदारांशीं त्यांना सामना देणें साधत नाहीं. भारतांत औद्योगिक क्षेत्रांत हातपाय पसरणारा परदेशी भांडवलदार सर्व सोयींनीं सुसज्ज असतो. त्याला सरकारचें भरपूर पाठबळ असतें. त्याच्या पाठीशीं अनुभवांचें, तंत्रज्ञांचें व अर्थज्ञांचेंही भरपूर पाठबळ असतें. त्यांच्यापुढें भारतीय भांडवलदाराला हात टेकावे लागले तर त्यांत नवल कसलें ? कामगारवर्गासाठीं नानाप्रकाच्या सुखसोयी कराव्या असें त्याला फार वाटतें. परंतु अनेक बंधनांखालीं त्याला वावरावें लागतें, यामुळें त्याचा निरुपाय होत असतो. त्यामुळें कोणतीही नवीन सुधारणा असो, त्याला आस्ते कदम व फार सावधगिरीनें पावलें टाकावीं लागतात."

शेवटीं बाबासाहेब म्हणाले, "माझ्या मतें भारतापुढें सध्यां अत्यंत महत्त्वाचा असा जर कोणता प्रश्न असेल तर तो म्हणजे देशाची व जनतेची आर्थिक स्थिति सुधारणें हाच होय. देशांत उद्योगधंद्यांचें जाळें पसरल्याशिवाय ती गोष्ट साध्य होणार नाहीं. त्यासाठीं हिंदी भांडवल हिंदी लोकांनीं उपयोगांत आणलें पाहिजे. त्याशिवाय भारतीय जनतेची स्थिति सुधारणार नाहीं."

बाबासाहेबांनीं त्या काळांत भारतीय जनतेच्या दारिद्र्याचें कारण बरोबर ओळखलें होतें व तेंच त्यांनीं जिनेवा येथील परिषदेपुढें खुल्या दिलानें मांडिलें.

या दौऱ्यांत बाबासाहेबांची तब्येत असावी तशी ठीक नव्हती; तरीही परिषदेच्या कामांत उत्साहपूर्वक भाग घेऊन त्यांनीं भारतीय परिस्थितीची सर्वांना यथातथ्य कल्पना करून दिली. अशाप्रसंगीं तेंच तर महत्त्वाचें कार्य असतें. मिळालेल्या संधीचा जास्तींत जास्त फायदा घ्यावयाचा, या आपल्या धोरणाला अनुसरून बाबासाहेबांनीं जिनेवा येथील तीन आठवडे सत्कारणीं लाविले.

परिषदेचें कामकाज संपतांच केळकर यांच्यासह बाबासाहेब डेन्मार्क, हॉलंड, बेल्जम, जर्मनी वगैरे देशांना भेट देणार होते; परंतु प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें तो बेत रहीत करून ते कांहीं दिवस विश्रांतीसाठीं लंडनमध्यें जाऊन राहिले.

हा बेत रद्द होण्यास दुसरेंही एक महत्त्वाचें कारण होतें. युरोपांत दुसरें महायुद्ध पेटण्याचा तो आरंभकाळ होता. पाणसुरुंगाच्या साहाय्यानें बोटी बुडविण्यांत येत होत्या. बाबासाहेब बोटीनें प्रवास करीत होते. त्यांच्या बरोबर सुटलेल्या दोन बोटींना जलसमाधि मिळाल्याचें त्यांना समजून आलें त्यावेळीं त्यांच्या मनाची काय स्थिति झाली असेल याची कल्पनाही करणें कठीण आहे; परंतु बाबासाहेबांकरवीं ईश्वराला महत्त्वाचें कार्य पार पाडून घ्यायचें होतें म्हणूनच कीं काय त्यांच्या बोटीवर संकट ओढवलें नाहीं !

**आम्हीं काय शिकावें ?**

परदेशांतील दौऱ्यांचें आकर्षण बाबासाहेबांस नेहमीं वाटत असे. त्यामुळें युरोप–अमेरिकेला त्यांनीं १।२ वेळां नव्हे तर ५।६ वेळां भेट दिली. कांहीं ना कांहीं नवीन शिकण्याची त्यांची हौस त्यांना स्वस्थ बसूं देत नसे. नवीन ओळखी व्हाव्या, नवनवे देखावे पहावे, कारखान्यांची प्रगति पहावी, यांत्रिक क्षेत्रांतील घडामोडी पहाव्या व या सर्वांपासून आपल्या देशासाठीं आपण काय घ्यावें व काय शिकावें, याकडे त्यांचें नेहमीं लक्ष असे.

युरोप–अमेरिकेचा दुसरा दौरा संपवून परत आल्यानंतर महाराष्ट्र चेंबरच्या व्यासपीठावरून आपले परदेशांतील अनुभव सांगतांना ते म्हणाले

होते कीं, "अमेरिका, इंग्लंड, जर्मनी व जपान यांसारख्या पुढारलेल्या देशांपासून प्रस्तुतच्या शास्त्रीय व औद्योगिक युगांत आपणांस पुष्कळ उचलण्यासारखें आहे. फार काय? आम्हांमध्यें शास्त्रीय व आधुनिक दृष्टीचा प्रसार होण्यावरच आमची सर्वांगीण प्रगति अवलंबून आहे, असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. आमच्या देशांत हरएक प्रकारच्या कच्च्या मालाची समृद्धि आहे, कामगारवर्ग आहे, मोठी व वाढती बाजारपेठ आहे. असें असतां आमची औद्योगिक प्रगति सत्वर कां होऊं नये? ती सत्वर होण्यावरच अधिकाधिक लोकांना रोजगारधंदा उपलब्ध होऊन देशांतील संपत्ति वाढणार आहे व देशांत सुबत्ता होणार आहे. मात्र या कामीं ज्याप्रमाणें सरकारचें साहाय्य हवें त्याचप्रमाणें आपल्या व्यापारीवर्गांत व इतर जनतेंत खरी व जागतिक स्वदेशी भावना हवी."

युरोप-अमेरिकेच्या प्रवासाबद्दल एका काळीं लोकांना फार वाटायचें. आतां त्या भावना राहिलेल्या नाहींत. सर्व दृष्टींनीं अलीकडे युरोप-अमेरिका आपल्या देशाच्या जवळपास आलेली आहेत. त्या देशांचे बाबासाहेबांनीं अनेक दौरे केले. त्यांच्या चिरंजीवांनींही केले व आतां त्यांचे नातूही शिक्षणसंपादनार्थ परदेशाच्या दौऱ्यावर जाऊं लागले आहेत. हें काल-माहात्म्य आहे.

युरोप व अमेरिकेंतील देश आजही अनेक क्षेत्रांत आघाडीवर आहेत. त्यांच्या मानानें आम्ही अजूनही किती तरी मागें आहोंत. गुणांच्या, सुधारणांच्या व संपत्तीच्या दृष्टीनें आम्हांला त्यांच्या बरोबरीचा दर्जा मिळवावयाचा आहे. तो मिळवायला आणखीं किती वर्षें लागतात, हेंच पाहावयाचें आहे.

# १२.


# धार्मिक जीवन

**देवधर्म**, पूजाअर्चा, पुराणप्रवचन आदि धार्मिक गोष्टींना जेथें महत्त्वाचें स्थान आहे अशा कुटुंबांत बाबासाहेब लहानाचे मोठे झाले. त्यांची आई त्याचप्रमाणें वडील अत्यंत धर्मनिष्ठ. रोजचे धार्मिक विधि पार पाडल्याशिवाय अन्न घ्यायचें नाहीं, हा त्यांचा नित्यक्रम असे. स्नानसंध्या, पूजाअर्चा, नामस्मरण व भजनपूजन या गोष्टींना त्यांच्या जीवनांत महत्त्वाचें स्थान होतें. त्यांच्याच कां ? त्याकाळीं अनेकांच्या जीवनांत देवधर्माला स्थान होतें. आज मात्र तो मनू पालटलेला आहे.

## बालपणांतील धार्मिक संस्कार

बाबासाहेबांच्या मनावर बालपणीं जे धार्मिक संस्कार घडले ते, त्यांचें मुंबईत वास्तव्य झालें, त्यांना इंग्रजी शिक्षणाचा लाभ घडला, ते उद्योगधंद्यांशीं समरस झाले व युरोपअमेरिकेचे दौरे करून आले, तरीही त्यांना कायमचे चिकटून राहिले. एवढेंच नव्हे तर त्या संस्कारांत उत्तरोत्तर अधिकाधिक भर पडत गेली.

उद्योगधंद्याच्या व्यापांत पडल्यापासून बाबासाहेबांना खरीखुरी साथ जर कोणी दिली असेल तर ती देवावरील असीम श्रद्धेनेंच होय. श्रद्धा अंतःकरणपूर्वक असावी लागते. देवाच्या दरबारांत दिखाऊपणाला स्थान नाहीं. अंतरंग निर्मळ श्रद्धेनें न्हाऊन धुऊन निघावें लागतें. बाबासाहेबांना या




बाबासाहेबांनीं पहिलेंच रंगीत चित्र काढलें तें श्रीगणरायाचें.
त्याचें हें एकरंगी छायाचित्र.

गोष्टीची जाणीव झालेली होती. त्यामुळें देवधर्माच्या बाबतींत तेथें पोकळपणा नव्हता. त्यांनीं औद्योगिक क्षेत्रांत उडी मारिली आणि ती जिंकण्याची ईर्षा बाळगिली ती या श्रद्धेच्या बळावर. देव माझा पाठिराखा आहे; तो मला कधींही अंतर देणार नाहीं, ही जाणीव जशी प्रेरक तशीच तारकही आहे; परंतु त्यासाठीं श्रद्धेचें संपूर्ण बळ पाठीशीं असावें लागतें. बाबासाहेबांनीं बालपणापासून तें बळ जवळ करून ठेविलें होतें.

ईश्वरभक्तिशिवाय सारें व्यर्थ आहे. तोच आपला एकमेव आधार व संकटप्रसंगीं मार्ग दाखविणारा. आपण त्याचें मनोभावें स्मरण करावयाचें. ही साधीसुधी भावना त्यांच्या अंतःकरणांत ज्या दिवशीं प्रकट झाली, तो दिवस भाग्याचा समजला पाहिजे. त्या भावनेनें त्यांचें सारें जीवन व्यापून टाकिलें व तिनें त्यांच्याकडून कर्तबगारीचीं नाना प्रकारचीं कृत्यें करवून घेतलीं.

बाबासाहेब शुद्ध बालबोध वळणांत वाढले व शेवटपर्यंत तेंच वळण कायम राहिलें. युरोप-अमेरिकेला ५।६ वेळां जाऊन आले, नाना धर्मांच्या लोकांशीं संबंध जडला, परंतु पूर्वीच्या वळणांत कोणत्याही प्रकारचा फरक घडून आला नाहीं.

एकदां ऐन तारुण्यांत आपण गुरुपदेश घ्यावा असें त्यांना तीव्रतेनें वाटूं लागलें. पंढरपूर येथें जयरामस्वामी या नांवाचे कोणी सत्पुरुष रहात असत. त्यांची भेट घेऊन गुरुपदेशाची आपली इच्छा त्यांनीं पूर्ण करून घेतली. त्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनानुसार त्यांनीं आपलें धार्मिक जीवन बनविलें.

### देवकृपेची जरुरी

आपण उद्योगधंद्याच्या व्यापांत असलों तरी त्याला देवकृपेची जरुरी आहे, त्याच्या इच्छेशिवाय झाडाचें पानही हालूं शकत नाहीं मग आपलें काय? तेव्हा त्या कृपेचा आधार आपण संपादन केला पाहिजे, ही तळमळ त्यांच्या अंतःकरणांत सदैव वावरत असे आणि तीच त्यांना नामस्मरणाची कांस धरायला लावीत असे. स्नानोत्तर करायची पहिली गोष्ट म्हणजे आपल्या

आराध्यदैवताला भक्तिभावपूर्वक फुलें वाहायचीं. तिच्या पायाशीं बसून स्वस्थ चित्तानें तिचें ध्यान करायचें. हातांत माळ घेऊन नामस्मरणांत थोडा वेळ का होईना, निमग्न व्हावयाचें. त्या कांहीं क्षणांत मनाला मिळणाऱ्या शांततेची व पावित्र्याची तुलना कशाशींही करता येणार नाहीं. रोज जे व्याप व उलाढाली करायच्या त्या या वेळच्या कमाईच्या बळावर !

शंख, चक्र, गदाधारी विष्णूची प्रतिमा म्हणजे बाबासाहेबांचें आराध्य दैवत. त्या प्रतिमेवर त्यांचें भारी प्रेम. आणि ती प्रतिमा कोणती माहीत आहे? औंधचे चित्रकलाप्रेमी व चित्रकार राजेसाहेब श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी यानीं आपल्या कुंचल्यानें रंगविलेली व छापून प्रसिद्ध केलेली ! ती भगवंताची प्रतिमा आपल्या डोळ्यांना जिकडे तिकडे दिसावी ही त्यांची इच्छा ! कारखान्यांत असो; कचेरींत असो वा घरीं असो. दिवाणखान्यांत, झोपायच्या खोलींत, जिकडे जाल तिकडे तुम्हांला पुष्पहारमंडित विष्णूची प्रतिमा दृष्टीस पडेल ! देवघरांत तर तिला स्थान मिळायचेंच. परदेशाच्या प्रवासास निघाले तरी बाबासाहेब आपली आवडती विष्णूची प्रतिमा बरोबर घ्यायला विसरणार नाहींत ! एखाद्याला आपल्या आवडीचें म्हणून बक्षीस द्यावेसें वाटलें तर सुंदर व मौल्यवान चौकटींत बसविलेली विष्णूची प्रतिमा ते भक्तिभावपूर्वक देतील ! एवढी त्या प्रतिमेवर निष्ठा !

### कीर्तनांची आवड

नेहमीं उद्योगधंद्यांच्या व्यापांत व चिंतनांत गुंतलेले बाबासाहेब चांगलें कीर्तन ऐकण्यासाठीं हपापलेले असत.

रेडिओवर दर गुरुवारीं कीर्तनाचा कार्यक्रम असतो. तो कोणाचा व किती वाजतां सुरू होईल, ही माहिती अगाऊ त्यांना नियमितपणें द्यावी लागत असे. सायंकाळीं कामकाज संपवून घरीं जाण्यापूर्वी एखाद्या मंदिरांत जाऊन देवदर्शन घडल्याशिवाय मनाचें समाधान व्हायचें नाहीं. रात्रौ झोपी जाण्यापूर्वी अर्धा तास भजन ऐकण्याची व झोपतां झोपतां भजनांत रंगून जाण्याची त्यांना संवयच जडलेली होती.

एका प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें बाबासाहेबांचें वाचन अतिशय तुटपुंजें. ते सदासर्वकाळ आपल्या औद्योगिक व्यापांत गर्क झालेले. त्यांचें नियमीत व फार थोडें असें जें वाचन होतें तें केवळ धार्मिक पुस्तकांचें. श्रीसमर्थ रामदासांचे 'मनाचे श्लोक' म्हणजे बाबासाहेबांचें जीवनसर्वस्व. त्यांच्याइतक्या श्रद्धेनें व धार्मिक भावनेनें मनाच्या श्लोकांचें नित्य पठण, मनन करणारीं माणसें निदान आजच्या काळांत तरी फारच थोडीं आढळून येतील.

**मनाचे श्लोक**

मनाचे श्लोक म्हणजे बाबासाहेबांच्या जीवनाचा आरसा. ते २०५ श्लोक वाचावे आणि मग बाबासाहेबांचा सारा जीवनपट उलगडून पहावा. त्या श्लोकांच्या छायेंत ते वावरत असलेले आढळून येतील. एखाद्या सत्पुरुषाचे उपदेशपर बोल आपण वाचतों किंवा ऐकतों. परंतु त्याप्रमाणें आचरण करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, याची जाणीव किती जणांना असते? बाबासाहेबांच्या ठायीं ती जाणीव आत्यंतिक तीव्रतेनें वास करीत आहे. 'मनाचे श्लोक' हे समजण्यास सुलभ; परंतु आपण त्यांचें सदासर्वकाळ मनन करून त्याप्रमाणें वागलें पाहिजे. त्यांत समर्थांनीं अत्यंत तळमळपूर्वक जें व्यवहार विषयक तत्त्वज्ञान सांगितलें आहे, तें कल्याणप्रद आहे, ही जाणीव झाल्या दिवसापासून मनाच्या श्लोकांचें पठण बाबासाहेब नित्य नेमानें व भक्तिभावपूर्वक करूं लागले.

एकंदर दोनशें पांच श्लोकांपैकीं ज्या कांहीं श्लोकांचा बाबासाहेबांच्या मनावर व वागण्यावर कायमचा ठसा उमटला असावा, अशा श्लोकांपैकीं फक्त पांच निवडक श्लोक पुढें देण्यांत येत आहेत:—

*मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें*
*मना बोलणें नीच सोशीत जावें*
*स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावें*
*मना सर्व लोकांस रे नीववावें*

सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा
सदा रामनामें वदे नित्य वाचा
स्वधर्मेंचि चाले सदा उत्तमचा
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा
जनीं भोजनीं नाम वाचें वदावें
अती आदरें गद्य घोषें म्हणावें
हरीचिंतनें अन्न सेवित जावें
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें
मना अल्प संकल्प तोही नसावा
सदा सत्य संकल्प तोही वसावा
जनीं जल्प वीकल्प तोही त्यजावा
रमाकान्त एकांतकाळीं भजावा
बरा निश्चयो शाश्वताचा करावा
म्हणे दास संदेह तो वीसरावा
घडीनें घडी सार्थकाची करावी
सदा संगती सज्जनाची धरावी

**जें सहज उमजलें तेंच पकडलें**

समर्थांच्या शिकवणुकीचें सार या पांच श्लोकांत आलेलें आहे असें वाटतें. हीच शिकवणूक आचारणांत आणण्यासाठीं बाबासाहेब श्रद्धापूर्वक व भक्तिभावपूर्वक झटले. इमारतीचा पाया खंबीर व मजबूत असावा लागतो. त्याचप्रमाणें प्रत्येक व्यक्तिमात्रानें आपल्या जीवनाचें मूलभूत सूत्र शोधून तपासून घेऊन त्याच्या आधारावर एकंदर जीवनक्रमाची आखणी करावी लागते. बाबासाहेब कोणत्याही अवघड तत्त्वज्ञानाच्या अवडंबरांत सांपडले नाहींत. जें हाताला सहज लागलें, सहज उमगलें, तेंच पकडून त्याच्या आधारें त्यांनीं आपलें जीवनपुष्प फुलविलें व त्याचा सुगंध आपोआप सर्वत्र पसरला.

बाबासाहेबांच्या नित्य पाठांतील दुसरें पुस्तक म्हणजे '*गीताहृदय*' हें होय. 'गीताहृदय'मध्यें संत विनोबा भावे यांनीं धुळें येथील तुरुंगांत गीतेच्या अठरा अध्यायांवर जीं प्रवचनें दिलीं त्यांचा पूज्य सानेगुरुजी-लिखित सारांश ग्रथित करण्यांत आलेला आहे. नित्य पाठांतील या छोट्या पुस्तकाचें बाबासाहेबांच्या जीवनांत किती महत्त्वाचें स्थान आहे, याची थोडीशी जाणीव मागील एका प्रकरणांत करून दिलेली आहे.

### भक्तिमार्ग प्रदीप

धार्मिकदृष्ट्या बाबासाहेबांचें विशेष आवडतें तिसरें पुस्तक म्हणजे ह. भ. प. ल. रा. पांगारकर यांचें '*भक्तिमार्गप्रदीप*' हेंच होय. गेल्या ५०।६० वर्षांपासून हा 'प्रदीप' महाराष्ट्रभर भक्तिमार्गाचा प्रसार अखंडपणें करीत आहे. यांत काय नाहीं? महाराष्ट्रांत होऊन गेलेल्या साधुसंतांचे अभंग, भूपाळ्या, आरत्या, स्तोत्रें, प्रार्थना वगैरे भक्तिमार्गी भाविक मनाला भारून टाकणारें सर्व कांहीं आहे. आतांपर्यंत पंचवीस आवृत्त्यांपर्यंत मजल मारण्याचें महद्भाग्य फारच थोड्या धार्मिक ग्रंथांना लाभलें असेल. अशा या ग्रंथानें बाबासाहेबांच्या जीवनांत महत्त्वाचें स्थान मिळविलें असलें तर त्यांत नवल कसलें?

मनाचे श्लोक, गीताहृदय व भक्तिमार्गप्रदीप हीं तीन बाबासाहेबांचीं अत्यंत आवडतीं व नित्यपाठांतील पुस्तकें. याचा अर्थ इतर धार्मिक पुस्तकांकडे त्यांनीं लक्ष पुरविलें नाहीं असा कोणीही करून घेऊं नये. 'पंचरत्न गीता' यासारख्या इतर कांहीं धार्मिक पुस्तकांकडेही त्यांचें लक्ष असे, परंतु त्यांच्या मनाची कायमची पकड जर कोणत्या पुस्तकांनीं घेतली असेल तर ती वरील तीन पुस्तकांनींच होय. त्यांचें यशस्वी जीवन घडविण्यांत त्यांनीं घेतलेला भाग महत्त्वाचा आहे.

देवावर श्रद्धा ठेवणारा व त्याची भक्ति करण्यांत आनंद मानणारा माणूस नेहमीं प्रत्येक पाऊल त्याचें नांव घेऊन टाकणार. बाबासाहेबांच्या जीवनक्रमाकडे पाहिलें असतां असें दिसून येतें कीं, त्यांच्या जीवनांत

देवाला व धर्मभावनेला महत्त्वाचें स्थान आहे. देवावरील श्रद्धेची बळकट दोरी त्यांनीं आपल्या हातांत नेहमीं घट्ट पकडून धरली होती. माणसावर संकटें येतात; तीं आयुष्यांत कधीं ना कधीं यायचींच. तशींच तीं बाबासाहेबांवरही आलीं; परंतु त्यामुळें ते दबले गेले नाहींत. ईश्वर आपला पाठीराखा आहे, तो अंतर देणार नाहीं, या खंबीर श्रद्धेच्या बळावर त्यांना सहज लीलेनें संकटपार होतां आलें.

**सदा सर्वदा देव सन्नीध आहे**

सध्या पक्षघातामुळें कांहीं एक न करतां बिछान्यावर स्वस्थ पडून रहाण्याचें बाबासाहेबांच्या वांट्यास आलें आहे ! तुम्ही कोणत्याही अवस्थेंत असा. 'सदा सर्वदा देव सन्नीध आहे' ही भावना तुमच्या मनावर पूर्णपणें ठसलेली असली म्हणजे मग तुम्ही शारीरिक वा मानसिक दुःखाशीं धैर्यानें टक्कर देऊ शकतां. तीं दुःखें तुम्हांला सतावूं शकत नाहींत. कारण त्याच्या सान्निध्यांत तुम्ही जीवन कंठीत असतां. वाट्यास आलेलें शारीरिक दुःख सहन करण्याचें सामर्थ्य त्याच्या कृपेमुळेंच तुम्हांला प्राप्त झालेलें असतें.

तुमच्या वाट्यास आलेले दिवस आनंदाचे असोत वा दुःखाचे असोत. तुम्हीं भक्तिभावपूर्वक देवाशीं आपलें नातें जोडून ठेवलें असल्यास तुम्हीं कसलीही चिंता करण्याचें कारण नाहीं. तुमची सर्व प्रकारची चिंता वहाणारा तोच आहे.

बाबासाहेबांच्या आवडत्या धार्मिक ग्रंथांपैकीं 'भक्तिमार्गप्रदीप' हा एक असल्याचें वर सांगितलें. त्यांतील नामसंकीर्तन प्रकरणांतील पुढील अभंग बाबासाहेबांच्या श्रद्धाशील मनाला दिलासा देणारा आहे—

*'आवडीनें जरी हरिनाम घेसी। तुझी चिंता त्यासी सर्व आहे ॥ १ ॥*
*नको खेद करूं कोणत्या गोष्टीचा। पति लक्ष्मीचा जाणतसे ॥ २ ॥*
*सकळ जीवांचा करितो सांभाळ। तुज मोकलील ऐसें नाहीं ॥ ३ ॥*
*जैसी स्थिति आहे तैशा परी राहें। कौतुक तूं पाहें संचिताचें ॥ ४ ॥*
*एकाजनार्दनीं भोग प्रारब्धाचा। हरिकृपें त्याचा नाश आहे ॥ ५ ॥*

38582



बाबासाहेब औद्योगिक क्षेत्रांत आलेल्या संकटांना धैर्यानें टक्कर देत सतत पन्नास वर्षे वावरले ते कशाच्या बळावर? देवावरील निस्सीम श्रद्धेच्या बळावर. आणि आज शारीरिक व्याधींशींही ते त्याच श्रद्धेच्या बळावर झगडत आहेत!

## १३.

# कौटुंबिक जीवन

**ज्या** कुटुंबांत सुख, समाधान व शांतता नांदत आहे, तेथें देवाचें वास्तव्य आहे, असें समजायला हरकत नाहीं. कुटुंबाचा कारभार चालविण्याची जबाबदारी जास्तींतजास्त यशस्वी रीतीनें पार पाडणें, हें एक दिव्यच आहे. आजकाल एकत्र कुटुंबपद्धती जवळजवळ नामशेष झालेली आहे. नवरा, बायको आणि मुलें म्हणजे आजचें कुटुंब; परंतु अशा या मर्यादित कुटुंबांतही सुख, समाधान व शांतता यांचा लाभ होणें कठीण झालें आहे. कुटुंबचालक या नात्यानें बाबासाहेबांचा संबंध आला तो फार मोठ्या व्यापक कुटुंबाशीं. एखाद्या संस्थेचा, कारखान्याचा किंवा उद्योगधंद्याचा कारभार चालविणें यापेक्षां एखाद्या व्यापक कुटुंबाचा कारभार चालविणें फार नाजूक, तसेंच कठीण असतें. व्यक्ति तितक्या प्रकृति! प्रत्येकाच्या अपेक्षा, आवडीनिवडी व स्वभाव वेगवेगळे! त्या सर्वांचें समाधान व्हावें व सर्वांनीं प्रगतीपथावर रहावें यासाठीं झटणें, ही एकप्रकारें तारेवरील सर्कस आहे. ती यशस्वी रीतीनें पार पाडण्याची जबाबदारी बाबासाहेबांकडे आली व ती त्यांनीं आनंदानें स्वीकारली. ती पार पाडीत असतां सहनशीलता, समतोलपणा व समंजसपणा यांसारख्या गुणांची कसोटी लागली आणि त्या कसोटींत बाबासाहेब कुठवर उतरले हेंच पहावयाचें आहे.

बाबासाहेबांची वडीलधाऱ्या मंडळीच्या शब्दांवर जबरदस्त श्रद्धा. विशेषतः आपल्या वडिलांचा शब्द म्हणजे देवाचा शब्द, या भावनेनें ते

झेलीत असत. आपल्या कर्तबगार चिरंजिवाबद्दल लक्ष्मणरावांस साहजिकच मोठा अभिमान वाटायचा. बाबासाहेबांस उद्देशून एकदां ते म्हणाले होते कीं, "हें बघ, कुटुंबांतील सर्व माणसें कांहीं सारख्या तोलाचीं नसतात. प्रत्येकांत कांहीं ना कांहीं गुणदोष हे असायचेच; परंतु आपण गुण तेवढे निवडायचे. ईश्वरकृपेनें आपणास जें कांहीं मिळतें, त्याचा अभिमान कधींही बाळगूं नये. त्याच्यामागें सर्वांचे आशीर्वाद आहेत असें समजून कुटुंबांतील सर्वांच्या कल्याणासाठीं आपण झटत असावें. त्यामुळें तुझें कांहीं कमी होणार नाहीं. उलट ईश्वरकृपेनें त्यांत वाढच होत जाईल."

वडिलांनीं अगदीं जिवाभावानें केलेला हा उपदेश होता.

## वडिलांचा सदुपदेश वेदवाक्य मानिलें

वडील माणसें उपदेश करण्यांत पटाईत असतात. त्यांचा तो हक्कच असतो. परंतु अनेकांच्या बाबतींत वडीलधाऱ्या माणसांचा उपदेश एका कानानें ऐकून दुसऱ्या कानानें सोडून दिला जात असतो. बाबासाहेबांनीं तसें केलें नाहीं. वडिलांचा उपदेश आचरणांत आणण्यासाठीं ते आयुष्यभर जीवेंभावें झटले.

हेंच पहाना. आपली मुलें व आपले बंधू यांच्या बाबतींत त्यानीं कधीं कोणत्याही प्रकारें प्रपंच केला नाहीं. बंधूंच्या व मुलांच्या वयांत फारसें अंतर नव्हतें. सर्व आपलींच मुलें आहेत असें मानून प्रत्येकाच्या बाबतींत आपणास जास्तींत जास्त जें जें करतां येईल तें तें करायला त्यानीं कधींही मागें पुढें पाहिलें नाहीं. आपल्या मुलांसाठीं कर्तव्यभावनेनें दक्षतापूर्वक जें जें करावयाचें, त्याच भावनेनें आपल्या धाकट्या बंधूंसंबंधीं आपलें कर्तव्य पार पाडावयाचें. डहाणूकर कुटुंब लहानसहान नाहीं. त्याचा विस्तार व व्याप मोठा आहे. चार चुलते, त्यांची मुलेंबाळें, शिवाय इतर जवळच्या व दूरच्या नातलगांचा गोतवळा या सर्वांकडे बाबासाहेबांचें लक्ष असे. "तुम्हीं लागेल तेवढें शिक्षण घ्या. कच खाऊं नका किंवा आम्हांला कोण मदत करील याची मुळींच चिंता बाळगूं नका. मी सतत तुमच्या पाठीशीं आहें. तुम्ही

हिंमत बाळगा. कर्तबगार व्हा. जगांत नाव मिळवा." हेंच प्रत्येक तरुणास त्यांचें सांगणें असे.

### आज जो तो आपल्यापुरता

आजच्या जगांत कोण कोणाला विचारीनासा झाला आहे. जो तो आपल्यापुरता ! कोणाचे भाऊ आणि कोणाचे नातलग ! उलटपक्षीं स्वतःच्या स्वार्थासाठीं 'भाऊबंदकी' माजवून कोर्टाची पायरी चढण्याची व त्यापायीं ईर्षेला पेटून जवळ असेल नसेल तें गमावून बसण्याची आमची तयारी ! अशा गोष्टी आपल्या सभोंवारच्या जगांत प्रत्यहीं घडत आहेत ! आपण त्या पहात आहोंत आणि म्हणूनच बाबासाहेबांच्या कुटुंबनिष्ठेचें आजच्या या काळांत करावें तेवढें कौतुक थोडेंच होईल. आजकाल कौटुंबिक प्रेमाची भावना लयाला जात चालली आहे; परंतु बाबासाहेबांच्या स्वभावांतील वैशिष्ट्य हेंच कीं, कोणीही आश्चर्य करावें अशा रीतीनें त्या भावनेची, आत्यंतिक झीज, मानसिक यातना व उपद्रव आनंदानें सोसून, त्यांनीं तिची जीवेंभावें जोपासना केली.

बाबासाहेब कुटुंबांतील प्रत्येकास आपल्यापरीनें देतां येईल तेवढें उत्तेजन देत होते व जरूर त्या मदतीचा हात पुढें करीत होते; परंतु ओघास आलें म्हणून मागील एका प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें सर्वांची बुद्धि का सारखी असते? पुढें जाणारे जातात व कित्येक मध्येंच अडकून पडतात! अशी पड खाऊन कसें बरं चालेल? जीवनक्रम चालू राहिला पाहिजे ना? त्याची काय वाट? बाबासाहेबांना त्याही गोष्टीची काळजी! कुटुंबांतील एखादा पडखाऊ किंवा निराश झालेला तरुण त्यांच्यापुढें आला असतां ते त्याच्यावर रागावत नसत. प्रेमानें त्याला जवळ घेऊन व त्याच्या पाठीवरून हात फिरवीत त्यांनीं आश्वासनपूर्वक म्हणावें, "तुझ्यानें नाहीं पुढें जाववत! ठीक आहे बाबा! तुला कुठें ना कुठें एखादी नोकरी किंवा शक्य तों एखाद्या उद्योगधंद्यांत अडकविण्याची मी व्यवस्था करतों. काळजी करूं नकोस. मात्र उद्योग केला पाहिजे. जो मनापासून उद्योग करतो त्याला

त्याचें फळ मिळाल्याशिवाय राहात नाहीं. एवढी एक गोष्ट नेहमीं लक्षांत ठेव, म्हणजे झालें!"

## उद्योगधंद्यांमुळें भाग्योदय

बाबासाहेबांनीं डहाणूकर कुटुंबाकडे जसें आपुलकीनें लक्ष पुरविलें त्याचप्रमाणें आपल्या सासरच्या अर्थात् वांद्रेकर कुटुंबापैकीं ज्यांना ज्यांना मदतीची जरुरी लागली त्यांनाही शक्य ती मदत करून, आपल्या सहकाराचा निःसंकोचपणानें त्यानीं फायदा दिलेला आहे.

आणि अशा रीतीनें, आमच्या माहितीप्रमाणें, बाबासाहेबांनीं आपल्या व्यापक व वाढल्या कुटुंबांतील सुमारें दोनशें माणसांच्या उत्कर्षाला आजवर यथाशक्ति हातभार लावलेला आहे.

उद्योगधंदे व कारखानदारी हें बाबासाहेबांचें आवडतें क्षेत्र. युक्ति-प्रयुक्तीनें, चिकाटीनें व दीर्घोद्योगाच्या बळावर त्यांत त्यांनीं यश मिळविलें. त्यामुळें ते सुखी झाले व असंख्य कुटुंबांनाही त्यांनीं सुखी केलें. तसेंच आपल्या मुलांबाळांनीं, नातलगांनीं व इतरेजनांनींही त्या क्षेत्रांत वावरून आपला भाग्योदय घडवून आणावा, हीच त्यांची मनापासून इच्छा असे.

हा प्रयोग त्यांनीं प्रथम आपल्या मुलांना व कुटुंबांतील मंडळींना हाताशीं धरून केला. मुलगा असो वा दुसरा कोणी असो, त्याला उद्योगधंद्यासाठीं जरूर तेवढें भांडवल देऊन तो परिस्थितीशीं कसकशी व कुठवर टक्कर देऊं शकतो हें पहावयाचें. त्याची कुवत पहावयाची. नुकसान झाल्याचें रडगाणें घेऊन कोणी आला तर त्याला निराश करावयाचें नाहीं. त्याला शक्य तेवढें उत्तेजन द्यावयाचें. "नुकसान कां आलें याचीं कारणें शोधून काढ व पुन्हा नव्या जोमानें प्रयत्न करून पहा. यश मिळालेंच पाहिजे. उद्योगधंद्यांत कोणत्याही वेळीं कच खाऊन चालत नाहीं. कधीं नफा तर कधीं नुकसान, या गोष्टी धंदेवाइकाच्या बारशाला पुजलेल्या असतात. त्याबद्दल सुखदुःख मानण्याचें कांहीं कारण नाहीं!" हेंच त्यांचें प्रत्येकास सांगणें असे. औद्योगिक क्षेत्रांत वावरणाऱ्यांच्या दृष्टीनें हा किती मोलाचा

सल्ला आहे, नाहीं का ? तो प्रथम त्यांनीं स्वतःच्या आचरणांत आणिला व तोच प्रसाद त्यांनीं आपल्या मुलांबाळांना व जे जे कोणी आपल्या सान्निध्यांत येतील, त्यांनाही रिक्तहस्तें वाटला.

## मुलांबाळांकडे लक्ष

उद्योगधंदे व कारखानदारी हें बाबासाहेबांचें व्यसन होतें म्हणाना. सदा सर्वकाळ त्यांत गुंतलेले; असें असलें तरी आपल्या मुलांबाळांच्या शिक्षणाकडे व त्यांच्या वागणुकीकडे त्यांचें लक्ष असे. लहान वयापासून मुलांच्या मनावर सुसंस्कार घडावे लागतात. कुंभार मातीचें भांडें घडवीत असतो. तें सुंदर दिसावें व त्याला सुडौल आकार यावा यासाठीं थोपटून थोपटून तो त्याला आकार आणण्याचा प्रयत्न करीत असतो. मुलांच्या मनांत साधीसुधी परंतु उच्च रहाणी व उच्च विचारसरणी सतत घोळत रहावी, उच्च वर्णीय ब्राह्मण कुटुंबांतील मुलें कशीं सुसंस्कारी असतात, तशीं आपलीं मुलें व्हावीं, या सद्हेतूनें बाबासाहेबांनीं जें जें करणें त्यांच्या मनाला जरूर वाटलें तें तें त्यांनीं केलें. सात्विक आहाराचें महत्त्व ते जाणून होते. त्यासाठीं पहिल्या चिरंजिवाचा जन्म झाल्यानंतर घरांत त्यांनीं मांसाहाराला बंदी केली होती. मुलांना निरनिराळे विषय शिकविण्यासाठीं शीलसंपन्न व सद्वर्तनी गुरुजी ठेवून त्यांच्याकरवीं मुलांच्या मनावर सुसंस्कार घडत जातील अशी जाणीवपूर्वक व्यवस्था केलेली होती. तसेंच लहानपणापासून रामायण, महाभारत व शिवछत्रपति यांच्या कथा त्यांच्या कानावरून जाव्या व आपल्या जीवनांत त्यापासून त्यांनीं योग्य तो बोध घ्यावा, अशा गोष्टींकडेही त्यांचें बारकाईनें लक्ष असे.

## मुलाबाळांकडे लक्ष पुरवायला वेळ नाहीं

या गोष्टींचा थोडासा विस्तारपूर्वक येथें उल्लेख करण्याचें कारण एकच आहे. आजकाल आपण जन्म दिला त्या मुलांबाळांच्या बाबतींत आपलें कर्तव्य आम्ही पालन करण्यास असमर्थ ठरलेले आहोंत. स्वतःच्या नोकरीच्या



बाबासाहेबांचे पूज्य वडील
व मातोश्री
कै. लक्ष्मण बापूजी व
कै. श्रीमती सौ. कृष्णाबाई



श्री. सौ. पार्वतीबाई डहाणूकर
जामात श्री. काशीनाथपंत चिंचणकर
कन्या सौ. रत्नप्रभा चिंचणकर
१९३७

## चिरंजीवांसह बाबासाहेब व सौ. आईसाहेब



डावीकडून—१ दिनकर ऊर्फ दिनूशेट, २ बाबासाहेब, ३ शांताराम ऊर्फ अण्णासाहेब, ४ सौ. आईसाहेब (सौ. पार्वतीबाई) व दत्तात्रय ऊर्फ दादासाहेब
श्री. अण्णासाहेब उच्च शिक्षणासाठीं विलायतेस गेले त्यावेळीं घेतलेला फोटो.
(१९३७)

## नातवंडांसह सौ. आजीबाई (सौ. पार्वतीबाई)



डावीकडून बसलेले— भारत, दिलीप, कु. मीना, सौ. पार्वतीबाई (आजीबाई) व अरुण. उभे—किरण व प्रकाश
चि. दिलीपकुमार (अण्णासाहेबांचे चिरंजीव) हे उच्च शिक्षणासाठीं अमेरिकेस गेले (१९६४) त्यावेळीं घेतलेला फोटो.

व उद्योगधंद्याच्या व्यापांत हरघडी आम्हीं इतके गुंतून गेलेले असतो कीं, घरांतील मुलांबाळांकडे लक्ष पुरवायला आम्हांला क्षणाचीही फुरसद नसते! पुन्हां, 'काय करणार हो! सध्यां नोकरीधंद्याचा व्याप इतका कांहीं वाढला आहे कीं, घरांत लक्ष द्यायला वेळच मिळत नाहीं', अशी फुशारकी मारण्याची आमची तयारी! या सर्वसाधारण वृत्तीमुळें आपल्या कुटुंबी जनाचें, समाजाचें व राष्ट्राचेंही नुकसान करण्यास आम्हीं फार मोठ्या प्रमाणांत कारणीभूत होत असतों, या गोष्टीची संपूर्णपणें जाणीव आम्हां सर्वांना ज्या दिवशीं होईल तो दिवस भाग्याचा!

बाबासाहेबांनीं आपल्या कुटुंबांतील मंडळीसाठीं अगदीं मनापासून जें जें करतां येईल तें तें सर्व केलें. आपल्या पूज्य वडिलांचा शब्द त्यांनीं कर्तव्यबुद्धीनें पालन केला; परंतु त्या गोष्टीचा कधींही अभिमान बाळगला नाहीं. ते म्हणतील, "माझ्या हातून जें कांहीं अल्पस्वल्प घडलें, तें कशासाठीं? माझ्या मनाच्या समाधानासाठीं! जन्माला येऊन कर्तव्यपालनाचें समाधान लाभावें म्हणून मी जीवनभर झगडलों, जें करतां आलें तें करीत गेलों. कांहीं बाबतींत यश मिळवूं शकलों तर कांहीं बाबतींत अपयशही गाठीशीं बांधून घ्यावें लागलें! जें कांहीं बरेंवाईट हातून घडलें तें सारें देवाला अर्पण! त्याबद्दल मी सुख:दुख कांहीं मानीत नाहीं."

## मानसिक समाधान

केवढा मोठा उद्योगी व ध्येयनिष्ठ पुरुष! परंतु पक्षघातामुळें गेल्या वर्षापासून (१९६३) त्यांना बिछान्यास खिळून रहावें लागलें आहे! त्या परावलंबी स्थितींत जीवन कंठीत असतां त्यांच्या अंतःकरणाला नेहमीं दिलासा व आनंद देणारा जर कोणता विचार असेल तर तो हाच कीं, मीं कोणाच्याही बाबतींत कर्तव्यचुकारपणा केला नाहीं. जे जे माझ्यासन्निध आले, त्यांपैकीं प्रत्येकासाठीं मीं कांहीं ना कांहीं केलें. मनाची पकड घेऊन मनाला नेहमीं समाधान देणारी ही महत्त्वाची गोष्ट आहे, नाहीं का? बाबासाहेबांचीं मुलेंबाळें, नातवंडें व इतर कोणीही आज त्यांच्यापुढें गेले

असतां कृतज्ञताभावानें त्यांची मान खालीं वाकल्याशिवाय रहात नाहीं! जीवनांत यापेक्षां अधिक काय मिळवायचें? समाधान! निर्भेळ मानसिक समाधान! ईश्वरकृपेनें बाबासाहेबांच्या वांट्यास आज तें आलेलें आहे व त्यामुळें वाटणाऱ्या सात्वीक आनंदांत ते जीवन कंठीत आहेत!

कुटुंबांत पत्नी, मुलेंबाळें, सुना, नातवंडें एकोप्यानें नांदताहेत, एकमेकांसाठीं झटताहेत व कुटुंब कारभाऱ्याचा शब्द झेलण्यासाठीं प्रत्येक जण पुढें सरसावत आहे, असें विलोभनीय दृश्य आजच्या काळांत पहायला मिळणें कठीण आहे. अशा प्रकारचें सुख, समाधान व शांतता एखाद्याच भाग्यवंताच्या घरीं पहायला मिळेल. या दृष्टीनें पहातां कौटुंबिक दृष्ट्या बाबासाहेब खरोखर भाग्यवंत आहेत.

**भाग्यलक्ष्मीचा सहकार**

बाबासाहेबांची सुशील व धर्मनिष्ठ पत्नी सौ. पार्वतीबाई यांचें शिक्षण मराठी तीन इयत्तांपर्यंत झालेलें असलें तरी व्यवहारज्ञानांत त्या कोणाला हार जाणार नाहींत. नंतरच्या काळांत त्यांनीं वाचनानें आपलें मराठी व इंग्रजी भाषेचें ज्ञान वाढविलें. त्यांनींहीं यूरोप–अमेरिकेच्या यात्रा केलेल्या आहेत. बाबासाहेबांना सर्व बाबतींत त्यानीं उत्तम प्रकारें सहकार दिला. त्यांच्याबरोबर त्रासाचें जीवन त्या आनंदानें जगल्या, त्याचप्रमाणें वैभवश्रीचा काळ भाग्यानें वांट्यास आला त्या काळांत सौजन्य, नम्रता, निरहंकारीपणा या गुणांशीं त्यांची फारकत कधींही झाली नाहीं. घरींदारीं जसजसें भाग्य येत गेलें तसतशा त्या वांकत गेल्या. धार्मिक कार्यांत किंवा देण्याघेण्याच्या व्यवहारांत पतीच्या इच्छेआड त्या केव्हांही आल्या नाहींत. उगाच नाहीं बाबासाहेब त्यांना 'भाग्यलक्ष्मी' या सार्थ नांवानें संबोधीत? बाबासाहेबांप्रमाणेंच डहाणूकर कुटुंबाच्या भाग्योदयास त्यांचाही हातभार लागलेला आहे. घरीदारीं नवनव्या सुधारणा, चालीरीती फॅशन्स व वागण्याच्या पद्धती पुढें येत आहेत. जुन्या व बालबोध वळणांत वाढलेल्या त्यांच्यासारख्यांना त्या सुधारणांचा स्वीकार किंवा त्यांचें स्वागत करणें फार जड

अनुक्रम ३८ ३२...
क्रमांक ......... १२५६ नोंद दि: १६-१२



जात असतें. त्यामुळें त्यांच्या वाट्यास मानसिक कुचंबणा सहाजिकपणें येत असते. सौ. पार्वतीबाईंचा स्वभाव अत्यंत प्रेमळ, दिलदार तसेंच मिळतें घेणारा. त्यामुळें आपल्या सभोंवारच्या परिस्थितीशीं त्या सहज समरस होऊं शकल्या. लहानांत लहान, तरुणांत तरुण व वृद्धांत वृद्ध, अशारीतीनें कोणत्याही अवस्थेंतील माणसाच्या विचारांशीं त्या समरस होऊं शकतात. त्यांचा चेहरा दुःखीकष्टी कधींही दिसणार नाहीं. नेहमीं आनंदी व समाधानी वृत्तींत. बाबासाहेबांप्रमाणें त्यांचीही देवधर्मावर आत्यंतिक श्रद्धा. नामस्मरणांत व प्रार्थनेंत रोज कांहीं वेळ खर्च व्हावयाचाच.

अशा आहेत बाबासाहेबांच्या भाग्यलक्ष्मी !

बाबासाहेबांना तीन चिरंजीव व एक कन्या. दत्तात्रय ऊर्फ दादा-साहेब, शांताराम ऊर्फ अण्णासाहेब व दिनकर ऊर्फ दिनूशेट हे तीन चिरंजीव व सौ. रत्नप्रभा ही कन्या. आपल्या मुलांवर सुसंस्कार व्हावे व उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत त्यांनीं कर्तबगारी गाजऊन नावलौकिक संपादन करावा यासाठीं जें जें करणें शक्य होतें तें तें सर्व बाबासाहेबांनीं विचारपूर्वक केलें. त्यांचे तिन्ही चिरंजीव अपेक्षेप्रमाणें कर्तबगार व आपापला व्यवसाय यशस्वी रीतीनें हाताळणारे आहेत. त्यांच्या तिन्ही चिरंजीवांनीं आंतरजातीय विवाह केले असून ते यशस्वी ठरले आहेत. आपण योजून ठेवल्याप्रमाणें साऱ्या गोष्टी घडून याव्या असें वाटत असलें तरी बहुधा तसें न घडतां कांहींतरी विपरीत घडलेलें दुर्भाग्य वांट्यास येत असतें. बाबासाहेब त्या दृष्टीनें पहातांही मोठे भाग्यवान आहेत, असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं.

## बाबासाहेबांचा दूरदर्शीपणा

बाबासाहेब सर्वांसाठीं मनापासून झटले. त्याचप्रमाणें आपली एकुलती एक कन्या चि. सौ. रत्नप्रभा हिला योग्य तें शिक्षण दिल्यानंतर तिला अनुरूप असा पति मिळावा व तिचा संसार सुखाचा व आनंदाचा व्हावा, या भावनेनें दूरवर दृष्टि ठेवून आपल्याच समाजांतील चांगला मुलगा मिळावा म्हणून त्यांनीं विचारपूर्वक निरनिराळ्या कुटुंबांत पहाणी केली व त्यामधून सात्त्विक,

ईश्वरभक्त व सदाचारी असे आपले बालपणींचे जाणते स्नेही चिंचणी येथील श्री. भिकाजी जगन्नाथ चिंचणकर (चिंचणी–ठाणें) यांचे ज्येष्ठ चिरंजीव काशीनाथ यांची निवड केली. ते मॅट्रिकच्या परिक्षेला बसले असतांना त्यांच्या इच्छा, आकांक्षा समजाऊन घेऊन, त्यांची पुढील उच्च शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा दिसून आल्यावरून बाबासाहेबांनीं त्यांना आपुलकीनें स्वतःच्या मुलाप्रमाणें कोणत्याही तऱ्हेची उणीव भासूं न देतां त्यांचें उच्च शिक्षण पूर्ण केलें. अशी संधि खरोखरच व क्वचितच एखाद्याचे वाट्यास येत असते. त्या संधीचा काशीनाथपंतांनीं योग्य व चांगला उपयोग करून घेतला व बी. एस्. सी. आणि बी. इ. या पदव्या संपादन करून प्रथमच बेलवंडी येथील साखरकारखान्याची इमारत संपूर्णपणें स्वतः मेहनत घेऊन लवकरांत लवकर पूर्ण करून दिली व त्यानंतर कऱ्हाड येथील कृष्णा नदीवरच्या पुलाचें अवघड काम यशस्वी रीत्या पूर्ण केलें. गेलीं पंचवीस वर्षे यशस्वी कॉंट्रॅक्टर म्हणून त्यांनीं काम केलें असून आतां त्यांचा थोरला मुलगा शाम बी. इ. (civil) होऊन हा व्यवसाय पुढें चालवीत आहे.

बाबासाहेबांना कारखानदारीचें बाळकडू होतंच व जावयानें पण एखादा कारखाना काढावा ह्या हेतूनें त्यांनीं त्यांना सर्वतोपरी साहाय्य व प्रोत्साहन देऊन पुण्याजवळ पिंपरी येथें नट्स् व बोल्टस बनविण्याचा कारखाना काढण्यास उत्तेजन दिलें. ह्या बाबतींत मार्गदर्शन बाबासाहेबांचेंच आहे. पूल बांधण्याच्या कामांत चिंचणकर विशेष प्रवीण असून अनेक ठिकाणीं पूल बांधण्याचें काम त्यांनीं समाधानकारकरीत्या पार पाडलें आहे.

योग्य माणसाची निवड कशी करावी, हा बाबासाहेबांचा विशेष मोठा गुण वरील उदाहरणानें प्रत्ययास येतो. थोडक्यांत म्हणजे "योजकस्तत्र दुर्लभः" काशीनाथपंतांस चार चिरंजीव व एक कन्या मिळून पांच मुलें असून त्या सर्वांनीं उच्च शिक्षण संपादन केलें आहे. त्यांपैकीं विजयकुमार हे जर्मनींत इंजिनियरिंगचें शिक्षण घेत आहेत. बाबासाहेबांचे दुसरे एक नातू (अण्णासाहेबांचे चिरंजीव) दिलीपकुमार हेही उच्च शिक्षणासाठीं सध्यां अमेरिकेंत आहेत.

मुलांकडे कितीही ओढा असला तरी आजोबांना जास्त लळा जडलेला असतो नातवंडांचा. अरुण (दादासाहेबांचे चिरंजीव) भारत, दिलीप व किरण (अण्णासाहेबांचे चिरंजीव) तसेंच प्रकाश व कु. मीना (दिनूशेटजींचीं मुलें) यांच्या गोड सहवासांत कांहीं वेळ घालवून त्यांना रामायणमहाभारतांतील उपदेशपर गोष्टी सांगितल्याशिवाय बाबासाहेबांना चैन पडत नाहीं. मुलांबाळांच्या सहवासांत रंगून जाणें, त्यांच्याशीं खेळणें व कांहीं क्षण स्वतःला विसरून जाणें, हा बाबासाहेबांचा एक आवडता छंद आहे. त्यांच्या सुखी कौटुंबिक जीवनासंबंधीं आणखी एक गोष्ट सांगायची म्हणजे बाबासाहेब आतां पणजोबाही झाले आहेत. त्यांच्या नातीची कन्या चि. अपर्णा हिच्या लडिवाळ बाललीला सध्यां त्यांना सात्त्विक आनंदाची जोड करून देत असतात.

१४.

# कारखानदारीचा वाढता व्याप

## न्यू युनायटेड कन्स्ट्रक्शन कं.

**कितीही** अवघड स्वरूपाचें बांधकाम असो, त्यासाठीं जरूर त्या तंत्रज्ञांचा व इतर साधनांचा सहकार मिळवून त्या बांधकामाची ठेकेदारी धडाडीनें स्वीकारावयाची व तितक्याच धडाडीनें ती यशस्वी रीतीनें पार पाडून दाखवावयाची, हा बाबासाहेबांचा स्वभावगुणच होता. मागील एका प्रकरणांत बाबासाहेब बांधकामाच्या ठेकेदारीकडे कसे वळले व त्यांत त्यांनीं नांवलौकिक कसा मिळविला, हें आपण पाहिलें. बांधकामाचें क्षेत्र विशाल आहे. तसेंच तें सतत वृद्धिंगत होत जाणारें आहे. तें आपण हातचें सोडतां कामा नये, ही बाबासाहेबांची इच्छा; परंतु एक माणूस कितीही चौरस दृष्टीचा व उत्साहाचा असला तरी तो किती उद्योगधंद्यांकडे लक्ष पुरविणार? आपण एकेका उद्योगाचा भक्कम पाया घालावा, त्यावर इमारत रचावी व तिचा कारभार आपल्या चिरंजिवांकडे सोपवावा, हें बाबासाहेबांचें दूरदर्शीपणाचें नेहमींचें धोरण. साखरकारखान्यांची जबाबदारी त्यांनीं आपले ज्येष्ठ चिरंजीव दादासाहेब यांच्याकडे योग्य वेळीं सोपविली, त्याचप्रमाणें बांधकामाच्या ठेकेदारीचा आपला आवडता व्यवसाय सतत चालू रहावा, या हेतूनें ते आपले द्वितीय चिरंजीव शांताराम ऊर्फ अण्णासाहेब यांच्याकडे पाहूं लागले.

आजकाल बांधकामकला हें एक शास्त्र बनलेलें आहे. त्या शास्त्रांत रोज नवनवीन भर पडत आहे. या देशांत त्याचप्रमाणें युरोपअमेरिकेसारख्या देशांत शिल्पकलेचें पद्धतशीर शिक्षण संपादन करण्याची सोय झालेली आहे. बांधकाम कंपनीची जबाबदारी शिरावर घेण्यापूर्वी तत्संबंधीं जरूर व कंपनीला पोषक होणारें व या देशांत उपलब्ध होणारें शिक्षण बाबासाहेबांनीं अण्णासाहेबांस घ्यायला लावलें.

पुणें येथील इंजिनियरिंग कॉलेजमध्यें दाखल होऊन अण्णासाहेब सिव्हिल इंजिनियरिंगची परिक्षा मानसन्मानपूर्वक उत्तीर्ण झाले. मुंबई विश्वविद्यालयातर्फे घेण्यांत आलेल्या परिक्षेंत ते दुसऱ्या क्रमांकानें उत्तीर्ण झाले व त्यांनीं चार पारितोषिकेंहि पटकावलीं.

त्यानंतर प्रत्यक्ष अनुभवजन्य ज्ञान मिळविण्यासाठीं ते इंग्लंडमध्यें गेले व तेथें एका नामांकित बांधकाम कंपनींत त्यांनीं आठ महिने प्रत्यक्ष काम करण्यांत घालविले व तेथें बांधकामासंबंधीं मिळवितां येण्यासारखें शक्य तें ज्ञान त्यानीं मिळविलें. तेथें असतां डॉ. अनंत पंड्या ह्या मित्रानें सुचविल्यावरून ते अमेकेरिस गेले व तेथील जगप्रसिद्ध 'मॅसॅच्युसेटस् इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी (एम्. आय. टी.) या महाविद्यालयांत नांव दाखल करून त्यांनीं तेथील पदवी कोर्स पूर्ण केला. नंतर जागतिक युद्ध सुरू झाल्यामुळें पॅसिफिकच्या बाजूनें ते स्वदेशीं आले व आपल्या वडिलार्जित व्यवसायाघडे लक्ष पुरवूं लागले.

## धोरणी स्वभाव

१९६४ सालपर्यंत बांधकामांची जबाबदारी एम्. एल्. डहाणूकर आणि कंपनीतर्फे पार पाडली जात असे; परंतु त्यानंतर त्या कंपनीला विशेष व्यापक स्वरूप देण्यांत आलें व तिला 'न्यू युनायटेड कन्स्ट्रक्शन प्रा. लि.' हें नवें नांव देण्यांत आलें. वयोमान वाढत चाललें, इतर उद्योग-धंद्यांचा पसाराही उत्तरोत्तर वाढत चालला तसतसें या व्यवसायाकडे पूर्ववत् लक्ष पुरविणें बाबासाहेबांस जमेना; परंतु या व्यवसायाचें महत्त्व किती आहे

हें ओळखलें असल्यामुळें त्यांनीं कंपनीचीं सूत्रें अण्णासाहेबांकडे विश्वासपूर्वक सोपविलीं व त्या क्षेत्रांतील इतर नामवंत सहकाऱ्यांचा सहकार मिळवून आजकाल ते कंपनीचीं सूत्रें यशस्वी रीतीनें हाताळीत आहेत. बाबासाहेबांच्या धोरणी स्वभावाचें हेंही एक उदाहरण आहे.

सध्यां आपण विकासयुगांत वावरत आहोंत. देशांतील निरनिराळ्या भागांत सध्यां नाना प्रकारचीं बांधकामें निघत आहेत. तीं जबाबदारीनें पार पाडणाऱ्या अनुभवी, विश्वासू व तज्ञ तंत्रज्ञांचीच आज फार जरुरी भासत आहे. बाबासाहेबांनीं या व्यवसायाला सुरुवात केली यावेळीं काळ सर्वपरीनें प्रतिकूल होता. सरकारशीं व समर्थ प्रतिस्पर्ध्यांशीं त्यांना झगडावें लागलें व मार्गांतील कांटे झाडूनसवरून दूर करावे लागले. आज सुदैवानें आपला मार्ग निष्कंटक आहे. स्वीकारलेली जबाबदारी समाधानकारक रीतीनें पार पाडणाऱ्या कर्तबगारांचीच आज जरुरी आहे. ही जरुरी न्यू युनायटेड कन्स्ट्रक्शन कंपनीकडून भागविली जाईल व ज्या कंपनीचें बीजारोपण बाबासाहेबांनीं विपरीत काळांत करून तिचें काळजीपूर्वक संगोपन केलें, त्या कंपनीचा बोलबाला भारतभर सदैव होत राहील, अशी सार्थ अपेक्षा केल्यास ती अनाठायीं ठरणार नाहीं.

## अमृत ऑईल मिल

गेल्या महायुद्धाच्या काळांत देशांतील निरनिराळ्या प्रकारच्या वस्तूंची व मालांची मागणी एकदम वाढली व त्याचबरोबर वस्तूंचे भावही वाढत गेले. पूर्वीं ज्या वस्तू किंवा जो माल तयार केला असतां तो पडून राहावयाचा व त्यावर फारसा नफा मिळत नसे, त्या मालाचा उठाव झपाटेबंद स्वरूपांत होऊन त्यावर चांगला नफाही मिळूं लागला. त्यामुळें साऱ्या देशभर आपण कांहीं ना कांहीं उद्योगधंदा करून चार पैसे कमवावे, अशी भावना प्रसृत झाली.

बाबासाहेबांचा साखरधंदा त्यावेळीं चांगला तेजींत होता. तरीही

आपण शक्य ते इतर उद्योगधंदे हाताळावे अशी ईर्षा त्यांच्याही मनांत निर्माण झाल्यास नवल नाहीं. मागें सांगितल्याप्रमाणें साखरेचा जो गाळ मागें शिल्लक राहतो, त्यापासून अल्कोहोल बनविण्यासाठीं त्यांनीं संपूर्णपणें हिंदी बनावटीची डिस्टीलरी उभी केली व तो व्यवसाय यशस्वीपणें सुरू केला. त्याचबरोबर उसाचीं पानें किंवा चोपड जीं निरुपयोगी म्हणून टाकून दिलीं जातात, त्यापासून कागदाचा पुठ्ठा बनविण्यासाठीं लागणारी जरूर ती यंत्रसामुग्री येथेंच आपल्या देशी कारागिरांकडून तयार करवून घेऊन तोही कारखाना त्यांनीं सुरू केला. तसेंच साखरेपासून नाना प्रकारची कन्फेक्शनरी व साखरेचे क्यूब्स बनविण्याच्या व्यवसायांतही त्यांनीं यश मिळविलें.

आपल्या क्षेत्रांत नवीन काय करतां येईल यासंबंधींचे विचार त्यांच्या मनांत सदासर्वकाळ घोळत असत आणि विचार करून तेवढ्यावर न थांबतां त्याप्रमाणें आचरण करण्यासाठीं ते झटून उद्योगास लागत असत.

**नवें क्षेत्र धुंडाळण्याकडे लक्ष**

हें झालें साखरेचें उत्पादन व तदनुषंगिक उद्योगधंदे यांच्यासंबंधीं; परंतु औद्योगिक क्षेत्रांतील बाबासाहेबांची प्रतिभा त्याच व्यवसायांत गुरफटून राहायला तयार नव्हती; आपण त्याच्याही पलीकडे जावें, नवीन क्षेत्रें शोधून काढावीं व त्यांत आपल्या कर्तबगारीला कुठवर वाव मिळतो हें पाहावें, ही होती त्यांची दुर्दमनीय मनीषा. नेहमीं लक्ष नवें क्षेत्र धुंडाळण्याकडे व तत्संबंधीं शक्य ती माहिती मिळविण्याकडे !

आणि आतां तर काय ? या औद्योगिक क्षेत्रांत ते एकटे राहिले नव्हते. त्यांच्या शिरावरील थोडाफार भार हलका करण्यासाठीं त्यांचे चिरंजीव त्यांच्या तालमींत तयार होऊन ते आतां पुढें येऊं लागले होते.

यापूर्वी अनेक ठिकाणीं उल्लेख केल्याप्रमाणें बाबासाहेबांचें आशाकांक्षी व शोधक मन आतां नवीन उद्योग कोणता हाताळावयाचा ? यासंबंधींच्या चिंतनांत असे. एकदां ते मुंबईंतील कापडगिरण्यांसंबंधीं गंभीरपणें विचार

करूं लागले. मुंबईंत ६०।६५ कापडगिरण्या आहेत. त्यांत महाराष्ट्रीयांच्या मालकीची किंवा महाराष्ट्रीय संचालन लाभलेली एकही गिरणी असूं नये, ही किती शोचनीय स्थिति आहे ! त्या गिरण्यांचीं संचालक मंडळें असतात. (Board of Directors) त्या मंडळांत तरी एखाद्या महाराष्ट्रीयाचा प्रवेश झालेला आहे का? एकही नाहीं. महाराष्ट्रासंबंधीं वाटणाऱ्या तीव्रतर अभिमानामुळें हे विचार त्यांच्या मनाला बोचत असत, टोचत असत! त्यांना त्याबद्दल भारी खंत वाटे! आपल्यापरीनें आपण तरी ती उणीव थोड्या प्रमाणांत का होईना, भरून काढावी, या हेतूनें एखादी उत्तम रीतीनें चालणारी लहानशी कापडगिरणी विकत मिळेल का? या विचारांत व शोधांत ते होते.

तो शोध चालू असतां कापडगिरणी नाहीं मिळाली, परंतु एक तेल व वनस्पती-तूप बनविणारी गिरणी एके ठिकाणीं विकायची आहे असें त्यांना समजलें. त्या काळांत वनस्पती-तुपाला तेजी आलेली होती. त्यामुळें बाबासाहेबांचें लक्ष त्या व्यवसायाकडे वळलें. त्यांनीं त्या गिरणीची चौकस दृष्टीनें पाहणी केली व खरेदीसंबंधीं रीतसर वाटाघाटीही केल्या. परंतु कांहीं ना कांहीं कारणामुळें तो सौदा जमला नाहीं. त्यानंतर लगेच त्यांना समजलें कीं दुसऱ्या एका ठिकाणीं शेंगदाणे व खोबरें यांच्यापासून तेल काढण्याची एक गिरणी विकायची आहे. तिचीही पाहणी करून थोडी अधिक किंमत द्यावी लागली तरीही ती गिरणी त्यांनीं विकत घेतली. तेल गाळीत बसण्यामध्यें फारसा नफा होण्याचा संभव नाहीं असें त्यांना विचारांतीं आढळून आलें. तेव्हां त्या गिरणीला वनस्पती तूप बनविण्याचें मोठें व व्यापक स्वरूप प्राप्त करून द्यावयाचें, या हेतूनें भारतांत प्रथमच वनस्पती कारखान्यासाठीं लागणारी सर्व यंत्रसामुग्री स्वदेशी असावी, या हेतूनें देशी कारागिरांकडून आपल्या देखरेखीखालीं 'डिझाईन्स' तयार करवून घेऊन ते तज्ज्ञ देशी कारागिरांकडे सोपविले व त्याबरहुकूम संपूर्णपणें देशी यंत्रसामुग्री तयार करवून घेतली व देशी तज्ज्ञांकडून कारखान्याची उभारणी केली.

### देशी कारागिरीस उत्तेजन

बाबासाहेबांचा स्वभाव धीरोदात्त. कोणत्याही बाबतींत घाईनें पावलें न टाकतां आस्तेकदम मार्गक्रमण करावयाचें. तेलाचें रूपांतर हायड्रोजन गॅसमध्यें करण्यासाठीं विशिष्ट प्रकारची यंत्रसामुग्री लागते. त्या काळीं परदेशांतून यंत्रसामुग्री आयात करण्याची शक्यता नव्हती म्हणून तेवढ्यासाठीं ते अडून बसले नाहींत, हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

या कारखान्याच्या उभारणीला सुमारें दीड वर्ष लागलें. कारखाना सुरू झाल्यानंतर रोज दहा टन वनस्पतीची निर्मिति करणारा 'अमृत ऑईल मिल' हा या देशांतील सर्वस्वीं देशी यंत्रसामुग्रीवर चालणारा पहिला कारखाना उत्पादनक्षेत्रांत यशस्वी रीतीनें उतरला. या कारखान्यांत तयार होणारें वनस्पती-तूप सरकारी कसोटीसही सर्वतोपरी उतरलें.

अशा परिस्थितींत कोणाच्या उत्साहाला भरती येणार नाहीं? बाबासाहेबांना व त्यांच्या चिरंजीवांना या व्यवसायाची आणखी वाढ करावी व उत्पादनाचें क्षेत्र अधिकाधिक वाढवावें, असें आतां वाटूं लागलें. बाबासाहेबांनीं या धंद्याची वाढ करण्याची योजना तयार केली. त्यासाठीं लागणारा जरूर तो पैसाही कर्जरूपानें उभा करण्यांत आला.

या कारखान्याच्या कार्यांत बाबासाहेब अतिशय रंगून गेले होते. त्यांना शक्य त्या परीनें या कारखान्याची वाढ करावयाची होती. त्याला जोडून इतर नाना उद्योगधंदे त्यांना पूरक धंदे म्हणून सुरू करावयाचे होते. सतत ३।४ वर्षें या कारखानावाढीच्या उद्योगांत ते होते. तेवढ्या काळांत त्यांनीं कितीतरी सुधारणा घडवून आणिल्या. गिरणीला सर्वतोपरी अद्ययावत् स्वरूप प्राप्त झालें. पूर्वीं शेंगदाण्याचें तेल २० ते २२ टन निघत असे तें आतां ३०।३५ टन निघूं लागलें.

मागें सांगितल्याप्रमाणें या कारखान्यांत सुरुवातीस दहा टन वनस्पती तूप तयार होत असे; त्याची मजल आतां पंचवीस टनांपलीकडे जाऊन पोहोंचली; त्याचबरोबर साबणाचा कारखानाही चालू झाला. शिवाय आणखी

जोडधंदे म्हणून 'स्टीयरिक ॲसीड', 'ऑलिक ॲसीड' व 'डबल बाईल्ड बेलतेल' हीं या कारखान्यांतून बाहेर पडूं लागलीं. अशा रीतीनें या कारखान्याची उत्पादनक्षमता जी सुमारें पाऊण कोट रुपयांची होती ती वाढवीत वाढवीत बाबासाहेबांनीं दोन ते सव्वा दोन कोटीपर्यंत नेऊन पोहोंचविली.

### धंद्यांत चढउतार चालायचेच

अशा प्रकारचे अनेक उद्योगधंदे चालविणाऱ्या मालकाच्या हातीं भरपूर खेळतें भांडवल असावें लागतें. नवीन जोडधंदे काढले त्यांत बरेंच भांडवल गुंतविलें गेलें. या मालाचें उत्पादन अधिकाधिक वाढवावयाचें तर खेळतें भांडवल पूर्वींपेक्षां दुप्पट तरी असणें जरूर होतें. तें तसें राहूं शकलें नाहीं. कारण अनेक आघाड्या एकाच वेळीं संभाळाव्या लागत होत्या. वनस्पतीधंद्याला आतां पूर्वींसारखी तेजी राहिली नव्हती. बाजारांत चढाओढ सुरू झाली होती. अशा स्थितींत हातांत जास्तींत जास्त खेळतें भांडवल असणें जरूर असतां तें घटतच चाललें.

लढाई संपून ५।६ वर्षें झालीं होतीं. त्या काळांत जी उत्साहाची लाट उसळली होती, तिला आतां ओहोटी लागूं लागली. युद्धोत्तर काळांत वाजवीपेक्षां फाजील खर्च करून ज्यांनीं ज्यांनीं म्हणून उद्योगधंद्यांची किंवा कारखान्यांची वाढ केली, त्यांपैकीं अनेकांवर पस्तावा करण्याची पाळी आली. बाजारभाव उलटत चालले! त्याची झळ इतरांप्रमाणें अमृत ऑईल मिललाही लागली!

थोडक्यांत सांगायचें म्हणजे तो नाउमेदीचा काळ होता; परंतु नाउमेदी किंवा निराशा या शब्दांना बाबासाहेबांच्या कोषांत स्थान नव्हतें. आपलीं मुलें अशा परिस्थितींत नाउमेद होतील, याची मात्र त्यांना काळजी. त्यांना धीर देऊन ते म्हणाले, "धंद्यामध्यें चढउतार हे नेहमीं चालायचेच. त्याबद्दल सुखदुःख कांहीं मानायचें नाहीं. नुकसान कुठें व कशामुळें होत आहे, हें जातीनें लक्ष घालून शोधून काढण्यासाठीं झटायचें. कारखान्यांत

व बाजारच्या हालचालींकडे जास्तींत जास्त लक्ष पुरवून त्यासाठीं आपला जास्त वेळ खर्च करावयाचा. एवढें केलें म्हणजे तुमचें तुम्हांला समजून येईल, व नुकसान टाळून तुम्हीं थोडीफार कमाई करूं शकाल. परिस्थिति कशीही येवो, हातपाय गाळल्यानें आपला निभाव लागणार नाहीं. सावधगिरीनें वागा, म्हणजे अडचणीच्या काळांतून तुम्हीं पार पडाल."

किती बहुमोलाचा सल्ला आहे हा ! तो सर्वांनाच उपयोगी पडणारा आहे. बाबासाहेब केवळ उपदेश करून थांबत नसत. नुकसान भरून काढून पुढें पाऊल टाकण्यासाठीं लागणाऱ्या पैशांचीही तरतूद करीत असत.

आपण उत्साहपूर्वक सुरू केलेला कोणताही धंदा असो, तो सतत चालू रहावा व त्याची उत्तरोत्तर वाढ होत जावी आणि औद्योगिक क्षेत्रांतील आपला नावलौकिकही वृद्धिंगत होत जावा, अशी जबरदस्त आकांक्षा बाबासाहेबांच्या अंतःकरणांत निरंतर वास करीत असे.

बाबासाहेबांचा अनेकांस मोठा आधार वाटावयाचा. मग त्यांच्या चिरंजिवांस तो वाटावा, यांत नवल नाहीं. आपण नेहमीं पहातों कीं, वडिलांनीं हिंमतीनें चालविलेल्या धंद्याकडे मुलें वळतात; परंतु कांहीं ना कांहीं कारणामुळें धंद्याला उतरती कळा लागूं लागते. मग काय करायचें ? धंदा रोजगार विकून टाकावयाचा आणि नोकरीकडे वळावयाचें ?

अमृत आईल मील चालविण्याच्या बाबतींत बाबासाहेबांच्या चिरंजिवांनीं पराकाष्ठेचे प्रयत्न केले. २।३ वर्षें हा धंदा पुढील आशेच्या बळावर नुकसानींत चालू ठेविला. परंतु १९५५ सालीं या धंद्याला दुसरा एक जबरदस्त फटका बसण्याची पाळी आली ! वनस्पती तूप शरिराला अपायकारक आहे कीं काय अशी शंका निर्माण झाली. हा प्रश्न सर्वत्र चर्चिला जाऊं लागला. या बाबतींत सरकारतर्फे संशोधन चालू असल्याचेंही जाहिर झालें.

अशा परिस्थितींत हा धंदा यशस्वी रीतीनें चालू ठेवणें अशक्य आहे असें स्पष्टपणें आढळून आल्यानंतर अमृत आईल मील टाटा ऑईल कंपनीला विकण्यांत आली. (१९५७)

## वरळी केमिकल वर्क्स लि.

आपण नवनवीन उत्पादक धंदे हाताळावे व त्याद्वारें आपल्या देशबांधवांचा व आपलाही फायदा करून घ्यावा, या बाबासाहेबांच्या विचारसरणीनें त्यांना स्वस्थता अशी कधींच लाभूं दिली नाहीं. नवीन उद्योगधंद्यांत शिकायला मिळतें व त्या शिक्षणाचा लाभ इतरांस करून दिल्यानें निरनिराळ्या व्यवसायांत माणसें तयार होतात.

मागें सांगितल्याप्रमाणें लढाईच्या उत्तरकाळांत या देशांत नवीन उद्योगधंदे स्थापन करण्याची लाटच उसळली होती. त्या काळांत (१९४८) हिंद रेझर अँड ब्लेडस्‌च्या बरोबरीनें बाबासाहेबांनीं आणखी एका नवीन व्यवसायांत पदार्पण केलें. या देशांतील लोकांना औषधें, रसायनें या बाबतींत बऱ्याच प्रमाणांत परदेशांवर आवलंबून रहावें लागतें. तेव्हां ती गरज अल्प प्रमाणांत का होईना, भागवितां आल्यास पहावी, या हेतूनें त्यांनीं वरळी केमिकल वर्क्स लि. या कारखान्याची स्थापना केली. (१९४८) त्यासाठीं कांहीं तज्ज्ञ माणसें जवळ केलीं व औषधांचें उत्पादनही सुरू झालें. प्रत्येक धंद्याचें कांहीं ना कांहीं वैशिष्ट्य असतें. तें आत्मसात् करावें लागत असतें. त्याशिवाय पाऊल पुढें पडत नाहीं. आपण साखरेचा धंदा उदाहरणादाखल घेऊं या. या धंद्यांत जमिनीची व पाण्याची सोय पहावी लागते. त्याचप्रमाणें साखरेचें उत्पादन जास्तींत जास्त होईल, असा ऊंस तयार करावा लागतो. त्याचप्रमाणें औषधी धंद्याचेंही आहे. तेथेंही संशोधक दृष्टीची, व प्रत्यहीं लागणाऱ्या नवीन शोधांची दखल घ्यावी लागत असते. औषधांचा संबंध रोगनिवारणाशीं येतो. गुण देऊन रोगनिवारण करणारीं औषधें बनविण्यासाठीं परिश्रमांची पराकाष्ठा करावी लागते. शिवाय औषधें बनविलीं म्हणजे कार्य संपत नाहीं. औषधविक्री ही एक कलाच आहे. त्यांत पारंगत असलेलीं माणसें मिळवावीं लागतात.

औषधनिर्मिती चालू झाली आणि नंतर एकेका गोष्टीचा अनुभव

अनुक्रम ३८९८२ वि: चारित्र
क्रमांक ........१२५६ नों: दि: ........१६-११-८



येऊं लागला. आरंभीं जे आराखडे मांडण्यांत आले होते त्यापेक्षां किती तरी पटीनें अधिक या व्यवसायांत पैसा ओतावा लागला. औषधांचा जसा खप व्हावा तसा होईना. दिवसेंदिवस परदेशांतून येणाऱ्या औषधांशीं टक्कर देणें जड होऊं लागलें ! नफा बाजूला राहिला; परंतु नुकसानीचें प्रमाण उत्तरोत्तर वाढतच गेलें. दुसरीकडे अमृत ऑईल मिलचा पसारा वाढविण्यांत आला होता. तो मोठा धंदा. तो शक्य त्या प्रयत्नांनीं संभाळणें जरूर होतें. त्यामुळें या धंद्याकडे जितकें लक्ष पुरविणें जरूर होतें तितकें पुरवितां येईना. अशा परिस्थितींत आपल्या चिरंजिवांच्या सल्ल्यानुसार औषधनिर्मितीचा कारखाना बंद करून तो विकून टाकण्यांत आला. (१९५८).

## हिंद रेझर अँड ब्लेड कंपनी

आपल्या नित्याच्या गरजा शक्य तों आपणांस भागवितां आल्या पाहिजेत. त्यासाठीं परक्यांच्या तोंडाकडे पाहाण्याची जरुरी भासूं नये. परावलंबीपणासारखें दुःख नाहीं. त्यामुळें आमचा पैसा परदेशीं जातो व आमच्या वाट्यास दारिद्र्य येतें. सुई, टांचणी, वस्तरे, दाढी करण्याचीं पातीं वगैरे प्रत्येकास नेहमीं लागणाऱ्या वस्तू परदेशांतून इकडे यायच्या आणि पडेल ती किंमत देऊन आम्हीं त्या घ्यायच्या.

आम्हांला जरूर लागणाऱ्या वस्तू तयार करण्याचे कारखाने या देशांत स्थापन करून त्यांची निर्मिति येथल्या येथें व्हावी हा विचार मनांत आला तरी तो अंमलांत येण्याच्या बाबतींत अनेक अडथळे होते. सरकार-कडून जरूर तें संरक्षण मिळालें पाहिजे, यंत्रसामुग्री, तंत्रज्ञ, कारागीर व भांडवलही पाहिजे.

### आमचें परावलंबन

आपण दाढी करण्यासाठीं लागणाऱ्या ब्लेडस्‌चें (पातीं) उदाहरण घेऊं या. कारण त्यांची निर्मिती करणाऱ्या कारखान्याचा येथें परिचय करून

घावयाचा आहे. दाढी प्रत्येकाला करायची असते. त्यासाठीं जीं पातीं वापरलीं जातात तीं इंग्लंड, अमेरिका किंवा जर्मनी या देशांतून आपल्या देशांत येतात. ज्यांची मोजदाद कोट्यांनीं करावी लागेल इतकीं पातीं या देशाला परदेशी कारखान्यांकडून पुरविलीं जात होतीं. जी अतिशय जरुरीची वस्तु व जिच्यापायीं दर वर्षी कोट्यवधि रुपये परदेशीं जातात ती बनविण्याकडे आम्हीं कां लक्ष पुरवूं नये? आमचें रोजचें साफ सफाईचें काम होत आहे ना? मग तें कोणत्याही मार्गानें होईना. काम झालें म्हणजे झालें! ही आमची परावलंबी व आकुंचित दृष्टि! बाबासाहेब नेहमीं व्यापक दृष्टीनें पहात असत. देशांत उद्योगधंदे, कारखाने निघाले पाहिजेत ते केवळ जनतेच्या गरजा भागविण्यासाठीं नव्हे. गरजा तर भागल्याच पाहिजेत; परंतु त्याशिवाय लोकांना उद्योगधंदा मिळतो. त्यांच्या हातांत पैसा घोळूं लागतो. प्रामाणिकपणें उद्योग करून प्रत्येकाला पैसा मिळवितां आला पाहिजे. हें साध्य गाठावयाचें तर देशांत उद्योगधंद्यांची वाढ होत गेली पाहिजे. या दृष्टीनें बाबासाहेबांचें नेहमीं चौफेर निरीक्षण चालू असे.

बाबासाहेबांचे तिसरे चिरंजीव दिनकर ऊर्फ दिनूशेट हेही लहानपणापासून त्यांच्या तालमींत वाढलेले व उद्योगधंद्यांकडे लक्ष असलेले. १९४८ सालीं यूरोप अमेरिकेच्या दौऱ्यावर असतां रेझर ब्लेडचा एक कारखाना त्यांच्या पाहण्यांत आला. अत्यंत लक्षपूर्वक त्यांनीं तो पाहिला. त्यावेळीं आपल्या देशांतील लोकांना ब्लेडस्‌ची फार मोठ्या प्रमाणांत जरुरी असतां देशांत त्यांची निर्मिति करणारा एखादाही कारखाना असूं नये, ही गोष्ट त्यांच्या मनाला फार खटकली. बाबासाहेबांच्यापुढें त्यांनीं हा विचार ठेविला तेव्हां त्यानाही सहाजिकपणें तो फार रुचला.

त्याच सुमारास भारतांत अमेरिकन कंपनीचा एक एजंट आलेला होता. त्यानें रेझर ब्लेडस् कसे तयार केले जातात, याची माहिती करून देणारा चित्रपट बरोबर आणिला होता. तो बाबासाहेबांच्या पहाण्यांत आला. दिनूशेटप्रमाणें बाबासाहेबांच्याही मनांत कारखाना काढण्याचा विचार

एकसारखा घोळूं लागला. त्यासंबंधीं साधकबाधक रीतीने विचार सुरू झाला. विचाराला तीव्र स्वरूप आलें. जरूर ती यंत्रसामुग्री खरेदी करायची आणि कारखान्याची उभारणी करायची, अशा विचारांत असतां कोणी एका गृहस्थानें रेझर ब्लेडसच्या कारखान्यासाठीं लागणारी यंत्रसामुग्री अमेरिकेंत खरेदी केली असून कांहीं ना कांहीं कारणामुळें ती त्याला विकून टाकावी लागत आहे, असें समजलें. धाडस पत्करून बाबासाहेबांनीं ती यंत्रसामुग्री विकत घेतली व १९४९ सालीं वरळी येथें 'हिंद रेझर अँड ब्लेड कंपनी' या नावानें कारखान्याची स्थापना केली.

**तंत्रज्ञांचा तुटवडा**

यंत्रसामुग्री घेतली; परंतु कारखाना चालविण्यासाठीं तंत्रज्ञ पाहिजे; कारागीर पाहिजेत. जरूर ती साधनसामुग्री पाहिजे. एकदां पुढें पाऊल टाकल्यानंतर तें नेहमीं पुढें पुढेंच पडत गेलें पाहिजे; मग त्यासाठीं काय वाटेल तें करावें लागो, हा बाबासाहेबांचा नेहमींचा शिरस्ता. त्याला अनुसरून आस्ते आस्ते सर्व साधनें जवळ करण्यांत आलीं. प्रथम एका अमेरिकन तंत्रज्ञाचें सहकार्य मिळविण्यांत आलें. दिनूशेटनीं या व्यवसायांतील सर्व प्रकारची माहिती करून घेतली. अमेरिकन तंत्रज्ञाच्या हाताखालीं आपले अनेक कारागीर वर्षभरांत शिकून तयार झाले आणि १९५० सालापासून पात्यांची निर्मिति सुरू झाली.

दिनूशेट या व्यवसायांत आतां पूर्ण तरबेज झाले असून कारखान्याची जबाबदारी आपल्या वडील बंधूंच्या सहकारानें ते उत्तमप्रकारें संभाळीत आहेत. १९५१ सालीं ते इंग्लंड, जर्मनी वगैरे देशांत गेले असतां अशा कारखान्यासंबंधीं त्यांनीं अधिक माहिती व ज्ञान संपादन केलें; आणि त्याचबरोबर जरूर वाटलेली कांहीं नवीन यंत्रसामुग्रीही खरेदी केली.

हा कारखाना स्थापन होऊन आतां सुमारें पंधरा वर्षे होऊन गेलीं आहेत. या कारखान्यांत तयार होणारीं 'झेनिथ ब्लेडस्' परदेशी उत्तम

घ्यावयाचा आहे. दाढी प्रत्येकाला करायची असते. त्यासाठीं जीं पातीं वापरलीं जातात तीं इंग्लंड, अमेरिका किंवा जर्मनी या देशांतून आपल्या देशांत येतात. ज्यांची मोजदाद कोट्यांनीं करावी लागेल इतकीं पातीं या देशाला परदेशी कारखान्यांकडून पुरविलीं जात होतीं. जी अतिशय जरुरीची वस्तु व जिच्यापायीं दर वर्षीं कोट्यवधि रुपये परदेशीं जातात ती बनविण्याकडे आम्हीं कां लक्ष पुरवूं नये? आमचें रोजचें साफ सफाईचें काम होत आहे ना? मग तें कोणत्याही मार्गानें होईना. काम झालें म्हणजे झालें! ही आमची परावलंबी व आकुंचित दृष्टि! बाबासाहेब नेहमीं व्यापक दृष्टीनें पहात असत. देशांत उद्योगधंदे, कारखाने निघाले पाहिजेत ते केवळ जनतेच्या गरजा भागविण्यासाठीं नव्हे. गरजा तर भागल्याच पाहिजेत; परंतु त्याशिवाय लोकांना उद्योगधंदा मिळतो. त्यांच्या हातांत पैसा घोळूं लागतो. प्रामाणिकपणें उद्योग करून प्रत्येकाला पैसा मिळवितां आला पाहिजे. हें साध्य गाठावयाचें तर देशांत उद्योगधंद्यांची वाढ होत गेली पाहिजे. या दृष्टीनें बाबासाहेबांचें नेहमीं चौफेर निरीक्षण चालू असे.

बाबासाहेबांचे तिसरे चिरंजीव दिनकर ऊर्फ दिनूशेट हेही लहानपणापासून त्यांच्या तालमींत वाढलेले व उद्योगधंद्यांकडे लक्ष असलेले. १९४८ सालीं यूरोप अमेरिकेच्या दौऱ्यावर असतां रेझर ब्लेडचा एक कारखाना त्यांच्या पाहण्यांत आला. अत्यंत लक्षपूर्वक त्यांनीं तो पाहिला. त्यावेळीं आपल्या देशांतील लोकांना ब्लेडसूची फार मोठ्या प्रमाणांत जरुरी असतां देशांत त्यांची निर्मिति करणारा एखादाही कारखाना असूं नये, ही गोष्ट त्यांच्या मनाला फार खटकली. बाबासाहेबांच्यापुढें त्यांनीं हा विचार ठेविला तेव्हां त्यानाही सहाजिकपणें तो फार रुचला.

त्याच सुमारास भारतांत अमेरिकन कंपनीचा एक एजंट आलेला होता. त्यानें रेझर ब्लेडस् कसे तयार केले जातात, याची माहिती करून देणारा चित्रपट बरोबर आणिला होता. तो बाबासाहेबांच्या पहाण्यांत आला. दिनूशेटप्रमाणें बाबासाहेबांच्याही मनांत कारखाना काढण्याचा विचार

एकसारखा घोळूं लागला. त्यासंबंधीं साधकबाधक रीतीने विचार सुरू झाला. विचाराला तीव्र स्वरूप आलें. जरूर ती यंत्रसामुग्री खरेदी करायची आणि कारखान्याची उभारणी करायची, अशा विचारांत असतां कोणी एका गृहस्थानें रेझर ब्लेडसच्या कारखान्यासाठीं लागणारी यंत्रसामुग्री अमेरिकेंत खरेदी केली असून कांहीं ना कांहीं कारणामुळें ती त्याला विकून टाकावी लागत आहे, असें समजलें. धाडस पत्करून बाबासाहेबांनीं ती यंत्रसामुग्री विकत घेतली व १९४९ सालीं वरळी येथें 'हिंद रेझर अँड ब्लेड कंपनी' या नावानें कारखान्याची स्थापना केली.

**तंत्रज्ञांचा तुटवडा**

यंत्रसामुग्री घेतली; परंतु कारखाना चालविण्यासाठीं तंत्रज्ञ पाहिजे; कारागीर पाहिजेत. जरूर ती साधनसामुग्री पाहिजे. एकदां पुढें पाऊल टाकल्यानंतर तें नेहमीं पुढें पुढेंच पडत गेलें पाहिजे; मग त्यासाठीं काय वाटेल तें करावें लागो, हा बाबासाहेबांचा नेहमींचा शिरस्ता. त्याला अनुसरून आस्ते आस्ते सर्व साधनें जवळ करण्यांत आलीं. प्रथम एका अमेरिकन तंत्रज्ञाचें सहकार्य मिळविण्यांत आलें. दिनूशेटनीं या व्यवसायांतील सर्व प्रकारची माहिती करून घेतली. अमेरिकन तंत्रज्ञाच्या हाताखालीं आपले अनेक कारागीर वर्षभरांत शिकून तयार झाले आणि १९५० सालापासून पात्यांची निर्मिति सुरू झाली.

दिनूशेट या व्यवसायांत आतां पूर्ण तरबेज झाले असून कारखान्याची जबाबदारी आपल्या वडील बंधूंच्या सहकारानें ते उत्तमप्रकारें संभाळीत आहेत. १९५१ सालीं ते इंग्लंड, जर्मनी वगैरे देशांत गेले असतां अशा कारखान्यासंबंधीं त्यांनीं अधिक माहिती व ज्ञान संपादन केलें; आणि त्याचबरोबर जरूर वाटलेली कांहीं नवीन यंत्रसामुग्रीही खरेदी केली.

हा कारखाना स्थापन होऊन आतां सुमारें पंधरा वर्षें होऊन गेलीं आहेत. या कारखान्यांत तयार होणारीं 'झेनिथ ब्लेडस्' परदेशी उत्तम

ब्लेडस्‌च्या तोडीचीं निघूं लागलीं असून जनतेची रोजची गरज भागविण्यास तीं समर्थ ठरलीं आहेत.

दाढी करण्यासाठीं लागणारीं पातीं तयार करण्याचा कारखाना काढणें ही या देशाच्या दृष्टीनें पहातां एक बिकट समस्या होती. तशी ती आजही आहे; परंतु बाबासाहेबांच्या पाठिंब्यामुळें व प्रोत्साहनामुळें दिनूशेटनीं हें धाडस पत्करून तें यशस्वी करून दाखविलें आहे. ब्लेड ही लहानशीच वस्तु, परंतु त्याच्या बनावटीसाठीं जो पोलादी पत्रा लागतो तशाप्रकारचा पोलादी पत्रा अजून आपल्या देशांत तयार होऊं लागला नाहीं. तो परदेशांतून आणावा लागतो. पुढेंमागें तो या देशांत तयार होईलही. या कारखान्यांत सध्यां स्वीडनमधून आयात केलेला पोलादी पत्रा वापरला जातो. धार काढण्यासाठीं लागणारे सहाणीचे दगड, तसेंच पातीं गुंडाळण्यासाठीं लागणारा कागदही परदेशांतून आयात करावा लागतो. या वस्तूंवर जकात जबरदस्त बसविलेली आहे. त्यासाठीं परवाना मिळविण्याच्या मार्गांतही अडचणी असतात. मात्र रेझर ब्लेड धंद्याला सरकारकडून संरक्षण मिळालें असल्यामुळें कारखाना चालविणें शक्य झालें आहे.

आमच्या माहितीप्रमाणें हा कारखाना जमेस धरून भारतांत रेझर ब्लेडस्‌ची निर्मिति करणारे एकंदर चार कारखाने चालू आहेत. ते चारही चांगल्या स्थितींत असून देशाची गरज भागवीत आहेत. पूर्वीं आपल्या देशाला चाळीस ते पन्नास कोटी ब्लेडस् लागत असत. अलीकडे शंभर कोटीपर्यंत मर्यादा गेलेली आहे.

दाढी करण्याचीं पातीं बनविणारा भारतांतील पहिला कारखाना या दृष्टीनें याचें महत्त्व फार आहे. तो यशस्वी रीतीनें चालून देशाची गरज उत्तमप्रकारें भागविणारा व्हावा यासाठीं बाबासाहेबांचे तिसरे चिरंजीव दिनूशेट हे वर सांगितल्यप्रमाणें सतत प्रयत्नशील आहेत. येथें नमूद करायला आनंद वाटतो कीं, या कारखान्याची कार्यक्षमता व देशाची गरज लक्षांत घेऊन तो पांच पटीनें वाढविण्यासाठीं सरकारकडून जरूर असलेला परवाना अलीकडेच मिळाला आहे. त्या दृष्टीनें कारखान्याची वाढ करण्याची

योजना चालू आहे. कारखान्याच्या भावी काळांतीलभरभराटीच्या दृष्टीनें ही घटना फार महत्त्वाची आहे.

या कारखान्यांत तयार होणारीं झेनिथ ब्लेडस् परदेशीं निर्यात करण्याचेही प्रयत्न चालू असून त्यांत सुयश मिळेल, अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

## १५.

# शिक्षणप्रसार व समाजकल्याण कार्य

**सध्यांच्या** काळांत शिक्षणाचें महत्त्व पटवून देण्याची जरुरी राहिलेली नाहीं. शिक्षणाशिवाय आपली धडगत नाहीं याची जाणीव आतां प्रत्येकास झालेली आहे. मग बाबासाहेबांस शिक्षणप्रसाराचें महत्त्व वाटत असलें तर त्यांत नवल कसलें? परंतु महत्त्व पटणें वेगळें व त्याची अंमल बजावणी व्हावी यासाठीं जाणीवपूर्वक सतत प्रयत्न करीत रहाणें व त्या कार्यासाठीं जास्तींत जास्त त्याग करणें हें वेगळें. शिक्षणकार्यास वाहिलेल्या अनेक संस्थांस उदारहस्तें साहाय्य करून त्याचप्रमाणें जो जो विद्यार्थी शिक्षणासाठीं मदत मागायला येईल त्याला जरूर ती मदत देऊन त्यांनीं या कार्याबद्दलची आपली आस्था वेळोवेळीं प्रकट केलेली आहेच. त्याशिवाय शिक्षणप्रसाराचें कार्य अखंड चालू रहावें या सद्धेतूनें त्यांनीं कांहीं विश्वस्त निधीही निर्माण करून ठेविले आहेत. मुलांचें शिक्षण असो वा मुलींचें शिक्षण असो; आजवर त्यांनीं अशा किती संस्थांना व मुलांमुलींना मदतीचा आसरा दिला हें सांगतां येणें कठीण असलें तरी त्यांची संख्या फार मोठी आहे, एवढें येथें नमूद केल्याशिवाय रहावत नाहीं.

आमच्या दृष्टीसमोर त्यांनीं किंवा त्यांच्या प्रेरणेनें स्थापन झालेले जे दोन-तीन शैक्षणिक निधि चटकन आले, त्यांचा अल्प परिचय येथें करून द्यावयाचा आहे.

## एम्. एल्. डहाणूकर एज्युकेशनल ट्रस्ट

देशांतील ज्या होतकरू व हुषार तरुणांस आर्थिक अडचणींमुळें उच्च शिक्षण घेतां येत नाहीं त्यांची सोय व्हावी व देशाला आज ज्यांची फार जरूरी आहे असे शास्त्रविशारद व तंत्रविशारद अधिकाधिक प्रमाणांत उपलब्ध व्हावे या हेतूनें बाबासाहेबांनीं आपल्या स्वतःच्या मिळकतींतून सुमारें पंचवीस लक्ष रुपये किंमतीचा हा विश्वस्त निधि निर्माण केला असून त्याचें सालीना उत्पन्न एक लक्ष रुपयांपेक्षां अधिक येतें. हा विश्वस्त निधि जातिधर्मनिरपेक्ष आहे.

या निधीचें कार्य १९६० सालापासून सुरू झालें असून, त्यांतून होतकरू विद्यार्थ्यांप्रमाणें गरजू शिक्षण संस्थांनाही मदत देण्यांत येते. पहिल्या वर्षी या निधीचा फायदा ६०।६५ विद्यार्थ्यांनीं घेतला तर १९६४ सालीं १५० ते १६० कॉलेज विद्यार्थ्यांनीं उच्च शिक्षण संपादन करण्यासाठीं घेतला. अशा रीतीनें मदत घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वर्षानुवर्ष वाढत चालली आहे.

### या निधीचें विश्वस्त मंडळ

अध्यक्ष—श्री. दत्तात्रय महादेव डहाणूकर; विश्वस्तः—श्री. शांताराम महादेव डहाणूकर, श्री. दिनकर महादेव डहाणूकर, श्री. विनायक दत्तात्रय मुजूमदार व श्री. तनूभाई देवदास देसाई. कार्यवाह—श्री. टी. आर्. एस्. मणी.

## कै. लक्ष्मण बापूजी डहाणूकर ट्रस्ट

आपल्या समाजाची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक स्थिति फार खालावलेली आहे, याचें मुख्य कारण म्हणजे शिक्षणाचा अभाव हेंच होय.

गरीब आईबाप आपल्या मुलांस फी, पुस्तकें वगैरेसाठीं लागणारे पैसे पुरवूं शकत नाहींत. त्यांना कामाकाजास लावतात; त्यामुळें त्यांना अज्ञानांत व दैन्यावस्थेंत दिवस काढावे लागतात. पूर्वीचा जमाना आतां राहिलेला नाहीं. प्रत्येक समाजांतील मुलांमुलींनीं घेतां येईल तेवढें शिक्षण घेऊन देशाचे नागरिक या नात्यानें आपली जबाबदारी पार पाडण्यासाठीं पुढें सरसावलें पाहिजे; याबाबतींत आपला 'महाराष्ट्र पांचाळ समाज' मागें राहूं नये, शिक्षणाच्या सहाय्यानें त्यानें आपला उद्धार करून घ्यावा, या हेतूनें बाबासाहेबांनीं मुंबई व ठाणें जिल्हा या भागांत रहाणाऱ्या समाज बंधुभगिनींच्या कल्याणासाठीं व उन्नतीसाठीं आपल्या पूज्य वडिलांच्या नांवें "कै. लक्ष्मण बापूजी डहाणूकर ट्रस्ट" या नांवाचा दोन लक्ष रुपयांचा विश्वस्त निधि १९४८ सालीं निर्माण केला. त्याच्या व्याजांतून विद्यार्थी-विद्यार्थिनींना शिक्षणार्थ व समाजांतील अनाथ, अपंग व आपद्ग्रस्त स्त्रीपुरुषांस मदत देण्यांत येते. या निधीच्या पहिल्या विश्वस्त मंडळांत शांताराम महादेव डहाणूकर, अध्यक्ष शांताराम काशीनाथ कुर्लेकर व रामराव नथोबा वांद्रेकर हे होते. प्राथमिक खर्चासाठीं शांताराम महादेव डहाणूकर यांनीं एक हजार रुपयांची देणगी दिली.

या निधीमधून प्रतिवर्षी सुमारें बारा ते तेरा हजार रु. शिष्यवृत्त्यांसाठीं व अनाथांच्या मदतीसाठीं दिले जातात. या निधीचा लाभ प्रतिवर्षी १०० ते १२५ विद्यार्थांना व ५० ते ६० अनाथांस होत आहे.

या ट्रस्टच्या स्थापनेपासून ते १९६४ सालापर्यंत शिक्षणप्रसारासाठीं एकूण मदत सुमारें ४४ हजार रुपये करण्यांत आली, तर त्याच मुदतींत अनाथ मदतीसाठीं एकूण ७१२७० रु. खर्च करण्यांत आले.

यावरून गेल्या सोळा वर्षांच्या काळांत या विश्वस्त निधीनें समाजांतील गरजू बंधुभगिनींना मदत करण्याचें कार्य कसें वाढत्या प्रमाणांत चालविलें आहे व उत्तरोत्तर त्याची कशी वाढ होत चालली आहे, याची सहज कल्पना करतां येईल.

अनुक्रम ३८९८२ दि:
क्रमांक १२५६ चरित्र
नों. दि. १६-११-६५



**सध्याचें विश्वस्त मंडळ (१९६४)**

अध्यक्ष : श्री. शांताराम महादेव डहाणूकर. विश्वस्त : श्री. सीताराम जीवन बोळिंजकर, श्री. पुरुषोत्तम केरोबा चाफेकर, श्री. नारायण भगवान डहाणूकर, श्री. एकनाथ आत्माराम सहामते, श्री. ग. पां. सोपारकर, व श्री. रा. न. वांद्रेकर. कार्यवाह : श्री. दिनानाथ त्र्यं. मंत्री.

## एम्. एल्. डहाणूकर कॉलेज ऑफ कॉमर्स, विलापार्ला

आजच्या काळांत प्रत्येक समाजांतील मुलांमुलींनीं शिक्षणसंपन्न बनून उत्कर्ष साधला पाहिजे हें तर खरेंच; त्याचबरोबर आपल्या देशाची आजची गरज ओळखून आपण पावलें टाकलीं पाहिजेत, हेंही तितकेंच खरें आहे. आजकाल आपल्या देशाला तंत्रज्ञांची, शास्त्रज्ञांची व उद्योगधंद्यांकडे वळणाऱ्यांची आत्यंतिक जरुरी आहे. ती जरुरी आम्ही भागविली पाहिजे. सरकार त्या हेतूनें जरूर तें शिक्षण देणाऱ्या संस्था जागोजाग स्थापन करीत आहे, ही समाधानाची गोष्ट आहे.

बाबासाहेब या बाबतींत एकदां बोलतांना आपल्या एका मुलाखतींत म्हणतात कीं, "यापुढें आपण तांत्रिक व औद्योगिक शिक्षणावर सर्व भर दिला पाहिजे. पुस्तकी शिक्षण खूप झालें! अतिशयोक्तीचा दोष पत्करूनही मी अलीकडे असें म्हणत असतों कीं, एल्एल्. बी. परीक्षा कांहीं वर्षें बंद करा! तांत्रिक व औद्योगिक शिक्षणाचें महत्त्व किती आहे हें लक्षांत येण्यासाठींच मी हें अतिरेकानें बोलत आहें."

यावरून बाबासाहेबांचा कल लक्षांत येईल. १९६० सालीं विलेपार्लें येथील पार्ले टिळक विद्यालय या संस्थेस औद्योगिक शिक्षण देणारें कॉलेज स्थापन करण्यासाठीं त्यांनीं तीन लक्ष रु. दिले. या संस्थेशीं एक आद्य संस्थापक या नात्यानें पूर्वीपासून बाबासाहेबांचा संबंध आहे. त्यांच्या इच्छेनुरूप 'एम्. एल्. डहाणूकर कॉलेज ऑफ कॉमर्स' हें

औद्योगिक शिक्षण देणारें महाविद्यालय १९६१ पासून पार्ल्यास सुरू झालें आहे.

## श्रीमंत बाबासाहेब डहाणूकर विद्यानगर, लोणावळा

लोणावळा येथें सौ. वसुंधरा चंदावरकर व गणेश ल. चंदावरकर यांनीं बालवयापासून मुलांच्या मनावर सुसंस्कार घडावे व आदर्श नागरीक या नात्यानें भावी जीवनांतील आपापल्या जबाबदाऱ्या त्यांना उत्तम प्रकारें पार पाडतां याव्या या उद्देशानें 'गुरुकुल' नामक शिक्षण संस्था ता. ६ मार्च १९४९ पासून सुरू केली. तेथें मुलांच्या रहाण्यासवरण्याची व जेवणाखाण्याचीही सोय करण्यांत आली आहे.

त्यासाठीं जें सल्लागार मंडळ नेमण्यांत आलें त्याचें अध्यक्षस्थान बाबासाहेबांनीं भूषित केलें. ही संस्था चालविण्यासाठीं एखादी रजिस्टर्ड संस्था असावी या हेतूनें 'विद्या विनय सभा' अस्तित्वांत आली. तिच्या अध्यक्षस्थानींही बाबासाहेबांची योजना करण्यांत आली. १९६३ सालीं आजारी पडेपर्यंत या सभेचे तेच अध्यक्ष होते.

या शिक्षण संस्थेला आपला हातभार लागावा या हेतूनें लोणावळा येथें असलेल्या आपल्या जमिनीपैकीं सुमारें एक लक्ष रु. किंमतीची सहा एकर जमीन बाबासाहेबांनीं या शिक्षण संस्थेला अर्पण केली (१९५७). त्या जमिनीवर शाळेसाठीं व वसतिगृहासाठीं इमारती बांधावयाच्या होत्या. आर्थिक अडचणींमुळें तें काम रेंगाळत पडलें होतें. बाबासाहेबांनीं त्याबाबतींत प्रोत्साहन दिल्यामुळें १९५९ सालीं महर्षि अण्णासाहेब कर्वे यांच्या हस्तें शीलान्यास (पायाभरणी) समारंभ घडवून आणण्यांत आला. त्यावेळीं बाबासाहेबांनीं आर्थिक अडचण लक्षांत घेऊन संस्थेला ५११११ रुपयांची देणगी जाहीर केली.

१९६१ सालीं वसतिगृहाच्या इमारती बांधून पूर्ण झाल्या. शाळेची मुख्य इमारत बांधावयाची होती. पुन्हां तीच पैशांची अडचण उभी राहिली.

प्रयत्न चालू होते. परंतु पैसा मिळविणें फार जड होऊन राहिलें होतें. अशा वेळीं बाबासाहेबांनीं संस्थेला एक लक्ष चाळीस हजार रु. बिनव्याजी कर्जाऊ दिले व त्यामुळें इमारतीचें बांधकाम १९६३ डिसेंबरमध्यें सुरू करतां आलें.

## डहाणू येथील व्यायामशाळेस मदत

डहाणू येथें १९५९ सालीं सर्व साधनांनीं सुसंपन्न अशी व्यायामशाळा बांधण्यांत आली असून तिचें महत्त्व लक्षांत घेऊन बाबासाहेबांनीं व्यायाम मंदिर बांधण्यासाठीं वडिलांच्या नांवें पंधरा हजार रुपयांची उदार दणगी दिली. त्या व्यायाभ मंदिरास "कै. लक्ष्मणराव बापूजी डहाणूकर व्यायामशाळा" हें नांव देण्यांत आलें आहे.

अशा रीतीनें बाबासाहेबानीं शैक्षणिक कार्यास वाहिलेल्या ठिकठिकाणच्या अनेक संस्थांना उदारहस्तें मदत केली असून, साधारणपणें आमच्या दृष्टीसमोर सहज आलेल्या संस्थांचा नामनिर्देश येथें करण्यांत आला आहे; याशिवाय त्यांचा आर्थिक हातभार लागलेल्या अनेक संस्था आहेत.

## समाजोपयोगी इतर कार्यांस मदत

आरोग्यधाम असो, नर्सिंग होम असो, किंवा देवदेवतांचीं मंदिरें असोत. समाजाला ज्याची जरुरी आहे व ज्यामुळें समाजाचें कल्याण होईल अशा अनेक उपक्रमांस व संस्थांस बाबासाहेबांचा उदार हातभार लागलेला आहे. पुणें येथील जहांगीर नर्सिंग होमला त्यांनीं पन्नास हजार रुपये दिले तर मालाड येथें डॉ. कैलास यांनीं स्थापन केलेल्या एस्. के. पाटील आरोग्यधामला त्यांनीं वीस हजार रुपयांची देणगी दिली. त्याशिवाय अलाहाबाद येथील कमला नेहरू हॉस्पिटल व इतर अनेक ठिकाणच्या अनेक लोकोपयोगी संस्थांना त्यांनीं साहाय्य केलें आहे.

## १६.

# मानसन्मानाचे विविध प्रसंग

**गुणी** व कर्तबगार व्यक्तीच्या वांट्यास मानसन्मानाचे गोड प्रसंग हे यावयाचेच. बाबासाहेबांच्या आयुष्यांत असे अनेक सुप्रसंग वेळोवेळीं येत गेले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ह्या व्यापारी संघटनेचे अध्यक्ष असतां १९३९ सालीं जिनीवा येथील आंतरराष्ट्रीय कामगार परिषदेसाठीं मालकवर्गाचे प्रतिनिधि या नात्यानें सरकारकडून त्यांची निवड झाली, हा त्यांच्या आयुष्यांतील एक माननीय प्रसंग होय.

सरकारच्या व जनतेच्या विश्वासास पात्र होणें, ही मोठी कठीण गोष्ट आहे. अंगीं तशीच अनन्यसाधारण योग्यता असावी लागते. जनतेची आपल्याकडून सेवा घडावी ही बाबासाहेबांची, तारुण्यांत प्रवेश केल्यापासून इच्छा होती. नगरपालिकांच्या द्वारें आपण आपल्या हातून होईल ती सेवा करावी या हेतूनें ते वांद्रे म्युनिसिपालिटी व मुंबई म्युनिसिपालिटीतर्फे झालेल्या निवडणुकांस उभे राहिले असतां दोन्ही ठिकाणच्या मतदारांनीं त्यांच्यावर विश्वास टाकून त्यांना निवडून दिलें, हा त्यांचा गौरवच होय.

परंतु बाबासाहेबांच्या वांट्यास मुंबईचे शेरीफ होण्याचा जो मान आला तो तर फारच मोठा होय.

त्यानंतर त्यांच्या वयास साठ वर्षें पूर्ण झालीं त्यावेळीं, तसेंच त्यांनीं सत्तरी ओलांडली त्यावेळींही मुंबईंत व इतरत्रही त्यांचे सत्कारसमारंभ भव्य प्रमाणांत व संस्मरणीय रीतीनें घडवून आणण्यांत आले. त्यावेळीं

अहेरादाखल त्यांना मौल्यवान् वस्तू व मानपत्रेंही अर्पण करण्यांत आलीं. त्यांनीं स्थापन केलेल्या संस्था व कारखाने आणि उद्योगधंदे यांच्यातर्फे अनेक सत्कारसमारंभ घडून आले; त्यांपैकीं कांहीं सत्कारांची माहिती पुढें करून देण्यांत येत आहे :—

## मुंबईचे शेरीफ बाबासाहेब

औद्योगिक क्षेत्रांतील आपल्या कर्तबगारीच्या बळावर बाबासाहेबांनीं जनताजनार्दनाकडून त्याचप्रमाणें सरकारकडून अनेक मानसन्मान मिळविले; त्यांत महद्भाग्यानें त्यांच्या वांट्याला आलेला मुंबईचे शेरीफ होण्याचा मान हा विशेष महत्त्वाचा होय. आणि तोही परकीय सत्तेच्या अमदानींत मिळाला हें लक्षांत घेण्याजोगें आहे. परकीय सत्तेचा अंमल जवळजवळ संपुष्टांत आलेला होता. १९४७ सालीं मुंबईचे राज्यपाल होते सर जॉन कॉलव्हिल. त्यांच्या हातून राज्यकारभाराचीं सूत्रें ना. महाराजसिंग यांच्या हातीं जावयाचीं होतीं.

ता. २० डिसेंबर १९४७ पासून मुंबईचे शेरीफ या नात्यानें बहुमानाच्या जागीं नेमणूक झाल्याचा सरकारी खलिता बाबासाहेबांच्या हातीं २-३ दिवस अगोदर पडला. ता. १८ डिसेंबर रोजीं राजभवनांत त्यांचा रीतसर शपथविधि होऊन ते आपल्या कचेरीचें कामकाज पाहूं लागले.

शेरीफच्या जागेचा दर्जा व मानमरातब पूर्वीपासून फार मोठा आहे. तो आजवर राखला गेलेला आहे. बाबासाहेबांनीं आपल्या दैनंदिन वागणुकीनें त्यांत उत्कृष्ट भर घातली. प्रकृति ठीक नसे तरीही आपल्या कर्तव्यांत त्यांनीं कधींही हेळसांड केली नाहीं. जी जबाबदारी शिरावर घेतली किंवा आपल्या वांट्यास आली, ती कसोशीनें पाळावयाची हें त्यांचें नेहमींचें धोरण येथेंही सर्वांच्या प्रत्ययास आलें.

निरनिराळ्या क्षेत्रांतील प्रमुख मंडळीशीं परिचय व्हावा व त्यांच्या अडीअडचणींची कल्पना व्हावी, या सद्धेतूनें त्यांनीं दरमहा वेगवेगळ्या क्षेत्रांत वावरणाऱ्या मंडळीस प्रेमाचें आमंत्रण देऊन त्यांना मेजवानी देण्याचा उपक्रम

सुरू केला व तो बाराही महिने अखंड चालविला, हें त्यांच्या एक वर्षाच्या कारकिर्दीचें वैशिष्ट्य सांगण्यासारखें आहे.

वर्षअखेर अधिकारसूत्रें दुसऱ्याच्या हातीं सुपूर्द करण्यापूर्वीं त्यांनीं महाराष्ट्राचे राज्यपाल, मंत्री, परराष्ट्रीय वकील व इतर अधिकारी आणि प्रमुख नागरीक यांस ताजमहाल हॉटेलांत थाटाची मेजवानी देऊन सर्वांचा साभार निरोप घेतला.

**दोन ठिकाणीं नगरपिते होण्याचा मान**

आपल्याकडून जनतेची सेवा घडावी ही बाबासाहेबांची फार मोठी इच्छा. म्युनिसिपालिटीच्या द्वारें जनतेच्या उपयोगी पडतां येतें हें जाणून बाबासाहेब मुंबई म्युनिसिपल कार्पोरेशनच्या निवडणुकीसाठीं 'जी' वॉर्डतर्फे १९३१ सालीं उभे राहिले व कौन्सिलर या नात्यानें यशस्वी रीतीनें निवडून आले. मुंबई म्यु. कार्पोरेशनला सतत सात वर्षें त्यांच्या सेवेचा व अनुभवांचा लाभ घडला. वांद्रे येथील म्युनिसिपालिटींत ते या पूर्वींच निवडून आले होते (१९२८–३१.)

बाबासाहेबांना बांधकामांचा दांडगा अनुभव. त्या अनुभवांचा यथा-योग्य फायदा त्यांनीं दोन्ही नगरपालिकांस वेळोवेळीं करून दिला. त्यांच्या अमदानींत मुंबईतील गटारांची योजना तयार होत आली होती. ही योजना आरंभीं दहा कोटींची होती. कार्पोरेशनचे माननीय व अनुभवी इंजिनीयर नानासाहेब मोडक व बाबासाहेब डहाणूकर यांनीं मिळून एकमेकांच्या विचारें ती एक कोटींत पूर्ण करण्याचें श्रेय मिळविलें! नऊ कोट रुपयांची बचत ही साधी गोष्ट नाहीं. त्यांच्या प्रयत्नांमुळें मुंबईतील रस्ते अस्फॉल्टचे न करतां सीमेंटचे करण्याला प्रारंभ झाला व त्यामुळें हिंदी सीमेंटची मागणी वाढत गेली. अशा अनेक उपकारक सुधारणा बाबासाहेबांच्या कारकिर्दींत घडून आल्या.

या ठिकाणीं जातां जातां एका गोष्टीचा उल्लेख करणें जरूर आहे. बांधकामासंबंधीं बाबासाहेबांचा अनुभव फार दांडगा व उपकारक होऊन

रहाणारा. नगरपालिकांतर्फे बांधकामें निघावयाचीं व त्याची ठेकेदारी कोणीना कोणी पत्करावयाची; बाबासाहेबांचा त्या क्षेत्रांतील अनुभव व त्याचबरोबर वजनही दांडगें असलें तरी नगरपालिकेचे सभासद असेपर्यंत त्यांनीं कोणत्याही बांधकामाची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेतली नाहीं; मात्र आपल्या अनुभवाचा भरपूर फायदा देऊन त्याद्वारें नगरपालिकांचा फायदा व्हावा यासाठीं ते झटले.

## कामगार व अधिकारी यांच्यातर्फे मानपत्र

टिळकनगरमधील कामगार व अधिकारीवर्ग यांच्या सुखसमाधानासाठीं बाबासाहेबांनीं व महाराष्ट्र शुगर मिल्सचे संचालक दादासाहेब यांनीं जें जें करणें जरूर तें केलें व सध्यांही करीत आहेत. या आपल्या उपकारकर्त्यां-बद्दल त्यांना आत्यंतिक प्रेमादरभाव वाटणें स्वाभाविक आहे. बाबासाहेबांच्या एकसष्टीनिमित्त त्यांनींही एक समारंभ घडवून आणून बाबासाहेबांस कृतज्ञता व प्रेमभावपूर्वक जें मानपत्र त्यांना अर्पण केलें, त्यांत सर्वांनीं आपलें अंतःकरण ओतलें आहे. तें मानपत्र पुढें देण्यात येत आहे:—

## परमपूज्य श्रीमान् शेट बाबासाहेब डहाणूकर

यांचे सेवेसी,

आपल्या वयाला दि. १३ डिसेंबर १९४९ रोजीं साठ वर्षे पूर्ण होऊन आपण एकसष्टाव्या वर्षांत पदार्पण करीत आहांत हें पाहून, आम्हां टिळकनगरवासी महाराष्ट्र शुगर मिलच्या कामगार व अधिकारी या सर्वांना अभिमान वाटत आहे.

इ. स. १९३२ मध्यें आपण बेलापुरास साखरेचा कारखाना काढण्याचा निर्णय घेतला त्यावेळीं, विशेषतः महाराष्ट्रांत किती प्रतिकूल परिस्थिति होती हें लक्षांत घेतल्यावरच, आपली दूरदृष्टि व साहस या उद्योगवाढीस आवश्यक अशा गुणांचें पूर्ण आकलन होऊं शकतें

कारखान्याचा संकल्प केला तेव्हां हिंदुस्थान सरकारनें साखरेच्या धंद्याला संरक्षण दिलें नव्हतें; आणि पाश्चात्य भांडवलदार व तंत्रविशारद यांच्याशीं टक्कर देण्याचा प्रसंग आपल्यापुढें होता. ह्या दुहेरी संकटांना न जुमानतां आपण निर्णय घेतला, हें खरोखरच स्पृहणीय होय. त्यावेळीं आपण हिंदुस्थानांतील निरनिराळ्या कारखान्यांचें निरीक्षण केलें, साखरेच्या धंद्यांतील तज्ज्ञांशीं चर्चा केली, आंकडेवारी गोळा केली व त्या सर्व माहितीची आपल्या मनानें नीट चिकित्सा करून निदान ठरविलें. कारखान्याकरितां जागा ठरवितांना आपणांस फार परिश्रम पडले. निर्जन प्रदेशांतून, दगडकांटे यांनीं भरलेल्या रानांतून, आपणांस मार्ग काढावा लागला. दोन ठिकाणें आपण स्वतः जातीनें पडताळून पाहिलीं. अशाप्रकारें आपण शोध करीत असतां, बेलापूरजवळील पाटाचे शेजारीं आपले पायांत कांटा मोडून रक्ताची धार लागली व त्याच ठिकाणीं साखरेचा कारखाना उभारण्याचा आपण निश्चय केल्याचें रोमांचकारी वृत्त समजलें म्हणजे आपलें कौतुक करावेंसें वाटतें.

बेलापूर स्टेशनपासून तीन मैलांवरील खंडाळा खेडेगांवीं आपण प्रथम प्रस्थान ठेवलें व इ. स. १९३३ मध्यें विजयादशमीचे सुमुहूर्तावर आपण कारखान्याचा पाया खणला. कारखाना स्थिर होईपर्यंत आपण अविश्रांत श्रम केले व तहान, भूक, निद्रा, थंडी किंवा ऊन यांची कधींच पर्वा केली नाहीं. आपण प्रथम सुरुवात जरी १५० टन ऊंस गाळण्याच्या यंत्रांनींच केली, तरी शक्य तों आपले देशांतच मिळणारी यंत्रसामुग्री वापरण्यावर आपला जास्त कटाक्ष होता. जीं यंत्रें आपल्या देशांत मिळत नव्हतीं किंवा त्यावेळीं तयार करतां येणें शक्य नव्हतें, तेवढींच आपण परदेशांतून मागविलीं. कारखान्यांतील ऊंस गाळण्याच्या यंत्रांची वाढ आपण फार झपाट्यानें केली. इ. स. १९३५ मध्यें ४००-५०० टन उंसाचा आपला कारखाना झाला, तरी त्यांत रोज १००० टन उंसाचें गळित कसें करतां येईल, ही महत्त्वाकांक्षा सुप्तावस्थेंत आपल्या हृदयांत होती, याची जाणीव त्यावेळीं फारच थोड्या लोकांना असावी. आपण स्वतः व श्रीमंत शेठ दादासाहेब व आपले तज्ज्ञ एंजिनियर्स यांना परदेशीं पाठवून झेकोस्लोव्हाकियामधून अद्ययावत् यांत्रिक सुधारणा

असलेली यंत्र सामुग्री व कारखान्याला आणि लोकांना विजेचा पुरवठा करतां येईल असें वाफेवर चालणारें टर्बाईन मा़गविलें. या यंत्राच्या सहाय्यानें इ. स. १९४१–४२ मध्यें आपण अखिल भारतांत सर्वोत्तम, शुद्ध व स्वच्छ साखर काढण्याचें श्रेय संपादन केलें.

बेलापूर साखर कारखान्याची वसाहत 'टिळकनगर' ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. या वसाहतीस 'टिळकनगर' हें नांव देण्यामध्यें आपली सूचकता विशेषच प्रशंसनीय आहे. लोकमान्य या नांवाशीं समीकरण झालेली राष्ट्रीय वृत्ति आपले ठायीं पूर्णपणें आहे, याची साक्ष हें नामाभिधान देत आहे. कॉंग्रेसमध्यें आपण बरींच वर्षें बहुमोलाची कामगिरी केली आहे, ही गोष्ट आम्हां सर्वांस अभिमानाची वाटते. सुरुवातीला आपण इतर कामगार बंधूंबरोबर तात्पुरत्या चटयांच्या घरांतून वास्तव्य केलें व कामगार-वर्गाच्या जास्तींत जास्त सुखसोई पहाण्याचें ध्येय आपण आतांपर्यंत कधींच डोळ्याआड केलेलें नाहीं. सध्यां कामगार व अधिकारी राहात असलेली वसाहत बरीच मोठी व स्वयंपूर्ण आहे. वसाहतींत मुलांच्या शिक्षणाकरितां मराठी व इंग्रजी शाळा, लोकांच्या करमणुकीकरितां जिमखाना व पार्क, उतारूंना स्टेशनवरून येण्याजाण्याकरितां मोटारची व्यवस्था, आजाऱ्यां-करितां सुसज्ज दवाखाना, स्त्रियांकरितां सूतिकागृह इत्यादि सुधारणा आपण केल्या आहेत. सकस दुधाचा पुरवठा करण्याची तरतूद आपण एक मोठी डेअरी काढून केलेली आहे. कामगारांना वेळोवेळीं पगारवाढ देऊन, त्यांच्या दैनंदिन गरजा भागवितां याव्या म्हणून आपल्या कृपाछत्रा-खालीं चालणाऱ्या कोऑपरेटिव्ह स्टोअर्समधून कापड, धान्य व इतर जिनसा विकण्याची देखील सोय करण्यांत आलेली आहे.

उसाच्या वेगवेगळ्या जातीच्या संशोधनाकडे आपलें फार लक्ष आहे, व त्यांत संशोधन करण्याचें एक स्वतंत्र खातें व प्रयोगालयाची सोय आपण आपल्या कारखान्यांत केली आहे.

अशाच प्रकारचा एक छोटासा कारखाना आपण बेलवंडी स्टेशन-पासून १॥–२ मैलांवर काढला आहे. विसापूरचे तलावापासून जें पाणी

पाटानें देण्यांत येतें, त्यावर ऊंस वाढविण्याची कल्पना प्रथम आपणांलाच सुचली. झाडाझुडपांनीं व्यापलेली जमीन आपण साफ करून घेऊन हळूहळू तीवर ऊंस लावण्यास आरंभ केला. साखरेच्या बाबतींत दर एकरीं जास्तींत जास्त साखर काढण्याचा उच्चांक आपल्या बेलवंडी येथील कारखान्यानें १९३५-३६ मध्यें मिळविला असून महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सनें त्याबद्दलचें पारितोषिक व प्रशस्तिपत्र त्या कारखान्यास दिलें आहे.

साखर कारखान्यांतून निरुपयोगी म्हणून फेकलेल्या मोलॅसिस, फिल्टर प्रेसची मळी, उंसाचीं चिपाडें वगैरे पदार्थांचा उपयोग देशांतील उद्योगधंदे व शेती यांचेकडे अधिकाधिक करण्याचें आपलें धोरण आपण चालविलेल्या डिस्टीलरी, कन्फेक्शनरी, पुठ्ठ्यांचा कारखाना इत्यादि जोडधंद्यांवरून स्पष्ट दिसून येतें.

मुंबईंत आपणांस ओळखत नाहीं असा मनुष्य विरळा! आपले मुंबइतील अमृत ऑईल मिल्स लि., न्यू युनायटेड कन्स्ट्रक्शन अँड इंजिनियरिंग कं. लि., वरळी केमिकल वर्क्स लि., हिंद रेझर अँड ब्लेड कंपनी, वगैरे कारखाने व इतर व्यवसाय सर्वांच्या परिचयाचे आहेत. "महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स" आणि डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनचे आपण बरींच वर्षें सूत्रधार व अध्यक्ष होतां व त्या संस्था नांवारूपास आणण्यास आपणच सर्वस्वीं कारणीभूत आहांत. मुंबईचे शेरीफ होण्याचा मान, आपली कर्तबगारी पाहून आपणांस देण्यांत आला व आपली त्यावेळची कर्तव्यतत्परता व चोख वागणूक पाहून आम्हांस फार अभिमान वाटला.

आपली अशीच भरभराट व्हावी, आपणांस दीर्घायुष्य लाभावें व आपलें उर्वरित आयुष्य समाधानांत जावें, अशी त्या जगन्नियंत्या परमेश्वराजवळ मनोभावें प्रार्थना करून आम्हीं हें मानपत्र अर्पण करीत आहोंत.

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे सत्कार

बाबासाहेबांचा षष्ठ्यब्धिपूर्तीसमारंभ चेंबरच्या विद्यमानें ता. १९ डिसेंबर १९४९ रोजीं ताजमहाल हॉटेलमध्यें मुंबई प्रांताचे विकासमंत्री

ना. मालोजीराव नाईक निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखालीं झाला त्यावेळीं त्यांना मानपत्र अर्पण करण्यांत येऊन त्यांच्या तैलतसबिरीचें अनावरण करण्यांत आलें.

चेंबरचे अध्यक्ष त्यावेळीं नानासाहेब पुराणिक हे होते. ते स्वागतपर भाषणांत म्हणाले, "घरांतील कर्ता माणूस कुटुंबियांकरितां ज्या भावनेनें, आत्मीयतेनें व तन्मयतेनें काळजी घेतो, तशाच भावनेनें बाबासाहेबांनीं चेंबरची काळजी घेतली व घेत आहेत.

त्याप्रसंगीं आलेल्या संदेशांचें वाचन उपाध्यक्ष वामनराव वाघ यांनीं केलें. त्यांत ना. काकासाहेब गाडगीळ, बिहारचे राज्यपाल लोकनायक माधवरावजी अणे, मुंबईचे मुख्यमंत्री ना. बाळासाहेब खेर, मुंबईचे महापौर स. का. पाटील, वालचंद हिराचंद, मुंबई विधिमंडळाचे अध्यक्ष ना. फिरोदिया, न्या. सू. भगवती, डॉ. मुकुंदराव जयकर, सर रघुनाथराव परांजपे, शं. वा. किर्लोस्कर वगैरे निरनिराळ्या क्षेत्रांतील थोरामोठ्यांचे संदेश आले होते.

संदेश वाचनानंतर अध्यक्ष नानासाहेब पुराणिक यांनीं मानपत्र वाचून दाखवून बाबासाहेबांस तें ना. निंबाळकर यांचेहस्तें अर्पण केलें. नंतर ना. निंबाळकरांनीं बाबासाहेबांच्या तैलतसबिरीचें अनावरण केलें.

याप्रसंगीं बाबासाहेबांच्या गुणवर्णनपर भाषणें वाय्. जे. फाजलभॉय, परशुरामपंत गणपुले, डॉ. मो. बा. वेलकर, पन्नालालजी लाहोटी यांचीं झालीं.

अध्यक्ष ना. नाईक निंबाळकर यांनीं आपल्या भाषणांत साखर कारखाना काढण्याच्या सुरुवातीस बाबासाहेबांची व आपली जी भेट झाली तिचा उल्लेख केला व त्यांच्या यशस्वी औद्योगिक जीवनाबद्दल गौरवपर उद्गार काढले. ते पुढें म्हणाले, "महाराष्ट्रासारख्या खडकाळ व डोंगराळ भागांत कारखानदारी उद्योगधंदे यशस्वी झालेले नाहीत, असें असतांही डहाणूकरांनीं एक यशस्वी कारखानदार अशी कीर्ति मिळवून त्यांनीं तरुण महाराष्ट्रीयांना यशाचा मार्ग दाखवून दिला आहे.

बाबासाहेब उत्तरादाखल म्हणाले, "मी महाराष्ट्र चेंबरचीं व इतर कामें केलीं तीं सर्व आपल्या सहकार्यानें केलीं. कोणीही झाला तरी एकटा कांहीं करूं शकत नाहीं. आपणांस आतां स्वातंत्र्य मिळालें आहे व त्यामुळें आपल्यावरील जबाबदाऱ्या वाढल्या आहेत. यापुढें राष्ट्रोद्धाराच्या कार्याला आपण जोरानें लागलें पाहिजे. कळकळ व मेहनत हेंच ध्येय आपल्यापुढें नित्य असलें पाहिजे. मग आपण राष्ट्रकार्यांत यशस्वी झाल्याशिवाय रहाणार नाहीं. लो. टिळकांनीं 'तूं यशस्वी होशील, पुढें पाऊल टाक' असा १९०६ सालीं मला आशीर्वाद दिला. माझ्याकडून या जीवनांत जें कांहीं थोडेंफार घडलें, तें सारें त्यांच्या आशीर्वादामुळें व त्यांनीं दिलेल्या स्फूर्तीमुळेंच होय. आणि आतांही मी आपणांस आश्वासन देतों कीं, माझ्या जिवांत जीव असेपर्यंत मी राष्ट्राच्या उत्कर्षासाठीं झटेन."

या प्रसंगीं बाबासाहेबांस रौप्यकरंडकांतून जें गौरवपर व अभिनंदनपर मानपत्र अर्पण करण्यांत आलें, तें जसेंच्या तसें पुढें देण्यांत येत आहे :

## ADDRESS PRESENTED
To
M. L. DAHANUKAR, ESQ., J. P.
By
Maharashtra Chamber of Commerce, Bombay

Sir,

I offer you sincere greetings and hearty congratulations on behalf of the members of the Maharashtra Chamber of Commerce on this happy occasion, when you have completed sixty years of your life and are entering the sixty-first. A period of nearly forty years of this span of sixty years has been for you a period of continuous and unremitting hard work in the commercial and industrial field is really something which one in your position

अनुक्रम 32522 वि: चारित्र
क्रमांक 9246 नो: दि: 16-11-64



can today justifiably look upon with a measure of pride and a sense of satisfaction when success has crowned your efforts.

Starting life as a firewood and charcoal merchant and subsequently as an ordinary constructional contractor, you have during this period risen to be a manufacturer of sugar, oil, soap, chemicals, etc. Thus solely bý dint of your hard work in circumstances which were by no means propitious, perhaps at time which seemed to be even for—bidding, your capacity for work coupled with accurate calculation and judgement has enabled you to attain the present high position.

Sir, our Chamber views all this record of yours with pride, since you have been one of its founders and a staunch and steady supporter. You have been its Vice-President for many years and the Chamber had the privilege of electing you its President four times. It may not be too much to say that your paternal affection for this Chamber has helped to bring it to day to its present status of eminence and has made it the one central, representative and influential organisation of businessmen and industrialists of Maharashtra. The Chamber is conscious of the good you have done to it, not only by precept, but by example as well.

I need hardly say that it was but a fitting recognition of your position in the industrial world that the Government of India appointed you to be the Indian Employers' Delegate to the XXVth session of the International Labour Conference which was held at Geneva in 1939.

A reference to your civic and other public activities can

also be appropriately made on this occasion in that you have served the Bombay and Bandra Municipalities as an elected Councillor.

You have never been found wanting in helping in a generous manner the cause of national freedom and the Woarking Committee of the congress was the recipient of your hospitality at its Session in Poona. Government of Bombay only last year appointed you to be the Sheriff of Bombay which incidentally gave you the unique honour of being the first sheriff of Bombay in free India.

It is given to few in this world to possess wealth, but it is given to fewer still to show that it can be utilised in a generous yet discriminating manner. You have done this before and you are doing this today. No good cause has escaped your attention. Though your main interests lie in commerce and industry, your outlook has been sufficiently broad and you have freely given to other causes as well. So much for the known-side of your munificence.

Realising as you do the usefulness of an organisation such as the Maharashtra Chamber of Commerce and knowing full well its financial requirements you were good enough to begin the Reserve Fund with a view to enabling the Chamber to have a building of its own in Bombay. It will be happy news to you to know that the Chamber has quite recently negotiated the purchase of a big building where it may be able to shift early. We of this Chamber look to you to guide us to hasten the advent of that happy day.

God has blessed you with a happy family and I trust your three sons will follow in your footsteps.

Let me say that it gives me great pleasure to wish you long life of health, happiness, usefulness and prosperity on behalf of the members of the Maharashtra Chamber of Commerce.

Bombay,
19th December 1949.

For Maharastra Chamber
of Commerce,
G. V. PURANIK,
President.

## १७.

# समारोप

**गेल्या** ५०-५५ वर्षांतील बाबासाहेबांच्या औद्योगिक जीवनाकडे मागें वळून पाहिलें असतां असें दिसून येतें कीं, फार मोठी व दुर्दम्य अशी महत्त्वाकांक्षा उराशीं बाळगून ती फलद्रूप व्हावी या हेतूनें आपलें प्रत्येक पाऊल जपून, सावधगिरीनें व विचारपूर्वक टाकण्याचा त्यांनीं निर्धारपूर्वक प्रयत्न केला व त्यामुळें आपलें उद्दिष्ट गाठण्यांत ते फार मोठ्या प्रमाणांत यशस्वी ठरले. त्यांनीं कोणत्याही बाबतींत घिसाडघाई कधींही केली नाहीं.

त्यांच्या घराण्यांत व्यापारधंद्याची परंपरा होती; परंतु ती केवळ जंगलाचे कूप घेऊन लाकूडफाट्याचा व्यापार दलालांमार्फत करण्याची. आजोबा काय किंवा त्यांचे वडील काय, त्याच रिंगणांत वावरले व आपल्या चिरंजीवानेंही त्याच रुळलेल्या व मर्यादित क्षेत्रांत वावरावें व आहे त्या स्थितींत समाधान मानून रहावें, ही त्यांची सद्भावना. परंतु बाबासाहेबांस जुनें तें सोनें मानून तेवढ्यावर राजी होऊन स्वस्थ रहावयाचें नव्हतें. त्यांची महत्त्वाकांक्षा फार दांडगी. त्यांना नवी परंपरा व नवीन वाटा पाडावयाच्या होत्या. त्यामुळें स्वभाव आज्ञाधारक व वडील मंडळीपुढें वाकणारा असला तरी ध्येयपालनाचा व त्यासाठीं वाट्यास येईल तो त्याग करण्याचा प्रश्न पुढें आला तेव्हां कर्तव्यकठोरतेनें त्यांनीं तात्पुरती का होईना, घराकडे व वडीलधाऱ्या मंडळीकडे पाठ फिरविली. 'देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांच्या तुटी ॥' त्यांना आपल्या ध्येयरूपी देवाची भेट घेण्याची उत्कंठा लागून

राहिली होती. ती त्यांना स्वस्थ बसूं देत नव्हती; तेथें दया आणि माया यांना स्थान नव्हते. ध्येयसाधनाचा मार्ग हा नेहमी कांटेरी व नाना प्रकारच्या संकटांनीं व्यापलेला असतो. त्या ध्येयावरील तुमची निष्ठा प्रखर व जाज्वल्य असावी लागते.

बाबासाहेबांनीं असें कोणतें ध्येय उराशीं बाळगलें होतें? त्यांचें प्राप्तव्य काय होतें? बाबासाहेबांना उद्योगधंदे हाताळावयाचे होते. कारखानदारी करावयाची होती. आपण सर्वच या बाबतींत परावलंबी व दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याचें कमकुवत व नामुष्कीचें जीवन जगत होतों. आपल्या आटोक्यांत येईल तें करून कोणत्या ना कोणत्या बाबतींत तरी परावलंबनाचा डाग धुऊन टाकावा ही होती त्यांची आकांक्षा.

## प्रतिकूल परिस्थितीशीं टक्कर

परकीय सत्तेनें औद्योगिक क्षेत्रांतील आमच्या साऱ्या नाड्या आखडून टाकलेल्या होत्या. औद्योगिक क्षेत्र हें आमचें नव्हतें तर त्यांचें होतें. आणि त्यांतल्या त्यांत महाराष्ट्रीयांना तर त्या क्षेत्रांत कांहींच स्थान नव्हतें. इंडियन मर्चंटस् चेंबर ह्या हिंदी व्यापाऱ्यांच्या संघटनेशीं बाबासाहेबांचा संबंध जडला तेव्हां तर औद्योगिक क्षेत्रांतील महाराष्ट्रीयांचा मागासलेपणा त्यांना अत्यंत तीव्रतेनें जाणवल्याशिवाय राहिला नाहीं. तेथें पारशी, गुजराथी, मुसलमान वगैरे समाजांतील मातबर व्यापारी प्रतिनिधी होते व मोठ्या मानमान्यतेनें वावरत होते. महाराष्ट्रीयांना तेथें फारसें स्थान नव्हतें. आणि कसें असेल? व्यापारधंद्यांकडे ज्यांनीं पाठ फिरविली त्यांच्याकडे लक्ष्मी व लौकिकही पाठ फिरवितो, याची प्रचीति बाबासाहेबांस पदोपदीं येत गेली व त्याबरोबर स्वतःच्या मनाशीं त्यांनीं पक्की खुणगाठ बांधली कीं औद्योगिक क्षेत्रांत वावरूं लागल्याशिवाय महाराष्ट्रीयांना मोलाचें व मानाचें जीवन जगतां येणार नाहीं.

या विचारानें मनाची पकड घेतली असली तरी त्यांना परोपदेशे पांडित्य गाजवायचें नव्हतें. आधीं केलें मग सांगितलें, हा त्यांचा बाणा होता.

हिंमत बाळगून व्यापारीक्षेत्रांत कर्तबगारी गाजवून दाखविल्याशिवाय दुसऱ्यांना उपदेश करण्याचा व त्यांचें यथाशक्ति मार्गदर्शन करण्याचा अधिकार आपल्या वांट्यास येऊं शकत नाहीं, याची त्यांना जाणीव होती.

## बाबासाहेबांचा जीवनाधार

त्याचबरोबर उद्योगधंद्यांच्या अभावीं देश व आपले देशबांधव सर्व परीनें दुबळे बनले आहेत, त्यांच्यांत माणुसकी राहिलेली नाहीं व आर्थिक दृष्ट्या त्यांना दैन्यवाणें जीवन जगावें लागत आहे, याचें मूळ कारण होतें राजकीय स्वातंत्र्याचा अभाव. तें मिळविण्यासाठीं दादाभाई नवरोजी, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांच्यासारखे तत्कालीन थोर व त्यागी पुढारी सरकारशीं झगडत होते. तो फार मोठा व सर्वांच्याच जिव्हाळ्याचा प्रश्न होता; परंतु त्याचबरोबर रोजच्या व्यवहारांत पदोपदीं प्रत्ययास येणारा दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे औद्योगिक क्षेत्रांतील पारतंत्र्य व परावलंबीपणा हाच होय. या बाबतींत परिस्थिति प्रतिकूल असली तरीही झीज सोसून व प्रयत्नांची पराकाष्ठा करून व्यापारधंद्यांत पाय रोवण्याचा प्रयत्न शक्य त्यानें केला पाहिजे. ही सुद्धां देशसेवाच आहे, अशा प्रकारचा गुरुमंत्र लो. टिळकांकडून त्यानीं मिळविला होता. त्या मंत्रावर त्यांची निस्सीम श्रद्धा होती. तो त्यांचा जीवनाधार होता म्हणा ना !

बाबासाहेबांनीं एक दोन नव्हे तर अनेक उद्योगधंदे हाताळले. ते कुठेंही एके ठिकाणीं कायमचे स्थिरावले नाहींत. याचें कारण काय ? एका धंद्याचा जम बसला नाहीं म्हणून तो सोडून दुसरा पकडला; दुसरा जमला नाहीं म्हणून तिसरा ! असें त्यांच्या बाबतींत कुठेंही घडलेलें दिसत नाहीं.

## नेहमीं नव्याच्या शोधांत

हेंच पहा ना. वडिलार्जित लाकूडफाट्याच्या धंद्यानें त्यांनीं आपलें व्यापारीजीवन सुरू केलें. त्यावेळीं तो धंदा विस्कळित स्वरूपांत व दलालांमार्फत चाललेला होता. बाबासाहेबांनीं तो धंदा हातीं घेऊन त्याला

सुसंघटीत व अधिकाधिक किफायतीचें स्वरूप आणिलें. त्याची वाढ केली व तो उन्नत दशेला आणून सोडला.

रोजगारधंदा करणारा कोणीही व्यापारी असो. तो आपलें सारें सामर्थ्य पणाला लावून आपल्या हातांतील रोजगार नांवारूपाला आणून सोडतो आणि त्यांत होणाऱ्या जास्त कमाईवर राजी होऊन आपण आतां कृतार्थ झालों असा समाधानाचा श्वास सोडून मोकळा होतो ! झालें ! त्याची इतिकर्तव्यता येथेंच संपते !

बाबासाहेबांच्या बाबतींत मात्र तसा प्रकार आढळून येत नाहीं. ज्याला स्पर्श केला त्या लोखंडाचें सोनें केलें, यापेक्षां आणखी काय पाहिजे ? संपलें या जन्मींचें आपलें कर्तव्य ! असें त्यांना कधींही वाटलें नाहीं. जें हातून घडलें तें कांहींच नाहीं; त्यापेक्षां किती तरी पटीनें अधिक आपल्या हातून अजून घडायचें आहे, आपणाला जो 'सिंहगड' सर करायचा आहे, तो किती तरी दूर आहे. तेथें पोहोंचण्याचा मार्ग खांचखळग्यांनीं व नाना प्रकारच्या अडीअडचणींनीं व्यापलेला आहे. तरीही तेथें एक दिवस आपणाला पोहोंचायचें आहे, हा निर्धार व तत्संबंधींची जागरूकता त्यांच्या ठायीं सतत वास करीत होती. ती त्यांना एके ठिकाणीं स्वस्थ बसूं देत नव्हती व जें मिळविलें तें बस्स झालें, अशा अल्पसंतुष्टतेच्या आहारीं त्यांना जाऊं देत नव्हती.

नाहीं उत्तेजन, नाहीं कसली अनुकूलता. प्रतिकूल परिस्थितीशीं धैर्यानें टक्कर देत देत एकाकी मार्गक्रमण करावयाचें ! असा होता हा खडतर प्रवास !

**प्रथम भांडवलदार बनायच !**

महाराष्ट्रीय माणूस बुद्धिमत्तेंत कोणाला हार जाणार नाहीं. दुःख भोगील, कष्टाचें जीवन जगेल व पैशांची पर्वा करणार नाहीं ! परंतु या जगांत पैशांशिवाय पाऊल उचलतां येत नाहीं याची त्याला खंत नाहीं ! बाबासाहेब केवळ याच गुणाचें कौतुक करीत नव्हते. जवळ पैसा पाहिजे,

भांडवल पाहिजे. पैशाजवळ पैसा येतो, हा धडा त्यांनी चांगला गिरविला होता. जवळ भांडवल असल्याशिवाय आपण औद्योगिक क्षेत्रांत कांहींएक करूं शकणार नाहीं. तेव्हां प्रथम आपण भांडवलदार किंवा धनिक बनलें पाहिजे. त्याशिवाय आपण कितीही मनोरथ मनांत रचिले तरी ते वाळूच्या किल्ल्याप्रमाणें क्षणांत जमीनदोस्त झाल्याशिवाय राहणार नाहींत, हें ते पूर्णपणें जाणून होते.

मला कारखानदार आणि उत्पादक व्यापारी बनायचें आहे. महाराष्ट्रीय माणूस मनांत आणिलें तर व्यापारी व कारखानदार बनूं शकतो, हें प्रत्यक्ष कृतीनें सर्वांना दाखवून देण्याची उच्च आकांक्षा त्यांनीं उराशीं बाळगलेली होती. ती थोडीच त्यांना एके ठिकाणीं स्वस्थ बसूं देणार?

लाकडाचा धंदा यशस्वीपणें हाताळीत असतां त्याहीपेक्षां अधिक किफायतीचा धंदा कोणता, याची बाबासाहेब टेहेळणी करूं लागले तेव्हां बांधकामाच्या ठेकेदारीचें क्षेत्र त्यांच्या नजरेपुढें आलें. तें क्षेत्र नवीन, नाना अडचणींनीं व्यापलेलें व तेथें सामना द्यायचा होता सत्ताधाऱ्यांच्या गोऱ्या जातभाईशीं!

## परिस्थिती बरोबर झगडण्यासाठीं जन्म

आपण असल्या झगड्यांत पडा कशाला? मिळताहेत चार पैसे लाकडाच्या धंद्यांत, राहूं या त्यांतच समाधान मानून! असें बाबासाहेबांनीं म्हटलें नाहीं, हेंच त्यांचें वैशिष्ट्य! झगडावें लागो किंवा आणखी कांहीं करावें लागो. त्यासाठींच तर आपला जन्म आहे. आपणाला कुठेंही थांबायचें नाहीं. आपला 'सिंहगड' अजून कितीतरी दूर आहे. तेथपर्यंत न थकतां न भागतां आपणाला पल्ला गाठायचा आहे, तो गांठूनच सुटका! हा होता त्यांचा निर्धार!

बाबासाहेबांनीं बांधकामाची ठेकेदारी पत्करली. अडचणीशीं टक्कर देत देत तो व्यवसायही नावारूपास आणिला आणि त्यांत पैसा व मानमान्यताही मिळविली. आपल्या अंगभूत गुणसंपदेच्या बळावर त्या

मराठी ग्रंथ संग्रहालय ...
अनुक्रम 38582 वि: चारित्र
क्रमांक 9246 नों: दि: 19-11-65



व्यवसायला त्यांनीं शोभा आणिली व त्याच्या सहाय्यानें स्वत:ची शोभाही वाढविली. म्हणून येथें तरी ते स्थिर झाले का? नाहीं! त्यांना काबीज करायचा सिंहगड किल्ला अजूनही त्यांच्यापासून दूरच होता.

प्रवास कंटाळवाणा, दगदगीचा तसाच दूरचा! असेना का, आपणाला कुठें घाई लागली आहे! तेथवर मजल दरमजल करीत जायचें आहे, हें मात्र निश्चित. हा त्यांच्या स्वभावांतील आणखी एक विशेष गुण.

### परिस्थितीच्या आहारीं जायचें नाहीं

माणूस निर्धार करतो आणि नंतर परिस्थितीच्या आहारीं जाऊन व त्याला सोडचिट्ठी देऊन मोकळा होतो. ज्याचा स्वभाव धीरगंभीर आहे, ज्याच्या अंत:करणांत ध्येयप्राप्तीची जिवंत तळमळ अहर्निश वावरत आहे; तसेंच चिकाटी, सौजन्य, सहनशीलता, उद्योगशीलता हे ज्याचे सहकारी आहेत, तो विलंब लागला तरी आपलें ध्येय गांठल्याशिवाय राहात नाहीं. बाबासाहेब परिस्थितीच्या आहारीं केव्हांही गेले नाहींत तर अनेक गुणांच्या बळावर परिस्थितीलाच त्यांनीं आपल्यापुढें वाकायला लाविलें; आणि मजल दरमजल करीत ते सतत आगेकूच करीत राहिले.

संधी येतांच तिला घट्ट कशी पकडून धरावी व आपलें उद्दिष्ट साध्य करून घेण्यासाठीं त्या संधीचा सदुपयोग कसा करून घ्यावा, हें बाबासाहेबांपासून शिकावें. शांतपणें वाट पहात बसण्याचा सद्गुण तुमच्याठायीं असला तरी तुम्हांला जरूर असलेली सुवर्णसंधी तुमच्या वांट्याला येतेच असें नाहीं. बाबासाहेबांचे भाग्य थोर आणि म्हणूनच जणूं काय पूर्वनियोजित योजनेप्रमाणें अपेक्षिलेली संधी वेळोवेळीं त्यांच्यापुढें येत गेली व तिचा फायदा त्यांना मिळत गेला.

### नियोजनाचें सामर्थ्य

सध्या आपण नियोजनाच्या काळांत वावरत आहोंत. सर्व क्षेत्रांत नियोजन हा आपला धर्म होऊन बसला आहे. बाबासाहेबांच्या गतकालीन

पन्नास वर्षांच्या औद्योगिक जीवनाकडे वरवर जरी दृष्टिक्षेप फेकला तरीही सर्व घटना नियोजनपूर्वक घडून आलेल्या आढळून येतात. कांहीं गोष्टी त्यानीं नियोजनपूर्वक केल्या असतील; नाहीं असें नाहीं. परंतु साखर कारखाना किंवा इतर कारखान्यांची स्थापना यांपैकीं कांहीं गोष्टी त्यांच्या मनात घोळत असल्या तरी तेथें त्यांच्या नियोजनाची मात्रा लागू पडण्यासारखी नव्हती. तें ईश्वरी नियोजन होतें. तें फळ प्रखर निष्ठेच्या बळावर बाबासाहेबांनीं मिळविलें.

ह्या जगांत दैवी शक्ति वावरत असते. तिला अनन्यभावें शरण जाऊन तिच्या कृपेच्या छत्राखालीं यावें लागतें. जो त्या छत्राखालीं आला व त्या छायेंत वावरूं लागला, त्यानें या जगांत कळिकाळाचेंही भय बाळगण्याचें कारण नाहीं. पन्नास वर्षांच्या काळांत बाबासाहेबां-पुढें भीतीनें गाळण उडविणारीं थोडींथोडकीं का संकटें आलीं? परंतु किंकर्तव्यमूढ होऊन ते कधीं निराशेच्या आहारीं गेले नाहींत. धैर्यगलित किंवा कर्तव्यच्युत झाले नाहींत. याचें कारण त्यांची भगवंतावरील प्रखर निष्ठा.

## निराशा नाहीं, भय नाहीं!

बाबासाहेबांना जसा निराशेचा तसाच भयाचाही स्पर्श कधीं होऊं शकला नाहीं. मोठमोठ्या व्यापारी उलाढालींत मी कसा पडूं, देशांत ज्यांची मानमान्यता फार मोठी, त्यांच्याशीं मी संबंध कसे जोडूं? अशी भीतिदायक शंका त्यांच्या मनाला कधीं शिवली नाहीं. कारण उघडच आहे. 'विष्णुचिया दासा, नाहीं भय चिंता ॥'

ज्याला सद्सद्विवेक किंवा सदाचार म्हणतात तो, माणसाला सामर्थ्य-संपन्न बनवीत असतो. आपल्याकडून नेहमीं पुण्याचरण घडावें. तें जोडणें हाच आपला धर्म. विचारपूर्वक वागण्यासाठीं झटायचें. मागाहून पस्तावा करण्याची पाळी येईल, असें कधींही वागायचें नाहीं. सत्कृत्यांचा हार गुंफून तो भगवत् चरणीं अर्पण करणें, हेंच तर आपलें जीवनकार्य. अशा प्रकारच्या

सात्त्विक विचारांनीं प्रफुल्लित झालेल्या बाबासाहेबांच्या जीवनांत निराशेला किंवा रागरोषाला कधींही थारा मिळाला नाहीं.

## जीवनांत मनोरंजनालाही स्थान होतें

आपल्या कर्तबगारीला वाव मिळावा व स्वतःबरोबर आपल्या देशबांधवांचेंही कल्याण साधावें या सद्धेतूनें औद्योगिक क्षेत्राची निवड केल्यानंतर कोणत्याही परिस्थितींत निराश न होतां बाबासाहेब शेवटपर्यंत त्याच क्षेत्रांत वावरत राहिले. तो वावर त्यांना पुरून उरणारा होता. तरीही ते कधीं कंटाळले नाहींत. एकसारखे कोणत्या ना कोणत्या व्यापांत किंवा चिंतनांत सर्वकाळ ते असत. शारीरिक असोत वा मानसिक असोत, श्रमांमुळें माणसाला थकवा आल्याशिवाय कसा राहील? मग बाबासाहेबांच्या वांट्यास तो येत नसे का? कां नाहीं येणार?

बाबासाहेब श्रमांचें महत्त्व ओळखत असत, त्याचप्रमाणें विश्रांतीचें व मनोविनोदनाचेंही महत्त्व ते पूर्णपणें ओळखून त्याप्रमाणें वागत असत. दिवसभर एकच चिंतन, एकच मनन व एकच निदिध्यास करून कसें चालेल? मनाला मनोरंजनाचा विरंगुळा हा हवाच.

बाबासाहेबांना गायन, वादन व विशेषतः नाट्य यांसारख्या ललित व मनोरंजनाला पोषक अशा कलांची भारी आवड. कुठे नावाजलेला नाट्यप्रयोग असला तर तो पाहून त्यापासून मिळणारा मनमुराद आनंद लुटल्याशिवाय ते सहसा राहात नसत. नाट्यकला ही सात्त्विक मनोरंजन करून व सुबोध देऊन त्याचबरोबर श्रमपरिहार करणारी आहे. तिला आपण व प्रत्येकानें शक्य तेवढें उत्तेजन ज्या ज्या मार्गानें देतां येईल त्या त्या मार्गानें दिलें पाहिजे व या कलेची उत्तम प्रकारें जोपासना झाली पाहिजे, असें त्यांना वाटत असे व त्याप्रमाणें ते वागत असत.

एकदां महाबळेश्वरीं असतां बाबासाहेबांना एका शाळेच्या संमेलनाचें आमंत्रण आलें. तेथें कांहीं नाट्यप्रयोगही व्हायचे होते. बाबासाहेबांनीं तेथें जाण्याचें ठरविलें होतें; परंतु त्यांच्या जाण्यास घरची मंडळी अनुकूल नव्हती.

त्यांनीं घरीं स्वस्थ पडून विश्रांति घ्यावी अशी होती त्यांची इच्छा! त्यावर आपला निर्धार न बदलतां बाबासाहेब म्हणाले होते कीं, "जीवनांत आनंदाचा उपभोग कसा घ्यावा हें तुम्हांला समजत नाहीं! लहानसहान गोष्टींपासूनही आपण मिळेल तेवढा आनंदाचा लाभ घ्यायला शिकलें पाहिजे. मी जाणार आहें तेथें विद्यार्थ्यांनीं बसविलेले नाट्यप्रयोग होणार असले म्हणून काय झालें? त्यांना उत्तेजन कोणी द्यायचें? लहानाला काय किंवा मोठ्यांना काय, उत्तेजनाची फार जरुरी असते. त्यासाठीं आपल्या हातून होईल तेवढें आपण करावें." अशी होती बाबासाहेबांची नेहमींची वृत्ति.

## चित्रकलेची आवड

आपलें मन आनंदी ठेवण्यासाठीं बाबासाहेब नेहमीं झटत असत. उद्योगधंद्यांचा व्याप मागें असला म्हणून काय झालें? त्यांतल्या त्यांत वेळ काढून त्यांचें आनंदाकांक्षी मन कांहींतरी नवीन शिकण्याच्या शोधांत नेहमीं असे. एकदां पुणें येथें राहात असतां आपण चित्रकला हस्तगत करावी; मन रमविणारी व नवनिर्मिती करणारी अशी ती कला आहे. ज्याला शिकण्याची हौस आहे त्याच्या आड वय कधींही येत नाहीं. अजून मला शिकायचें आहे, असें बाबासाहेबांस आयुष्यभर वाटत असे व तो गुण त्यांच्या जीवनांतील उत्तर भागांतही प्रकर्षानें दिसून येत आहे.

त्यांचा एकसष्टी समारंभ अनेक ठिकाणीं थाटामाटांत पार पडला. त्यावेळीं दिलेल्या एका मुलाखतींत बाबासाहेब म्हणतात, "मिळविलेलें पचवावें व त्यांतून नवीन निर्माण करावें हें ब्रीद मी माझ्यापुढें ठेविलें आहे. त्याचबरोबर मुंगीपासून ज्ञान घ्यावें आणि जीवन आहे तोंपर्यंत मला शिकायचें आहे, या समजुतीनें मी वागत असतों."

चित्रकला हस्तगत करण्याचें ठरल्यानंतर त्यासाठी जरूर असलेलें सर्व साहित्य आणवून एका चित्रकलाप्रवीण शिक्षकाजवळून त्या कलेचें शिक्षण त्यांनीं मोठ्या उत्साहभरांत सुरू केलें. शिकण्याच्या बाबतींत उल्हास दांडगा! त्यामुळें तीन महिन्यानंतर ते दिसेल त्या चित्राची

बरोबर नक्कल करण्यांत तरबेज झाले! त्यांनीं अशा रीतीनें पहिलेंवहिलें चित्र रेखाटलें तें गणरायाचें होतें! त्यानीं रेखाटलेल्या त्या गणरायाचें भाग्य थोर! त्यांना चौकटींत बसवून पूजास्थानीं त्यांची योजना करण्यांत आली! त्या विघ्नहर्त्या गणराजांचा फोटो या ग्रंथांत संग्रहीत करण्यांत आलेला आहे.

## उद्योगमंदिराची उभारणी

बांधणें, जोडणें, उभारणें किंवा नवीन रचना करणें, हें बाबासाहेबांचें एक महत्त्वाचें जीवनकार्य. त्यानीं व्यापारधंद्याच्या बळावर व कारखानदारीवर पैसा मिळविला व डहाणूकर उद्योगमंदिराची उभारणी केली ती कोणासाठीं? केवळ डहाणूकर कुटुंबियांसाठींच नव्हे तर सर्वांसाठीं. आपल्या महाराष्ट्रीय बंधूंनीं उद्योगधंद्यांच्या व कारखानदारीच्या बळावर सुसंपन्न व्हावें, दैन्याचा त्याग करून सुखांत व समाधानांत नांदावें, ही त्यांची पूर्वीपासून सदिच्छा. त्यासाठीं विपरीत परिस्थितीशीं झगडून एक महाराष्ट्रीय, उद्योगाच्या व चिकाटीच्या बळावर आदर्श उद्योगपति कसा होऊं शकतो, हें स्वतःच्या उदाहरणानें त्यानीं सर्वांना दाखवून दिलें. 'डहाणूकर उद्योगमंदिर' हें त्याचें प्रत्यक्ष प्रतीक आहे.

## कारखाने

बाबासाहेबांनीं अनेक पूल, रस्ते, इमारती, व देवदेवतांसाठीं मंदिरें बांधलीं. अशा रीतीनें महाराष्ट्रीयांपुढें त्यांनीं कर्तबगारीचा, स्फूर्तिदायक उच्च आदर्श ठेविला आहे तीं सारीं बांधकामें, लोककल्याणासाठीं होतीं हें तर खरेंच; परंतु सतत पन्नास वर्षें खपून, स्वतःचें रक्त आटवून व झीज सोसून त्यांनीं डहाणूकर उद्योगमंदिराची जी आदर्श उभारणी केली, तिची वाखाणणी शब्दांनीं करतां येण्यासारखी नाहीं. एक महाउद्योगी, महत्त्वाकांक्षी व माणुसकीनें भारलेला महाराष्ट्रीय माणूस विपरीत काळाशीं टक्कर देऊन औद्योगिक क्षेत्रांत केवढी महनीय व मोलाची कर्तबगारी गाजऊं शकतो,

यासंबंधी विचार करीत असतां, जीं कांहीं संस्मरणीय व माननीय नावें आपल्या दृष्टिसमोर येतात, त्या यादींत उद्योगपति बाबासाहेब डहाणूकर ह्यांच्या नावाचा समावेश आपण प्रेमादरपूर्वक व ठळकपणें केल्याशिवाय राहणार नाहीं.

अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों. दि. ........

# बाबासाहेबांच्या जीवनांतील कांहीं महत्त्वाचे टप्पे

| | |
|---|---|
| १८८९ | (ता. १३ डिसेंबर) बाबासाहेबांचा जन्म |
| १९०५ | विवाह |
| १९०९ | रोजगारधंद्यास सुरुवात (लाकडांचा व्यापार) |
| १९१५ | काँग्रेससंस्थेशीं व काँग्रेस पुढाऱ्यांशीं निकट संबंधाची सुरुवात |
| १९१८ | बांधकामाच्या ठेकेदारीचा व्यवसाय |
| १९२६ | युरोपचा पहिला दौरा |
| १९२८–३२ | वांद्रे म्यु. चे लोकनियुक्त सभासद |
| १९३३ | महाराष्ट्र शुगर मिल्सची स्थापना |
| १९३३ | बेलवंडी साखरकारखान्याची स्थापना |
| १९३१–३८ | मुंबई नगरपालिकेचे लो. नि. सभासद |
| १९३८–४६ | महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष |
| १९३९ | जिनिवा आंतरराष्ट्रीय मजूर परिषद : मालकवर्गाचे प्रतिनिधी या नात्यानें सरकारतर्फे बाबासाहेबांची निवड |
| १९४२ | साखरधंद्यांतील कृतार्थतेचें वर्ष. महाराष्ट्र शुगर मिलनें शोधून काढलेल्या नवीन व कमी खर्चाच्या पद्धतीनें परदेशी साखरेच्या तोडीची पांढऱ्या शुभ्र, दाणेदार साखरेची निर्मिती. |
| १९४३ | अमृत आईल मिलची स्थापना |


| | |
|---|---|
| १९४४ | न्यू युनायटेड कन्स्ट्रक्शन अँड इंजिनीयरिंग कंपनीची स्थापना |
| १९४७ | मुंबईचे शेरीफ होण्याचा मान |
| १९४८ | वरळी केमिकल वर्क्सची स्थापना. (मार्च गुढी पाडवा) |
| १९४८ | हिंद रेझर अँड ब्लेड कंपनीची स्थापना (दसरा) |
| १९४९ | षष्ट्यब्धिपूर्ति समारंभ |
| १९५९ | महाराष्ट्र साखर कारखान्याचा रौप्यमहोत्सव |
| १९६१ | साखरनिर्मिती क्षेत्रांत महाराष्ट्र साखर कारखान्यानें भारतांत पहिला क्रमांक मिळविला. |
| १९६३ | पक्षघातानें आजारी |
| १९६५ | ७६ वा वाढदिवस व चरित्र ग्रंथ प्रकाशन समारंभ |

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 38982 वि: चरित्र
क्रमांक 9246 नोंद दि: 16-11-65

॥ श्री ॥

## श्री. बाबासाहेब डहाणूकर

### जन्मकुंडली




(जन्म १३–१२–१८८९)

नक्षत्र : पूर्वा पहिला चरण, शके १८११
मार्गशीर्ष व. ६–७ शुक्रवार इष्ट घटि ५६–४०

## घराण्याचा वंशवृक्ष

- देवराम
  - जयराम
    - लालजी
      - बापूजी
        - भगवान
          - मोरेश्वर, नारायण, त्र्यंबक, विठ्ठल
        - लक्ष्मण
          - महादेव, पुरुषोत्तम, वामन, वासुदेव
            - (महादेव) दत्तात्रय, शांताराम, सौ. रत्नप्रभा चिंचणकर, दिनकर
              - (दत्तात्रय) अरुण
              - (शांताराम) दिलीप, भारत, किरण
              - (दिनकर) प्रकाश, मीना
              - शाम, सौ. शुभा राजदेरकर, विजय, आनंद, ललित
        - जयराम
          - तुकाराम
        - यशवंत
          - जनार्दन

दा. क्र. १४४२७
१८८

REFBK-0014427
REFBK-0014427